
# आनंदलहरी

## नारायणी नमोस्तुते



॥ गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ॥

# नारायणी नमोस्तुते

(श्रीमद् देवीभागवताच्या अनुषंगाने
प. पू. दत्तमहाराजांनी केलेली प्रवचने)

संकलन
**श्री गोपाळ गोडसे**

संपादन
**डॉ. सौ. माधूरी पणशीकर**

प्रकाशक
**श्री भगवती प्रकाशन, पुणे**

सर्व हक्क प्रका

प्रकाशक :

श्री भगवती प्रकाशन

६/१ साई विहार, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२.

फोन - ३६९०६०

प्रकाशन दिवस :

२१, फेब्रुवारी, १९९५

मंगळवार, माघ वद्य षष्ठी

पू. दत्तमहाराज वर्धापनदिन, शके १९१६

मुखपृष्ठ :

आमोद दामले

मुद्रक व टाईपसेटिंग :

के. जोशी ॲण्ड को.

सदाशिव पेठ, भिकारदास मारुतीमंदिराजवळ,

पुणे ४११ ०३०. फोन : ४७१४०९

मूल्य : रु. २५/-






जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता करी।।

विघडले देव आणि भक्त। जीव शिवपणें द्वैत।
तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‌गुरु।।

जेथें सारासार विचार। तेथ होय जगोध्दार।
नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी।।
म्हणोनी नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्‌गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे।।


तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।
नानासाधने समर्था। सद्‌गुरूपासीं।।
अंतरी शुध्द ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन।
तेथे बहु भक्त जन। विश्रांति पावती।।

ओम् नमो सद्‌गुरु तूं ज्योतिषी। एकात्मतेचे घटित पाहसी।
चिद्‌ब्रह्मेंसी लग्न लाविशी। ओम् पुण्येंसीं तत्त्वतां॥
वधूवरां लग्न लाविती। हें देखिलें असे बहुतीं।
आपुली आपणा लग्नप्राप्ती। हे अलक्ष्य गती गुरुराया॥

ओम् नमो सद्‌गुरु धन्वंतरी। ज्याची दृष्टीचि निरुज करी।
त्यावांचोनि संसारीं। भवरोगु दुरी न करवे।
ज्या भवरोगाचेनि दर्पें। फुंफात तापलीं त्रिविधतापें।
'मी माझें' येणें संकल्पें। वाग्जल्पें जल्पती॥

जय जय सद्‌गुरु परम। जय जय सद्‌गुरु पुरुषोत्तम।
जय जय सद्‌गुरु परब्रह्म। ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी॥
जय जय सद्‌गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय जय सद्‌गुरु चिदात्मज्योति।
जय जय सद्‌गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्ती चिद्रूप॥

## श्री सद्गुरु




श्री दत्तात्रेय



पू. श्रीपादश्रीवल्लभ





## ॥ श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ॥

भारतीय संस्कृतीत निरनिराळ्या देवतांच्या उत्सवाचे नाते निरनिराळ्या ऋतूंशी जोडलेले दिसते. त्या देवतांचे सणवार आम्हा भारतीयांच्या मनात उत्साह आणि टवटवी निर्माण करतात. नवरात्रोत्सव हा असाच एक आनंदसोहळा! रसरशीत पिकलेल्या धनधान्यातून धरणीचा सुखाचा, संपन्नतेचा श्वासोच्छ्वास ह्या काळात ऐकायला येतो. सृष्टीच्या अंतर्गत शक्तीचा आविष्कार डोळ्यांना सुखावतो.

नवरात्रींचे महत्त्व 'महिषासुरमर्दिनी'च्या कथेतून लहानपणापासून आपण ऐकलेले असते. महिषासुरासारख्या उन्मत्त राक्षसाचा नाश करून, जगदंबेने पृथ्वीला त्याच्या भयापासून मुक्त केले. म्हणून नवरात्रीत 'देवीमाहात्म्य' सांगितले जाते.

प. पू. दत्तमहाराजांची प्रस्तुत पुस्तकातली प्रवचने म्हणजे नवरात्रीच्या निमित्ताने केलेले रसाळ आणि भावपूर्ण असे प्रगट चिंतन आहे. देवी माहात्म्याची चौकट न सोडता, त्यांनी साधकाच्या आध्यात्मिक जाणिवा विकसित व्हाव्या म्हणून निरनिराळे विचार मांडलेले आहेत. हर्षामर्ष, विचार-विकारांच्या आधीन असलेल्या माणसांना मोक्षाची वाटचाल करता यावी म्हणून मूळ देवीभागवतातले विचार कथांच्या माध्यमातून सुलभ केलेले दिसतात. मग त्या विचारांच्या स्पष्टीकरणासाठी रामायण-महाभारतातल्या कथा येतात तर कधी तुलसीदासजी, प्रल्हादजींच्या कथांचे विश्लेषण केले जाते. विवेक, निरहंकारवृत्ती, भक्ती, अहिंसा यांचे महत्त्व मनावर ठसवले जाते. प. पू. महाराजांचा भर वृत्ति

बदलावर आहे. कुठलेही कर्म करताना 'परमात्मा सर्वांतर्यामी आहे' चैतन्यरूपी आत्मतत्त्व म्हणजेच भगवती' हे सूत्र मनाशी पक्के असले पाहिजे असा, इतर सर्व संदर्भात निराग्रही असलेल्या महाराजांचा आग्रह आहे. या सर्व विचार-प्रक्रियेतून जनसामान्यांविषयी असलेली त्यांची कणव पाझरत राहते आणि जगण्याचे अधिष्ठान असलेला नीतिविचार प्रगट होतो.

परमार्थाच्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या साधकाच्या मनात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांना प.पू. महाराजांच्या विवेचनातून समर्पक उत्तरे मिळतात. उदा. 'सुख-दुःखे समेकृत्वा 'चा नेमका अर्थ कोणता ? याचे उत्तर देताना ते म्हणतात, 'सुख-दुःखे समेकृत्वा 'चा अर्थ दुःखाच्या वेळेस सुद्धा सुख मानायचे किंवा सुखाच्या वेळेस, 'मी दुःखात आहे' असे दाखवायचे असा नाही. तर आज जे सुख मिळालंय ते जाणारं आहे, टिकाऊ नाही आणि दुःखही टिकणारं नाही म्हणून दुःखात उद्वेग न करणं, म्हणजे सुखदुःखं अनित्य आहेत असं जाणणं हा आहे, किंवा 'द्वेषरहित अंतःकरण बनणं, शुद्ध सात्त्विक मन बनणं ही पूजा आहे देवाची 'असे ते सांगतात. तेव्हा पूजा शब्दातला व्यापक अर्थ उलगडतो.

इथे देवीमाहात्म्याच्या निमित्ताने जगतांना कोणत्या मूल्यांची जोपासना केली म्हणजे आत्मप्रकाश उजळतो, त्या मूल्यांकडे अंगुलीनिर्देश करून जीवसापेक्ष चिंतन केले आहे. विशेषतः आपल्या आजूबाजूचे सामाजिक जीवन अत्यंत गढूळ झालेले असताना शुद्ध, सात्त्विक जीवनाकडे बोट दाखविणारा आणि मुख्य म्हणजे स्वतः त्याप्रमाणे आचरण करणारा प.पू. महाराजांसारखा महात्मा दुर्मिळच आहे. आचारसंपन्नता, विवेकाधिष्ठित विचार, भक्तीचा ओलावा, पराकोटीची निःस्पृहता ह्या त्यांच्या गुणांचा प्रत्यय, त्यांच्या सहवासात असलेल्या साधकांना नेहमीच येत असतो.

चार्वाक वगळता आपल्या तत्त्वज्ञानाने ऐहिक अभ्युदय हा जीवनाचा अर्थ कधीच मानला नाही. लौकिक उत्कर्षापलीकडे

आत्मकल्याण, आत्महित आहे, कठोपनिषदातला नचिकेता म्हणतो, ' मनुष्य संपत्ती, सत्ता, ऐश्वर्य यांनी कधीच सुखी होत नाही.' पैसा, विषयभोग हे बद्धावस्था निर्माण करतात. तृष्णा, वासना विकारांची गुलामी नष्ट करणे म्हणजे जीवनमुक्ती ! माणसाच्या जीवनाचे प्राप्तव्य जो परमपुरुषार्थ आहे, तो ज्यांनी प्राप्त करून घेतला त्यांचे जीवन उदात्त, मंगल, कल्याणकारी असते. अध्यात्म ही जीवनाची गुणवत्ता आहे. उदात्त जीवनाची ही एक तऱ्हा आहे. असे जीवन प. पू. महाराजांच्या रूपाने आपल्या नजरेसमोर साक्षात् झाले आहे.

आज प. पू. महाराजांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे पुस्तक प्रकाशित करताना आनंद वाटतो आहे. आजच्या या शुभदिवशी आम्हा सर्व भक्तांतर्फे त्यांचे अभीष्टचिंतन. त्यांना आणि त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. आईसाहेब यांना सुखी आणि समाधानी दीर्घायुरारोग्य लाभो अशी ईशचरणी प्रार्थना.

प. पू. महाराजांचा विचार करताना मुण्डकोपनिषदातले ब्रह्मवेत्त्याचे वर्णन आठवते; ते सांगून ही प्रस्तावना संपवते.

' प्राणो ह्येष यः सर्वभूतैर्विभाति
विजानन् विद्वान् भवते नातिवादी ।
आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान्
एष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥'


अर्थ : सर्व भूतमात्रातून प्राणांचाही प्राण प्रकट होतो. त्याला जाणल्यानंतर मनुष्य मितभाषी बनतो. स्वतःच्या ठिकाणी क्रीडा करणारा आणि आत्मतत्त्वात रमलेला आणि तरीही विहित कर्मे करणारा असा महात्मा ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ असतो अशा ' ब्रह्मविदां वरिष्ठः ' असलेल्या प. पू. महाराजांना कोटी कोटी प्रमाण !

डॉ. सौ. माधुरी पणशीकर
११, गुडविल बिल्डिंग, मनमाला टँक रोड,, माहीम, मुंबई - १६

आगामी प्रकाशने :

श्रीमद्भागवत
श्रीकृष्णचरित्र
द्विसाहस्त्री चिंतनात्मक टीका
विवेकचूडामणी भाष्य


# श्री सद्गुरु मांदियाळी



पू. लोकनाथतीर्थ स्वामी



पू. दीक्षित स्वामी



पू. गुळवणी महाराज



पू. धुंडिराज महाराज

॥ सदैव माझे मन वाणी शुध्द । करो तुझे नाम पवित्र सिध्द ॥

ओम् नमो जी श्रीगुरुराया। म्हणोनि सद्भावें लागें पायां।
तवं मीपण गेलें वायां। घेऊनियां तूंपणा।।
नवल पायांचें कठिणपण। वज्रें न तुटे लिंगदेह जाण।
त्याचेंही केलें चूर्ण। अवलीळा चरण लागतां।।

ओम् नमो श्रीगुरु शिवशिवा। नमनें ज़ीवत्व जीवा।
नुरविसी, तेथें देहभावा। कैसेनि रिघावा होईल।।
जीवें घेऊनि जीवा। देहत्व मोडूनि देहभावा।
याहीवरी करविसी सेवा। हें लाघव देवा नवल तुझें।।

एवं स्वस्वरूप द्यावयासी। उदारत्व तुजपासीं।
हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा।।
तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा।
भावो तेथ भरंवसा। तू आपैसा आतुडसी।।



‘ जागृती ’ जागे तुझेनि हरिखें। ‘ स्वप्न ’ स्वप्ना तुझेनि देखे।
‘ सुषुप्ती ’ सुखावे जेणें सुखें। पूर्ण संतोखें तुझेनि ॥
मी जे जे ‘ विषय ’ भोगीं। तें भोक्तेपण तुझे अंगी।
तुझेनि निजसंयोगीं। मी पणें जगीं वर्तविशी मज ॥

सुखेंचि तुझें नाम घेतां। घातु करिसी जीविता।
जीवु घेऊनि तत्त्वतां। होसी सर्वथा कृपाळू ॥
तुझे नामाचें प्रबळ बळ। माथा नुधविती कळिकाळ।
चारी मुक्ति केवळ। होती निश्चळ निजदासी ॥

आतां सद्गुरु वर्णवेना। जेथे माया स्पर्शो सकेना।
ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ॥
न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती।
तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठे ॥

# श्रीमत् देवी भागवत

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ।।**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुदेव चरणारविंदाभ्यां नमः ।**

भगवान् वेदव्यास मुनी जनमेजय राजाला देवीचे महत्त्व सांगताहेत. वेदव्यासांनी सर्वही पुराणे रचली आहेत. आचार्य महाराजांनी पंचायतन पूजा पद्धती करावी असे सांगितले आहे. ते म्हणतात, कर्मानुष्ठान करावं आणि उपासना व भक्ती ही सुद्धा करावी. दोन्ही मिळून करायचे आहे. केवळ कर्म 'सांग' होत नाही. आपल्या मनाकडून, इंद्रियांकडून, शरीराकडून अनेक दोष घडत असतात. निर्दोष अशा प्रकारचे कर्म अनुष्ठान आपल्याकडून होत नाही. आपण कितीही लक्ष दिलं, दक्ष राहिलो तरी आपल्याकडून कर्मानुष्ठान करताना चुका होतात. म्हणून प्रत्येक कर्म शेवटी भगवंताला अर्पण करायचं, त्याचं स्मरण करायचं. आपलं कर्म पूर्ण झालं अशी मनाची समजूत करून घ्यायची आहे. नाही तर रोज कर्म करीत असताना आपल्या हातून अमुक चूक झाली, तमुक स्खलन घडले असंच सारखं वाटतं राहिलं तर मनाला समाधान कसं मिळेल?

म्हणून उपनिषदांमध्ये कर्मानुष्ठानाबरोबर उपासना, भक्ती याचंही स्मरण झालं पाहिजे, हा मोठा शास्त्रीय सिद्धांत सांगितला आहे.

उपासना आणि कर्म यांचा समुच्चय करावा हा एक पक्ष आहे. केवळ उपासना हाही एक पक्ष आहे. पण ती फार मोठी भूमिका आहे. 'केवल भक्ती' असे म्हणणारी मंडळी फार अधिकाराची असतात. 'अकिंचन भक्त' त्यांना म्हणतात. 'आमच्या जवळ काहीही नाही', अशा अकिंचन भावनेने देवाला शरण गेले तर त्याची कृपा होते. अर्थ, काम तर नाहीच. अकिंचन म्हणजे दरिद्री, असा एक अर्थ घेतला जातो. आमच्याजवळ पैसा अडका काही नाही, राहायला घर नाही, अंथरायला, पांघरायला नाही. हा एक अकिंचन शब्दाचा अर्थ आहे. तरी पण धर्मानुष्ठान आपण करीत असलो तर त्याबद्दल एक अहंकार कळत नकळत आपल्या मनामध्ये निर्माण होत असतो. माझ्या हातून एवढे पुण्यकर्म घडले आहे, घडत आहे अशी समजूत, असा एक अहंकार, कर्तृत्व, अभिमान मनामध्ये उत्पन्न झाल्यावर तो जीवात्मा अकिंचन होऊच शकत नाही.

'मी धर्माचरण करतो आहे' असे तो समजतो आणि देवाला शरण जातो आहे. म्हणजे धर्माचरणाचे कर्तृत्व आपल्याकडे घेतो आहे आणि देवाने कृपा करावी म्हणतोय. तो खरा अकिंचन नाही. 'धर्मही माझ्या हातून घडला नाही, देवा,' हे कबूल केलं पाहिजे. 'खरं धर्माचरण मी करू शकत नाहीये' आपल्याकडे नवविधा भक्ती सांगितली आहे. अर्चन भक्तीमध्ये कर्माचा संबंध आहे. देवपूजेमध्ये हातानेच सर्व करायचं आहे ना! मन आहे. शरीर आहे. वाणीने स्तोत्रपठण वगैरे करायचं आहे. कायावाचामनाने होणाऱ्या विविध कर्मांचा अर्चन भक्तीमध्ये समावेश होतो. या अर्चनभक्तीचा पुरस्कार भगवान गोपालकृष्णांनीही केला आहे. पूजा कशी करावी हे शास्त्रात सांगितले आहे.

व्यासांनी देवीगीतेमध्ये बाह्यपूजा आणि अंतर्पूजा असे दोन अर्चनाचे प्रकार सांगितले आहेत. देवीने प्रत्यक्ष उपदेश केलेला आहे दक्षाला. त्याच्यामध्ये हाच सगळा सिद्धांत मांडलेला आहे. कर्मानुष्ठान करण्याबद्दल मनामध्ये अत्यंत प्रेम निर्माण झाले पाहिजे.

**'तया सत्कर्मी रति वाढो'**

म्हणताहेत ज्ञानराज. सत्कर्म दाखवण्याकरता म्हणून करायचं नाहीये. सर्वेश्वर किंवा सर्वेश्वरी म्हणून एक पूर्ण शक्ती आहे, हा महत्त्वाचा सिद्धांत लक्षात घेतला पाहिजे. हे मानणारे लोक नाहीयेत. मोठे मोठे आस्तिक दर्शनकार, नास्तिक दर्शनकार पूर्ण शक्ती नाहीच म्हणतात. त्यांच्या मते सगळं जग अपूर्णच आहे. प्रयत्न करायचा जीवाने आणि आपली अपूर्णता दूर करायची! त्यांना प्रयत्नांनी तरी पूर्णत्व मिळतं की नाही, हे विचारलं तर? आणि प्रयत्नांनी मिळालेलं पूर्णत्व शेवटपर्यंत टिकेल किंवा नाही, ही सुद्धा मागून शंका येतेच की!

त्यापेक्षा, 'अखंड नित्य शक्ती आहे, त्याच्यासारखा कोणी नाही, त्याच्यापेक्षा अधिकही कोणी नाही,' असे मानून कर्मानुष्ठान केलं तर जास्त चांगले. आपण सगळे न्यून आहोत हे खरं आहे.

तर अकिंचनत्व आपल्या ठिकाणी बाणलं गेलं पाहिजे. माझ्याजवळ धर्मबलही नाही, हे कबूल केलं पाहिजे. अर्थ, काम हे बाहेर दिसणारे पदार्थ आहेत. ती साधनं आहेत, पुरुषार्थ आहे. ती नाहीत असं म्हणता येईल कदाचित. परंतु 'धर्म माझ्या हातून झालेला नाही,' असं आपण म्हणत नाही ना! म्हणून देवाला नावं ठेवतो, 'मी एवढं देवाचं करीत असताना माझा मुलगा गेला. माझ्याकडे देवाचे लक्ष जात नाही, किंवा गेलं नाही. अमुक झालं, तमुक झालं.' असे आक्षेप, दोषारोप आपण करत असतो. हे अकिंचनत्व नाहीये.

भगवान् गोपालकृष्णांनी अवतार धारण करून हेच दाखवलं आहे. त्रिविध तपांमध्ये देव, गुरु, द्विज, प्राज्ञ यांची पूजा सांगितली आहे. आपल्या अंतःकरणातून अहंकार गेल्यावर जी पूजा होते ती खरी पूजा. नाही तर बाहेरचा दंभ होईल तो. ज्ञानाच्या साधनामध्ये

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः॥**

ही साधना भगवान सांगताहेत. प्रणिपात हे एक साधन आहे. श्रेष्ठ ज्ञानी महात्मा भेटल्यावर त्याला प्रणिपात करणं, परिप्रश्न करणं आपल्या मनामध्ये आलेल्या ज्या ज्या शंका आल्या असतील – ज्याला आपण चिकित्सा

म्हणतो – त्या अशा ज्ञानी महात्म्यांच्यासमोर मांडायला हरकत नाही. 'हे पटत नाही आम्हाला,' सांगायला हरकत नाही ना! जो समर्थ आहे, समाधान करू शकणारा आहे त्याच्यासमोर शंका मांडायला काय हरकत आहे. तेही एक ज्ञानाचं साधन आहे. परिप्रश्नांमुळेसुद्धा जे काही ज्ञान होण्याकरता प्रतिबंध बुद्धीमध्ये असतात, दोष असतात, ते दूर होतात. निर्दोष बुद्धि झाल्यानंतर ज्ञानाचा बुद्धीमध्ये प्रकाश होतो.

भगवतीचे स्वरूप असे सांगितले आहे -

**या देवी सर्व भूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता।**
**नमः तस्यै नमः तस्यै नमः तस्यै नमो नमः ॥**

शास्त्रज्ञांना बुद्धिवाद हा किती मान्य आहे हे याच्यावरून दिसून येतं. सर्वेश्वरी भगवतीचं बुध्दि हे रूप मानलेले आहे. त्या बुध्दीला नमस्कार केलेला आहे म्हणजे बुध्दिवाद मान्य नाही असे नाही. परंतु कालाच्या ओघामध्ये बुध्दीतही फरक पडतो. असुरी संपत्ती आणि दैवी संपत्ती असा भेद दाखवलेला आहे. काही काळ असुरी, राजसी, तामसी बुध्दी असते. दैवी संपत्ती, जिला सात्त्विक बुध्दि म्हणतात, तीही कालाच्या योगाने येऊ शकते. त्या त्या काळाला अनुसरून भगवंतांचं कार्य चाललेलं आहे. असुरी संपत्ती कशी दूर करायची हे मार्गदर्शन करण्यासाठी अवतार आहेत.

असुरी संपत्ती वाढण्यासाठी देवच कारण होतात. ब्रह्मदेवांनीच काही असुरांना वर दिले आहेत. करणार काय आता ? ब्रह्मदेव मोठे सृष्टिकर्ते आहेत. कोणीही त्यांच्याकडे जाणार. असुरांची चरित्रं वेदव्यासांनी लिहिलेली आहेत. असुरांचे कर्म पाहून ब्रह्मदेवांना त्यांना वर द्यावा लागतो. राजस, तामस, बुध्दि जास्त जास्त वाढत जाते. सर्व प्रकारची बुध्दि सर्वही काळामध्ये असते. पूर्वी अमुक होतं, आता अमुक नाही' किंवा आता अमुक आहे पूर्वी अमुक नव्हतं, असं म्हणण्यात काही अर्थ नाही. आत्ता जास्त राजस आणि तामस बुध्दि झाली असेल. पूर्वीच्या काळामध्ये कमी असेल, पण ती नव्हती असं म्हणता येणार नाही. रामावताराच्या वेळी कैकेयी, मंथरा वगैरे झाल्याच की नाही! आता त्याची उपपत्ति निराळी लावतात. राम वनांत गेले नसते तर रावणाचा नाश

कसा झाला असता, तशी बुद्धीला प्रेरणा झाली, अशी उपपत्ती करण्याची पध्दती आहे. पण अशा प्रकारची बुध्दि सर्वही काळामध्ये आहे. सर्वच काळामध्ये सर्वच सात्त्विक आहे किंवा सर्वच तामस आहे असं म्हणता येत नाही.

अशा प्रकारची बुध्दि भगवत प्रेममय व्हावी. कर्म करत असताना सुध्दा, 'ती ईश्वराची आज्ञा आहे, ते वेद विहित आहे' अशी भावना हवी. वेद म्हणजे ईश्वराचे स्वरूप आहे ना! त्यांनी सांगितलेलं कर्म न करणं म्हणजे आज्ञाभंग होणार नाही का? तेव्हा ते अत्यंत प्रेमाने, आदराने, श्रध्देने झालं पाहिजे. पण तसं होत असतानाही अनेक दोष होण्याचा संभव असतो. ते दोष दूर करण्याकरता भगवत् भक्तीही अंतःकरणामध्ये पाहिजे. कर्मफल दाता एक पूर्ण ईश्वर शक्ती आहे. इतकंच नव्हे तर कर्म करण्याची आपल्याला जी बुद्धि होते आहे. त्या बुद्धीला प्रेरणा करणारीही तीच शक्ती आहे. ही भावना उत्पन्न झाली पाहिजे आणि दृढ झाली पाहिजे. अहंकारादि दोषांमुळे याच्यामध्ये कमी-जास्तपणा होतो. त्याचं फलही मोठमोठ्यांना भोगावं लागतं. हे वेदव्यासांनी देवीचं चरित्र कथन करताना सांगितलं आहे.

भगवान् वेदव्यास महर्षि जनमेजय राजाला देवीचे चरित्र सांगताहेत. हरिश्चंद्र राजाचे चरित्र त्यांनी सांगितलं. हरिश्चंद्र अत्यंत सत्त्वसंपन्न राजा आहे. यज्ञ, दान, तप वगैरे कर्मं व्यक्तीला तर पावन करतातच, पण सर्व समाजालासुद्धा पावन करतात. बुद्धीला प्रेरणा करणारी एक पूर्ण शक्ति आहे. तिच्या प्रेरणेने माझ्या हातून हे कर्म घडते आहे, अशी भावना ठेवली म्हणजे अहंकार निर्माण होत नाही आणि फलदाताही तोच परमात्मा आहे. केवळ भगवत् स्वरूप चिंतन करून पूर्ण शक्ती एक आहे अशा प्रकारची मान्यता मनामध्ये धारण करून कर्मानुष्ठान होते आहे. म्हणजे श्रद्धा, भक्ती, प्रेमही आहे.

हरिश्चंद्र राजाने पुष्कळ यज्ञयाग, दान धर्म केला. त्या दानाकरताच त्याला दुःख भोगावं लागलं ना! विश्वामित्र महर्षि आणि वसिष्ठ महर्षींमध्ये स्पर्धा निर्माण झाली. हरिश्चंद्र राजाचं महत्त्व दाखवायचंय देवीला म्हणून ही

स्पर्धा निर्माण झाली. वसिष्ठ महर्षि हरिश्चंद्राचे गुरु आहेत. त्यांनी हरिश्चंद्राची अशी स्तुति केली की, तो मोठा पुण्यशील राजा आहे. तो अनेक यज्ञयाग करतो. पुष्कळ दान करतो वगैरे. हे विश्वामित्रांना सहन झालं नाही. त्याचं आणखीही काही कारण होतं. हरिश्चंद्र राजाकडूनही काही प्रमाद झाले होते, प्रसंगाने. पुष्कळ मोठी कथा आहे ती. त्यामुळे विश्वामित्रांनी हरिश्चंद्राची परीक्षा पहायचं ठरवलं.

विश्वामित्र काय, वसिष्ठ काय पूर्ण शक्तीपर्यंत पोहोचलेले हे सगळे महात्मे आहेत. आपली अपूर्णता त्यांनी सगळी घालवलेली आहे. त्यांच्या मनामध्ये हरिश्चंद्राची परीक्षा पहायचा विचार उत्पन्न होणं म्हणजे कठीणच आहे. हरिश्चंद्र त्या परीक्षेला टिकलेला आहे. त्याची परीक्षा पहाताना विश्वामित्रांनी धर्माधर्माचा, नीति - अनीतीचा, दयेचा कसलाही विचार केलेला नाही. पण त्या परीक्षेत हरिश्चंद्राला उत्तम यश मिळाले. वेदव्यास मुनि सांगतात, 'जीवित जायचा प्रसंग आला तरी धर्मत्याग करायचा नाही.' त्यामुळे हरिश्चंद्र राजा वसिष्ठ, विश्वामित्र आणि देवादिकांनासुद्धा प्रिय झाला आणि सर्वांनी त्याचे कौतुक केले आणि तो सर्व प्रजाजनांना घेऊन स्वर्गाला गेला. हे महत्त्वाचे आहे.

इंद्राने येऊन त्याला विनंती केली, "तुम्ही मोठे धर्मशील आहात. तुमची बुद्धी तुमच्या ताब्यात आहे. स्वर्गलोकांमध्ये येण्याची तुमची योग्यता आहे." व्यवसायात्मिका बुद्धि जिला म्हणतात. निश्चय आहे. 'हे अमुक एक कर्म असं करायचं' हे ठरल्यावर त्या बुद्धीमध्ये दुसरा विचार येणारच नाही. कधीही बुद्धि बदलणार नाही असा निश्चय झालेला आहे. 'कर्तृत्त्व माझं नाही आणि फलप्राप्ती करून घेण्याची शक्तीही माझी नाही.' एवढा निश्चय व्हायला पाहिजे. म्हणजे भक्तिमिश्र कर्म झालं ते.

हरिश्चंद्र राजा म्हणाला, "माझ्या प्रजाजनांचे माझ्यावर फार प्रेम आहे. त्यांना घेतल्यावाचून मी कसा येणार?" इंद्राने विचारले, "स्वर्गात यायला काही पुण्य नको का त्यांचे? पुण्यकर्म करणाराच स्वर्ग लोकाला जाऊ शकतो. वाटेल तो कसा जाईल? तुम्ही पुण्य केलेलं आहे, धर्मात्मा तुम्ही आहात.

तुम्हाला आम्ही बोलवायला आलो. तुमच्या प्रजाजनांचं तसं पुण्य नाही.''

हरिश्चंद्राने सांगितले की, त्याच्या पुण्यातले काही पुण्य त्या प्रजाजनांना द्यावे. पुण्यपापांचा विनियोग करता येतो की नाही, हाही एक मोठा महत्त्वाचा शास्त्रीय प्रश्न आहे. आपलं पुण्य दुसऱ्याला देता येतं की नाही, पाप दुसऱ्याला देता येतं की नाही, वगैरे पुष्कळ प्रश्न आहेत. पण दुसऱ्याला दिलं असं समजायचं. संत महात्म्यांची सेवा कशाकरता करायची? ज्ञानी संत महात्म्यांना पुनर्जन्म नाही. पुन्हा शरीर मिळणार नाही. पण साचलेली जी पुण्यपापं ती अजून कुठं संपली आहेत? हा जन्म मिळाला. पण त्यांचंसुद्धा अजून पुष्कळ संचित असेल की! सिद्धांनी एक विचार मांडला आहे की ज्ञान झालं की सर्व संचित कर्मांचा नाश होतो. कारण त्या महात्म्यांची ''मी करतो'' ही (कर्तृत्व) बुद्धीच गेल्यामुळे कर्माचा संबंधच संपून गेला आहे ना! क्रियमाण कर्मांचाही संबंध नाही. झालेल्याही कर्मांचा संबंध उरला नाही.

दुसरा एक व्यावहारिक दृष्टीने त्यांनी सिद्धांत सांगितला की, ज्ञानी महात्म्याची सेवा करावी, निष्कपट, शुद्ध बुद्धीने. का तर त्याला आता सगळी कर्मं संपवून जायचंय ना! पुन्हा जन्म नाही. देहसंबंध नाही. मग त्याच्या हातून झालेली पुण्य पापात्मक कर्मं कशी संपतात? व्यावहारिक दृष्टीने हे उपनिषदांमध्ये सांगितले आहे. त्या महात्म्याच्या घरामध्ये जी काही संपत्ती असेल ती मुलांना मिळते. तसं शास्त्रानेच सांगितलं आहे. त्या ज्ञानी महात्म्याची अत्यंत प्रेमाने, श्रद्धेने जे सेवा करणारे आहेत त्यांच्याकडे ते पुण्य जाते. पुण्यपापाचा विनियोग होऊ शकतो. हेही यावरून दिसतं.

द्वेष करताना सारासार विचार माणसाच्या मनात येत नाही. शिशुपालाने जन्मापासून श्रीकृष्णाचा द्वेष केला. दुसरं काही केलं नाही. श्रीकृष्णाने रुक्मिणीला हरण करून नेल्यापासून तर त्याचा द्वेषाग्नी अधिकच भडकला होता. त्याचंही नारदांनी वर्णन केलेलं आहे. द्वेषसुद्धा शिशुपालासारखा करता आला पाहिजे. पण आमचं काय? जरासं काही बरं झालं, 'आहे हो देव आहे. देवाने आमचं बरं केलं.' हेही म्हणायची तयारी आहे. थोडंसं काही

प्रतिकूल घडलं की 'देव नाही' म्हणायची तयारी आहे. म्हणजे अर्धवटपणा आहे आमचा. देव आहेही म्हणायची तयारी, नाहीही म्हणायची तयारी. काय समजायचं काय?

ज्ञानी महात्म्याला ज्ञान मिळवण्याकरता किती जन्म, केवढे प्रयत्न करावे लागले असतील! सद्गुरूंची त्याच्यावर केवढी कृपा झालेली असेल. म्हणून संसार सगळा मनातून गेलेला आहे. निर्वासन मन झालेलं आहे. शुभ वासनाही राहिली नाही मनामध्ये आणि अशुभ वासनाही राहिलेली नाही. केवढी भूमिका आहे ती! पण हा विचार आपल्या मनामध्ये येत नाही. आपल्या प्रमाणेच हाही एक मनुष्य आहे असे आपल्याला वाटते. या भावनेतून द्वेष निर्माण होतो. असा द्वेष करणाऱ्या मनुष्याला ज्ञानी माणसाचं पाप जातं. तो ज्ञानी महात्मा मोकळा झाला. तो कोणाला काही देत नाही. शाप नाही, अनुग्रह नाही, काही नाही. 'हा महात्मा ईश्वररूप आहे.' अशी भावना ठेवून सेवा करणाऱ्यांच्याकडे त्याचं सगळं पुण्य जातं. म्हणून संत महात्म्यांकडे जाताना ही दृष्टी ठेवली पाहिजे. 'खरा आहे की नाही,' हे पाहण्याकरिता जायचं नाही. आपलं काही तरी कल्याण करून घेण्याकरता जायचं. तर आपोआप ते पुण्य मिळतं. शास्त्रकारांनी व्यावहारिक दृष्टीने सिद्धान्त मांडलेला आहे आणि तसे शक्यही आहे. महात्म्याच्या मनाची प्रसन्नता झाल्यानंतर सेवा करणाऱ्याला पुण्य का मिळणार नाही?

हरिश्चंद्र राजाने सांगितल्याप्रमाणे त्याचे पुण्य त्याच्या प्रजाजनांना देऊन इंद्राला त्या सगळ्यांना स्वर्गात न्यावे लागले. हे चरित्र ऐकून जनमेजय राजाला आश्चर्य वाटले.

शताक्षी हा एक देवीचा अवतार झालेला आहे. देवी महात्म्यामध्ये शताक्षी, दुर्गा, शाकंबरी असे देवीचे अवतार सांगितले आहेत. हरिश्चंद्र राजा देवीचा उपासक होता आणि ती बुद्धिरूप देवी त्याच्याजवळ होती. देवीच बुद्धि रूपाने जवळ असल्यावर मग काय? उत्तम. सर्व प्रकारचे कल्याणच होणार आहे. त्यामुळे हरिश्चंद्र राजाचे धैर्य व सत्त्वबल विलक्षण होतं. "हरिश्चंद्र राजाने

ज्या शताक्षी या देवीच्या अवताराची उपासना केली त्या अवताराचे चरित्र मला सांगा'' अशी प्रार्थना जनमेजय राजाने केली. देवीचं चरित्र ऐकण्याची श्रद्धा, प्रेम त्याच्या मनात उत्पन्न झाले. वेदव्यासांसारखे सांगणारे त्याला भेटलेले आहेत. देवीचं चरित्र ऐकताना अश्वमेध यज्ञाचे पुण्य आपल्याला मिळत आहे ही भावना पाहिजे. म्हणजे केवल श्रवणभक्तीसुद्धा उत्तम कल्याण करणारी होते. सर्व भक्तींचा समन्वय असणे हे कठीण आहे. श्रवण, अर्चन, वंदन, दास्य, वगैरे सर्व भक्तींचं आचरण करणं फार कठीण आहे.

कोणाला देवाची पूजा आवडत नाही. 'प्रत्यक्ष भगवतीच आपल्या समोर  आहे आणि तिची आपण पूजा करतो आहोत' या विचारात निमग्न झालं पाहिजे. तिला नैवेद्य देतो आहोत. आपण तिची प्रत्यक्ष आरती करतो आहोत अशी तन्मयता साधली जाणं सर्वांना शक्य नाहीये. एकेका भक्तीमध्ये एकेक निष्णात झालेले असतात.

गणेश पुराणात मुद्‌गल ऋषींचं वर्णन केलेलं आहे. ते नवविधा भक्ती करणारे होते. श्रवणही तितक्याच आदराने, श्रद्धेन करीत.

जनमेजय राजाची प्रार्थना ऐकून व्यास महर्षींना आनंद झाला. ते म्हणाले, ''राजा, शताक्षी देवीचा अवतार कशाकरता झाला, काय झाला हे सांगतो तुला. देवीभक्त तू आहेस. तुला देवीचं चरित्र श्रवण करण्याची इच्छा उत्पन्न झालेली आहे, तेव्हा मी सांगणार नाही, असं कसं होईल? तुला ते अवश्य सांगितलं पाहिजे. सर्वप्रथम हा अवतार होण्याचे कारण सांगतो.''

देवांचीही परंपरा आहे आणि दैत्यांचीही परंपरा आहे. सगळे पांडव म्हणजे देवांचेच अंश आहेत. मंत्रबलाने ते निर्माण झालेले आहेत. अर्जुन हा इंद्राचा पुत्र होता. याच देहाने तो स्वर्गलोकात जाऊन राहूनही आला होता. हे वेदव्यासांनीच वर्णन केलेलं आहे. देवपरंपरा ही चालू आहे. जगत्कार्य करण्याकरता देवाचा अवतार होणार. ईश्वराला सहाय्याची आवश्यकता आहे की नाही हा प्रश्न निराळा आहे. पण ईश्वराने मनुष्यरूपाने अवतार धारण केल्यावर इतर देवांनी अवतार धारण करून त्याला सहाय्य करण्याची प्रथा

आहे. ब्रह्मदेवांनी देवांनाही सांगितलेलं आहे – भगवान अवतार घेऊन येणार आहेत. तुम्हीही यदुकुलात जन्म घ्या, त्यांना सहाय्य करा. भगवान श्रीकृष्णाच्या चरित्रामध्ये त्यांनी एकट्यांनीही कार्य केल्याची वर्णनं आहेत तशी इतरांचे सहाय्य घेऊनही कार्य केल्याची वर्णनं आहेत. उत्पत्ती, स्थिती आणि लय करण्याकरता त्यांनी वेगवेगळी रूपं धारण केली. ब्रह्मदेवांच्या रूपाने उत्पत्ती करायची. महाविष्णूंच्या रूपाने संरक्षण करायचं, रुद्र रूपाने सर्व जगाचा संहार करायचा. ही सगळी भिन्न भिन्न अशा प्रकारची कार्ये चालू आहेत. गोपालकृष्णांच्या रूपामध्येही त्यांनी केलेली दिसतात.

सर्व वासरे आणि गोपालांना ब्रह्मदेवांनी नेले. कोणीच नाही. गोकुळामध्ये जायचं कसं? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. गोकुळातले लोक म्हणणार कृष्णाबरोबर आपली मुले व वासरे गेली होती. त्या गाईंनाही तसंच वाटणार आणि जर कृष्ण एकटाच परतला तर म्हणतील, 'ती सगळी कुठे आहेत? हा एकटाच कसा परतला? एकही वासरू किंवा गोपाळ याच्या बरोबर नाही.' वासरं न दिसल्यामुळे गाईंना किती शोक होणार. म्हणून त्या दिवशी गोकुळात जाताना भगवान सर्व वासरे आणि गोपालांचे रूप धारण करून गेले. असं कार्य वर्षभर चाललं होतं. ब्रह्मदेवांनी उत्पन्न केलेले गोपाल आणि वासरं वेगळी आहेत. ती त्यांची मर्यादित शक्ती आहे. इथे आता भगवानच सर्व रूप झालेले आहेत. म्हणजे उत्पत्तीचं कार्यही करावं लागलं त्यांना. स्थिती तर आहेच आहे. किती तरी जीवांचे संरक्षण केलेले आहे. संरक्षणाकरताच तर त्यांचे अवतार झाले आहेत. आणि संहार! भयंकर संहार केलेला आहे.

प्रत्येक वेळेला तेवीस अक्षौहिणी सैन्य घेऊन जरासंध हल्ला करायला येत होता. जरासंधासारखा पराक्रमी राजा त्या वेळेला दुसरा कोणीही नव्हता. उद्धवजींनी सांगितले, "सर्व पृथ्वी जिंकली पाहिजे. जरासंधाचा वध झाल्याशिवाय राजसूय यज्ञ करता येणार नाही." त्याचे सैन्यबलही पुष्कळ आहे. त्याच्याजवळ पैसा आहे, सत्ता आहे, पराक्रम आहे. प्रत्येक वेळी वाटेल तितकं सैन्य जमा करून तो चालून यायचा. प्रत्येक वेळेला राम कृष्ण ते सैन्य

मारीत असत. असुरी शक्तींच्या संहारासाठीच तर ते आले होते अवतार घेऊन. कृष्णदयार्णवांनी 'हरिवरदा' ग्रंथात असं लिहिलं आहे की, जरासंध हा वृत्तचित्री दैत्याचा अंश होता. कोणच्या कोणच्या दैत्यांचे कोणचे कोणचे अंश त्या वेळेला जन्म घेऊन आले होते, त्या सर्वांचा श्रीकृष्णांनी संहार केला. हे संहारकार्य चाललेलं आहे. संरक्षण कार्य चाललेलं आहे. नरकासुराचा नाश करायला ते एकटेच गेले होते. यादव कुठे होते बरोबर? सत्यभामा आणि ते गरुडावर बसून गेले. एकट्यानेच नरकासुराचा, त्याच्या प्रधानाचा आणि पुत्रांचा नाश केला. 'देवाच्या सहाय्याला मी गेलो' असा कोणी अभिमान बाळगण्याचे कारण नाहीये. पूर्णशक्ती आहे ना!

पूर्णशक्तीने दुसऱ्याचे सहाय्य घ्यायचं म्हणजे दुसऱ्याला मान द्यायचा इतकेच. श्रीकृष्णांनी उद्धवजींना विचारले, "काय उद्धवजी, कसं करायचं आता? तुम्ही राजनीतिज्ञ आणि बृहस्पतींचे शिष्य आहात. २०,८०० राजांना जरासंधाने तुरुंगात टाकले आहे. दिग्विजयाच्या वेळेला जे समोर आले त्या सर्वांना त्याने बांधून ठेवलेलं आहे. त्या राजांचा निरोप आलेला आहे - आम्हाला मुक्त करा. आणि नारदांनी युद्धिष्ठिराचा निरोप दिलेला आहे, की 'तुम्ही आमचा राजसूय यज्ञ पार पाडा.' हे धर्माचं कार्य उत्पन्न झालेलं आहे आणि राजांना मुक्त करणं हेही मोठंच कार्य आहे. सर्वही समाजाचे संरक्षण करणारे हे राजे आहेत ना. आता काय करावं?"

काय करावं हे श्रीकृष्णांना कळत नव्हतं असं नाही. पण उद्धवजींना मान दिलेला आहे.

वानरांमध्ये कोण कोणच्या देवाचे अंश होते याचं वाल्मिकींनी वर्णन केलं आहे. रामचंद्रांना सहाय्य केलं त्यांनी. रामचंद्रांनी ह्या वानरांच्याबद्दल त्यासाठी कृतज्ञता व्यक्त केली. मानवी अवतार धारण केल्यावर हे सर्व केलं पाहिजे.

हिरण्याक्षाच्या कुळात दुर्गम नावाचा दैत्य जन्माला आला होता. असुरी संपत्ती - बुद्धीवर वाईट संस्कार कसे असतात – कशी असते त्यांची

बुद्धी याचं हे उदाहरण आहे. त्या दुर्गम दैत्याला देवांचे राज्य घ्यायचे आहे. दैत्याच्या करता 'रसातल' म्हणून ईश्वराने या सृष्टीत स्वतंत्र स्थान निर्माण केलेलं आहे. तिथे सगळे दैत्य राहातात. पण देव ज्या स्थानात राहातात तेही स्थान त्यांना हवे होते. अशी वासना असणारी काही मंडळी असतात. हिरण्यकश्यपूनेही असा विचार केला होता. म्हणून सर्व द्विजांना, ऋषींना त्रास देण्याची आज्ञा त्याने आपल्या असुरांना दिली.

या दुर्गम दैत्याने असा विचार केला, की जोपर्यंत देव – ब्राह्मणांकडे वेद आहेत तोपर्यंत त्यांना जिंकता येणार नाही. हा त्याचा विचार बरोबर आहे. कारण वेदामध्ये सर्व ज्ञान आहे ना! धनुर्वेद हा ऋग्वेदाचा उपवेद आहे. आयुर्वेदही त्याचाच उपवेद आहे. शस्त्रास्त्र निर्मिती कशी करावी हे सुद्धा वेदांमध्ये सांगितलेलं आहे. प्राचीन काळची अस्त्रविद्या ही फक्त मानसिक शक्ती होती. योगसामर्थ्य, सगळ्या सिद्धी या सुद्धा मानसिक शक्तीचा विकास आहेत. तिथे अर्थव्यय (म्हणजे खर्च) नाही. आज एक अणुबाँब निर्माण करायला कोट्यवधी रुपये लागतात असे म्हणतात आणि आता त्यांची कपात करायची, कुठे तरी बुडवून टाकायच्या गोष्टी चालल्या आहेत म्हणे. पण ती निर्माणच का केली ? एवढा प्रचंड खर्च का केला? सर्व जगाचा नाश या बाँबमुळे होईल ही भीती वाटू लागली. मग ती निर्माण करताना का वाटली नाही? हा जो नव्याने विचार सुरू झाला आहे यावरून का होईना ईश्वर शक्ती मानावी लागते.

अर्जुन हा युद्धाला उभा राहिल्यावर सर्व अस्त्रदेवतांचे स्मरण करीत असे. त्या सगळ्या देवता त्याच्या समोर येऊन उभ्या रहात. त्यामुळे तो निर्भय होता. तो मोठा देवभक्त, गुरुभक्त आणि उपासक होता. त्याला सर्वही अस्त्र विद्या माहीत होत्या.

दुर्गम दैत्याने विचार केला, देव वेदातून अस्त्रविद्येचे ज्ञान मिळवून दैत्यांचा नाश करतात. दुसरं कारण मंत्रशक्ती. अस्त्रविद्या म्हणजे मंत्रशक्तीच आहे. वेदाभ्यास केलेले मोठे मोठे ज्ञानी ऋषी यज्ञ करतात. यज्ञामध्ये सर्व

देवांना हविर्भाग देतात. मंत्राने देवांना हविर्भाग दिल्यानंतर त्यांचे बल जास्ती वाढते आणि यज्ञ करणाराचेही बल जास्ती वाढते. तेव्हा हे यज्ञ बंद झाले पाहिजेत आणि हे सर्व ज्ञान ज्या वेदांमध्ये आहे ते वेद आपल्या ताब्यात आले पाहिजेत, अशी त्या दुर्गमाची इच्छा होती. देवांना अध्ययन करण्याची जरूर नाही. जन्मतःच वेदांचं स्वयंप्रकाशी ज्ञान त्यांना आहे. हे सगळं वेदज्ञान आपल्याकडे घेतलं पाहिजे. म्हणजे देवांचा, विप्रांचा, सगळ्यांचा नाश आपोआप होईल. याकरता प्रत्यक्ष लढाई वगैरे करायची जरूरी नाही. सगळ्यांचा बुद्धिनाश करायचा म्हणजे संपलं. ही ज्ञानाची सत्ता आपल्या हातामध्ये आली पाहिजे हा विचार त्याने केला.

व्यास महर्षि सांगताहेत, ' राजा, या दुर्गम दैत्याचे पूर्वजसुद्धा मोठे तपस्वी होते. ऋषी मंडळीही तपश्चर्या करतात, देवतांचा प्रसाद संपादन करतात. आणखी आत्मकल्याण करून घेतात. दुसऱ्याचा द्वेष करून आत्मकल्याण होतं की नाही, हाही विचार करण्यासारखा आहे. सर्व देवांचा नाश करायचा म्हणजे त्यांची सत्ता, राज्य तर ताब्यात घ्यायचंच पण त्यांची बुद्धीही नष्ट करून टाकायची. त्याकरता तपश्चर्या करायची. तपश्चर्येने काहीही साध्य करून घेता येतं. चांगलं फळही आहे, वाईट फळही आहे.

श्रीकृष्णांचा नाश करण्याकरता त्या काशी राजाच्या मुलाने काही अभिचारिक यज्ञ केला म्हणतात. शंकरांनी त्याला सांगितले, "तू हा अभिचारिक यज्ञ कर म्हणजे अग्निकुंडातून निघालेला अग्नि तुझ्या शत्रूचा नाश करील." यालाच करणीही म्हणतात. पण त्याच वेळी शंकरांनी त्याला हेही सांगितले, जर तुझा शत्रू अब्रह्मण्य असेल तर त्याचा नाश होईल पण जर तुझा शत्रू धर्मशील महात्मा असेल तर मात्र तो अग्नि तुझाच नाश करील. आणि शेवटी तसंच झालं. तो राजपुत्र तर गेलाच पण त्याला अशा अभिचारिक यज्ञात सहाय्य करणारे ऋषि वगैरे सर्वही जळून गेले. संपूर्ण काशी नगराचा नाश झाला.

दैत्यांच्या जवळसुद्धा धर्मबुद्धी आणि श्रद्धा आहे. पण ती श्रद्धा साहंकार आहे. त्यांचे काम, राग, दंभ वगैरे बल आहे. त्यांचे धर्माचरण हे दंभरूप

आहे. दाखवण्याकरता आहे. देवांचा पराजय करणारे, नाश करणारे आपल्यासारखेच दैत्य आपल्या कुळामध्ये निर्माण व्हावेत म्हणून यज्ञ करायचा. दुर्योधनही वरचे वर यज्ञ वगैरे करायचा. धर्मराजच यज्ञ करतो असं नाही. मीही यज्ञ करतो. लोकांनी पांडवांना विसरून जावं हा त्याचा यज्ञ करण्यामागचा हेतू होता.

तो दुर्गम दैत्य तपश्चर्या करण्याकरता हिमालय पर्वतावर गेला. देह पडेपर्यंत तप करायचे. विहीर किती खणायची याला काय उत्तर द्यायचे? पाणी मिळालं म्हणजे विहीर खणायचे थांबवायचे. तसं आहे. तसं आपल्याला जे फळ मिळवायचं आहे तोपर्यंत तपश्चर्या करायची. अभ्यास, अध्ययन, परमेश्वराची उपासना करणं याच्या योगाने हे सर्व सामर्थ्य मिळतं. पण तो मार्ग दुर्गमाने सोडलेला आहे. आणि त्या तपश्चर्येचा उद्देशही चांगला नाहीये. ज्ञान आपल्या ताब्यात घेऊन सात्त्विक गुणसंपन्न देवांचा नाश करायचा, विप्रांचा नाश करायचा हा उद्देश आहे.

फळ मिळेपर्यंत तपश्चर्या करायची हा एक निश्चय पाहिजे ना! तपश्चर्या करायला सगळे प्रवृत्त होतील पण सगळे शेवटपर्यंत टिकणार नाहीत. तितका निश्चय टिकला पाहिजे. शरीरकष्ट आहेत. इतरही किती तरी कष्ट आहेत. तपश्चर्या म्हणजे – तप धातूचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ 'क्लेश'. 'तप संतापे' हाही अर्थ पाणिनीने केला आहे. आणि तप 'आलोचनैः' हाही अर्थ आहे. अत्रि महर्षि पहाटे नदीवर जाऊन माध्यान्ह कालापर्यंत तप करायचे. ते आलोचन आहे. परब्रह्म सच्चिदानंदघन परमात्म्याचे चिंतन करीत समाधी लावून बसायचे. प्रारंभाचे तप म्हणजे क्लेश आहे. संताप म्हणजे शरीराला क्लेश इंद्रियांना क्लेश, मानसिक क्लेश. सगळे क्लेश सहन करून आपल्याला अंतिम फळापर्यंत जाऊन ते मिळवायचे आहे. फलाची वासना अंतःकरणात असल्यावर आपण ते क्लेश सहन करतो.

भूक लागलेली आहे. स्वयंपाक तयार नाहीये. कोळसे वाळलेले नाहीयेत. (आता गॅसची सोय झालेली आहे त्यामुळे धूर होण्याचा प्रश्न नाही.

पवित्र अपवित्र विचार आता केला जात नाही.) पण सरपण ओले असल्याने धूर झालेला आहे. त्यामुळे डोळ्यातून पाणी येते आहे. पण स्वयंपाक करणाऱ्यालाही धुराचा त्रास सहन करावा लागतो आणि घरातल्या इतर मंडळींनासुद्धा त्रास सहन करावा लागतो.

सहस्त्र वर्षेपर्यंत मनाचा निग्रह करून अन्न पाणी न घेता तप चाललेलं आहे. देहाला किती क्लेश झाले असतील. क्षुधा - तृषेचा निग्रह करणं किती कठीण आहे. निग्रहाचा अभ्यास करणारे तसं करू शकतात. हेही त्याच्याबरोबर आहे. अशा रीतीने दुर्गमाने एक हजार वर्षांपर्यंत तप केलं. सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवांनी आपली कामना पूर्ण करावी अशी त्याची इच्छा आहे. अशा कठोर तपश्चर्येने त्या दैत्याचे तेज इतके वाढले की, सर्व देवांना वगैरे ताप व्हायला लागला. ब्रह्मदेव हंसावर आरूढ होऊन त्याच्या समोर आले. त्याची उग्र तपश्चर्या पाहून ते प्रसन्न झाले. दुर्गम दैत्य समाधिस्थ होता. दैत्यांच्याकडेसुद्धा अनेक विद्या आहेत. वाटेल ते रूप धारण करण्याची शक्ती दैत्यांनासुद्धा आहे ना!

कंसाच्या आज्ञेने श्रीकृष्णांना मारण्यासाठी जे दैत्य आले ते कोणी घोड्याच्या रूपात तर कोणी बैलाच्या रूपात. एक दैत्य तर वाऱ्याच्या रूपाने आला. पुतना राक्षसीण अगदी श्रीमंत कुलीन स्त्रीच्या रूपात आली. उत्तम वस्त्र आणि दागदागिने घालून आली. "यशोदेला मुलगा झाला म्हणून त्याला पाह्यला आले" म्हणाली. आता अशा बाईबद्दल संशय येईल कुणाला? अशी वाटेल ती रूपं धारण करण्याची शक्ती त्यांनीही मिळवली आहे. योगसामर्थ्याचा उपयोग कोण कसा करतो हे महत्त्वाचे आहे. बुद्धि कशी आहे त्या बुद्धीप्रमाणे फल मिळतं.

ब्रह्मदेवांनी विचार केला, या दैत्याची आसनसिद्धी केवढी आहे! एक हजार वर्षे हा तप करतो आहे. म्हणजे देहाभिमान धारण करणारे हे दैत्य देहाभिमान सोडूही शकतात की नाही! देहाची काही पर्वा नाही. देह गेला तरी हरकत नाही पण आपलं उद्दिष्ट साध्य करायचं आहे. हा एक निश्चय आहे मग तो राजस असो, तामस असो. पण त्याचं फल त्याला मिळालं पाहिजे. ब्रह्मदेव

संतुष्ट होऊन दुर्गमाला म्हणाले, 'तुला काय मागायचं ते मागून घे.' दुर्गमाने डोळे उघडून ब्रह्मदेवांना नमस्कार केला. पूजा केली. आणि प्रार्थना केली – 'सर्व वेद माझ्याजवळ राहू देत.' म्हणजे 'बाकीच्या दैत्यांना द्या' असंही म्हटलं नाही त्याने. त्यातही ममता, देहाभिमान आहेच. स्वतःजवळ सर्व पाहिजे. देवांच्या जवळ तर नकोच. पण आपल्या इतर दैत्यांजवळ तरी आत्मीयता हवी का नको, पण तीही नाही. कसोटी आहे ही. खरं प्रेम कोणावर आहे हे सांगता येत नाही. सर्व देवांजवळ, ब्राह्मणांजवळ जे वेदज्ञान आहे ते माझ्याजवळ राहिलं पाहिजे म्हणजे त्या देवांचं ज्ञान गेलं पाहिजे, ही इच्छा आहे. सर्व देवांचा पराजय करण्याची शक्ती मिळावी.

ब्रह्मदेवांना आता त्याला वर देणं भागच आहे ना! ईश्वराने सृष्टीकार्य करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे त्यात त्याचाही समावेश आहे. दैत्यही सृष्टिकार्य करणारेच आहेत ना. स्वार्थ असेल त्यात. पण सृष्टिमध्ये वेदज्ञान मागताहेत. घेऊ देत. ज्ञान टिकवायचं कसं वगैरे वेगळं आहे. धारणा जी आहे ती वेगळी आहे. पण आज याची मागणी पूर्ण करायला हरकत नाही. याच्या तपश्चर्येचं फळ याला देऊन टाकायचं. ब्रह्मदेव "तथास्तु" म्हणाले. "तुझ्या इच्छेप्रमाणे होईल." आणि ब्रह्मदेव आपल्या सत्यलोकाला निघून गेले.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वगैरेंची मुले ऋषींच्या आश्रमात वेदाध्ययनाला येत. पूर्वी गोधन फार होतं म्हणतात. भगवान गोपालकृष्णांची दिनचर्या वेदव्यासांनी त्यांच्या चरित्रात वर्णन केली आहे. स्नान संध्या करायची, अग्निहोत्र करायचं, पितरांचं, ऋषींचं तर्पण करायचं, आपलं विहित कर्म करायचं आणि राजसभेमध्ये जायला निघाल्यावर भगवान गायींचे दान करीत. कित्येक लक्ष गायींचे दान करीत आणि ते गोदान घेणारे लोकही त्या वेळेला होते. आज दोन खोल्यातून राहणारे आपण! कोणी गोदान दिले तरी घेता येणार नाही. स्मृतिकार सांगतात, 'वनातल्या भूमीवर कोणाचेही स्वामित्व नाही.' सध्या प्रत्येक झाडावर नंबर टाकलेले आहेत. संरक्षणाकरता रक्षक नेमलेले आहेत तरी आजच्याच वर्तमानपत्रात बातमी आहे, चौदा हजार की काय

णवजनाचे चंदन चोरीला गेलेलं आहे. तेही चाललेलं आहे.

त्या काळात भूमी उदंड होती. संरक्षणाची सोय होती. त्यामुळे लोक गोदान घेत असत. किती प्रचंड संख्येने गायी असल्या पाहिजेत. श्रीकृष्णांच्या १६,८०० स्त्रिया म्हणजे घरे होती. त्या प्रत्येक घरातून तेवढी रूपे धारण करून भगवान गोदान करत असत आणि मग एक रूप धारण करून राजसभेत जात. म्हणजे त्यांच्या संपत्तीला अंत नाहीये. इतकी संपत्ती भारत वर्षामध्ये होती. दूध तूप कशाचीच उणीव नव्हती.

वेद रक्षणाकरता निरनिराळे अवतार झालेले आहेत. देवीचा अवतारही त्याकरताच झाला आहे. तिकडे ब्रह्मदेवांनी दुर्गम दैत्याला वर दिल्यावर चमत्कार असा झाला की, अध्यापन करणाऱ्या ऋषींना काही आठवेनासे झाले. त्यांचे ज्ञान, स्मरणशक्ती एकदम स्तंभित झाली. सगळ्यांना प्रश्न पडला हे असं अचानक काय झालं? वेदज्ञान म्हणजे काही नुसती पुस्तकी विद्या नाहीये. ते ज्ञान बुद्धीमध्ये धारण करतात. सगळं अध्ययन ऋषींच्या कंठस्थ आहे. कधी त्याचा विसर पडला नव्हता आणि आता एकदम विसर कसा पडला? स्नान संध्यासुद्धा कशी करायची हे त्यांना कळेना. बुद्धीभ्रंश झाल्यासारखी अवस्था झाली म्हणे. यज्ञयागादिक सगळी कर्मं बंद झाली. ऋषींनी तपश्चर्या करूनच वेदज्ञान मिळवलं होतं पण दुर्गमाची तपश्चर्या मोठी ठरली. आता पुढे कसं करायचं हा त्यांना प्रश्न पडला. मोठा अनर्थ झाला.

सर्व वेदज्ञान, कर्मज्ञान दुर्गमाला मिळालं. पण इकडे ऋषींची सर्व कर्मे बंद पडली. देवांना 'निर्जर' असं एक नाव आहे. 'जरा' म्हणजे म्हातारपण नाही देवांना. नेहमी ते तरुण असतात. पुण्य संपलं म्हणजे मात्र पृथ्वीवर येतात. आता त्या देवांना ऋषि मंडळींकडून यज्ञयागादि कर्मे न झाल्याने म्हातारपण आले. मग त्या दुर्गम दैत्याने अमरावतीवर स्वारी केली. त्याला असा अभिमान वाटला की, सर्व वेद आपल्या ताब्यात असल्यामुळे देवांची शक्ती वाढायचा संभवच नाही. शस्त्रास्त्र ज्ञानही नष्ट झालं होतं देवांचं. देवांचा पराभव झाल्यावर ते स्वर्ग सोडून कुठल्यातरी गुहेत जाऊन राहिले. कंदमुळे वगैरेंवर उदरनिर्वाह

करू लागले. सामान्य माणसाप्रमाणे कुठे तरी राहू लागले.

त्यांची धर्मबुद्धि मात्र नष्ट झाली नाही. कारण दैत्याने तसा वर मागितलाच नव्हता. त्याला सुचलं नाही तसं, नाही तर त्याने तेही मागितले असते. भगवती पूर्ण शक्तिसंपन्न आहे, तेव्हा तिला आपण शरण गेलं पाहिजे असे वाटून संकटात सापडल्यामुळे अधिक तळमळीने देवांनी तिची उपासना करायला सुरुवात केली.

त्यावेळी असे होऊ लागले की, अग्नीला दिलेली आहुति अदृष्य रूपाने आदित्य लोकाला जाऊ लागली. आदित्यापासून वृष्टी होते. वृष्टीमुळे धान्य वगैरे निर्माण होऊन प्रजाजनांचे संरक्षण होते. असा कार्यकारणभाव शास्त्रकारांनी सांगितला आहे. पण इथे तर अग्निहोत्र, यज्ञयागादिक बंद झालेले आहेत. त्यामुळे वृष्टी नाही, पाणी नाही. नद्या, तळी, विहिरी कोरड्या पडल्या. ही अनावृष्टी किती तरी वर्षे होती म्हणतात. त्यामुळे धान्य नाही. क्षुधा, तृषा कशा भागायच्या? त्याचा परिणाम असा झाला की सर्वांचा संहार झाला. जिकडे तिकडे प्रेतं पडली. प्रेतं स्मशानामध्ये न्यायलासुद्धा कोणी नाही.

आता दुसरं कोणाला शरण जायचं? हा मोठा अनर्थ झाला. सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवांच्या त्या दैत्याला वर देताना हे कसं लक्षात आलं नाही कोणास ठाऊक. त्या दैत्याने अत्यंत उग्र तपश्चर्या केली. देहाला पुष्कळ कष्ट दिले, पण एवढं करून जो वर मागितला त्यामुळे ही सृष्टीच नष्ट व्हायची वेळ आली ना! सर्व ब्राह्मण मंडळींनी शांतपणे विचार केला आणि या संकटातून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी भगवतीला शरण जायचं ठरवलं व ते हिमालय पर्वतावर आले. देवीला अनन्यभावाने ते शरण गेले आहेत. त्यांनी प्रार्थना केली, "आईसाहेब, आम्ही सामान्य जीव आहोत. आमच्यावर दया करा. अपराध आमच्याकडून होणारच. 'अपराध सहस्त्राणि क्रियन्ते अहर्निशम् मया,' हे कबूल केलं पाहिजे. सगळा अहंकार सुटल्याशिवाय ही प्रार्थना होणार नाही. शरीर, मन, वाणी वगैरे इंद्रियांच्या द्वारा किती अपराध होताहेत, त्यांची जाणीव पाहिजे. ह्या सर्व अपराधांची क्षमा करणारी तू दयाळू जननी आहेस. तेव्हा जरी

आमच्या अपराधाबद्दल तुला राग आला असला तरी तो दूर कर. कर्म किंवा धर्माचरण करताना बुद्धीला प्रेरणा तुझीच असते ना! उपनिषदांमध्ये तू सर्वांच्या अंतर्यामी आहेस, असं वर्णन केलेलं आहे.

आचार्य महाराजांना आपल्या आईला विष्णुलोकाला पाठवायचे होते म्हणून त्यांनी भगवान् विष्णूंची, गोपालकृष्णांची स्तुती केली. त्यात ते म्हणतात, 'भगवान श्रीकृष्ण सर्वांच्या अंतर्यामी आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही नुसती पंचमहाभूते नसून ते जीव आहेत. अर्थात ते मोठे प्रभावशाली जीव आहेत. पण आपण त्यांच्याही अंतर्यामी आहात. त्यांच्या बुद्धीला प्रेरणा करणारे आपण आहात.'

ऋषी मंडळी भगवतीला म्हणाली, 'ज्या प्रमाणे पुण्यकर्म करण्याची बुद्धीला प्रेरणा देणारी तू आहेस तशीच अपराध करण्याची बुद्धी देणारीही तूच आहेस' असं आम्ही म्हटलं तर? सर्वच कर्तृत्व ईश्वराचं असं मानलं पाहिजे. पापाचीही प्रेरणा ईश्वराकडून होते असं मानायला हरकत नाही. पण आमचं तसं होत नाही. आमच्या हातून पापकर्म घडतं तेव्हा आम्ही म्हणतो, ईश्वराच्या इच्छेने घडले आणि पुण्यकर्म मात्र आम्ही आमच्या बुद्धीने केले. आता इथे 'मी' कशाला येतो? सगळच कर्तृत्व तुमचं आहे असं जर पक्कं मानलं तर कर्मं संपली.

सर्व जीवांना प्रारब्ध, प्रारब्ध म्हणून काही उपयोग नाही. प्रारब्धाचाही उपसंहार होतो.

**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा।**
**हरिकृपे त्याचा नाश आहे।।**

म्हणतात ना! त्या 'नाश' शब्दाचा अर्थ असा आहे – पुण्य - पाप, सुख - दुःख, सगळंही कर्तृत्व त्याचं आहे. संपलं!

कालिया नागानेही अशीच स्तुती केली. तो श्रीकृष्णांना म्हणाला, "आम्हाला जन्माला आपणच घातलंत ना! आम्ही नाग रागीट आहोत. हा आमचा स्वभाव आपणच निर्माण केलात."

आपण अकिंचन झालं पाहिजे. सर्वही कर्मे ईश्वराची आहेत. पाप

असो किंवा पुण्य असो. आमचं काहीच नाही. परमेश्वराला अंतर्यामी म्हणायचं कशाला ?

तेव्हा आमच्या हातून घडलेल्या अपराधांची आपण माता म्हणून क्षमा करा. शिवाय खरा विचार म्हणजे आपण, 'अंतर्यामी' असल्यामुळे सगळं कर्तृत्व आपलं आहे. पुण्यही आमचं नाही आणि पापही आमचं नाही. जीवभाव संपला. आम्हाला पाण्याशिवाय कसे राहता येईल ? हे केवढं भयंकर संकट आलं आहे ! तेव्हा आपण प्रसन्न व्हा. सर्व स्वामित्व आपलं आहे.

सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणं ही केवढी मोठी शक्ती आहे ! ( म्हणजे जीवाचं काहीही कर्तृत्व नाही, असं भगवान् सांगताहेत. ) परंतु अनंत ब्रह्मांडाची स्वामिनी आपण आहात. दया आपला स्थायीभाव आहे ना ! तेव्हा आपण दया केली पाहिजे. वास्तविक आपलं स्वरूप निर्गुण निर्विकार आहे. कूटस्थ म्हणजे निर्विकार ! कोणाला सुख झालं काय आणि कोणाला दुःख झालं काय, आपण या सुखदुःखाच्या अतीत आहात. आपलं स्वरूप द्वंद्वातीत आहे. आपण चैतन्यरूप आहात.

'अंतर्यामी' या रूपाच्या पलीकडची ही स्तुती आहे. सर्वांच्या अंतर्यामी राहून सर्व जीवांना प्रेरणा देऊन कार्य करवून घेणं व त्याप्रमाणे फळ देणं हे कार्य निराळं. परंतु कूटस्थ म्हणजे काहीही विकार नाही, जीवांच्याकडून कर्म करविणं, हे तरी कशाला पाहिजे. आपणच जर जीवाकडून सर्व कर्म करवून घेणाऱ्या आहात, मग आम्ही दोषी कसे होऊ, असे जीवांनी विचारले तर काय उत्तर देणार ? खरंच आहे. म्हणून खरं अकिंचन झाल्यानंतर प्रारब्ध कर्मांचा संबंध सुटून जातो असंही सांगतात. "चिद्रूप, चैतन्यरूप आपण आहात. वेद, उपनिषदांच्या अभ्यासामुळे आपलं ज्ञान होत आहे. वस्तुतः काहीच नाही. द्वंद्व नाहीच. केवळ एक आपलं स्वरूपच आहे. सर्व कारण आपण आहात, सर्वरूप आपण आहात आणि सर्वशक्ती आपण आहात म्हणून आम्ही आपल्याला शरण आलो आहोत. आमची ही प्रार्थना मान्य करा. आपण आमचं संरक्षण करा."
अशी प्रार्थना सर्वही ऋषी मंडळींनी केली.

त्यांच्या अंतःकरणामध्ये ज्ञान, वैराग्य परिपूर्ण आहे. त्यांच्या मनामध्ये कोणचीही वासना राहिलेली नाही. त्यामुळे जगदंबेच्या शक्तीबद्दल त्यांच्या मनामध्ये पूर्ण श्रध्दा आणि विश्वास आहे. कारण स्वतःच्या शक्तीचा अहंकार पूर्णपणे गेलेला आहे. असलेली शक्ती आपल्याच रूपाने येणारी आहे हा निश्चय आहे. त्यामुळे कर्तृत्व अभिमानाचा काहीही संबंध नाहीये. अशा या शुध्दचित्त झालेल्या ऋषींनी देवीचे खरे स्वरूप जाणून तिची स्तुती केली आहे. त्यामुळे त्याला विशेष महत्त्व आहे. ज्ञान आहे आणि भक्तीही त्यांच्या ठिकाणी आहे. कोणत्याही प्रकारचा अभिमान नाही, फलाची आकांक्षा नाही, काही नाही.

व्यास महर्षि म्हणतात, जनमेजया, आता काल बदलणार आहे. काल हे सुध्दा परमेश्वराचेच स्वरूप आहे ना! काल, कर्म, यांच्या सहाय्याने ईश्वर सृष्टी निर्माण करतो, असा एक सिद्धान्त मांडलेला आहे.

जीवाला सुख-दुःख कां भोगावी लागतात?

जीवाने केलेल्या कर्माचं फळ आहे.

'भोगणे ते फळ संचिताचे।' समर्थही तेच सांगतात.

मग भगवतीने अनंताक्षी रूपात त्या ऋषींना दर्शन दिले. अनंताक्षी म्हणजे जिच्या शरीरावर अनंत नेत्र आहेत. शताक्षी म्हणून तिचे नाव आहे. या ऋषींचेही आलोचनात्मक तप झालं आहे. भगवतीचं खरं स्वरूप मनामध्ये आणून तन्मय होणं हे सुध्दा तप आहे. तसं ते आपल्या हातून घडत नाही म्हणून उपास-तापास, काया-वाचा-मनाने होईल तेवढे तप आपल्याला करावे लागते. भगवतीच्या मूळ स्वरूपाच्या ध्यानात तन्मय होणं हे खरं तप आहे. त्या ऋषींचं असं खरं तप घडल्याने जगदंबेला प्रगट व्हावं लागलं. ब्रह्मादिक देवांच्या अंतर्यामी राहून त्यांचे नियंत्रण करणारी असं तिचं वर्णन केलं आहे. ती शक्ती या रूपाने प्रगट झालेली आहे. शताक्षी देवीचेच 'शाकंबरी' असेही नाव आहे. तिला ते नाव का पडले, पुढे तिचं दुर्गा नाव का प्रसिद्धीस आलं हे सगळं चरित्र क्रमाक्रमानं सांगितलं आहे.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ।।**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुदेव चरणारविंदाभ्यां नमः ।।**

वेदव्यास महर्षि जनमेजय राजाला देवाचं चरित्र सांगताहेत. चंद्रवंश आणि सोमवंश यांच्यात जे जे राजे होऊन गेले ते ते देवीभक्त झालेले आहेत. राज्य करायचं म्हणजे ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती दोन्ही पाहिजे ना! सर्व प्रजाजनांचा संतोष झाला पाहिजे. सर्व प्रजाजनांना समाधान मिळालं पाहिजे, अशी राजाची बुद्धि पाहिजे. त्याकरता ही शक्तीची उपासना सर्व राजांच्या परंपरेमध्ये आलेली आहे. आचार्यांच्या परंपरेमध्ये सुध्दा शंकराचार्य महाराजांनी शक्तीची पूजा करायला सांगितली आहे. शारदा, चंद्रमौलीश्वर देवता, शंकर ही ज्ञानदेवता तर आहेच आहे पण विद्यादेवी म्हणून शारदेची पूजा आहे. देवी आणि शंकर अशी दोघांची पूजा आचार्यांच्या परंपरेमध्ये करतात.

असंख्य प्रकारची कर्मं सांगितली आहेत वेदामध्ये. आपला जर कोणी शत्रू असेल तर त्याने आपल्याबद्दलची शत्रुत्वाची भावना दूर करावी आणि त्याच्या मनाचे समाधान व्हावे अशा प्रकारे बुद्धीत परिवर्तन व्हावे म्हणून यष्टी (इष्टी) करायला सांगितली आहे. तशी देवतेची प्रार्थना केल्यावर बुद्धीला प्रेरणा करणारी ती देवता शत्रूचा मित्रसुद्धा करू शकते. बुद्धीच बदलली म्हणजे झालं.

नाश करायचा नाही.

**'जे खळांची व्यंकटी सांडो'**

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. खळ जे असतील त्यांची बुद्धी बदलू दे. बाहेर विषयांकडे जी सारखी त्यांची बुद्धी जाती आहे ती अंतर्मुख होऊ दे. ईश्वराकडे त्यांचं लक्ष लागू दे.

वेगळे वेगळे उत्सव आहेत. नवरात्रातील देवीची उपासना वेगळी. शारदीय नवरात्र आहे. चैत्रामध्ये नवरात्र आहे. राम नवमीचं नवरात्र आहे. मार्गशीर्ष महिन्यात मार्तंड भैरवाचं नवरात्र आहे. आणि कुलपरंपरा अशा चाललेल्या आहेत. नवीन काही चालू करून बघा असे नाही. कुळदेव म्हणून प्रत्येकाचा आहे. आणि कुळाचारही तशाच प्रकारचे चाललेले आहेत. कोणत्याही देवताची पूजा करीत असताना सर्व उपचार समर्पण करायचे. नैवेद्य कशाचा करायचा, हे सगळं कुळधर्म म्हणून ठरलेलं असतं ना! शास्त्रीय विधी वेगळा असेल पण प्रत्येकाच्या कुलामध्ये चालत आलेला आचार तोही असतो. पूजेच्या आरंभी होणारी शंख, घंटा यांची पूजा म्हणजे देवतेची पूजा आहे. त्याचप्रमाणे दीपपूजाही आहे. तेवढ्यापुरता दीप लावून ठेवण्याचीही पद्धत आहे किंवा अखंड दीप. देवता बुद्धीने त्या दीपाची पूजा होते. प्रकाश हे जगदंबेचे स्वरूप आहे. ती चैतन्यरूप आहे. त्यामुळे त्या चैतन्याचे एक प्रतीक म्हणून बाह्यरूपाने आपण त्या दीपाची पूजा करतो. नवरात्रामध्ये वगैरे दीप स्थापना करतो. देवस्थानामध्ये अखंड नंदादीप लावलेले असतात. ज्या लोकांना घरी नंदादीप ठेवणे शक्य नसते असे लोक कुठल्या तरी देवस्थानाला अखंड नंदादीप ठेवण्यासाठी द्रव्य देतात.

आणि अशी उपासना अखंड चालू राहिल्यामुळे त्यांची बुद्धि उपासनेमध्ये स्थिर झालेली असते. त्यात कर्तव्यभावना असते. या वर्षी नवरात्र दहा दिवस आले आहे. त्यात सरस्वतीचे आवाहन, पूजन, बलिदान आणि विसर्जन असा चार दिवस कार्यक्रम असतो. तीही उपासना या ठिकाणी विद्यादेवी म्हणून आहे. महासरस्वती हा एक देवीचा अवतार आहे. शुंभ, निशुंभ

या दैत्यांचा नाश देवीने अवतार घेऊन केला, असे मार्कंडेय ऋषींनी देवी भागवतात लिहून ठेवले आहे. हे ऋषी देवीचे महात्म्य जाणणारे होते. देवी परब्रह्मरूप आहे ना! अंतर्यामी रूप आहे. सगळ्या देवांनी स्तुती करताना सांगितलं – अंतर्यामी म्हणजे ईश्वर ज्याला म्हणतात. विराट परमेश्वर म्हणजे स्थूल सबंध समष्टि. सूत्रात्मा किंवा हिरण्यगर्भ ज्याला म्हणतात. म्हणजे संपूर्ण लिंग शरीर समष्टि. सूक्ष्म शरीर समष्टीचा अधिकारी, अभिमानी. आणि त्याच्याही अंतर्यामी म्हणजे कारण शरीर समष्टि आहे. प्रत्येक जीवाच्या भिन्न भिन्न अविद्या आहेत. असाही एक सिद्धान्त आहे.

त्यामुळे प्रत्येकाचं अज्ञान, प्रत्येकाचं अंतःकरण, मन, इंद्रिय, प्रत्येकाचं स्थूल शरीर या सर्वही शरीरावरती सर्वांना अधिष्ठानभूत असलेल्या समष्टि देवतेचा अधिकार आहे, असं सांगितलं आहे – विराट, हिरण्यगर्भ किंवा सूत्रात्मा आणि अंतर्यामी. तेही जगदंबेचंच स्वरूप आहे. आणि याच्याही पुढे शुद्ध चैतन्यरूप आहे. कूटस्थ, निर्विकार. जग निर्माण झालेलं आहे. त्याचा नियामक म्हणून अंतर्यामी व्हावं लागलं. नियमन करायला पाहिजे ना! नियामक शक्ती ही सुद्धा ईश्वराचीच आहे. त्याशिवाय बुद्धीचं नियंत्रण होणार कसं? देवांचा काही काल आहे, दैत्यांचा काही काल आहे. हे असं का घडतं? बुद्धीचं नियमन करणारी एक शक्ती आहे. त्या त्या वेळेला तशी तशी बुद्धि बदलती आणि अनुकूल व प्रतिकूल काळ येतो.

दुर्गम दैत्य निर्माण झाल्यामुळे देव, ऋषी वगैरेंना प्रतिकूल काळ आला आहे. पण यांची उपासनाही चालू आहे. त्याच्यामध्ये खंड नाही. हीच जगदंबेची कृपा आहे. ब्रह्मदेवाने वर दिला असेल. वेदविद्या, वेदज्ञान लुप्त झालं. पण जगदंबेबद्दल प्रेम, भक्ती, श्रद्धा आणि तिच्या स्वरूपाचं ज्ञान मात्र त्यांच्या बुद्धीत अजून आहे ना. त्यामुळे निर्भयता आहे. जरी दैत्य उन्मत्त झाला, आपलं ज्ञान एकाएकी गेलं तरी पुन्हा येऊ शकेल. म्हणून त्या सर्व ऋषी मंडळींनी ज्ञानपूर्वक प्रार्थना केली. श्रद्धेचे, ज्ञानपूर्वक श्रद्धा व ज्ञान नसताना श्रद्धा असे दोन प्रकार आहेत. पण ज्ञानपूर्वक श्रद्धेला महत्त्व आहे. श्रद्धा असेल तर ते

कर्म चांगलं होतं. त्यामुळे ऋषी मंडळींची बुद्धि या बाबतीमध्ये अगदी तयार आहे. त्या बुद्धीला धक्का नाही लागलेला.

**'ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते' ॥१०.१०॥**

ईश्वराकडून मिळालेली बुद्धि स्वतंत्र आहे. आणि आपल्या कर्माप्रमाणे मिळालेली बुद्धी ही स्वतंत्र मानावी लागते. पापकर्म झाल्यानंतर तशाच वासना तयार होतात. पुन्हा जन्माला आल्यानंतर त्या वासनांप्रमाणे पापाकडेच प्रवृत्ती होणार.

सत्संगती मिळाली, चांगल्या कुळामध्ये जन्म मिळाला. ही बाहेरची साधनं जरी मिळाली तरी त्यांचा बुद्धीवर परिणाम होत नाही.

'बुद्धी कर्मानुसारिणी' म्हणून सिद्धांत आहे.

दुर्गम दैत्याने तसाच अभ्यास केलेला आहे. तो पापकर्मच करत आलेला आहे. संत कोणच्या काळात नाहीत? त्याला कदाचित सत्संगती घडलीही असेल परंतु बुद्धीवर परिणाम नाही ना! दुर्योधनाला सत्संगती घडली नव्हती का? मोठा राजा होता तो. दुर्वास ऋषींना त्याने आपल्या राजवाड्यात चार महिने ठेवून घेतलं. मनाचा निग्रह करून त्यांची सेवा केली. दुर्वास ऋषींची सेवा करणे सोपे होते का? पण सकाम आहे. मनामध्ये वासना वेगळी आहे. पांडवांच्याबद्दल त्याच्या मनात मत्सर, द्वेष उत्पन्न झालेला आहे. त्यामुळे ही सगळी कर्मं अशीच घडताहेत. पांडवांचा नाश झाला पाहिजे. अरण्यामध्ये जाऊनसुद्धा पांडव काही स्वस्थ नाही राहिले. सर्व तीर्थयात्रा त्यांनी केल्या. राज्य करताना तीर्थयात्रेला जाता येईल की नाही कोणास ठाऊक. सवड कुठे आहे? राज्याचा कारभार किती मोठा असतो.

ब्रह्मादिक देव जसे समष्टि अभिमानी असतात, त्यांना नैसर्गिक तशी बुद्धी आहे. सर्व समष्टीचे ज्ञान त्यांना आहे. त्याप्रमाणे त्यांच्याकडून प्रेरणा होते. पण राजा हा जीवात्मा आहे. तो समष्टीचा अभिमान धारण करून कोणत्या जीवात कार्य न्यूनता आहे, कोणाची बुद्धी कशी आहे, जे जे काही अरिष्ट उत्पन्न होण्यासारखं असेल, त्या सगळ्याकडे लक्ष देतो ना! या सगळ्यात त्याला

तीर्थयात्रा वगैरे करायला वेळ मिळेल की नाही, सांगता येत नाही.

तेव्हा पांडव त्यांच्या प्रारब्धानुसार वनात जरी गेले तरी भक्तिमार्ग काही त्यांना सुटला नाही. जगदंबेची, भगवान श्रीकृष्णांची उपासना त्यांची चालूच होती. राजसूय यज्ञ धर्मराजांनी केला होता. नंतर वनवासाचा प्रसंग आलेला आहे. राजसूय यज्ञ म्हणजे केवढा मोठा यज्ञ आहे ! ब्रह्मलोकाला जाता यावे ही इच्छा धर्मराजाला होती. म्हणून नारदांबरोबर भगवान गोपालकृष्णांना त्याने तसा निरोप पाठवला. त्याप्रमाणे नारदमुनी द्वारकेत येऊन श्रीकृष्णांना भेटून म्हणाले, 'तुमचा आतेभाऊ धर्मराज तुमची वाट पहातो आहे.' श्रीकृष्णांनी विचारले, 'कशाला?' नारदमुनी म्हणाले, 'त्याला राजसूय यज्ञ करायचा आहे.' गोपालकृष्ण म्हणाले, 'मग करू देत की.' नारद म्हणाले, 'अहो, करू देत नाही. तुम्ही तिथे या आणि त्यांच्याकडून तो करून घ्या, असं म्हणतोय तो. म्हणजे मी राजा आहे, मी राजसूय यज्ञ करू शकेन अशी खात्री नाहीये त्याला. तुमची शक्ती मोठी आहे याची जाणीव त्याला आहे म्हणून तुम्हाला त्याने बोलावले आहे.'

मग गोपालकृष्ण पांडवांकडे येऊन बरेच दिवस राहिले. सगळं ठरवलं. सर्व राजांना जिंकून जो सार्वभौम राजा झाला आहे त्यानेच राजसूय यज्ञ करायचा. पैसे असले, चार लोक वर्गणी देणारे असले म्हणजे यज्ञ करायचा, असं नाही. यज्ञाकरता वर्गणी मागायची नाही.

**'यज्ञांना जपयज्ञोस्मि'**

भगवान सांगताहेत ना ! दुसऱ्याकडून पैसे घेऊन यात्रेला कशाला जाता? जाऊ नका. पण तसे जाऊन आलात तर यात्रेचे पुण्य पैसे देणाऱ्याला जाईल. थोडं तुम्हाला मिळेल. काय करायचंय उगीच ?

धर्मराजाने भावांबरोबर सर्व राजे लोकांना जिंकले. एक जरासंध तेवढा राहिला होता. भगवंतांनी भीमाकरवी त्याचाही नाश करविला आणि मग राजसूय यज्ञ धर्मराजाकडून झालेला आहे. म्हणजे सार्वभौम होता तो. त्याने तो यज्ञ केला आणि मग दैवयोगाने द्यूतात हरल्यामुळे वनवासात आला. प्रारब्ध

कर्माने राज्यभ्रष्ट झाला. शकुनीने द्यूतक्रीडेमध्ये त्याचे राज्य, संपत्ती वगैरे सर्व हरण करून दिलं कौरवांना. आणि शेवटी बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास ही अट घालून त्याला बाहेर पाठवलं. परंतु बुद्धीचं संरक्षण करणारी जी ईश्वरशक्ती आहे ती धर्मराज विसरले नाहीत. सर्व राजे त्याने जिंकले. मोठा यज्ञ झाला. लक्षावधी लोकांना अन्नदान झाले. स्वतः भगवान् गोपालकृष्ण तिथे हजर होते. निरनिराळ्या लोकांचे गुण जाणून राजसूय यज्ञातल्या निरनिराळ्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी त्यांची नियुक्ती गोपालकृष्णांनी केली होती. कार्य करणाऱ्याने कोणाचे मागचे पुढचे हेवेदावे काढून उपयोग नाही. आपल्याला प्रतिकूल जरी असला तरी त्याचा गुण आपल्याला घेता आला पाहिजे. त्याला कशाला घेता आपल्या पक्षात, कशाला त्याला सत्ता द्यायची? असा विचार करायचा नाही.

भीमाची नेमणूक पाकशाळेवर केली. भीमाला राजपुत्र असूनसुद्धा पाकशास्त्राचं ज्ञान उत्तम होतं. किती मंडळी आली, किती स्वयंपाक करायचा हे सर्व माहिती पाहिजे ना! हे काही शाळा कॉलेजात शिकवणार नाहीत. अलीकडे त्याच्याही शाळा निघाल्यात म्हणतात. परंतु ते शिक्षण निराळं. तर ती सर्व जबाबदारी भीमावर टाकली. त्याच्या हाताखाली पुष्कळ आचारी वगैरे सेवक वर्ग होता. तो काही स्वतः स्वयंपाक करत नव्हता. शिक्षण कोणतंही श्रेष्ठ आहे. हे कसं शिकू, ते कसं शिकू, लोक काय म्हणतील असं म्हणून चालत नाही. विद्या, ज्ञान पाहिजे. त्याच्या या ज्ञानाचा अज्ञातवासात उपयोग झाला ना! त्या विराट राजाच्या नगरात तोच स्वयंपाक करत होता. नाही तर भीम झाकला कसा गेला असता? स्वयंपाकी म्हणून राहिला.

राजसूय यज्ञात खजिनदार म्हणून दुर्योधनाची नेमणूक केली आणि सगळा पैसा त्याच्या ताब्यात दिला. त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकला. ज्योतिषशास्त्र, सामुद्रिकाच्या दृष्टीने त्याच्यावर काही चिन्ह होतं. दुर्योधनाने पैसा खर्च केला की दसपट पैसा पुन्हा गंगाजळीत यायचा. अनेक राजे लोक अनुकूल झाले. हे गोपालकृष्णांना माहीत होतं. आपल्यावर इतकी महत्त्वाची

जबाबदारी टाकल्याचे त्यालाही समाधान वाटले. तो मुद्दाम जास्ती खर्च करायचा. पण त्याच्या दसपट पैसा परत तिजोरीत यायचा. दानधर्म करण्याचे काम कर्णावर सोपवले होते. त्यागाची बुद्धि फार क्वचित पहायला मिळते. 'दाता भवति वानवा' म्हणतात. दान करण्याची बुद्धी फार कठीण आहे. शुद्ध कर्माचरण झालं पाहिजे, उपासना झाली पाहिजे, तर "माझं काहीही नाही, मी एकटा आलोय मला एकटं जायचंय" ही बुद्धि होते. जाताना काहीही घेऊन जाता येत नाही. मग द्यायला काय हरकत आहे? अशी बुद्धी असणारा एक कर्ण त्यांनी निवडला. दुर्योधनाचा मित्र आहे, पांडवांचा शत्रू आहे, असू दे. आज तो विचार करायचा नाही. आज यज्ञ पार पाडायचा आहे. मुख्य कार्याकडं लक्ष देणारा अशा प्रकारचा नेता जर भेटला तर हे कार्य व्यवस्थित होऊ शकतं. हा आपला आहे, तो दुसऱ्या पक्षाचा आहे, तो नको असा विचार केला नाही. अशा वेळेला हे चालत नाही. समष्टीचं हित करणारा आहे की नाही एवढंच पहायचं.

अशी सगळी योजना झाल्यामुळे धर्मराजाचा यज्ञ उत्तम प्रकारे पार पडला. सार्वभौम राज्य मिळविलं. ही भौतिक शक्ती मिळाली. ब्रह्मलोकाला जाण्याची योग्यता प्राप्त करून देणारे पुण्यकर्म, धर्माचरण श्रीकृष्णांनी त्याच्याकडून करविलं. देवाकडून त्याला बुद्धि मिळालेली आहे आणि त्याचं पुण्यकर्मसुद्धा अखंड चाललेलं आहे. लोमश ऋषी भेटले त्यांना. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पांडवांनी सर्व तीर्थयात्रा पायी केल्या. महाभारतकारांनी वनपर्वामध्ये त्या सगळ्यांचं वर्णन केलं आहे. पांडव निराशही झाले नाहीत. किंवा कुठल्यातरी राजाशी संधान बांधून त्यांनी राज्यही परत मिळविण्याचा प्रयत्न केला नाही. बारा वर्षे त्यांनी त्या दृष्टीने काही प्रयत्न केला नाही. तिकडे दुर्योधन आपलं बल वाढवत होता, तरीही पांडवांनी त्याकडे लक्ष दिलं नाही. निश्चिंत आहेत. ही बुद्धि मिळाली कशी? आपण मिळवलेलं साम्राज्य गेलं, आपल्या डोळ्यांदेखत ते आपण परत मिळवायचं नाही का? पण काही तशी तळमळ नाही. मिळेल. नंतर बघू. आज कबूल केल्याप्रमाणे बारा वर्षे वनवास

आणि एक वर्ष अज्ञातवास एवढंच पहायचं आहे.

आणखी द्रौपदीचाही नियम मोठा आहे. मोठी मोठी ऋषी मंडळी धर्मराजाची भेट घेण्यासाठी मुद्दाम अरण्यात यायची. धर्मराजाचे अजातशत्रू असे नाव आहे. निर्माण होतात शत्रू. त्याला पुष्कळ शत्रू निर्माण झाले. पण याने कोणी शत्रु निर्माण केला नाही. दुर्योधनालासुद्धा तो 'सुयोधन' म्हणून हाक मारायचा. म्हणजे वाणीसुद्धा इतकी चांगली आहे. बुद्धि तर चांगली आहेच आहे. त्याने (दुर्योधनाने) अपकार केला असेल पण तो अपकार विसरून जायचा हा मनाचा केवढा मोठेपणा आहे!

**'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।।'**

दृष्टांत देताना ज्ञानेश्वर महाराजांनी चंद्र आणि सूर्य हे दृष्टांत दिले आहे. पण त्यांची न्यूनताही दाखविली आहेत. संत महात्मे चंद्र आहेत पण अलांछन चंद्र आहेत. जगामध्ये असा चंद्र मिळायचा नाही. त्याला कलंक आहे. सूर्याप्रमाणे तेजस्वी आहेत. त्यांना जर राग आला तर देवसुद्धा मध्यस्थी करणार नाहीत. ही शक्ती त्यांच्याजवळ आहे. पण 'मार्तंड जे तापहीन' म्हणतात. ही केवढी शक्ती आहे! इतकं तेज असूनसुद्धा ताप नाही. कोणालाही ताप नाही. चंद्राप्रमाणे शीतल आहेत. आणि कलंकरहित आहेत. धर्मराज असे असल्यामुळे त्यांचे सर्व बंधू त्यांना अनुकूल वागत होते.

फिरता फिरता दुर्वास ऋषी दुर्योधनाच्या घरी आले. दुर्योधनाने त्यांना ठेवून घेऊन मनोभावे त्यांची सेवा केली. मानापमान सगळं सहन केलं. चार महिन्यांनंतर दुर्वास ऋषी जायला निघाले; तेव्हा प्रसन्न चित्ताने त्यांनी दुर्योधनाला काय हवे ते मागून घेण्यास सांगितले. काय मागावं? काय वाटेल ते मागितलं असतं तरी मिळालं असतं. 'सर्व संसार माझा मनातून जावा' असं ज्ञान मागितलं असतं तर तेही ज्ञान त्याला दिलं असतं दुर्वासांनी. पण नाही. ती बुद्धी होणारचं नाही. कर्म नाही ना तसं!

**'अत्युत्कटैः पापपुण्यैः इहैव फलमच्युते।'**

म्हणतात. कर्माचं फल मिळायला वेळ लागतो. धर्माचं किंवा अधर्माचं फल

मिळायला वेळ लागतो. आंब्याचं झाडं लावल्यावर आंबे कसे मिळणार? काही वर्षं जावी लागतात. मग आंबे मिळतील. तसं आहे. 'अधर्माचं फळ हे मिळालं नाही, आपात् धर्म करून सुद्धा तर अधर्म करायला हरकत नाही, अशी बुद्धी जास्ती वाढली, विवेकभ्रष्ट जर झाला तर त्याचं फल आहे म्हणतात.

शास्त्रकार सांगतात, एखाद्याने पाप केल्यावर त्याचं फल त्या जन्मात त्याला मिळालं नाही म्हणून जर तो निश्चिंत झाला तर तसं नाहीये. पुढे काय आहे हे त्याचं त्याला कळेल. त्याला मिळालं नाही तर मुलांना ते फळ भोगावं लागतं. मुलांना भोगावे लागले नाही तर नातवाला भोगावे लागते. आपल्या हातून घडणारा अधर्म म्हणजे पाप निष्फल कधीही होणार नाही. तसंच पुण्यही आहे. पुण्यकर्माचंही फल मिळू शकतं.

दुर्योधन दुर्वास ऋषींना म्हणाला, पांडव सध्या अरण्यामध्ये राहताहेत. धर्मराजाला सूर्य नारायणाने प्रसन्न होऊन एक पात्र दिलेलं आहे. त्या पात्रातून सूर्योदय झाल्यावर पुष्कळ अन्न निर्माण होतं, असं मी ऐकलेलं आहे. आणि ती द्रौपदी रोज अन्नदान करते आहे. आमच्या राजवाड्यातसुद्धा इतकं अन्नदान होत नाही. कोणीही आला तरी त्याला भरपूर अन्न तिथे मिळतं. देवाचं साहाय्य झालेलं आहे ना!

अधिदैवी विभाग जगामध्ये आहे. सूर्यादि देवता आहेत. केवळ मंडळ नाहीये. केवळ तारका नाहीयेत. या सगळ्या देवता म्हणजे जीवात्मे आहेत. धर्मराजाने आपला गृहस्थाश्रम व्यवस्थित चालावा म्हणून सूर्यनारायणाची प्रार्थना केली आणि सूर्यनारायणाने ते पात्र दिलेलं आहे.

द्रौपदीने अन्नदान सुरू केलेलं आहे. येणारा अतिथी म्हणजे साक्षात् देवरूप आहे. 'अतिथी देवो भव' अशी भावना हवी. कुठंही जायला नको देवाच्या दर्शनाला. घरी येणारा जो अतिथी तो देवरूप आहे. ही जर मनाची भावना चांगली राहिली तर ते फल मिळतं. आपल्या घरी येणारा पाहुणारावळा वगैरे त्याची चहापाण्याची व्यवस्था केली म्हणजे लोक बरं म्हणतील. 'काय हो, त्यांच्या घरी गेलो कपभर चहासुद्धा मिळाला नाही' असं लोकांनी म्हणू

नये, म्हणून करायचा नाहीये. शुद्ध भावना आहे. 'अतिथी' म्हणजे साक्षात् परमेश्वर आहे. ही भावना आहे. त्यामुळे द्रौपदीचं अन्नदान त्या बुद्धीनं चाललेलं आहे. द्रौपदीची बुद्धि कशी आहे, धर्मराजाची बुद्धि कशी आहे हे पहाण्यासारखं आहे. महाभारत त्याकरिता रचलेलं आहे. सगळ्या मोठ्या मोठ्या अधिकारी व्यक्तींनी याचे वाचन केलं पाहिजे. राजनीतीचं ज्ञान महाभारतावरून होतं. परदेशातल्या कायद्याप्रमाणे, कोणताही पुढचा मागचा विचार न करता अंधानुकरण करून कायदा इथे करणे म्हणजे राजनीती नव्हे. स्वतः त्याचं ज्ञान करून घेतलं पाहिजे.

धृतराष्ट्राचे मंत्री विदुरजी यांची राजनीती कशी होती! उद्धवजी यादवांच्यामध्ये मोठे नीतिशास्त्रज्ञ होते! अशी मोठी मोठी मंडळी आहेत. ते सगळं समजून घेतलं पाहिजे ना!

धर्मराज, द्रौपदी यांच्याकडून वनवासात होणाऱ्या अन्नदानात छिद्र काय आहे ते दुर्योधनाच्या लक्षात आले. त्या सूर्यनारायणांनी दिलेल्या पात्रातून फक्त द्रौपदीचे जेवण होईपर्यंतच अन्न मिळतं. द्रौपदी जेवली की त्या दिवशी अन्न बंद. पुन्हा दुसरे दिवशी सुरू. म्हणजे द्रौपदीलाही नियम करावा लागला. अतिथींची पूजा तर करायची आहे. अतिथी साक्षात् परमेश्वर आहे. गृहस्थाश्रमामध्ये साक्षात् परमेश्वराची पूजा होऊ शकते. मातापिता हे साक्षात् परमेश्वर आहेत, ही भावना ठेवणाऱ्या पुंडलिकाला भेट देण्यासाठी परमेश्वर आपण होऊन आले. तरी पण पुंडलिकाने त्यांना त्यांच्या देवांची पूजा होईपर्यंत थांबायला सांगितले. ही भावना आहे. ईश्वर दुसरा नाहीच मुळी. मातापिता हेच माझे ईश्वर आहेत. 'म्हणजे पुंडलिकाच्या मनात भक्ती नव्हती,' असे कोणी तरी संशोधन करतील. तसं म्हटलं तरी हरकत नाही. ज्ञानेश्वर महाराजही सांगतात सर्व तीर्थांमध्ये श्रेष्ठ मातापिता आहेत. त्यांची सेवा ही प्रत्यक्ष देवाची सेवा आहे. तुम्ही देव मानत नाही, मानू नका, पण मातापितरांची तरी सेवा करा. कल्याण होईल.

आरोग्य पाहिजे सर्वांना. आपल्यावर संकटं येऊ नयेत, आलीत तर

लगेच दूर व्हावी अशी सगळ्यांची इच्छा आहे. आपल्या जीवनात मंगल गोष्टी घडाव्यात, आपल्याला मंगलकार्ये पहायला मिळावीत ही इच्छा आहे. कुणाला नाही? नास्तिक असो आस्तिक असो. पण हे जे सगळं कल्याण होतं ते देवतांच्या कृपेने, सहाय्याने होते आहे ना! कोणते संकट येणार आहे आणि ते केव्हा दूर होणार आहे याचे ज्ञान आम्हाला नाहीये. परंतु जिला आपण दैवी शक्ती म्हणतो तिला हे ज्ञान आहे. संकटाचा परिहार करण्याची शक्तीही आहे.

तर द्रौपदीने आणखी जेवण करायचं नाही. दहा-दहा, बारा-बारा वाजेपर्यंत थांबायचं. अन्न समोर आहे, भूक लागलेली असेल. अन्नमय शरीर आहे ना! 'द्रौपदीला भूकच लागत नव्हती,' असं कसं म्हणता येईल? भूक लागलेली असताना, अन्नग्रहण करायचं नाहीये. हा केवढा त्याग आहे! त्याग म्हणजे प्रत्यक्ष धर्म आहे. महिषासुरमर्दिनीचे सिंह हे वाहन आहे. हिमालयाने तिला वाहनाला सिंह दिला म्हणतात. बाकीच्या देवांनी कोणी आयुधे दिली, कोणी अलंकार दिले. महिषासुरमर्दिनीची पूजा करताना त्या महिषासुराचीही पूजा करावी लागते. कारण तो देवीच्या स्वरूपामध्ये मिळून गेला ना! धर्मानेच सिंहरूप धारण केलं आहे. आणि त्या धर्मावरती अधिष्ठित अशा प्रकारची जगदंबा जी आहे ती सर्वांचे संरक्षण करते आणि दैत्यांचा नाश करते. हे मार्कंडेय महर्षि सांगताहेत. ह्या सिंहाची पूजा म्हणजे साक्षात् धर्म देवतेची पूजा आहे. ही भावना मनात निर्माण होणे हे ज्ञानाचं फळ आहे.

अनेक ऋषी मंडळी यायची. त्यांची धर्मराजाबरोबर अनेक विषयांवर चर्चा होत असे. धर्मराज नुसता जिज्ञासू नव्हे त्याप्रमाणे वागणारा आहे. प्रत्येक ज्ञानी महात्म्याकडून काही काही समजून घ्यायचं आणि त्याप्रमाणे आचरण करायचं. आचरण करण्याकरता तर मनुष्य जन्म मिळाला आहे ना! नुसतं ऐकायचं आणि सोडून द्यायचं, फक्त व्याख्यानाच्या वेळेला सांगायचं, याच्याकरता ज्ञान नाही.

द्रौपदीचं अन्नदान अखंड चालू आहे हे सगळीकडे पसरलं आहे. रात्री उशिरा कोणी अतिथी येणार नाही याची खात्री पटल्यावर खायचं आणि पात्र

घासून ठेवून द्यायचं. हे छिद्र त्या दुर्योधनाला माहीत होतं. दुर्योधनाने दुर्वास ऋषींना सांगितले की, द्रौपदीचे जेवण झाल्यावर त्यांनी आपल्या दहा हजार शिष्यांना घेऊन पांडवांच्या घरी जावे आणि जेवण मागावे. दुर्योधनाची ही बुद्धी कर्मानुसारिणी आहे. एवढी दुर्वास ऋषींची सेवा केली पण त्याचे काही फळ पदरात पडलेले नाही. मूळची बुद्धि वर आलीच शेवटी. त्याने जर दुर्वास ऋषींजवळ मोक्ष मागितला असता तर ? पण नाही. मुक्त याचा अर्थ कुठे माहीत आहे. संसार म्हणजेच खरा आहे असे समजणारा दुर्योधन दुर्वास ऋषींच्या जवळ मोक्षाची इच्छा कशाला करेल ? ते होणार नाही. देवाला दोष देण्यात अर्थ नाहीये. आम्ही जी कर्मे केलेली आहेत त्याप्रमाणे आमची बुद्धी तयार झालेली आहे. त्या बुद्धीकडून कार्य करून घेणारी फक्त ईश्वरी शक्ती आहे. करविता ईश्वर आहे. त्याच्यावर सर्व सोपवून देऊन भागणार नाही. आपण केलेलं आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे. आपण करीत असताना चांगलं असेल तेवढं करायचं. सज्जन मंडळी कसं वागताहेत, ज्ञानी माणसं कशी वागताहेत, त्यांचं जे योग्य असेल त्याचे आपण अनुकरण करायचं. हा प्रयत्न केला पाहिजे.

आता दुर्वास ऋषी काय करणार ? दुर्योधनाने त्यांची चार महिने मनोभावे सेवा केली होती. त्यांनीच दुर्योधनाला वर माग म्हणून सांगितलेलं आहे. मोठेपणा सगळ्यांनाच आहे ना ! त्याला जर असं म्हटलं की, हा वर तुला मिळायचा नाही तर पांडवांचा पक्षपात दाखवल्यासारखे होईल. दुर्वास ऋषींनी जर त्याला सांगितलं असतं, की 'पांडवांची अशी परीक्षा पहाणं चांगलं नाही. एकदा मी अंबरीष राजाची परीक्षा पाहिली आणि काय झालं ते माझं मला माहीत !' पण नाही, ते दुर्योधनाला काही सांगू शकले नाहीत.

सत्संगती असून काय उपयोग आहे ? दुर्योधनही कुलधर्म कुलाचार यज्ञ वगैरे करत होता. पण बुद्धि नाहीये. प्रत्येक कर्म काम्य करायचं. सत्संगतीचा उपयोगसुद्धा आपल्या स्वार्थाकरता करून घ्यायचा.

म्हणून भगवंतांनी सांगितलं –

**' तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**

**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥४-३४'**

ज्ञानी माणसांकडून उपदेश, ज्ञान तुम्हाला मिळेल. प्रणिपात करा, चिकित्सा करा, शंकासमाधान करून घ्या, सेवा करा. पण ह्या ज्या सगळ्या गोष्टी आहेत त्या दंभानेसुद्धा होऊ शकतात. ही साधनं खरी नाहीयेत. खोटीही असू शकतात.

सेवा केली दुर्योधनाने. पण ढोंगीपणाने केली. खरी ज्ञानाची साधनं शेवटी सांगताहेत भगवान –

**'श्रद्धावान् लभते ज्ञानम् तत्परः संयतेंद्रियः।'**

ही अंतरंग साधनं आहेत. अंतःकरणामध्ये श्रद्धा पाहिजे. हा ज्ञानी महात्मा कसा वागतोय याचा अभ्यास केला पाहिजे. नुसती त्याच्या शक्तीवर श्रद्धा असून उपयोग नाही. त्याचं आचरण कसं आहे. ते सगळंच योग्य आहे. ही पूर्ण श्रद्धा मनात असून त्याने सांगितल्याप्रमाणे आचरण करणं, तन्मय होणं आणि आपली इंद्रियं ताब्यामध्ये ठेवणं. पुन्हा इंद्रियांच्या आहारी जाऊन संचित कर्म जास्त करून ठेवणं इकडं लक्ष नाही. इंद्रियांचा निग्रह याकरता करायला सांगितला आहे. भगवान इंद्रियांचा निग्रह प्रथम करायला सांगताहेत, कारण इंद्रिये बाहेर गेली की मन बाहेर गेलंच. त्याला रस्ता मिळाला ना! खिडकी उघडल्यावर बाहेरचा सूर्यप्रकाश आत येतोच लगेच. खिडकी बंद असल्यावर तो कशाला येईल? वारा कसा आत येईल? त्याप्रमाणे इंद्रियाचा निग्रह याकरता सांगितला आहे. संचित कर्मं अनेक जन्मांची पडलेली आहेत, इंद्रियांच्या द्वारा मनाकडून झालेली, शरीराकडून झालेली. अहंकारयुक्त झालेली. जर इंद्रिये पुन्हा अनावर अशी होऊ दिली तर त्या कर्मांत पुनः आणखी भर पडणार. क्रियमाण कर्मात तरी तुम्ही सुधारणा करा. 'सत्कर्मयोगे वय घालवावे' असं समर्थांनी मुद्दाम सांगितलं आहे. प्रत्येक वेळेला वाणीने, इंद्रियाने कर्म करताना विचार करून कर्म करा, म्हणजे केलेली संचित कर्मं बरी वाईट काय असतील ती संपून जातील. म्हणून इंद्रियांचा निग्रह आहे. त्यामुळे मनाचाही निग्रह होणार आहे. पण कर्मानुसारिणी बुद्धि घेऊन दुर्योधन जन्माला आलेला आहे. त्यामुळे

सत्संगतीचा काहीही उपयोग झालेला नाही. भगवान गोपालकृष्ण धर्मराजाचे दूत म्हणून आले तेव्हा दुर्योधनाने त्यांनाच कैद करायचं ठरविलं. आता काय म्हणायचे त्याला? सर्वांनी त्याला तसे न करण्याबद्दल समजावून सांगितले. श्रीकृष्ण प्रत्यक्ष परमेश्वर आहेत, त्यांनी जे विलक्षण कार्य आपल्या ईश्वर शक्तीने केले हे प्रत्यक्ष पाहूनही त्यांना न ओळखणारे लोक त्या वेळेलाही होते. आता त्याच्यापेक्षा दुसरी सत्संगती आणखी कोणती असणार? भीष्म, द्रोण सगळेच ते जाणून होते. पण याला कळले नाही. जगदंबेची कृपा धर्मराजावरही आहे. तो जगदंबेचा मोठा उपासकही होता. प्रत्यक्ष देवीची उपासना करीतही असेल. नवरात्रार्चन वगैरे चालूही असेल. ते काही दाखवण्याकरता, वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्याकरता करायचे नाही. त्याचा अनुभव पुढे आलेला आहे.

पांडवांचा अज्ञातवास हा फार कठीण काळ होता. या काळात त्यांना कोणी ओळखून उपयोग नव्हता. त्यांना जर कोणी ओळखलं तर पुन्हा बारा वर्षं वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. म्हणजे बुद्धीचा वापर कसा केला आहे ते पहा. पांडवांनी जन्मभर वनवासात राहावं आणि जन्मभर राज्य आपल्या ताब्यामध्ये रहावं, ही दुर्बुद्धि आहे. पण त्याही दुर्बुद्धीतून पांडव हे श्रेष्ठ आहेत हे कबूल केल्याप्रमाणे होते. पांडवांचे गुणच इतके श्रेष्ठ आहेत की ते अज्ञात राहूच शकणार नाहीत, हे दुर्योधनाने मान्य केले असेच म्हटले पाहिजे. म्हणजे दुर्बुद्धीचा उपयोग केला म्हणून आनंद मानायचा किंवा पांडवांचा नाश करण्यासाठी आपली बुद्धी वापरल्याचे समाधान मानायचे? पण अप्रत्यक्षपणे पांडवांचे श्रेष्ठत्व मान्यच नाही का केले? दुर्योधनाचे गुप्तहेर पांडव वनवासात गेल्यापासून त्यांच्यामागे होते. कुठे जातात पांडव, काय करतात वगैरे सगळ्या बातम्या याच्याकडे येत होत्या. बारा वर्षांनंतर पांडव कुठे जातात इकडे जास्ती लक्ष ठेवलं पाहिजे.

विराट राजाच्या नगरात जायचं पाचही बंधूंनी ठरविलेलं आहे आणि राजधानीच्या बाहेर ते येऊन पोहोचलेले आहेत. धर्मराजांनी दुर्गादेवीची स्तुती केलेली आहे. "आमच्यावर असा प्रसंग आलेला आहे. एक वर्ष आम्हाला

अज्ञात रहायचं आहे. हे कार्य आपल्या कृपेशिवाय शक्य नाही. नाहीतर पुन्हा बारा वर्षं वनवासात काढावी लागतील." अनन्यभावाने, शुद्ध भावनेने जगदंबेची स्तुती केल्यावर ती साक्षात् प्रगट झालेली आहे. तिने सांगितले, "धर्मराज, काही काळजी करू नकोस. तुम्ही तुमच्या मूळ रूपामध्ये जरी फिरलात तरी तुम्हाला कोणी ओळखणार नाही. तुम्ही आता गुप्त राहा. वेगवेगळी कामे करणारे नोकर म्हणून राहा." पांडवांनी तेच ठरविलं होतं.

हे आश्वासन मिळालेले आहे जगदंबेचे. हा वर मिळाल्यावर त्यांचा एक वर्ष अज्ञातवास निर्विघ्नपणे पार पडला आहे. सेवा करावी लागली. प्रारब्ध भोग आहे. संपून गेलेला आहे. दुःखाने प्रारब्ध संपून जात आहे. धर्माचरणाने संचित नाहीसे होत आहे. आणि ईश्वराच्या कृपेने चित्ताला कायमची शांती आहे. हे धर्माचरणाचं, ईश्वरभक्तीचं मुख्य फळ आहे. हे अनुभवाला येत असताना आमची प्रवृत्ती तिकडे होत नाहीये. सज्जनांनी सांगितलं, कितीही आचरण करून दाखविलं तरीही होत नाही. देवाची कृपा नाही आमच्यावर, असं समजायला हरकत नाही.

त्यामुळे सगळ्या ऋषी मंडळींनी देवीची प्रार्थना केली आणि जगदंबा प्रगट झाली आहे. तिच्या शरीरावर अनेक नेत्र आहेत. शताक्षी म्हणतात तिला. जिकडे तिकडे डोळ्यांनी पाहते आहे आणि डोळ्यातून अश्रुधारा चाललेल्या आहेत. ऋषी मंडळी प्रार्थना करताहेत. एकेका हातात धनुष्य, बाण, पुष्प वगैरे आहे. धान्य आहे एका हातात, त्यामुळे या देवीला शाकंभरी असेही म्हणतात. जगन्माता आहे. ही नुसती भावना नाहीये. मातृहृदय ते आहे. सर्व संत मंडळी मातृभक्ती करतात. विठामाई म्हणतात, कृष्णामाई म्हणतात, माउली म्हणतात ज्ञानेश्वरांना. मातृरूपाने भक्ती ही जास्ती पुढची भक्ती आहे. मातेचं श्रेष्ठत्व हे धर्मशास्त्रकारांनी फार मोठं सांगितलं आहे.

संन्यासाश्रम घेतल्यानंतर त्या संन्यासी मुलाला बापाने नमस्कार करावा, असं सांगतात. तो आता साक्षात् ब्रह्मरूप झालेला आहे. सर्व कर्मे ज्याने मनापासून टाकली आहेत असा संन्यासी महात्मा, पित्यालासुद्धा वंद्य आहे.

म्हणजे सर्वांनी त्याला नमस्कार करावा. नरसोबावाडी वगैरे ठिकाणी काषाय वस्त्र पाहिल्यावर सगळे आणखी नम्र होतात. वाडी हे संन्याशांचेच स्थान आहे. पण जर माता समोर आली तर त्या संन्यासी पुत्राने मातेला नमस्कार केला पाहिजे अशी शास्त्राची आज्ञा आहे. म्हणजे मातेची केवढी योग्यता आहे! पुंडलिकाने मातापित्यांची सेवा केली ती उगीच केली नाही. देवाला पोहोचली आहे ती. देवाला अपमान वाटला नाही. देव उभे राहिले. देवीची उपासना काय स्वतंत्र करायला पाहिजे असे नाही. मातृरूपाने संत महात्म्यांची उपासना चालू आहे. देवीची काय मूर्तीच स्थापन केली पाहिजे असे नाही. देवालाच देवीरूप मानायचे आणि देवी व देव एकच आहेत. परमेश्वराच्या ठिकाणी स्त्री - पुरुष हा भेद नाहीच आहे. पण त्याने लोकांच्या करता तशा प्रकारची रूपे धारण केलेली आहेत.

वर मागणारे दैत्यही अशी बुद्धी वापरतात. महिषासुराने वर मागून घेतला, की कोणत्याही पुरुषाकडून माझा नाश होऊ नये. ब्रह्मदेवांना तो द्यावा लागला. आता पुरुषाकडून नाश व्हायचा नाही म्हणजे शंकर, विष्णू वगैरे कोणीही देव त्याला मारू शकणार नाहीत. त्याने तशी उग्र तपश्चर्याच केली होती. म्हणून हे स्त्रीरूप घ्यावे लागले. सर्व देवांची शक्ती एकत्रित होऊन महालक्ष्मी तयार झालेली आहे. सर्व देवांची शक्ती ऐक्यरूपाने महालक्ष्मी झाली आहे.

समुद्रमंथनाच्या वेळेलाही लक्ष्मी उत्पन्न झालेली आहे. त्याचप्रमाणे हिमालयापासूनही ती शक्ती उत्पन्न झाली. आरंभाला दक्ष प्रजापतीची कन्या म्हणून ती झालेली आहे. पण मूळ स्वरूप असं आहे. सर्व देवांचे तेज शरीरातून बाहेर पडले आणि ते एक होऊन महालक्ष्मीचे रूप तयार झाले आणि ते हृदय म्हणजे मातृहृदय आहे. "न मातुः परदैवतम्" शास्त्रकार उगीच सांगत नाहीयेत.

मातृगयेला गेल्यानंतर केवळ मातेकरता श्राद्ध तिथे करावं लागतं. त्यावेळेला पिंड प्रदान करीत असताना ते श्लोक म्हणतात, "मला गर्भामध्ये

धारण केले असताना त्या माउलीला किती क्लेश झाले असतील! सर्व क्लेश सहन करणाऱ्या मातेला मी पिंड प्रदान करतो. जन्माला आल्यानंतर स्वतः झोप न घेता माझ्या पालन पोषणाकरता लक्ष देणाऱ्या मातेला किती क्लेश झाले असतील! त्याकरता मी हा पिंडदान करतो." कृतज्ञता आहे. मातेच्या अंतःकरणामध्ये जे शुद्ध प्रेम आहे ते दुसरीकडे कुठेही मिळणार नाही.

सर्व गोपींची समजूत काढताना त्या वृंदावनामध्ये गोपालकृष्णांनी शुद्ध प्रेम काय आहे याचे वर्णन केले. ते आरंभाला म्हणाले, आपल्यावर प्रेम करणारा, आपल्या उपयोगी पडणारा जो आहे त्याच्यावर प्रेम करणे हा स्वार्थ आहे. कोणाचं प्रेम खरं ? त्याने उपकार केला तर आपण करायचा ही साधारण वृत्ती दिसते. पण शुद्ध प्रेम पहायचं असेल तर मातापितरांचं प्रेम पाहा. काही अपेक्षा नाहीये. या पुत्राचे कल्याण व्हावे एवढीच इच्छा आहे.

तर हे जे मातृहृदय आहे ह्या हृदयाची कल्पना मुलाला यायला पाहिजे ना! 'पाचशे काय हजार रुपये देतो पण आई वडिलांना वृद्धाश्रमात पाठवा' अशी भाषा हल्ली आपण ऐकतो. काय म्हणायचं याला! राजशासनही त्यांना शिक्षण देऊ शकत नाही. वृद्धाश्रम काढणारे काढताहेत. आता व्यवस्था काही तरी लावली पाहिजे ना! त्या म्हाताऱ्यांची व्यवस्था काय करायची? म्हणून उपकार म्हणून आम्ही काढतो काही तरी. राजशासन मुलांना सांगू शकत नाही की त्यांना आई-वडिलांना दुसरीकडे टेवता येणार नाही. ती बुद्धी मिळाली पाहिजे. अंतःकरणामध्ये कृतज्ञता निर्माण झाली पाहिजे. केवढं विलक्षण प्रेम आहे. म्हणून स्त्रियांच्याबद्दल अत्यंत आदरभाव पूर्वीपासून आहे. मनु सांगतात, घरामध्ये असणारी स्त्री मग ती माता असो, कन्या असो अथवा पत्नी असो ती देवीरूप आहे. देवीची उपासना करणारे संन्यासी लहान तीन वर्षांची मुलगी पाहिल्याबरोबर नमस्कार करतात. सर्वच लहान थोर स्त्रिया देवीचे रूप आहेत. त्यामुळे गृहस्थाश्रमामध्ये देवीचे वास्तव्य आपल्या घरामध्ये आहे ही भावना आहे. आपल्या मनामध्ये जर प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणी देवीचे रूप पहायची भावना निर्माण झाली तर त्या देवीच्या अंतःकरणामध्ये मातृभावना आपोआप

निर्माण होते.

शताक्षीरूपी देवीच्या नेत्रातून अश्रुधारा चाललेल्या आहेत. त्या अश्रूंनी सगळ्या कोरड्या पडलेल्या नद्या, विहिरी, तळी सगळं भरून गेलं आहे. कारण वाईट वाटलं त्या देवीला, ह्या जीवांना इतकं दुःख होतंय याचं. धान्यही दिलं. नवीन पाणी शेताला मिळून त्यातून धान्य पिकून येईपर्यंत हे देवीने दिलेले धान्य पुरले. ही सगळी व्यवस्था अगोदर करून टाकली.

आता त्याने जे तपश्चर्या करून ज्ञान मिळवलेले होते ती तपश्चर्याही तशीच होती. सकाम कर्म करू नये म्हणतात. त्यातल्या त्यात इच्छा करताना जरा जपून करावी. दुर्योधनाची इच्छा पांडवांचा पूर्ण नाश व्हावा अशीच होती. द्रौपदीचे जेवण झाल्यावर दुर्वास ऋषी दहा हजार शिष्यांना घेऊन गेल्यावर द्रौपदी काही त्यांना अन्न देऊ शकणार नाही. महालक्ष्मी समुद्र मंथनातून निर्माण झाल्यावर वरमाला हातात घेऊन कोणाच्या गळ्यात घालायची म्हणून पाहू लागली. प्रथम तिच्यासमोर दुर्वास ऋषी आले. त्यांच्याबरोबर दृष्टादृष्ट झाली. काय, केवढं तप आहे! ब्रह्मदेवाची दृष्टी खलास करून नवीन सृष्टी निर्माण करण्याची शक्ती आहे. तपश्चर्येला महत्त्व आहे.

महालक्ष्मीने विचार केला हे तपस्वी पुरुष आहेत. त्यांना क्रोध काही आवरत नाही. जन्मभर यांच्याजवळ राहायचं म्हणजे काय माझी अवस्था होईल ? नको. आधीच विचार करून निर्णय घेतलेला बरा; असे दुर्वास ऋषी! त्यांची योजना दुर्योधनाने याकरता केली. आपल्याला सगळं राज्य मिळावं, ही तर सगळ्यांचीच इच्छा आहे. पण अन्न मिळालं नाही की दुर्वास ऋषी रागावून शाप देतील आणि परस्पर पांडवांचा नाश होईल. दुर्वास ऋषि जरी मध्यस्थी करायला आले तरी त्यांची मध्यस्थी ईश्वराला, जगदंबेला मान्य होणार नाही. स्वतंत्र ईश्वरशक्ती ही त्या वेळेला वापरावी लागली. आणि ही ईश्वरशक्ती वापरण्याकरता द्रौपदीची भक्ती उपयोगी पडलेली आहे.

धर्मराज मोठे धार्मिक आहेत. शुद्ध धर्माचरण चाललेलं आहे. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे शुद्ध कर्म करताहेत. कोणाचंही अनिष्ट चिंतन नाही

मनामध्ये. अजातशत्रू खरोखरच आहेत.परंतु ऐन वेळेला दहा हजार शिष्य घेऊन दुर्वासऋषि आल्यानंतर कुठलं अन्न निर्माण करणार? सूर्यनारायण उदयाला यायला अजून अवकाश आहे. अशा वेळेला परमेश्वराची भक्ती उपयोगी पडलेली आहे. शुद्ध अंतःकरण जर प्रेममय झालं तर त्या प्रेमाला काही दुःख नाही, संकट नाही.

अशा रीतीने दुर्गम दैत्याने हरण केलेलं वेदज्ञान त्या शताक्षी देवीने त्याचा नाश करून देवांना, विप्रांना परत दिलं आहे. अशा प्रकारचा कथाभाग पुढे येणार आहे.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ।।**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

ऋषी मंडळींना देवीची कृपा संपादन करण्यासाठी दुर्गम दैत्यासारखी हजार वर्षं तपश्चर्या करावी लागली नाही. मनामधले सगळे दोष दूर होऊन जशी जशी प्रगती त्या तपश्चर्येमध्ये होत गेली तसे त्या असुराचे कार्य झाले. इथे ऋषी मंडळींना काही मागायचं नव्हतं. सर्व विश्वाचा नाश होण्याचा प्रसंग आलेला आहे. वेदज्ञान सगळं गेलेलं आहे. ते परत मिळवण्याची त्यांना इच्छा आहे. वेदज्ञान मिळवून आपण श्रेष्ठ व्हायचं, देवादिकांचा पराजय करावयाचा वगैरे वासना त्यांच्या मनामध्ये नाहीयेत. असुराच्या मनामध्ये ती इच्छा आहे.

'सर्वेऽपि सुखिनः संन्तु' ही ऋषी मंडळींची इच्छा आहे. असुरांची तशी नाही. केवळ आपण एकटंच सुखी व्हावं. सर्व आपल्या अंकित राहिले पाहिजेत. म्हणजे हजार वर्षं तपश्चर्या करून सुद्धा ही वासना कमी झालेली नाही. वासनाक्षय होणं किती कठीण आहे ! ऋषी मंडळींचं अंतःकरण निर्वासन आहे, त्यांची नित्यकर्म उपासना चालू आहे. नित्यानित्य विवेक, वैराग्य वगैरे सगळी साधनं परिपूर्ण आहेत. त्यामुळे त्यांच्या तपश्चर्येने त्यांनी आवाहन केल्याबरोबर देवीचा प्रादुर्भाव होतो आहे.

पुरुष सूक्तामध्ये पुरुषाला सहस्त्रशीर्षं आहेत, सहस्त्र अक्ष आहेत असे वर्णन आहे. म्हणजे फक्त सहस्त्र नाहीत. अनेक आहेत. समष्टि रूपाचे वर्णन आहे. तसं अनंत अक्ष धारण करून देवता उत्पन्न झाली. तिच्याकडे मातृवात्सल्य आहे. वात्सल्य शब्दाचा अर्थ शास्त्रकारांनी दोन प्रकारांनी केलेला आहे. ईश्वराचा वात्सल्य गुण हा फार मोठा आहे. दुसरा अर्थ असा जे आपल्याला शरण आलेले आहेत, त्यांच्या दोषांचा विचार करायचा नाही. सर्व दोष गुणरूप दिसताहेत. वात्सल्य मातेचं आहे ते. त्यामुळे त्याला राग येणं, शासन करणं वगैरे काही नाही. खरा राग नाहीये तो. म्हणजे जीवांच्याकडून अनेक दोष झाले असले तरी दोषबुद्धी नसून गुणबुद्धी आहे. दोषाच्या ठिकाणी गुणत्व बुद्धी हा दोष समजला जात नाही. गुणाच्या ठिकाणी दोषत्व बुद्धी हा दोष आहे. मात्र, असूया त्याला म्हणतात.

श्रेष्ठ पुरुषांच्याजवळ अनेक गुण आहेत. पण त्या प्रत्येक गुणामध्ये आणखी दोषबुद्धी उत्पन्न होणं, हा असूया दोष आहे. अनसुया माता देवांची जननी या गुणामुळे झाली. आपल्या अंगी गुण यावे असे वाटत असेल तर गुणांच्या ठिकाणी दोषत्व बुद्धी उत्पन्न होऊन उपयोगी नाही. गुणच जर आम्हाला ते वाटत नसले तर आपल्या ठिकाणी त्याचं संवर्धन करण्याचा प्रयत्न तरी कसा करणार ? म्हणून गुणांच्या ठिकाणी दोषाविष्करण ही असूया आहे.

श्रीकृष्णांची अग्रपूजा सर्वांच्या संमतीने धर्मराजाने केली. राजसूर्य यज्ञाच्या वेळेला सर्वांची पूजा यजमानांनी करायची असा एक विधी आहे. सोमरस ज्या दिवशी काढतात त्या दिवशी आलेल्या सर्व मंडळींची यजमानाने पूजा करायची असते. राजसूय यज्ञाला किती प्रचंड संख्येने मंडळी आली होती ! पृथ्वीवरचे अनेक राजे आले होते. जरासंध जिवंत राहिला असता तर धर्मराजाचा राजसूय यज्ञ झाला असता की नाही कोणास ठाऊक. तो प्रतिबंध करणार. जरासंधाच्या कारागृहात हजारो राजे लोक बंदी होते त्या सर्वांची मुक्तता केली आणि सन्मानाने त्यांच्या राज्यात पाठवून दिलं. त्या सर्वांना धर्मराजाच्या राजसूय यज्ञाला यायचं आमंत्रण दिलं, श्रीकृष्णांनी. चातुर्य आहे,

मुत्सद्दीपणा आहे. धर्मराजाचे सर्वांगीण कल्याण व्हायला पाहिजे हे श्रीकृष्णाचं वात्सल्य आहे. मुख्यतः संपत्ती पाहिजे ना. त्या बंधूंनी जिंकून पुष्कळ संपत्ती आणली. श्रीकृष्णांसारखे श्रेष्ठ पुरुष नेहमी दूरदृष्टीने विचार करीत असतात. पुढे पांडवांच्यावर प्रसंग येणार आहे, त्यांचे राज्य जाणार आहे आणि युद्ध होणार आहे. त्यावेळी सगळे राजे लोक पांडवांना अनुकूल व्हावेत म्हणून श्रीकृष्णांनी अगोदरच ही सर्व योजना करून ठेवली.

परमेश्वराबद्दल प्रेम का वाटतं भक्तांना? भक्तियोगाचे मुख्य कारण ईश्वराला भक्ताचे दोष गुणच दिसतात. "सुहृदम् सर्व भूतानां" भगवान् सांगत आहेत. ईश्वराजवळ मोठी शक्ती आहे. सर्वांचा तो नियामक आहे. सर्वांना शासनकर्ता आहे हे ऐकून परमेश्वराकडे लक्ष जाईल की नाही? भीतीच वाटायची उलट. सर्व कर्मांचा तो प्रेरक, कर्ता आणि कारयिता आहे. हे ज्ञान आहे. शक्ती आहे. पण आपलं अंतःकरण परमेश्वराकडे जायला पाहिजे. त्याच्याबद्दल प्रेम वाटलं पाहिजे. भगवान सांगताहेत - "मी सर्वांचा सुहृद आहे" सुहृद म्हणजे "प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्" असा अर्थ आचार्य महाराज करताहेत. भक्ताने आपल्याला काही द्यावं अशी त्याला अपेक्षा नाही. भक्तावर उपकार करावयाचा आहे फक्त. आपल्याजवळ आलेला आहे. संकटग्रस्त असेल. संकट नसताना जीवाने आपली कुठे आठवण केली, हा विचार तो करत नाही. कृतज्ञता नाही जीवांच्या ठिकाणी. असं असेल. पण ते सुद्धा गुण आहेत त्याच्या दृष्टीने. आत्ता संकटामध्ये सापडल्यावर मला विचारायला येतात, हरकत नाही. तो सुद्धा गुण आहे. आले ना माझ्याजवळ?

रावण कुठे गेला शेवटपर्यंत? नाही. जाणार नाही म्हणाला. शरण जाणार नाही.

जे आपले आश्रित आहेत त्यांचे दोष विसरून जाणं म्हणजे त्यांच्या दोषांना गुण समजणं. किती गुणी आहे जीव. एक क्षणभर जरी चिंतन केलं तरी हरकत नाही म्हणतात ना! 'मोटके निमिषभरी देईजे' एक निमिष चिंतन कर तू. म्हणजे दुसरे दिवशी दोन क्षण होईल आणि पुढे हळू हळू ते वाढत जाईल.

तर दोषाच्या ठिकाणी गुणत्वाची व्याख्या भक्तिशास्त्रकारांनी केली. आपले दोष त्यामुळे देवाला गुणच वाटतात. म्हणजे केवढं मोठं मन आहे ! असा जर आपण विचार केला तर आपल्या अंतःकरणामध्ये प्रेमभक्ती निर्माण होते.

पण हाही अर्थ बरोबर वाटला नाही. दोषाला गुण समजणं हा भ्रम झाला नाही का ? दोष असताना त्यांना गुण का म्हणायचं ? म्हणजे देवाला वात्सल्य आहे, याचा अर्थ भ्रम, भ्रांती आहे असा करावा लागेल. म्हणून दुसरी व्याख्या केली. जीवांचे दोष न दिसणं. दोषांकडे लक्षच नाही. दोष दर्शन अभावः - दोषाला गुण समजणं नको. त्याचे दोषच विसरून जाणं, ते मनामध्ये न येणं. ब्रह्मादिक देवांचासुद्धा जो नियामक आहे त्याचं आपल्या दोषांकडे अजिबातच लक्ष नाहीये.

'योगक्षेमं वहाम्यहम्' अशी आश्वासनं देतात भगवान्. तशी जर वृत्ती झाली तर प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही मार्गांमध्ये सहाय्य करण्याचं भगवंतांचं आश्वासन आहे. भगवान् नुसते उपदेश करीत नाहीयेत.

'मामेकं शरणं व्रज' हे सांगताहेत. त्यात तुझंच कल्याण आहे. आणि त्यात योगक्षेमाची हमी घेतलेली आहे ना ! काय मिळाले नसेल ते मिळवून देणं. मिळालेलं सुरक्षित ठेवणं, वाढवणं. ही सगळी व्यवस्था प्रपंचामध्येही आवश्यक आहे.

पारमार्थिक दृष्टीने जे योगक्षेम आहेत तेही मोठे कठीण आहेत. मनातले सगळे दोष दूर झाल्याशिवाय विवेक वैराग्य हे मनात उत्पन्न होत नाहीत. विवेक होत नाही.

'शरीरापेक्षा मी वेगळा आहे' हा विवेक होत नाही ना ! कितीही जन्म घेतले तरी शरीरात्मभाव कायम आहे. शरीर हे अत्यंत प्रिय आहे. मग तो जीव पशूच्या जन्माला जावो किंवा पक्ष्याच्या. त्याला आपलं शरीर प्रिय आहे. त्याला जर विवेक उत्पन्न झाला तर तो सुटेल ना त्यातून ! मनुष्याला जिथे विवेक समजत नाही, तिथे प्राण्यांची काय कथा ! शरीर म्हणजेच मी आहे या भ्रमात पडलेला आहे. पण तो भ्रम आहे हे समजत नाही. शरीर म्हणजेच मी आहे

हेच खरं वाटतं. शरीरात्मभावच खरा आहे. शरीरापेक्षा मी वेगळा आहे हा विवेक उत्पन्न व्हायला किती भयंकर प्रयत्न केले पाहिजेत! बुद्धीला प्रेरणा करणारी एक मोठी शक्ती आहे. ही एक भावना मनामध्ये असली पाहिजे. प्रयत्न करायचा. अशा भ्रमामध्ये पडल्यावर किती दुःखं भोगावी लागतात!

देहात्मवाद स्वीकार करून देहाचे संबंधी जे आहेत त्यांच्या ठिकाणी ममता उत्पन्न होते. त्या सर्वांना सुखी करण्याचा प्रयत्न करायचा आहे. शक्य आहे का हे? त्याची बुद्धि परिछिन्न म्हणजे मर्यादित आहे. सर्वत्र ममता नाहीये. सर्वही माझे आहेत. सर्वात मी आहे. 'हे विश्वची माझे घर' असे आम्ही म्हणू शकत नाही. "हे घर माझं आहे, हे फक्त माझं घर आहे आणि ते पक्कं राहिलं पाहिजे." एवढीच इच्छा आहे. 'सर्व विश्व माझंच घर आहे,' अशी बुद्धि कशी उत्पन्न होणार?

तर ही जी इच्छा आहे, "माझे सर्व आप्तेष्ट आहेत, माझे सगळे आहेत त्यांचं कल्याण व्हावं; मी जे काही मिळवलेलं आहे, ते सुरक्षित रहावं, त्याची हानी होऊ नये," वगैरे भावना नुसत्या मनामध्ये करायच्या. आपली शक्ती किती आहे याचा विचार आपण कुठे करतो? या वासना मनामध्ये आहेत, त्यामुळे हे सगळं करणारी एक शक्ती आहे, ही कल्पनाच मनात येत नाही. कर्तृत्व फक्त 'माझं' आहे. माझ्या बुद्धीने, माझ्या शक्तीने मी एकंदर सगळं मिळवणार आहे. आणि हे मिळवायचं ठरल्यानंतर धर्माधर्माचा विचार राहात नाही. विवेक जेवढा मनामध्ये उत्पन्न होईल तेवढं नीति काय, धर्म काय इकडे लक्ष जाईल ना! विवेकच नाही, शरीरात्म भाव पक्का आहे. शरीर म्हणजेच मी आहे. मग शरीर, म्हणजे मी सुखी होण्याकरता प्रयत्न केला पाहिजे. आपण, म्हणजे आपले शरीर सुखी होण्याकरता प्रयत्न करणं आपलं कर्तव्य आहे. त्याशिवाय मी सुखी होणार नाही. सुखाकरता प्रयत्न करू नका असे शास्त्र किंवा संत महात्मे सांगतील का?

पण संतांचा प्रश्न असा आहे की, ज्या सुखाकरता तुम्ही प्रयत्न करता ते सुख मिळणं शक्य आहे का? तुम्ही आणि तुमचे संबंधी जे मानलेले

आहेत. अहंता आणि ममता. या सगळ्यांना सुख मिळावं ही इच्छा तुमची चांगली आहे. पण त्या इच्छेला काही प्रतिबंध पाहिजे. त्यांना सुख मिळावं म्हणून आपण जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा त्यांच्या पूर्व कर्मांचा आपण विचार करीत नाही. इथे विवेक पाहिजे.

तुकाराम महाराजांना शिवाजी महाराजांनी नजराणा पाठवला. पण त्याच्याबद्दल तुकाराम महाराजांचा विवेक किती मोठा आहे! हे जर माझ्या घरात राहिलं तर सुरक्षित राहू शकणार नाही. हा एक विचार. सगळ्या लोकांचं लक्ष तिकडे जाणार ना. उद्या जर त्याची चोरी झाली तर शिवाजीराजे प्रत्येक वेळेस चोरांना पकडून ते धन परत आणून देणार आहेत का? शिवाय माझीही बुद्धी बदलण्याचा संभव आहे. मी आज जे मला काहीही नको म्हणतो ते आता म्हणणार नाही. मला आता ऐश्वर्य मिळालेलं आहे. राजेच अगदी अनुकूल आहेत. राजांची माझ्यावर श्रद्धा आहे. म्हणजे राजाकडे माझं अधिक लक्ष जाणार आणि पांडुरंगाकडचे लक्ष कमी होणार! ते देवाकडे राहील किंवा नाही हा एक मोठा विचार आहे. हा पूर्ण विवेक संतांच्या मनामध्ये असल्याने पूर्ण वैराग्य आहे. काही मला नको. तो नजराणा परत घेऊन चला. पुन्हा असं पाठवू नका, असं सांगा. हा जो विवेक मनामध्ये उत्पन्न झाला पाहिजे हा केवढा गुण आहे! त्याग निर्माण झालेला आहे मनात. राजांची अनुकूलता आहे, राजांची श्रद्धा आहे, त्यामुळे सगळे लोक आपल्याला भिऊन राहणार. तुकाराम महाराज म्हणजे फार मोठे आहेत, राजांचे गुरू आहेत. मानसन्मानालाही काही कमी पडणार नाही. नको. काही जरूर नाही. सर्व देण्याची शक्ती जिथे आहे तिथे दुसऱ्याचं कशाला घ्यायचं? घेतल्यानंतर तिथं मन गुंतून राहाणार ना?

मनाला बाजूला करायचं आहे. शरीरातून मन बाजूला झालं पाहिजे. माझं - माझं म्हणून द्रव्य वगैरे आहे तिथून मन बाजूला झालं पाहिजे. हा विवेक आहे. पृथक्करण करून मनाला सगळ्यांपासून बाजूला करायचं आहे. हा प्रयत्न करण्याकरता परमेश्वराची जितकी भक्ती आपल्या अंतःकरणात उत्पन्न होईल तितकी व्हायला पाहिजे. तीही तळमळ मनाला लागली पाहिजे. त्याकरता असे

जे ज्ञानी महात्मे आहेत त्यांची संगती मिळेल आम्हाला तितकी मिळाली पाहिजे. अशी इच्छा करायची. या वासना अंतःकरणामध्ये उत्पन्न झाल्या पाहिजेत. या दुसऱ्या धनादिकांच्या वासना मनामध्ये उत्पन्न होऊन उपयोग काय? मन त्यांच्यापासून कधीच बाजूला होणार नाही. जास्ती आसक्त मन होईल. यातच मनुष्य जन्मून संपायला काय वेळ लागणार आहे, केव्हाच संपून जाईल आयुष्य! माणसाला वाटतं मी इतका मोठा आहे, निरोगी आहे असे समजतो आपण. पण कोणत्या वेळेस काय बिघडेल, काय होईल सांगता येत नाही. बोलता बोलता माणसं जातात.

तर हा जो अनिश्चितपणा आहे तो देहात्मवाद मानणाऱ्यांच्या पुढं येत नाही. हे सगळं अनिश्चित आहे. जोपर्यंत सगळं सुव्यवस्थित आहे तोपर्यंत हा प्रयत्न आपण करायला नको का? जास्ती मन आसक्त करण्याचा प्रयत्न करायचा की त्याच्यापासून बाजूला करण्याचा प्रयत्न करायचा? बाजूला करायचं याचा अर्थ जेवणखाण करायचं नाही, दैनंदिन व्यवहार करायचे नाहीत असा नाही. शरीर राहिलं पाहिजे हे तर मुख्य आहे. शास्त्रकार किंवा संतमहात्मे शरीराची उपेक्षा करा असं सांगत नाहीत. 'सगळं सोडून द्या,' याचा अर्थ घरदार सोडून कुठंतरी फूटपाथवर जाऊन निजा असा नाही. परंतु मन त्या ठिकाणी आसक्त होतंय का इकडे लक्ष द्या. मन केव्हाही बाहेर पडण्याची तयारी आहे.

पूर्वीच्या रघुवंशातील राजे लोकांचं कालिदासांनी वर्णन केलेलं आहे, रघुवंशात. संपत्ती पुष्कळ ते जमा करायचे पण ती त्यागाकरता होती. अनेक प्रकारचे प्रजाजन आहेत. कोणी सुखी आहेत, कोणी दुःखी आहेत, कोणी सुखी असले तरी संकटग्रस्त आहेत. हे द्रव्य त्यांचं आहे आणि ते त्यांना उपयोगी पडलं पाहिजे. सर्व खजिन्याचा मालक राजा आहे पण मनात अशी बुद्धि आहे की, हे प्रजाजनांचे द्रव्य आहे. त्यांच्या उपयोगी पडलं पाहिजे. अशी मुख्य राजाची इच्छा पाहिजे. त्याप्रमाणे त्याने आपल्या आचरणाने प्रजाजनांची बुद्धि तयार केली पाहिजे. ज्या ठिकाणी असे आचरण होत नाही तिथे नियामक शक्ती वापरली पाहिजे.

कार्तवीर्यार्जुनाने आपल्या शक्तीचा वापर करून प्रजाजनांना विवेक, त्याग वगैरे शिकवले. दत्तात्रेयांच्या कृपाप्रसादाने योगसामर्थ्य मिळालेलं आहे.

तर देहात्म बुद्धि कमी करण्याचा प्रयत्न हा विवेकाने, विचाराने होत असतो. सत्संगतीने होत असतो. महात्म्यांचे आचरण पाहून होत असतो.

पण कार्तवीर्यार्जुनाच्या मनात आले की, आपण योगसामर्थ्याने प्रजाजनांची बुद्धी चांगली बनवायची. सामर्थ्य मिळालेलं आहे. दत्तात्रेयांच्या कृपेने पुष्कळ सिद्धी मिळाल्या. त्याची मानसिक शक्ती फार वाढली. त्याचं वर्णन कालिदासांनी केलेलं आहे.

**'अकार्य चिंता समकालमेव प्रादुर्भवं चापहरः पुरस्तात ...'**

एवढा नेता होता तो, की त्याला ईश्वरसाक्षात्कार झाला होता. स्वतःच्या मनाचे असलेले गुण दोष इकडे लक्ष द्यायला सवड नाही. हा एक प्रसंग आहे. अकार्य चिंता सुरू झालेली आहे. आज अमुक एका श्रीमतांच्या घरावर दरोडा घालायचा आहे. काही चार मंडळी मिळून अरण्यात बसून विचार करताहेत. विचार सुरू झाल्याबरोबर कार्तवीर्यार्जुनाला हे समजलं. आता तिथे काही फोनची व्यवस्था नव्हती. ईश्वरकृपेने मानसिक शक्तींचा त्याचा विकास इतका आहे की, कुठे कोण कसला विचार करतोय हे त्याला लगेच समजायचं. आणि तो लगेच धनुष्यबाण हातात घेऊन त्यांच्यासमोर जाऊन उभा रहायचा. आणि असं फक्त एकाच ठिकाणी नाही तर संपूर्ण राज्यात जिथे जिथे असा अनीती, अकार्य विचार सुरू होई तिथे तो प्रत्यक्ष उपस्थित होत असे. अनेक रूपे धारण करण्याची त्याची शक्ती होती. समजण्याची शक्ती होती. ज्ञानशक्ती असल्याशिवाय क्रियाशक्तीचा उपयोग होऊ शकत नाही. हेरांच्यावर त्याचा विश्वास नव्हता.

त्याचा पिता गेल्यानंतर त्याने सांगितले की, "मी राज्य घेणार नाही. खरा कोण, खोटा कोण, चांगला कोण, वाईट कोण हे मला कळणार नाही. हेर सगळं खरंच सांगतील कशावरून ? त्यांच्या बुद्धीमध्येही काही दोष असतात ना! त्यांच्या विरोधात असणाऱ्या निर्दोष लोकांची त्यांनी दोषी आहेत अशी

खोटी नावे राजाला दिली तर! ते सगळं पाप राजा म्हणून माझ्या मस्तकावर येणार. मला नरकात जावं लागेल. त्यापेक्षा मी राज्य स्वीकारत नाही.'' त्यामुळे काही ऋषींनी त्याची समजूत काढली. ''तुझी इच्छा एवढीच आहे ना, तुला सर्व समजून सर्वांचं नियमन करण्याची शक्ती तुला मिळाली पाहिजे ना, मग तुझी राज्य करायला हरकत नाही ना?'' तो म्हणाला, ''मग हरकत नाही.'' त्यासाठी दत्तात्रेयांची उपासना आणि सेवा कर असं ऋषींनी सांगितले आणि त्याप्रमाणे त्याने सेवा केली.

त्या शक्तीमुळे सबंध राज्यातील सर्व प्रजाजनांनाच्या अशी दहशत बसली, की कार्तवीर्यार्जुन केव्हाही आणि कुठेही येतो, धर्मशील महात्मे जे आहेत त्यांचे धर्माचरण चालू आहे. त्यांचंही कल्याण आहे. लोकांचंही कल्याण आहे. पण अधर्माने वागणाऱ्यांच्या समक्ष जाऊन त्यांना ताकीद द्यायची की आत्ताच्या आत्ता मी तुमचा नाश करतो – अधर्माचरण बंद करता की नाही. हेर पाहिजेत कशाला?

असं राज्य त्यानं केलं ८५,००० वर्षे. पाच वर्षे किंवा दोन वर्षे नाहीये. किती दीर्घ काळ आहे आणि केवढी शक्ती मिळवणारे राजे लोक होऊन गेलेले आहेत. आणि नंतर त्याची बुद्धि पालटली. म्हणाला, मी काय केलं? शक्ती असल्यामुळे सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत हाच एक उद्योग केला. त्यात काही श्रम नाहीयेत. वाटेल ती रूपं धारण करता येतात. कुठे अकार्य चालू आहे समजतं. गुन्हेगारांना ताकीद देता येते, पण हेच करत बसायचं का? का बुद्धीमध्ये असणारा अन्याय दूर केला गेला पाहिजे? कार्तवीर्य एकदम येतो आणि आपण एकदम अकार्य करताना थांबतो, हे थांबणं नाहीये. अन्याय थांबणार नाहीये. अपराध करणाऱ्यांच्याच मनामध्ये न्याय, अन्याय यांच्याबद्दल विवेक निर्माण झाला पाहिजे. आपण अधर्माने वागतो आहोत. याचं फळ – दुःख हे आपल्यालाच भोगावं लागणार आहे. या जन्मात नाही तर पुढच्या जन्मात. हा सगळा विवेक त्याच्या मनामध्ये उत्पन्न झाला पाहिजे आणि त्याची बुद्धी बाजूला झाली पाहिजे.

संसारापासून मनाला बाजूला करणं हा एक विवेक; धर्माधर्माचा विवेक म्हणजे अधर्मापासून मनाला बाजूला करणं. हिंसा, द्वेष वगैरे जे दोष आहेत त्यापासून मनाला बाजूला करणं हा विवेक आहे. हा विवेकाचा अभ्यास करायचा म्हणजे किती कठीण काम आहे. मनामध्ये चीड आहे. मला याने त्रास दिला याचा नाश केला पाहिजे. याचा नाश केल्यामुळे त्याचा झालेला नाश भरून येतो का ?

द्रौपदीची पाच मुलं मारली अश्वत्थाम्याने. त्याला धरून आणलं कृष्णार्जुनाने. द्रौपदीला म्हणाले, "याला काय शिक्षा करायची ? तू सांगशील ती शिक्षा आम्ही करू." पण द्रौपदीचा विवेक केवढा मोठा आहे ! भगवान् गोपालकृष्णाचं एवढं प्रेम द्रौपदीवर उगीच नाहीये. देहात्मविवेक तिच्या अंतःकरणात आहे. देह मी नाहीये. आणि माझी मुले ही नाहीतच. अहंता गेल्यानंतर ममता आपोआप बाजूला होती. मन हे देहापासून बाजूला झालं की देहाचे संबंधी - चेतन, अचेतन जे सगळे आहेत - ते माझे आहेत असं जे वाटतं त्यापासूनही मन बाजूला होतं. विवेक झाल्यानंतर त्या घटनेबद्दल मनात वाईट भावना काहीच राहात नाही. अश्वत्थाम्याने मारली ? याला जिवंत का ठेवायचे ? ती 'याला मारा' असे जरी बोलली असती तरी अश्वत्थाम्याचा शिरच्छेद केला असता. द्रोणाचार्यांचा मुलगा वगैरे काहीही विचार केला नसता. परंतु तिच्या मनाचं पृथक्करण झालेलं आहे. तिच्या मनात किती विवेक उत्पन्न झालेला आहे ! भगवान श्रीहरीची पूर्ण कृपा तिच्यावर आहे. भक्तीचा काय उपयोग आहे असं जे विचारतात त्याला उत्तर आहे – हा उपयोग आहे. भगवान भक्ताचं मन अधर्मापासून बाजूला करतात. कितीही अन्याय झालेला असला तरी त्या ईश्वराच्या कृपेने अंतःकरणात तितीक्षा उत्पन्न होते आणि विवेक होतो.

माझी मुलं मारली. आता याला शासन करून काय उपयोग ? पण ती बुद्धीच नाहीये. संसारात राहून ती किती धर्माचरण करीत होती ! धर्मराजाची सगळी खाती ती एकटी सांभाळत होती. राज्य करीत होती पण

मन बाजूला आहे. ईश्वराचं हे राज्य आहे. संसार हा ईश्वराचा आहे. ही बुद्धी असल्यानंतर ममता कमी झालीच पाहिजे. संसारातून मन बाजूला झालंच पाहिजे ना!

माझं ऑफिस इथे आहे. इथे असेपर्यंत काम करायचं, बदली झाल्यावर दुसरीकडे जायला नको का? माझं ऑफिस हेच आहे, मी इथेच काम करणार असं म्हणता येईल का? तसंच ईश्वराचा संसार आहे इथून माझी त्याला दुसरीकडे बदली करायची असती तर त्याने केली असती. मला जायला पाहिजे. अर्थात इथे राहून सुध्दा मन बाजूला करता येते. केव्हाही.जायची तयारी आहे. आनंदाने.

आचार्य महाराजांनी गंगादेवीची स्तुती केली आहे.

**मातर्जान्हवि शंभुसंगमिलिते मौलौ निहायांजलिं ।**
**त्वत्तीरे तपुषोऽवसानसमये नारायणाङ्घ्रिद्वयम् ॥**
**सानंदं स्मरतो भविष्यति मम प्राणप्रयाणोत्सवे ।**
**भूयाद्भक्तिरविच्युता हरिहराद्वैतात्मिका शाश्वती ॥**

गंगेची प्रार्थना करताना आचार्य सांगताहेत – हे गंगादेवी, भगवान् नारायणाची भक्ति माझ्या अंतःकरणामध्ये असावी. अद्वैत भक्ति पाहिजे. हाही विवेक आहे. शंकर श्रेष्ठ आणि विष्णु कनिष्ठ आहे, विष्णु श्रेष्ठ आहे आणि शंकर कनिष्ठ आहे. नाही! सर्व पेच जर त्याची आहेत तर त्यांच्यामध्ये कमी आणि जास्ती ठरविणाऱ्या आमच्या मनाला काय किंमत आहे? आम्ही कसं ठरवायचं? तर हरिहराद्वैत आहे. सर्व एक ईश्वररूप आहे. अशी भक्ति माझ्या अंतःकरणामध्ये उत्पन्न व्हावी. केव्हा तर प्राणप्रयाणोत्सवे. केवढा विवेक आहे! शरीरातून प्राण बाहेर पडायची वेळ झालेली आहे. ठरलेलं आहे, त्याच्यामध्ये अर्धा सेकंद सुध्दा कमी होणार नाही. थांबा, अमूक येणार आहे. नाही. येणार - बिणार नाही. ठरलेल्या वेळेला प्राण बाहेर पडायचे.

आचार्य महाराजांची भावना अशी आहे, की देहातून प्राण बाहेर पडायचे हा एक उत्सव आहे. प्राण प्रयाणाचा उत्सव चालू असताना माझ्या अंतःकरणामध्ये अद्वैत भक्ति निर्माण व्हावी. प्रेम ईश्वराचं असावं. आणि माझे

प्राण बाहेर पडावे. म्हणजे मृत्यूच्याविषयी सुध्दा ही भावना आहे. हे विवेकाचं बल आहे. शरीरातून केव्हा तरी बाहेर पडायचा आहे. हे नेहमी मनामध्ये आहे ना! ज्ञानाच्या साधनेमध्ये हे साधन मुद्दाम सांगितले आहे. संसाराचा विचार करा. नुसत्या सुखामध्ये राहून आपण सुखी आहोत, आपल्याला काही कमी नाही वगैरे वाटून काही उपयोग नाही. सुख खरं आहे की खोटं हे समजण्याइतका विवेक उत्पन्न व्हायला पाहिजे. तर हा सगळा विवेक याचा अर्थ मन त्या त्या विषयातून बाजूला होणं. आणि ज्याचं असं मन बाजूला राहू शकतं तो कुठेही असेना! मग तो संसारात असला काय आणि नसला काय!

समर्थांची गोष्ट सांगतात ना! कोणी जयरामस्वामी त्यांच्या वेळेला होते. ते कुठेही असले तरी कोणी राजा, श्रीमंत मनुष्य यायचा आणि मानसन्मानाने त्यांना घेऊन जायचा, आदरसत्कार करायचा. समर्थांनी एक पत्र आपल्या शिष्याबरोबर पाठवलं म्हणे. हे घोडे, दागदागिने कशाला पाहिजेत? अमूक कशाला पाहिजे? असे त्या पत्रात लिहिले. जयराम स्वामींनी त्या पत्राला उत्तर देताना ही कुबडी कशाला पाहिजे? जटा कशाला पाहिजेत? असे लिहून पाठवून दिले. कशाला पाहिजे? खरंच आहे. काहीच नकोय. साध्य निश्चित झाल्यावर साधनांचा अभ्यास काय करायचाय? 'अंतरी निर्मळ वाचेला रसाळ। त्याच्या गळा माळा असो नसो' बाह्य चिन्हांची काय जरूरी आहे? तुम्ही तरी जटाबिटा वाढवून मनाच्या श्लोकांचा उपदेश करता, ते तरी कशाला पाहिजे? एवढंच.

तर विवेक हा जितका वाढत जाईल, जितकं जितकं मन बाजूला होईल, तर ते बाजूला झालेलं मन परमेश्वराच्या चरणी लागू शकतं. स्थिर होऊ शकतं. संतांच्या सहवासात ईश्वराचे गुण ऐकायला मिळाल्यावर स्वाभाविक त्या मनाची गती त्या ईश्वरस्वरूपाकडे आपोआप होते आहे. जर विषयांपासून ते बाजूला झालेलं असेल तर! विवेक!! द्रौपदीने सांगितलं, "अश्वत्थाम्याला सोडून द्या." केवढा विवेक आहे! द्रौपदी राजा आहे का धर्मराज राजा आहे, सगळ्या प्रजाजनांच्या समोर केवढा आदर्श आहे हा! सगळे पहायला आलेले

आहेत. आज अश्वत्थामा जिवंत रहाणार की नाही ? द्रौपदी काय निर्णय देणार आहे ! धर्मराज वगैरे सगळे गप्प होते. अश्वत्थाम्याने तसं केलंच होतं ना ! तिची पाचही मुलं मारली पण मनामध्ये उत्पन्न होणारे रागद्वेषादिक विकार, विवेक जागृत झाल्यावर मग ती स्त्री असो की पुरुष, त्या दोघांच्याही मनामध्ये राहात नाही.

अश्वत्थाम्याचा नाश करणं हा अधर्म आहे हा पहिला विचार तिने मांडला आहे. ती अर्जुनाला म्हणाली, "तुम्ही अत्यंत गुरुभक्तीपूर्वक द्रोणाचार्यांजवळ अभ्यास केलात. त्यांनी सगळी अस्त्रविद्या तुम्हास दिली आहे. अश्वत्थामा म्हणजे द्रोणाचार्यांचं प्रत्यक्ष रूप आहे. द्रोणाचार्यांबद्दल तुमच्या मनात कृतज्ञता नाही ? " 'आपली मुलं मारणारा हा आहे' ही बुद्धी नाहीये. दोषाच्या ठिकाणी गुणत्व बुद्धी होऊ शकते. तो भ्रम नाहीये. पण त्यांनी बदलली व्याख्या वात्सल्याची. हा दोष नाहीये. अश्वत्थामा चांगला आहे असं तुम्हाला वाटलं पाहिजे. हा धर्म आहे. प्रत्यक्ष द्रोणाचार्य याच्या रूपाने तुमच्यासमोर उभे आहेत. आणि त्याचा शिरच्छेद करणार तुम्ही ?

भगवान् गोपालकृष्ण ऐकताहेत. मारायला सांगितलं नाही. ते मोकळे झाले. तुझं तू विचार करून काय ते ठरव म्हणाले. स्वस्थ बसून ऐकताहेत. द्रौपदीची इच्छा कशी आहे. द्रौपदीचं मन किती बाजूला झालेलं आहे संसारातून ! द्रौपदीचा विवेक कसा आहे. अहंता, ममता तिच्या ठिकाणी आहे की नाही, हे सगळं लोकांना दिसतंय.

द्रौपदीने आपल्या गुणांनी चांगलेपणा लोकांमध्ये दाखविला पाहिजे. ही इच्छा आहे परमेश्वराची. "योगक्षेमम् वहाम्यहम्" भगवान सांगताहेत. संशयादिक दोषांनी हे कसं होईल बुवा, असं जीवाला वाटतं. द्रौपदीलासुद्धा अधून मधून संशय वाटत होता. अरण्यामध्ये असताना अतिशय दुःख व्हायचं. निजायला काही नाही. स्वयंपाक करायला कुठून तरी लाकडं आणायची. आता ते सूर्य नारायणांनी अन्नपात्र दिलं आहे. परंतु त्याचा स्वतः उपयोग करून घ्यायचा नाही. ही सगळी दुःखं भोगायला लागल्यामुळे द्रौपदीनेसुद्धा धर्मराजाला सांगावे की ईश्वर आहे की नाही, असा माझ्या मनात संशय निर्माण झाला

आहे. धर्माचरणाचं फल मिळतं की नाही? धर्मराजाला ती सांगतीये. पांडव अत्यंत धार्मिक. धर्मराजांनी विचारलं, ' संशय वाटण्यासारखं काय झालं ? ' ती म्हणाली, ' तसंच घडलंय. तुम्ही साम्राज्य मिळवून राजसूय यज्ञासारखं मोठं पुण्यकर्म करूनही तुमचं राज्य गेलं. आणि सतत दुसऱ्याचा द्वेष करणारे, तुम्हाला जिवंत जाळून टाकण्याचा प्रयत्न करणारे कौरव राजे झाले आहेत. धर्माने वागून राज्य जातं आणि अधर्माने वागून राज्य मिळतं असं समजायचं काय? धर्माधर्माचं फल देणारा ईश्वर तरी आहे की नाही असा मला संशय वाटू लागलाय.'

पण धर्मराजांनी तिचं समाधान केलं. ते म्हणाले, संशय नाही. पूर्ण विवेक मनामध्ये उत्पन्न झाल्यानंतर संशय कधीच वाटणार नाही. हा सिद्धांत आहे ना ! ' धर्माचं आचरण काही फलाकरिता करायचं नाही ' हा सिद्धांत आहे. मी त्याकरता धर्माचरण करीत नाही. कर्तव्य आहे. ईश्वराची आज्ञा आहे त्याप्रमाणे मी वागलेलो आहे. धर्माचरणामुळे माझं राज्य गेलं असं मला वाटत नाही. धर्माधर्माचं फळ अवश्य मिळतं. फल देणारा ईश्वरही निश्चित आहे. मन संसारातून बाजूला झाल्याशिवाय संशय जाणार नाही. हे विवेकाचं फल आहे. भगवत् प्रेमाचं फल आहे. भक्तिमार्गाचं हे फल आहे. मनामध्ये प्रथम विवेक निर्माण झाला पाहिजे, संसारातून मन बाजूला झालं पाहिजे. अत्यंत अप्राप्य असे जे गुण आहेत ते आपल्यात निर्माण झाले पाहिजेत. हा केवढा गुण आहे ! अनेक जन्मांचा अभ्यास आहे.

मनाला संसारातून बाजूला करण्याची सवय पाहिजे आणि ईश्वराची कृपा पाहिजे.

भगवान गोपालकृष्णांची पूर्ण कृपा असल्यामुळे द्रौपदीने सांगितले, ह्या मुलाच्या रूपाने तुमचे गुरू द्रोणाचार्यच साक्षात् तुमच्यासमोर उभे आहेत आणि तुम्ही यांचा शिरच्छेद करणार ? म्हणजे तिच्या मनामध्ये जो विवेक दृढ झालेला आहे त्याचा परिणाम अर्जुनाच्या मनावरही झालेला आहे. आपली मुलं ह्यानं मारली असं वाटत होतं. साक्षात् द्रोणाचार्य याच्या रूपाने आहेत. आपल्या गुरूला मारायचे काय ? अधर्म नाही का हा? अधर्मापासून बुद्धी बाजूला केली

त्या द्रौपदीनं. शोक नाही वाटला तिला! शोकापेक्षा धर्माधर्माचा विवेक जागृत असल्यामुळे आपलंही मन अधर्मापासून बाजूला केलं आणि अर्जुनालाही करायला लावलं. हा ब्राह्मण आहे हे दुसरं कारण सांगितलं. त्याची हत्या तुम्हाला करता येणार नाही. शास्त्राची आज्ञा आहे. द्रोणाचार्यांचं प्रतीक आहे, रूप आहे. आणि तिसरं कारण तिनं सांगितलं - दया सर्व भूतेषु....

नारदांनी परमेश्वराचा कृपाप्रसाद लौकर होण्याची तीन कारणे श्रीमत् भागवतात एका ठिकाणी सांगितली आहेत.

पहिलं साधन – सर्वही प्राण्यांच्याबद्दल मनामध्ये दया पाहिजे. दया केव्हा उत्पन्न होईल? माझा हा शत्रू आहे, मला याने त्रास दिलेला आहे असे जर रागद्वेषादिक विचार मनामध्ये असतील तर कोणाबद्दल दया वाटेल का? तो दुसरा संकटात सापडल्यावर हा जास्ती त्याला त्रास देणार. 'असाच संकटात सापडू दे. असाच त्याला त्रास होऊ दे.' ह्याच्या मनात असे विचार असताना दया उत्पन्न होणारच नाहीये. तर सर्व भूतांबद्दल दया पाहिजे. मित्राबद्दल दया पाहिजे, शत्रूबद्दलही दया पाहिजे, कोणीही संकटात सापडला तर त्याच्याबद्दलही दया पाहिजे. कोणालाही दुःख होऊ नये. मित्रालाच होऊ नये, घरच्या मंडळींना होऊ नये. नाही! शत्रूलासुद्धा होऊ नये. दया हा मोठा धर्म आहे.

दुसरं साधन – संतोष. अनुकूल, प्रतिकूल कोणतीही परिस्थिती असली तरी संतोषवृत्ती पाहिजे.

**जैसी स्थिती आहे । तैशा परि राहे ॥**
**कौतुक तू पाहे । संचिताचे ॥**

विवेकसंपन्न बुद्धी असणारे संत महात्मे अनुकूल परिस्थितीबद्दलही हेच सांगतात. प्रतिकूल परिस्थितीमध्येही सांगतात. कारण दोन्ही जाणाऱ्या आहेत. दुःखही जाणार आहे, सुखही जाणार आहे. म्हणजे सुखाची परिस्थिती असताना आनंद मानणं, अहंकारी होणं, याचा काय उपयोग आहे? ते जाणार आहे.

**सुखेषु विगतःस्पृहः ।**

हे मुद्दाम सांगितलेले आहे. 'सुख माझं राहिलं पाहिजे.' असं वाटतं, पण नाही. राहणार नाही.

आणि तिसरं साधन – इंद्रियांचा संयम. सर्व इंद्रिये संयमात पाहिजेत, निग्रहित पाहिजेत. म्हणजे मनाला, बुद्धीला गुणी करायचं आहे. इंद्रिय जर बाहेर जायला लागली तर मनात आलेले थोडे फार गुणही जातील आणि दोष येतील, जास्ती वाढतील. म्हणून इंद्रियं ताब्यामध्ये पाहिजेत. हा संयम विवेकाशिवाय होणार नाही. सर्व इंद्रियांचा निग्रहसुद्धा विवेकाने होतो आहे. लोभादिक विकारांचा निग्रहसुद्धा विवेकाने होतो. मन जर विचार करून बाजूला झालं आहे तर हे मला पाहिजे, ते मला पाहिजे वगैरे लोभ कशाकरता करायचा? हे मनाला वाटेल आणि मन नेहमी बाजूलाच राहील. आसक्ती वाढणार नाही. हा पहिला मोठा गुण आहे.

वेदान्त ऐकण्याचा, ज्ञानेश्वरी वाचण्याचा, श्रवण करण्याचा अधिकार प्राप्त करून घ्यायलासुद्धा विवेक पाहिजे. मन किती वेळ बाजूला ठेवू शकतो, आम्ही ह्याचा विचार केला पाहिजे. मग ज्ञानेश्वरी ऐकावी, गीता ऐकावी, भागवत ऐकावं हे कधीच नाही. ऐकल्यानंतर तेवढ्यापुरतं बरं वाटतं, पुन्हा घरी गेल्यावर सगळं अगदी पहिल्याप्रमाणे आहे. कोण शत्रू ? कोण मित्र ? काय कमी आहे ? काय जास्ती आहे ? काय राहिलेलं आहे ? काय गेलेलं आहे ?

तर हे मुख्य गुण आहेत. द्रौपदीने सांगितले तिसरे कारण, दया. पूर्ण दया आहे. धर्मराजाच्या मनालासुद्धा द्रौपदीच्या या भाषणाने, विवेचनाने अत्यंत समाधान झाले. द्रौपदी अर्जुनाला सांगती आहे, अश्वत्थाम्याला जीवदान का द्यायचं, तर तो द्रोणाचार्यांचं साक्षात् रूप आहे. प्रतीक आहे. तुमचे ते गुरु आहेत. ज्या गुरूंनी दिलेल्या अस्त्रविद्येमुळे तुम्ही सगळ्या जगात अजिंक्य ठरलात ते गुरूच आहेत. या पुत्राच्या रूपाने. ही एक भावना तुम्ही ठेवली पाहिजे.

आणि दुसरं म्हणजे "याची माता अद्यापी जिवंत आहे, तुम्हाला माहीत आहे ना ? याला जर तुम्ही मारलंत तर एकुलता एक मुलगा गेल्याचे तिला किती दुःख होईल ! मी रडते आहे. माझी मुलं गेली म्हणून. माझ्याप्रमाणे

याच्या मातेला दुःख व्हावं अशी माझी इच्छा नाही. तेव्हा याला सोडून द्या, एवढी माझी इच्छा पूर्ण करा.''

भगवान् गोपालकृष्ण मनानेच आणखी द्रौपदीला शाबासकी देताहेत. जीवसुद्धा संतांच्या, परमेश्वराच्या कृपेने केवढा मोठा होऊ शकतो ! त्याचं मन संसारातून बाजूला झालं पाहिजे. निर्विकार स्थिती कशी आहे, अहिंसा कशी आहे, सत्य कसं आहे, हिंसा-अहिंसा विवेक झाला पाहिजे. सत्य - असत्याचा विवेक झाला पाहिजे. चोरीचा काय उपयोग आहे ? अस्तेय म्हणजे काय आहे ? अपरिग्रह म्हणजे काय ? किती संग्रह ? संग्रहाचा काय उपयोग आहे ? संग्रह न करण्याचा काय उपयोग आहे ? हा सगळा विवेक झाला पाहिजे ना ! मन त्याकरता दिलं आहे देवाने ! का जास्तीत जास्त संसारामध्ये मन घालून त्याप्रमाणे वागणं सामान्य जीवन जगणं हे श्रेयस्कर आहे ?

अज्ञानी लोकांप्रमाणे सामान्य जीवन जगून काय उपयोग आहे ? आयुष्य फुकट जाणार ! गेला जन्म व्यर्थ ! काही उपयोग नाही. बुद्धीला प्रेरणा करणं हे भगवतीचं कार्य आहे. त्या शक्तीने प्रेरणा दिली आणि द्रौपदीने अश्वत्थाम्याला सोडून दिलेलं आहे. उत्तर कोणीही देऊ शकलेला नाही. भीम जरासा त्या वेळेला रागावला होता. "मी अश्वत्थाम्याला सोडणार नाही " म्हणाला. म्हणजे त्याचा विवेक कमीच पडला द्रौपदीपेक्षा. रागाच्या भरात तो म्हणाला, " आपली मुलं त्याने मारली आणि द्रौपदी ह्याला जीवदान कसले देते ? मुलं गेल्यामुळे हिच्या डोक्यावर परिणाम झालेला दिसतोय."

पण नाही. धर्मराज वगैरेंनी सांगितलं, द्रौपदीचा अगदी उत्तम निर्णय आहे. पूर्ण समाधानाने ती सांगते आहे आणि ते अत्यंत विचारणीय आहे.

तर हा जो विचार आहे, हे एक अलौकिक कर्म आहे - प्रत्यक्ष पोटची मुलं मारणारा समोर आलेला आहे आणि त्याला सोडून द्या, सांगणं. त्याला मनाची केवढी तयारी पाहिजे ! राग नाहीये, द्वेष नाहीये. द्रौपदीच्या मनामध्ये द्वेष उत्पन्न का झाला नाही ? पहिल्यापासून ती सावध आहे. संसार माझा नाहीच आहे. ज्याने निर्माण केलंय तोच स्वामी आहे. मी मालक आहे, असं

म्हणण्याचा अधिकार मला काय आहे? संपूर्ण विश्व निर्माण करणाऱ्याला बाजूला करायचं आणि मी मालक आहे म्हणायचं, हा किती मोठा अपराध आहे! हा विचार करायचा. आणि त्या संसाराचं स्वरूप तसं विनाशीच आहे. राहाणार काय आहे? हाही विचार आहे. नित्य आहे की अनित्य आहे. हाही विवेक आहे ना! टिकणारं आहे की न टिकणारं आहे. हे एकदा मनाला पटल्यानंतर न टिकणाऱ्याच्या ठिकाणी मन राहील कसं? मात्र आपला विचार पक्का झाला पाहिजे. म्हणजे मन आपोआप बाजूला होतं. तर परमार्थ दृष्टीनं अशा प्रकारची ही प्राप्ती, जे काही मिळायचे असेल ते मिळवून देतो तो. आणि 'क्षेम' म्हणजे जे मिळालं आहे त्याचे संरक्षण करतो.

धर्मराजांनी द्रौपदीला सांगितलं, "धर्माचं आचरण. मी धर्माने वागलो म्हणून साम्राज्य गेलं ही खोटी समजूत आहे. ही समजूतच तुझी चुकीची आहे."

हा केवढा निर्णय आहे मनाचा! फलाची काही इच्छा मनामध्ये निर्माणच होणार नाही. फल देणारा दुसरा आहे. मालक दुसरा आहे. कर्ता दुसरा आहे. काय, माझा संबंध काय इथं? मला फल मागण्याचा अधिकार काय? कर्म मी करणारा आहे का? अहंताही बाजूला झाली. त्यामुळे फलेच्छाही बाजूला झाली. अंतःकरणामध्ये प्रेम अधिकाधिक उत्पन्न झालेलं आहे. आणि त्यामुळे ईश्वराची कृपा आहे.

भगवती जगदंबेच्या कृपेने सर्वत्र धान्य पिकलं. नद्या, तळी पाण्याने भरली. आता दुसरं एक कार्य उरलेलं आहे. या ऋषी मंडळींना ज्ञानाची इच्छा आहे. ज्ञान पाहिजे. ज्ञानधनापुढे बाहेरच्या धनाकडे त्यांचे लक्ष नाहीये. विवेकाशिवाय ज्ञानही मिळत नाहीये. धनाच्या इच्छेने धनातच मन गुंतून राहिलं तर ज्ञान मिळणार नाही. धर्माचरण होणार नाही. त्याकरता प्रपंचामध्येही विवेक पाहिजे. परमार्थामध्येही पाहिजे. परमार्थात विवेकाला अत्यंत महत्त्व आहे. पहिल्या नंबरचा गुण आहे तो. बाजूला आपलं मन किती वेळा होतंय हे पाहिलं पाहिजे नेहमी. संसाराकडे मन किती वेळा जातं, त्यात किती गुंतून राहातं आणि

त्यापासून थोडं तरी बाजूला होऊ शकतं का हे पाहिले पाहिजे सतत. आणि नुसतं बाजूला होऊन उपयोगी नाही, ते तसं टिकलं पाहिजे. माझे मन विवेकसंपन्न होऊन संसारापासून बाजूला होऊन तसे कायम कसे राहील हे पाहिले पाहिजे. तसा अभ्यास केला पाहिजे. हे देवाकडे मागणे मागितले पाहिजे.

शुद्ध बुद्धीने धर्माचरण झाले पाहिजे. ईश्वरार्पण बुद्धीने धर्माचरण झाल्यावर आसक्ती, ममता, अहंता हे जे दोष आहेत ते सगळे दोष जातात. आणि वैराग्य म्हणजे 'जिहासा' ज्याला म्हणतात ते प्राप्त होते. वैराग्य म्हणजे 'हे नको मला' असे वाटले पाहिजे. हे नित्य आहे, ते अनित्य आहे, हे शाश्वत आहे ते क्षणिक आहे. संसारात सुख कशामुळे मिळते आणि दुःख का प्राप्त होते वगैरे विचार करून मन बाजूला झाल्यावर पूर्ण वैराग्य येते. हा संसार कधीच नको मला; अशी भावना दृढ होऊ लागते.

त्यासाठी अनेक प्रकारचे विचार करायला सांगितले आहेत. संतांच्याद्वारे निरनिराळ्या प्रकारे मार्गदर्शन मिळते आहे. आणि अहंकाराने आपण जे कोणतेही कार्य करतो ते करण्याची आपल्याजवळ खरोखरच शक्ती आहे की नाही हे सगळे पटते आपल्याला. आणि मन निर्दोष झाल्याशिवाय तशी तीव्र इच्छा होणार नाही. आणि सोडण्याची इच्छा म्हणजे जिहासा, वैराग्यही होणार नाही. आणि ती सोडण्याची इच्छा झाल्याशिवाय भक्तीचा खरा उपयोग होणार नाही.

**हेची थोर भक्ती आवडते देवा ।**
**संकल्पावी माया संसाराची ॥**

तुकाराम महाराज सांगताहेत. माझे, माझे म्हणू नये. ही जी आसक्ती आहे ती कमी झाली पाहिजे. मन बाजूला झाले पाहिजे. ईश्वराची चरित्रे ऐकावीत, ईश्वराचे गुण ऐकावेत, सत्संगती करावी, संतांच्या सेवेत माझे जीवन जावे अशी मनाला तळमळ लागून राहिली पाहिजे. त्याकरता हे सगळे उपाय आहेत. पारमार्थिक योगक्षेम ईश्वराच्या कृपेशिवाय, सद्गुरूंच्या कृपेशिवाय मिळत नाही. ते मिळाले तर मानव जन्माचे सार्थक आहे. मिळालेला मानव जन्म सफल झाला.

भीष्माचार्यांनी कौरवांचा वंश सांभाळला. पण शेवटी ते शरशय्येवर पडले असता भगवान गोपालकृष्णांनी धर्मराजांना त्यांच्याजवळ पाठवले. भीष्माचार्यांनी धर्मराजाला सगळा उपदेश केला आणि भगवान गोपालकृष्णांवर दृष्टी स्थिर करून त्यांची स्तुति करता करता त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. नाही, गोपालकृष्णांच्या ठिकाणीच त्यांचे प्राण स्थिर होऊन गेले. ब्रह्मस्वरूपामध्ये ते विलीन झाले. त्यांना काही ब्रह्मलोकाला किंवा दुसऱ्या कोणत्या लोकाला जावे लागले नाही. हे त्यांनी आपले कर्तव्यकर्म करून साधले. संसार केला. संसार सोडला. ब्रह्मचारी राहिले. राज्य केले नाही. सगळ्यांचे संरक्षण केले. सगळे केले. परंतु मन बाजूला ठेवून केलेले आहे. मन बाजूला ठेवून सर्व साधता येते की नाही हे "जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे." आपल्याला काय समजणार?

तुकाराम महाराज स्पष्ट सांगतात, "जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे." हे कसे होते? ते त्याचा अभ्यास करणाऱ्याला माहिती.

तेव्हा ही कृपा आपल्यावर व्हावी अशी ऋषींची इच्छा असल्यामुळे शताक्षी देवीने ते सर्व कार्य केले आहे. सर्वांच्या जीवनाची व्यवस्था प्रथम केली आहे. आता त्या असुराचा नाश करायचा आहे. वेदज्ञान मिळावे अशी ऋषींची इच्छा आहे. ते ज्ञान महत्त्वाचे आहे. पवित्र आहे. अपवित्रापासून आमचे मन बाजूला झाले आहे आणि ते तसे कायम राहावे अशी प्रबळ इच्छा आहे. त्याकरता दुर्गम राक्षसाचा नाश करणे भाग आहे. ऋषींनी जसे तपश्चर्या करून ज्ञान मिळवले तसेच त्या दुर्गम दैत्यानेही तपश्चर्या करून ते ज्ञान मिळवले आहे. ऋषींच्याजवळ ज्ञान राहिले असते तर काय बिघडले असते? याला पुन्हा ज्ञान देता आले नसते का ब्रह्मदेवाला? पण त्याची तशी इच्छा नाही. आपल्याला जे ज्ञान मिळायचे ते देवांजवळ आहे ते मिळाले पाहिजे, स्वतंत्र ज्ञान नको. दुसऱ्याचे सर्व आपल्याला मिळावे, ही इच्छा आहे. यालाच लोभ म्हणतात. ते ज्ञानहीन झाले पाहिजेत. म्हणजे त्यांची धर्मशक्ती सगळी कमी पडेल आणि मग माझा सगळा उत्कर्ष होईल. हाच अविवेक आहे.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ।।**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

सध्या जी बाकीची मंडळी आहेत, ज्यांच्या मनात थोडे बहुत धर्मसंस्कार आहेत त्यांच्याकडून सर्वही कर्मांचे अनुष्ठान, यज्ञयागादिक अनुष्ठान, उपासना हे सगळे प्रत्येकाकडून पूर्ण होते असे नाही. इच्छा असते. आणि अशी इच्छा जरी असली तरी दृष्ट, अदृष्ट अनेक प्रकारचे प्रतिबंध निर्माण होतात. त्यामुळे ईश्वरप्राप्तीसाठी, ज्ञानप्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नांना समाधानकारक यश मिळत नाही. कर्माचा प्रतिबंध आहे.

योगशास्त्रामध्ये  हे सर्व प्रतिबंध सांगितले आहेत.

'अकर्मण्यता' हा पहिला प्रतिबंध आहे. कंटाळा ! काय उगीच किती करायचे ? रोज ज्ञानेश्वरी वाचून काय करायचंय ? झालं की, पुष्कळ वाचन झालं ! वर्षातून एकदा नामसप्ताह असतो त्यावेळी ज्ञानेश्वरी वाचावी, पुष्कळ झाले तेवढे. म्हणजे ज्ञानेश्वरीचे सगळे रहस्य जणू काय समजलेलेच आहे, अशीच कल्पना आहे. पुढे त्याचा काय उपयोग केला जातो किंवा काय फळ मिळेल हा काही मनामध्ये विचार नाहीये. सारखे ऐकले पाहिजे, सारखे चिंतन केले पाहिजे. आपले मन निदिध्यासापर्यंत न्यायचे आहे. तर तो निदिध्यास

म्हणजे दुसरा विषय मनामध्ये नाही. त्यालाच ध्यान असेही म्हणतात. ज्या विषयाचे प्रतिपादन ज्ञानेश्वर महाराजांच्यासारख्या ग्रंथकारांनी केले आहे तो मुख्य विषय कोणचा आहे? हे समजून घ्यायचे आहे. कीर्तन चालू आहे. तुकाराम महाराज किंवा कोणाचा तरी अभंग घेतात आणि त्या अभंगाच्या द्वाराने कीर्तनकार आपल्या वाणीने तुकाराम महाराजांना काय सांगायचंय ते सांगतात. सत्संगती पाहिजे. एक अभंग या विषयावरचा घेतला.

त्याच्याकरता गायन आहे. मनोरंजनाकरता अधून मधून विनोदी कथा सांगतात. पण ते काही मुख्य विषय नाहीयेत. मुख्य विषयाचे जे सार आहे तिकडे बुद्धी पाहिजे. मुख्य विषय सोडून गायन, वादन, विनोद यातच जर मन गुंतून राहिले तर त्या श्रवणाचा काय उपयोग होणार? एकदा एखादा ग्रंथ वाचून किंवा एकदा एखादे कीर्तन ऐकून काय होणार?

अकर्मण्यता उत्पन्न होते म्हणतात. पुरे आता. मनानेच पुरे असे म्हटल्यानंतर काय करायचे? दरवर्षी आषाढी एकादशीला पांडुरंगाच्या दर्शनाला काय जायचे? एकदा जाऊन आले म्हणजे झाले! अनेक वेळेला दर्शन का करायचे, हे वाटू नये म्हणून करायचंय.

भक्ताची भावना कशी असते / असावी – हे एका सुभाषितात सांगितले आहे, भगवान् शंकराची प्रार्थना करताना......

मोठा भक्त आहे भगवान सदाशिवांचा. कृपा आहे देवाची त्याच्यावर. तो म्हणतो आहे, देवा, वाराणसीमध्येच मला राहायला मिळावे. आणि तिथे राहायचे म्हणजे चहा, फराळ वगैरेंची व्यवस्था करून नाही. त्याच्याकरता तीर्थयात्रा नाहीयेत. अशी व्यवस्था झाली तर घ्यायचे नाही असा अर्थ नाही. मुख्य हेतू काय आहे इकडे लक्ष पाहिजे. हाच विवेक आहे. कौपिन फक्त धारण करावे मी, एवढीच माझी इच्छा आहे. अंथरायला, पांघरायला दुसरे काही नाही. ती तळमळ लागली आहे – "भगवंता, गौरीनाथा, तुझा माझ्यावर प्रसाद होवो." अशी सतत माझ्या मुखातून अत्यंत तळमळीने प्रार्थना निघाली पाहिजे. आणि शेवटी त्याने सांगितले असे अनेक दिवस जातील पण मला ते

निमिषासमान वाटले पाहिजेत. थोडी सेवा झाली, थोडीच भक्ती घडली माझ्या हातून, असेच शेवटपर्यंत वाटले पाहिजे. असे अनेक दिवसच्या दिवस गेले तरीसुद्धा काय, थोडीच थोडी प्रार्थना झाली अशी भावना व्हायला पाहिजे, खंत वाटली पाहिजे.

ब्रह्मदेवालासुद्धा कालमर्यादा आहे. सगळे जीव या कालमर्यादेत सापडलेले आहेत. पण हा भक्त त्या कालमर्यादेच्या पलीकडे गेला आहे. इतकी भक्ती घडली पाहिजे, इतकी तळमळ मनाला लागली पाहिजे. हा देवाचा प्रसाद आहे. तरीसुद्धा तो भक्त प्रार्थना करतो आहे. याला कधी वाटेल - पुरे आता, अजून किती करायचे ? मनामध्ये 'अकर्मण्यता' हा फार मोठा दोष निर्माण होतो. हा पहिला दोष आहे. प्रपंचाचा नाही तो कंटाळा येत ? रोज जेवायचा नाही तो कंटाळा येत ? रोज कशाला जेवायचे असे एखादे दिवशी तरी वाटेल का ? रोज रोज देवदर्शनाला कशाला जायला पाहिजे, प्रत्येक वर्षी वाडीला कशाला जायला पाहिजे, अनेक वेळा ज्ञानेश्वरी कशाला वाचायला पाहिजे, कशाला ऐकायला पाहिजे ? असे विचार आमच्या मनात येतात आणि पुन्हा हे बरोबर आहे असे वाटते. आणि वर आम्ही दुसऱ्याला सांगतो – तुम्ही तरी इतके कशाला करता ? म्हणजे आपली बुद्धी खरं तर भ्रष्ट झालेली पण ती बरोबर आहे असे वाटून आम्ही दुसऱ्याला उपदेश करतो. तर असे मनाचे अनेक दोष आहेत.

बुद्धीला एकदम काही समजेनासे होणे हा एक दोष उत्पन्न होतो. गहन विषय आहे. 'सकलमिदं अहंच वासुदेवः' ही भूमिका प्राप्त व्हायची म्हणजे किती कठीण काम आहे !

'सर्वम् देवीमयम् जगत् ।'

असा एक सिद्धांत सांगताहेत. देवी महात्म्यात सांगितला आहे. सर्व जगत् देवीरूप आहे. सर्व स्त्रिया तर आहेतच. हा जो सिद्धांत आहे ते काय नुसते शब्द आहेत का ? त्याप्रमाणे कोणाला ज्ञान झालंय का ? होणे शक्य आहे का ? हा विचार कुठाय ? म्हणायचे आपण. म्हणतो. पाठ करतो सगळे. देवीच्या भक्तांच्या दृष्टीने सर्वही विद्या हे देवाचे रूप आहे, ब्रह्मविद्येपर्यंत.

शास्त्रकारांनी उपनिषदामध्ये पर विद्या आणि अपर विद्या असे भेद केले आहेत. नारद आणि सनत्कुमारांची भेट झाली. सनत्कुमार म्हणतात, 'आम्हाला ज्ञान पाहिजे' नारदांनी विचारले, 'तुम्ही काय काय शिकलात ते सांगा बघू अगोदर.' त्यांनी जे सांगितले त्याची यादी छांदोग्य उपनिषदामध्ये दिलेली आहे. ते म्हणाले, 'जगात जेवढ्या विद्या आहेत त्या सगळ्या मला माहीत आहेत.' नाही, म्हणाले, हे अगदी थोडे आहे. काय जाणलं तुम्ही?

ज्ञान पुष्कळ झाले आहे. हा विषय माहिती आहे, तो विषय माहिती आहे. काय माहिती नाही असे नाही. लोक आश्चर्यचकित होतात. किती ज्ञान आहे, किती बहुश्रुतता आहे, हे सगळे आहे. पण त्याला शास्त्रकार दृष्टांत देतात – लोखंडाची पळी आहे ती आमटीतही आपण बुडवतो, स्वच्छ करून बासुंदी आटवतानाही तिचा उपयोग करतो, प्रत्येक पदार्थामध्ये ती पळी जाते. पळीने प्रत्येक पदार्थ आपण वाढतो. खाणारे खातात. म्हणतात, उत्तम बासुंदी झालेली आहे. उत्तम आमटी झालेली आहे. पण त्या पळीला यातला एक तरी रस माहीत आहे का? गोड कोणते? आंबट कोणते? वगैरे त्या पळीला काही माहीत नाही. तशी कोरडी आहे. शब्दामध्ये सामर्थ्य आहे. त्या शब्दाचा अर्थ, त्या अर्थाचे ज्ञान, अनेक विद्या या सगळ्याचा याला स्वतःला काही उपयोग नाहीये.

त्याप्रमाणे आणखी अपर विद्या आहेत. अपर विद्या म्हणजे आत्मज्ञान, भगवतीचे जे ब्रह्मरूप आहे ते, समजून घेणे.

**'सकलमिदं अहंच वासुदेवः ।'**

सर्वही विसरून गेले पाहिजे आणि सर्वांना पाहणारा 'मी' आहे, तेही विसरून गेले पाहिजे. केवळ 'वासुदेवः' या भूमिकेपर्यंत किंवा या विद्येपर्यंत पोहोचण्याकरता किती विद्या आहेत? मनामध्ये केवढी योग्यता पाहिजे! सगळ्या विद्या समजून घ्यायच्या किंवा नाही हा एक प्रश्न आहे. विवेक आड येतो ना! काय करायचं हे? विवेकाने सोडणे निराळे. आणि कंटाळ्याने सोडणे निराळे.

वैराग्य म्हणजे विवेकपूर्ण वैराग्य पाहिजे.

अनेक विद्या आहेत पण त्यांचा आत्मशांतीला काय उपयोग आहे?

स्वर्गलोकाला गेला अशी कथा सांगितली आहे.

अपर विद्येचा असा उपयोग क्रमाक्रमाने होऊ शकतो.

धर्मविद्या म्हणजे धर्मज्ञान. हेही आणखी बरोबर झाले पाहिजे. आणि ते ज्ञान झाल्यानंतरच क्रिया, म्हणजे कर्मं व्हायची आहेत ना! कोणता धर्म आहे हे समजून आल्यानंतर त्याप्रमाणे आचरण करायचंय. त्या आचरणाकरताही धर्मविद्येची जरूरी आहे. पाप कोणते, पुण्य कोणते, धर्म - अधर्माचे ज्ञान बरोबर व्हायला पाहिजे. संगतीने ते होते. शिष्टाचार हे स्वतंत्र प्रमाण स्मृतिकारांनी मानलेले आहे. त्यांनी सांगितलेल्या मार्गाप्रमाणे निःसंदिग्धपणे आचरण करायला पाहिजे.

शिष्टाचार हे सर्वात सोपे प्रमाण आहे. धर्मराजाने त्या यक्षाला सांगितले की, महाजन ज्या मार्गाने गेले असतील त्या मार्गाने जायचे. श्रेष्ठ पुरुष ज्या मार्गाने जातील, जसे आचरण ठेवतील तसे आपण करायचे. क्रमाक्रमाने आरंभाला प्रथम माता आहे, पिता आहे, आचार्य आहेत, उपाध्याय आहेत. जसजशी त्या जीवात्याची बुद्धी परिपक्व होत जाईल तसतसे त्या त्या योग्यतेच्या अधिकारी महात्म्यांच्या संगतीत राहून ते ते ज्ञान प्राप्त करून घेता येते. सर्व निःसंदिग्ध ज्ञान जर त्याने श्रद्धापूर्वक मिळवले तर त्याचा त्याला स्वतःला उपयोग होतोच पण इतरांनाही तो मार्गदर्शन करू शकतो. ब्रह्मचर्याश्रम त्याकरता आहे.

शास्त्रकारांनी चार आश्रम आणि चार वर्ण अशी व्यवस्था निर्माण केली आहे. शास्त्रामध्ये वर्ग आहेत. आहेत. नाही कशाला म्हणायचे? शास्त्रामध्ये केलेले वर्ग जे आहेत ते समाजाच्या हिताकरता आहेत. संघर्षाकरता

नाहीये. हे समजून घेतले पाहिजे. संघर्ष का निर्माण होतो ? ज्ञान संपादन करताना बुद्धी अत्यंत अवधानयुक्त पाहिजे. ऐकताना अवधानयुक्त पाहिजे. मनामध्ये बाकीचा इतर कोणता संस्कार असून उपयोग नाही. एक गुरुमहाराज सांगताहेत आणि आपण ते ज्ञान ग्रहण करतो आहोत. विद्यार्थ्यांच्या बुद्धीमध्येही तशी शक्ती आहे. गुरुजनांच्या दोषाकडे बिल्कुल लक्ष नाहीये. असूया नाही. 'गुणेषु दोषाविष्करणं असूया' म्हणतात ना! गुरूंचे गुणच पहायचे. अशा भावनेतून विद्या ग्रहण करण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांकडे त्या गुरुजींची विद्या आपण होऊन जाते.

ती विद्यादेवी सांगते आहे, त्या वेदाध्ययन करणाऱ्या उपनयन झालेल्या विद्यार्थ्याला, "मला तू सांभाळ. मी तुझी निधी आहे." विद्येमध्ये सर्वांचा अंतर्भाव आहे.

अनेक विद्यांचे ज्ञान प्राप्त करून घ्यायलाही हरकत नाही. विचार भूमिका आहे. त्या विचार भूमिकेमध्ये अनेक प्रकारचे पक्ष आहेत. त्यातले आपण कोणते घ्यायचे आणि पुढे कुठे जायचे हे ठरवलं पाहिजे. कुठे थांबून उपयोग नाही.

चार्वाकवाद्यांच्या दृष्टीने देहात्मवाद चांगला आहे. पण सगळ्यांनाच तसे वाटायला लागले तर काय करायचे ? त्याच्याकरता जास्ती वाचू नका, असे सांगितले आहे. तुमची बुद्धी (अजून अपरिपक्व असल्याने) केव्हा बदलेल हे सांगता येत नाही. पण ज्याची बुद्धी विवेकसंपन्न आहे तो म्हणतो, असेना का! चार्वाक तत्त्वज्ञान देवगुरूंनी सांगितले आहे. आत्मा देहातच आहे. पण 'देह हाच आत्मा आहे' इथे थांबतो का आम्ही ? 'देहावरती तुम्ही प्रेम केलं पाहिजे' हे सांगण्याकरता देहात्मवाद सांगितला आहे. पण तिथेच थांबतो का आपण ?

मुलगा आजारी पडल्यावर लगेच याची तळमळ सुरू झाली. का बाबा ? देहात्मभाव आहे ना तुझ्या मनामध्ये ? मुलाकडे तुझे लक्ष नाही. हे प्रश्न विचारले युक्तीवादाने. लोक व्यवहाराच्या विरुद्ध वागतात असे. परंतु

युक्तीने विचार सुरू झाला असताना, देह हाच आत्मा असताना दुसरीकडे मन का जाते? तिथे देहापर्यंतच थांबलेला आहे. अन्नमय शरीर आहे. तिथेच मन थांबले पाहिजे. म्हणून पहिली भूमिका उपनिषदांमध्येच सांगितली आहे. त्या विरोचनाला तेवढेच समजले. त्याला काही मध्ये संदेह आला नाही. पुन्हा तो आपल्या गुरुजींना विचारायला गेला. 'देहात्मवाद उत्तम आहे.' म्हणाला. ते म्हणाले, 'हरकत नाही. चालू दे.' पण इंद्राला संशय आला. गुरुजींनी तसं सांगितलेले नाहीये. परंतु याची समजूत अशी झाली.

पुन्हा त्याने गुरुजींकडे जाऊन विचारले, 'गुरुजी, देह हा आत्मा कसा? आत्मा कोणता?' ते म्हणाले, 'आरशात पहा. तोच आत्मा आहे.' आरशात देह दिसतो. विरोचनाला ते पटले. अलंकार घालून त्याने आरशामध्ये पाहून तो म्हणाला, 'हाच आत्मा उत्तम आहे. परत गुरुजींकडे येऊन तो म्हणाला, ''आरशात तर देह दिसतोय, आत्मा कुठे? हा देह तर नाहीसा होणारा आहे. हा आत्मा कसा असेल ?''

गुरुजी म्हणाले, '३२ वर्षे ब्रह्मचर्याचे पालन करून ये. पुढचा धडा मी नंतर सांगेन.'

त्याची तयारी झाली पाहिजे ना ! ३ वेळा त्याला जावे लागले. (म्हणजे त्याची तयारी व्हायला किती वर्षे लागली पहा.) 'स्थूल शरीर आत्मा नाही. माझे शरीर आत्मा नाही.' प्रत्येक वेळेला तो विचारायला गेलेला आहे. आणखी ३२ वर्षे. ३ वेळा गेला. इंद्र. देवांचा राजा हं ! त्यालाही ऐकण्याची योग्यता नाहीये. त्या गुरुजींच्या भूमिकेवर जाणे फार कठीण आहे.

सर्व विद्यादेवीचे स्वरूप आहे. सर्व जग देवीचे स्वरूप आहे. हे त्या महात्म्यांनी पाहून सांगितलेले आहे. महात्म्यांची बुद्धी सर्वत्र देवीरूप पाहू शकते. स्थूल, अस्थूल, प्रवृत्त, निवृत्त वगैरे उत्पन्न करणारा जो आहे, ही जी आदि शक्ती आहे – त्याला ईश्वरशक्ती म्हणा, ब्रह्मस्वरूप म्हणा – त्या शक्तीपासून उत्पन्न झालेले ते वेगळे कसे असू शकेल ?

पुष्कळ विचार आहेत. शास्त्रकारांनी अनेक युक्तिवाद मांडलेले

आहेत. मनाला पटत नाही आमच्या, असं सांगून आम्ही सोडून देतो, मोकळे होतो. त्यात शास्त्रकारांचे काहीही जात नाही. शास्त्रं त्यांनी प्रचाराकरता केलेली नाहीत. आमचं शास्त्र कोणी वाचावं हे त्यांनी अगोदरच सांगून ठेवलेले असते. वेदान्तशास्त्र कोणी ऐकावे हे आधी त्यांनी ठरविलेलं आहे. विवेक, वैराग्य, तप, तितिक्षा, शमदमादि सगळी साधने ज्याच्याजवळ पक्की आहेत, त्यानेच वेदान्त ऐकावा. नाही तर तो नास्तिक होईल. तर प्रत्येक विषयाचा अधिकारी कोण आहे हेही सांगितले आहे. कोणत्या शास्त्रात कोणता विषय सांगणार आहेत हेही आधी सांगितले आहे. प्रत्येकाने आपापल्या योग्यतेचा विचार करून मग ठरवावे, आपण कोणते ज्ञान मिळवायचे ते. त्यांचा आग्रह कोणताच नाहीये.

तर इंद्रालासुद्धा ज्ञानप्राप्तीकरता ब्रह्मचर्याश्रम पाळून ह्या सर्व साधनांचा अभ्यास करावा लागला. वास्तविक देवांचा राजा तो, त्याला काय कमी आहे? तैत्तिरीक उपनिषदांमध्ये आनंदाच्या निरनिराळ्या प्रकारांचे वर्णन केलेले आहे. सुख किती प्रकारचे आहे हे सुद्धा आम्हाला माहिती नाहीये. 'त्याला सुख मिळाले तसे मला मिळावे' असा विचार येणे म्हणजे स्वतःची बुद्धीच नाहीये. स्वतःला आपण बुद्धिवादी म्हणवतो पण खरं सुख कोणते आहे हेच आम्हाला समजत नाही. सर्व मंडळी ज्याप्रमाणे वागताहेत त्याप्रमाणे आपण वागायचे आणि तेच सुख समजायचे. यापेक्षा अधिक काय?

तर जे जे महात्मे आहेत ते निराळ्या मार्गाने निघालेले आहेत. त्यांना 'देवीमयं जगत्' या भूमिकेपर्यंत पोहोचायचे आहे. ते समजून घ्यायचे आहे, जिज्ञासा ज्याला म्हणतात. हे ज्ञान आम्हाला झाले पाहिजे. ते काय सामान्य माणसाने सांगितलेले नाही. 'सर्वं देवीमयं जगत्' सांगणारा काही सामान्य नाहीये! त्याच्याप्रमाणे आमच्या दृष्टीला सर्वत्र देवीचे दर्शन का होऊ नये? ही एक जिद्द म्हणा, जिज्ञासा म्हणा, महत्त्वाकांक्षा म्हणा निर्माण झाल्यामुळे त्याचे अन्नपाण्याकडे लक्ष जात नाहीये. आपसूक सगळी साधने होतात.

म्हणून इंद्रालासुद्धा ती विद्या मिळविण्याकरता १०५ वर्षे ब्रह्मचर्याश्रम स्वीकारून म्हणजे सर्व विषयांचा परित्याग करून स्वर्गात राहावे लागले. आणि

ते जेव्हा त्याने सोडले तेव्हाच त्याला आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचे मार्गदर्शन मिळाले आहे. तर अशा प्रकारे बुद्धीची योग्यता वाढवायची आहे. त्या बुद्धीमध्ये उत्पन्न होणारे अनेक प्रकारचे दोष आहेत.

'कंटाळा' हा दोष आहे. तृप्तीला आपण संतोषही म्हणतो. संतोष हा गुण आहे की दोष आहे? शास्त्रकारांनी संतोष हा कोणाला गुण आहे आणि कोणाला दोष आहे हे सांगितले आहे.

**असंतुष्टात द्विजा नष्टा ।**

ब्राह्मणाने संतोष हा गुण संपादन केला पाहिजे. जे आपल्याला मिळालेले आहे, त्यात त्याने संतोष मानला पाहिजे.

आणि क्षत्रिय आहे. राज्य करतोय. त्याने संतोष मानणे चांगले नाही. एक इंचभर जमीनसुद्धा मी शत्रूला देणार नाही, असे त्याने ठरविले पाहिजे. दुर्योधनाजवळ हा गुण आहे, असे म्हणायला हरकत नाही, या स्मृतिवाक्याप्रमाणे. स्वतः श्रीकृष्ण शिष्टाई करायला आले असतानासुद्धा त्याने खंबीरपणे सांगितले की, अर्धे राज्य तर सोडाच पण सुईच्या टोकावर राहील एवढीसुद्धा जमीन मी देणार नाही. क्षत्रियांमध्ये उत्तम आहे तो. क्षत्रियाचे कर्तव्य त्याने जाणलेले आहे. दोष असतील त्याच्यामध्ये. युद्ध म्हणजे काय सामान्य नाहीये. किती हिंसा होईल हे कळले नाही. युद्ध थांबावे अशी देवांची इच्छा आहे. खरी होती की नाही कोणास ठाऊक? धर्मराजाने देवांना पाठवले शिष्टाई करायला. बरंय, म्हणाले. जाऊन येतो. द्रौपदीने विचारले, 'काय करणार तू शिष्टाई?' गोपालकृष्ण म्हणाले, 'काही नाही. तुम्ही सांगाल तसे करणार.' त्यांनी आधीच द्रौपदीचे समाधान केले.

तर भगवान् गोपालकृष्णांनी सांगूनसुद्धा दुर्योधनावर काही परिणाम झाला नाही. लोभ हा दोष आहे की गुण आहे? त्यातही शास्त्रकारांनी तसेच सांगितले आहे. वैश्य व्यापारी जे आहेत त्यांच्या मनामध्ये जर लोभ नसेल तर द्रव्य संग्रह कसा होईल? द्रव्य मिळविणारे व्यापारी असतात ना! ब्राह्मणाने मिळवायचे नाही. क्षत्रियाने आपले कर्तव्य करायचे. याचना करायची नाही कोणाकडे. परंतु हा वैश्य व्यापारी जो आहे त्याच्या ठिकाणी लोभ हा गुण मानला

आहे शास्त्रकारांनी. जास्ती पैसा मिळाला पाहिजे. काही काही व्यापाऱ्यांचे सांगतात, की ते असा निश्चय करतात, नवीन ठिकाणी दुकान काढल्यावर १०,०००रु. उत्पन्न मिळेपर्यंत मी भात खाणार नाही. मिळतात. पण १०,००० मिळाल्यानंतर २५,००० रु. मिळेपर्यंत मी अमूक एक पदार्थ खाणार नाही. असा निश्चय करतात. आता १०,००० रु. मिळाल्यावर २५,०००रु. चा लोभ कशाला धरतोस, असा त्याला उपदेश करून उपयोगी नाही. तर वैश्यांनी लोभरहित राहून उपयोगी नाही. हा त्याचा गुण आहे ना! द्रव्यसंग्रह अधिकाधिक वाढणे हे व्यक्ती किंवा राष्ट्र सर्वांनाच उपयोगी आहे ना! त्याचा विनियोग कसा करावा, हे वाटलं तर त्याला सांगावे.

असे वेगवेगळे विचार शास्त्राने भिन्न भिन्न वर्णांसाठी मांडले आहेत कारण प्रत्येक वर्णाची बुद्धी भिन्न भिन्न आहे. बुद्धीचे वैषम्य हे सर्वांना मान्य आहे. साम्यवादी लोकसुद्धा बुद्धिवैषम्य नाही असे म्हणू शकत नाहीत. त्यांनाही ते मान्य आहे. फक्त अर्थसाम्य पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे. पण अर्थसाम्य हे अशक्य आहे ना! अर्थ हे बुद्धीने मिळविण्याचे काम आहे. बुद्धीचा उपयोग करून ज्याने सर्व द्रव्य वगैरे मिळवलं आहे त्याला ही साम्यवादी विचारसरणी कशी पटणार? स्वतःला अगदी गरजेपुरते ठेवून बाकीचे इतरांसाठी ठेवायचे. साम्यवादी तत्त्वज्ञान त्याला कधीच मान्य होणार नाही. शास्त्रकारांनाही हे मान्य नाही. शुक्राचार्यांनीसुद्धा बळीराजाला हेच सांगितले, "राजा, तू राज्य एवढं मिळविलंस. तुझ्या नुसत्या शंखाचा ध्वनी ऐकल्याबरोबर स्वर्गाचा राजा इंद्र व सर्व देव घाबरून देवगुरु बृहस्पतींच्या सांगण्याप्रमाणे स्वर्गलोक सोडून गेले. तुला युद्धसुद्धा करावे लागले नाही. हे राज्य तुला मिळालेले आहे. आणि हे सगळं देऊन टाकणार तू? अतिथी कोण आलाय हा. 'अतिथी देवो भव' जरी शास्त्रकारांनी सांगितले असले तरी तू सांगोपांग विचार करायला नकोस का? इतका पराक्रम करून मिळविलेलं राज्य याच्या हातावर पाणी सोडून देऊन टाकणार? हा विचार बरोबर नाहीये. एकदम इतकी तयारी होणार नाही. संसारी मनुष्याची बुद्धी इतकी तयार नाहीये."

धर्मराजाला श्रीकृष्णांनी सांगितलं, "द्रोणाचार्य तुझी भेट घेण्याची इच्छा करताहेत. अश्वत्थामा मेला हे खरं आहे काय? हे तुला विचारायचं म्हणताहेत. काय सांगणार तू?" धर्मराज म्हणाले, 'काय खरे असेल ते सांगितले पाहिजे ना!' "मग लढाई कशाला करतोस? १२ वर्षे वनवासात राहिलास तसेच राहायचेस. इथे आलास कशाला?" श्रीकृष्णांनी त्याला विचारलं.

असत्य कधीही बोलायचे नाही हे फार महान व्रत आहे. त्या व्रताचा स्वीकार करण्याची योग्यता येईपर्यंत अल्पव्रते करून राहिले पाहिजे. मंदिरात असेपर्यंत खोटे बोलायचे नाही. म्हणजे बाहेर गेल्यावर बोलावे असे नाही. तयारी जर मनाची तेवढी असेल तर बाहेरही बोलू नये. पण कालमर्यादा न ठेवता सत्य वचनच बोलायची प्रतिज्ञा करणे कठीणच आहे. त्याकरता बलिराजाला त्यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सर्व अर्थशास्त्र आहे. बलिराजा दैत्य जरी असला तरी साक्षात भगवंताचे दर्शन झाल्यामुळे मोठा विवेकसंपन्न होता. त्यामुळे इंद्राची निवड करण्याचा अधिकार असलेल्या ईशशक्तीलाही असे वाटले की, बलिराजा इंद्रपदावर बसण्यास योग्य आहे. देवांनीच इंद्र व्हावे असे नाहीये. याचे कारण दैत्य कुलात जन्माला येऊनसुद्धा त्याची बुद्धी अत्यंत सत्यनिष्ठ आहे. गुरुमहाराजांनी त्याला पुष्कळ समजावून सांगितले तरीही त्याने विचारले, "सत्याचा त्याग मी कसा करू? एकदा मी त्या अतिथीला - वामनाला - भूमी देतो सांगितल्यावर, आता देत नाही असे कसे म्हणायचे?" या एकाच निष्ठेमुळे बलिराजा देवमान्य झाला. गुरूंनी अवज्ञा केल्याबद्दल त्याला शाप दिला आरंभाला, परंतु ईश्वराने तो नंतर दूर केला. भगवान त्याचे द्वारपाल होऊन राहिले. त्याला इंद्र केला. देवांनी असे समजून उपयोग नाही की इंद्र होण्याचा त्यांचाच अधिकार आहे. दैत्यांनी पुण्यकर्म करून आपली योग्यता वाढवली तर तेही इंद्र होऊ शकतात.

**'जे जे भेटिजे भूत**
**ते ते मानिजे भगवंत।'**

या ज्ञानेश्वरांच्या सांगण्याप्रमाणे आपली बुद्धी तयार करायची आहे. म्हणजे

सर्व जे दृष्य आपल्याला दिसतंय त्यालाच भगवंत मानायचे. हाही अर्थ यात दिसतोय. पण दुसराही अर्थ त्यात असा दिसतो. – अंधार पडलेला आहे आणि एक मोठा खांब आहे. बाहेरून आलेल्या माणसाला हे माहीत नसल्याने तो या खांबाला चोर समजून "चोर, चोर" ओरडायला लागला. चोरही उभा राहिला म्हणजे उंच दिसतो, खांबही उंच दिसतो. थोडेसे दोघांच्यात साम्य आहे. सगळे लोक त्याचा आरडा-ओरडा ऐकून तिथे जमले. दिवा आणून पाहतात तो खांब आहे.

खांब जो आहे हाच चोर झाला होता पूर्वी कल्पनेत. तो आता दिव्यामुळे ज्ञान झाले की चोर नसून खांब आहे; ही बुद्धी झाली. चोरबुद्धी गेली आणि स्तंभ ही बुद्धी झाली.

सर्वही भूतं म्हणजे भगवान आहेत ही जी बुद्धी आहे तीसुद्धा मोठी आहे. बुद्धी फार मोठी विकसित झाली पाहिजे. आमची बुद्धी अल्प आहे, मर्यादित आहे. पण सर्वच ठिकाणी परमात्मा आहे, सर्वत्र ममता ठेवणे ही व्यापक बुद्धी आहे. तेव्हा दृष्य जे आहे ते सर्व जसंच्या तसं परमात्मा आहे. चोरालाच खांब समजला पण खरा खांब नजरेला पडल्यावर चोर नाहीसा झाला.

म्हणजे 'जे जे भेटिजे भूत । ते ते मानिजे भगवंत,' यात ज्ञानेश्वर महाराजांचा अभिप्राय काय आहे हे समजले पाहिजे.

आरंभाला अगदी सरळ आहे. जो आपल्यासमोर आहे तो भगवंताचे रूप आहे. सगळे विश्व त्याचेच रूप आहे. हा सामान्य, साधा अर्थ घ्यायला हरकत नाही. सरळ आहे. आणि तशी जर आमची बुद्धी बनली तरी हरकत नााही. म्हणजे बुद्धीचा संकुचितपणा गेला ना! म्हणजे आपल्यापुरते, आपल्या परिवारापुरते, आपल्या अनुकूल असणाऱ्यांपुरते जे माझे म्हणतोय ते सर्वच भगवत् स्वरूप आहे.

पण जे भूत आहे ते परमात्मा आहे. जो चोर आहे तो खांब आहे, याचा अर्थ चोर नाहीसा होऊन खांब झाला. जे दिसलेले आहे ते नाहीसे झाले आणि जे खरे आहे ते दिसायला लागले. 'सकलमिदं अहंच वासुदेवः' आरंभाला

सगळेच वासुदेवरूप आहे. पण 'सकलमिदं' आणि 'अहं' ही गेल्यानंतर एका वासुदेवाशिवाय दुसरे काहीच नाही. आनंदस्वरूप देवी, जगदंबा आहे. दुसरे काहीच नाही. असेही ज्ञानाचे स्वरूप मानता येण्यासारखे आहे. याच्यामध्येही परमशांती आहे. म्हणून आरंभाला आपल्या चित्ताची भूमिका कोणत्या योग्यतेची आहे त्या दृष्टीने विचार होता. चूक कोणाला म्हणायचे? सर्वत्र ठिकाणी परमात्म बुद्धी होणे हे काही वाईट नाहीये. एक (रूप) असलेला परमात्मा विविध रूप झाला आहे. हे उपनिषदामध्येच वर्णन आहे. इच्छा झाली, आपण अनेकरूप व्हावं. त्याचा संकल्प झाल्यावर हे सगळे विश्व निर्माण झाले.

राधेयच कौंतेय आहे असा एक दृष्टांत देतात. कर्ण हा राधेय आहे. आरंभाला कौंतेय म्हणजे कुंतीचा मुलगा आहे. तिने टाकून दिल्यावर राधेने त्याचे पालनपोषण केले, त्यामुळे तो 'राधेय' म्हणून प्रसिद्ध झाला. इथे ज्ञान कोणते आहे? इथे दोन व्यक्ती नाहीयेत. चोर आणि खांब दोन भिन्न तरी आहेत. ज्या ठिकाणी खांबाला चोर समजत होता, तो चोर म्हणजेच खांब आहे. हे ज्ञान झाले म्हणजे चोर - बुद्धी गेली आणि खरी बुद्धी झाली. दोन वस्तू तरी आहेत. इथे राधेय आणि कौंतेय दोन व्यक्ती नाहीयेत ना! मग खरं ज्ञान कोणतं? राधेय जो आहे, समजतो आपण, तोच कौंतेय आहे. त्याला राधेय जर म्हणायचे असेल तर कौंतेय जो आहे, समजत होतो आपण, तोच राधेय आहे. वेगळे नाहीत. एक असलेला परमात्मा विविधरूप तोच झालेला आहे. कौंतेयच राधेय झालेला आहे. निराळा कुठाय? एकत्वाच्या ठिकाणी अनेकत्व दिसायला लागते.

चांगदेवांनी पत्र म्हणून ज्ञानेश्वर महाराजांना कोरा कागदच पाठवला. काय लिहू ज्ञानेश्वरांना? नमस्कार लिहायला पाहिजे कारण त्यांना गुरु करायचंय ना! पण नमस्कार तरी कसा लिहायचा? कारण ते आपल्यापेक्षा लहान आहेत. मुक्ताबाई म्हणाली, चौदाशे वर्षं जगून हा अद्यापि कोरा राहिला. निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांना म्हणाले, "त्यांना उत्तर लिहून पाठवा." ज्ञानेश्वरांच्या मनामध्ये काहीच विकल्प नाही. चांगदेव संदेहग्रस्त झाले, मनामध्ये संशय

आला. पण ज्ञानेश्वरांच्या बाबतीत तसे काही नाही.

निवृत्तिनाथांची आज्ञा झाल्यावर ज्ञानेश्वरांची लिहायला लगेच सुरुवात झाली –

**'स्वस्तिश्रीवटेशु । जो लपोनी जगदाभासु ।**
**दावि मज ग्रासु । प्रगटिला करी ।।'**

चांगदेव म्हणजे परमात्म स्वरूप आहे, या बुद्धीने लिहायला सुरुवात झाली. 'सकलमिदं अहंच वासुदेवः ।' ही पक्की बुद्धी आहे. 'जे जे भेटीजे भूत...' हे काही नुसते लेखन नाहीये. त्यामुळे ते म्हणू शकले, 'वटेश्वर चांगदेवांचे कल्याण असो.' केवढं चातुर्य आहे! ज्ञानी महात्मा हा किती चतुर असतो! चौदाशे वर्षं योगाभ्यासाने शरीर टिकवणाऱ्या चांगदेवांना संभ्रम पडला, मी ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहू की आशीर्वाद लिहू! इथे ज्ञानेश्वरांच्या मनात कसलाच संशय नाही. छिन्दन्ते सर्व संशयः ।! हा निराळा मार्ग चांगदेवांना सुचला नाही? नमस्कारही नको आणि आशीर्वादही नको. लहान मूलंही म्हणू शकते, 'आई बापांचे कल्याण असो' मोठा मनुष्य तर 'लहानाचे कल्याण असो,' असे सहजच म्हणू शकतो. हे सुद्धा लक्षात आलेले नाही. अहंकार पूर्ण नाहीसा झाल्याशिवाय, 'जे जे भेटिजे भूत ते ते मानिजे भगवंत' हे समजण्याची योग्यता बुद्धीमध्ये येणार नाही. यात आग्रह धरण्याचे किंवा वादविवाद करण्याचे कारण नाही.

आणि मग पुढे विवेचन ज्ञानेश्वर महाराज चालू करताहेत –

**'जो लपोनी जगदाभासु । दावि मग ग्रासु । प्रगटला करी ।।'**

जो परमात्मा चांगदेव तो लपलेला आहे. अविद्या आवरणामध्ये सापडलेला आहे. आवरण असेपर्यंत जग भासते आहे. तोही त्याचाच संकल्प आहे. आपले स्वयं प्रकाशित स्वरूप आच्छादित होऊन गेलेले आहे त्याशिवाय विविधता आली कशी? आमच्या समोर विविधता आहे. अनेक जन्म आमची बुद्धी त्या अनेकत्वामध्ये गुंतून पडलेली आहे. सर्वत्र एक परमात्मा आहे ही कल्पनासुद्धा मनाला नाहीये. म्हणून अद्वैत ज्ञान पटत नाही आम्हाला. द्वैत इतके डोळ्यासमोर असताना, अद्वैत कसे म्हणतात असे आम्हाला वाटते.

'शंकराचार्यांनाही समजले नाही' वगैरे वाटेल तसे प्रमाद आमच्या मुखातून निघतात. परंतु ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, परमात्माच अनेक रूपे धारण करतो. तो आच्छादित झाला आणि त्याने सगळा जगदाभास दाखवला. म्हणजे प्रगट झाल्यानंतर सगळे नाहीसे करून टाकतो.

आमच्या मनामध्ये कोणत्या वासना आहेत ते पाहिले पाहिजे. मन तपासून पाहिले पाहिजे . त्यांच्या बुद्धीपर्यंत जाण्याची योग्यता आमच्या बुद्धीची झाली पाहिजे.

जे जे भेटिजे .... भगवंत हे ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत आणि जे शंकराचार्यांना कळले नाही ते ज्ञानेश्वरांना कळले असे आम्ही तोंडाने सांगतो. आणि ज्ञानेश्वरी वाचून ते सांगतो. केवढी विसंगती आहे!

जो लपोनी जगदाभासु....... संपलं! सिद्धांतांचा समन्वय बुद्धीने करता येतो आहे. अमुक संत श्रेष्ठ आणि तमुक संत कनिष्ठ हे म्हणण्यात काही अर्थ नाहीये. ती खरी भक्ती होणार नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी जी भक्ती सांगितली आहे, ती भक्ती होणार नाही. ज्ञानेश्वरांच्याबद्दल ही खरी श्रद्धा ठरणार नाही. त्यांचे स्पष्टीकरण कोणत्या अभिप्रायाने आहे हेही समजून घेतले पाहिजे. अनेकत्वही खरे आहे, कारण अनेकत्वाच्या भूमिकेवर सध्या आम्ही आहोत. आमच्या बुद्धीमध्ये अनेकत्वाचेच संस्कार आहेत. द्वैतच आमच्या बुद्धीमध्ये आहे. मूर्त पदार्थ आमच्या समोर आहेत.

म्हणून त्यांनी सांगितले, हे सर्वही परमात्मा आहे. हे एवढे त्याला समजणे हे खरे ज्ञान आहे. ते एकाचेच अनेकत्व झालेले आहे. तेही काही खोटे नाहीये. परंतु बुद्धीची परिपक्वता जशी जशी होत जाईल तसतसा जो लपोनी जगदा भासु। दावी मग ग्रासु। प्रगटिला जगी। याचा अर्थ उलगडत जाईल. सिद्धांत सांगून टाकला. जो चोर होता तोच खांब झाला, मग चोर कुठे गेलाय? म्हणजे चोर ही बुद्धी गेली आणि खरी बुद्धी निर्माण झाली. चोर आलाही नाही आणि गेलाही नाही. 'अगा जे झालेची नाही। तयाची वार्ता पुससी काही।' या भूमिकेवर गेलेल्या ज्ञानी महात्म्यांचे सिद्धांत शेवटी एकरूप असतात. हे

आपल्या बुद्धीला पटले पाहिजे. ज्ञानेश्वर महाराजांना जास्ती कळले असे काही लोक म्हणतात. तर काही सांगतात की, 'शंकराचार्यांनी सिद्धांत मांडण्यात फार गडबड केली हो! आणखी थोडे थांबले असते तर त्यांना कळले असते.' म्हणजे याला काय म्हणायचे? ही काय भक्ती झाली की ज्ञान झाले? असे सांगणारे जगामध्ये मोठे समजले गेले. चांगदेवही स्वतःला मोठे समजत होते. ज्ञानेश्वरांना लहान आणि स्वतःला मोठे समजणे हे काय योग्य झाले का? चौदाशे वर्षं काय आत्म्याला झाली? आत्म्याचे वय मोजता येते का? किती तो अनादि आहे. अनंत आहे! वर्षे मोजायची देहाची. देहाला चौदाशे वर्षे झाली. आणि केवळ 'चौदाशे वर्षे वयाचा मी मोठा' असे समजणारे चांगदेव देहापर्यंतच आले आहेत. देहाच्या पुढे अजून गेले नाहीयेत. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय यांच्यातून पलीकडे जायचे आहे. चांगदेव अन्नमय कोशामध्येच थांबले आहेत. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक त्यांना अजून समजलेला नाही. पण

जे जे भेटिजे भूत .....
स्वस्तिश्री वटेषु .....

एवढे सांगून ज्ञानेश्वर मोकळे झाले. चांगदेवांची चूक काढायची नाही. 'चांगदेवांचेही कल्याण असो' ही ज्ञानेश्वर महाराजांची भूमिका केवढी मोठी आहे!

आचार्य महाराजही तसेच सांगताहेत. सर्वही ब्रह्मरूप आहे. 'सर्वंखलु इदं ब्रह्म' जे जे आमच्या डोळ्याला दिसतंय, मनाला ते समजतंय, तोपर्यंत हेच ब्रह्म आहे.

'सर्वं खलु इदं' हे नाहीसे होऊन 'ब्रह्म' सर्वत्र भासायला लागले. संपले. समोर दृष्टीला पडणाऱ्या दृष्याचे सगळे संस्कार मनातून गेल्यानंतर फक्त आनंद आहे. दुसरे काही नाही. 'सच्चिदानंद' 'ब्रह्मास्मि.'अशा दोन्ही भूमिका आहेत ना! दोन्हीही भूमिकांमध्ये ज्ञानच आहे. व्यवहारदशेमध्ये 'हेही खरे आहे' ही भूमिकाही पक्की व्हायला पाहिजे. सर्वांच्याबद्दल परमात्मबुद्धी झाली पाहिजे. हे असू शकते. चांगदेवांचा तिरस्कार ज्ञानेश्वर महाराजांनी केला नाही.

सर्व पदार्थांचा 'आत्मा' हे खरे स्वरूप आहे. त्याचा पुरस्कार करून "मग ग्रासु प्रगटिला करी" म्हणजे अनेकता नाहीच आहे.

हा वाद चांगला, तो वाद वाईट हे आपल्यासारख्या अपरिपक्व बुद्धीच्या माणसांनी सांगणे बरोबर नाही. समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणून 'सर्व विश्व देवीमय', आहे असे सांगणारे जे महात्मे आहेत त्यांचा अभिप्राय सर्वांच्या ठिकाणी समदृष्टी ठेवावी हा आहे. आणि सर्व नाहीसे झाले तरी परमात्मा आहेच आहे. जग पूर्वीही होते. आताही आहे आणि पुढेही राहणार आहे. मुख्य स्वरूपाचे दर्शन झाल्यावर सर्व नाहीसे होते ना! दावि मग ग्रासु प्रगटिला जगी। ज्ञानेश्वर महाराजच सांगताहेत. परमात्मा प्रगट झाला. 'प्रगट झाला' असे म्हणायचे. तो तर स्वयंप्रकाशी आहे. आमच्या बुद्धीने तो झालेला आहे. आम्ही त्याला झाकला गेलाय असे म्हणतो. हे वर्णनसुद्धा आमच्या बुद्धीला अनुसरून केले आहे. शास्त्र हे मनुष्याकरता निर्माण झालेले आहे. मनुष्याला जसा जसा बोध होईल तसं तसं पुढे न्यायचे. एकदम सगळा ग्रास होऊन जातो असे सांगून कसे होईल? पटेल का कोणाला? परंतु 'सर्व जे दिसतंय ते ब्रह्म आहे. सर्वत्र समबुद्धी ठेवा' असं संत सांगतात. मनातल्या वाईट वासना, रागद्वेषादिक विचार जाण्याकरता हा प्रयत्न आहे. ते विकार पूर्णपणे मनातून नाहीसे झाले, शांत झालंय मन, निर्वासन झालेले आहे. शुभ वासनाही नाहीत, अशुभ वासनाही नाहीत. अशा स्थितीमध्ये 'सर्वं खलु इदं' गेले सर्व. केवळ ब्रह्म उरले.

आमच्या बुद्धीच्या भूमिका अनेक आहेत. जी विद्या आपल्याला चांगली वाटते तिच्याकडे लक्ष द्यायचे, पण इतर विद्यांची निंदा करायची नाही. भागवतावर श्रद्धा ठेवा तुम्ही पण दुसरे सर्व खोटे आहे, दुसऱ्यात काही अर्थ नाही, रामायण बरोबर नाही वगैरे हे तुम्ही म्हणू नका. तुम्हाला जे बरे वाटते ते घ्या की तुम्ही! पण दुसऱ्याबद्दल सांगण्याचा अधिकार तुम्हाला काय आहे? तुम्ही रामायण काय आहे, रामांचे चरित्र काय आहे हे कधी जाणून घेण्याचा प्रयत्न केलाय का कधी? महात्म्यांचे शब्द अगदी मोजून मापून असतात.

अधिक नाही, कमी नाही. तो सगळा अभिप्राय लक्षात आणून देण्याकरता एका मार्गदर्शकाची जरुरी आहे. म्हणून परमात्म्याची सेवा, उपासना त्याकरता सांगताहेत. योगसूत्रकारसुद्धा मान्य करताहेत.

अंतरायाभावश्च ।

बुद्धीमध्ये अनेक प्रकारचे अंतराय म्हणजे प्रतिबंध उत्पन्न होतात.

श्रद्धासुद्धा एका विशिष्ट पातळीवर घातक ठरते ना! 'ज्ञानेश्वरांना जास्ती समजले आणि शंकराचार्यांना समजले नाही' हे म्हणण्याचे धाडस करण्याची आमची वाणी, बुद्धी तयार झाली. हा बुद्धीतला दोष नाही का! ज्ञानेश्वर महाराज कोणाची तरी निंदा करतात का? तशी एक ओवी तरी तुम्हाला सापडेल का कधी? त्यांच्यावर श्रद्धा दाखविणारे आम्ही मात्र 'ते चांगले आणि हे वाईट' असे सांगायचा अधिकार दाखवायला लागलो. म्हणजे आमचा अधिकार नाही असेच सिद्ध होते. ज्ञानेश्वरी वाचण्याचाही अधिकार नाही आम्हाला. ही श्रद्धा ठरणार नाही. हे सर्व समजून घेतले पाहिजे आणि त्याकरता बुद्धीला प्रेरणा करणारी जी भगवत् शक्ती आहे तिची उपासना व्हायला पाहिजे. बुद्धीतले सगळे दोष, अंतराय त्या उपासनेमुळे निघून जाताहेत.

बरोबर आहे. त्यांचे सांगणेही बरोबर आहे. उद्धवजींनी विचारले श्रीकृष्णांना, "अहो पुष्कळ लोक निरनिराळे 'वादी' आहेत. कोणी ५ म्हणतात, कोणी २० म्हणतात, कोणी १७ म्हणतात. ही काय सगळी मते वेगळी वेगळी आहेत?" भगवान म्हणाले, "ते सगळे बरोबर आहेत." त्यांनी, हे चुकलेत, ते बरोबर आहेत, असे उत्तर दिले नाही. त्यांनी बुद्धीने काय काय निर्णय घेतलाय तो तो समजून घेणाऱ्याने घेतला पाहिजे. 'पांचच तत्व । भूते आहेत,' म्हणजे त्यांच्यामध्ये बाकीच्या भूतांचा / तत्त्वांचा अंतर्भाव करता येतो. कसा करता येतो? हे आपल्या बुद्धीने समजून घेतले पाहिजे. आपल्याला समजले नाही तर अधिकारी व्यक्तीला विचारले पाहिजे. पंचवीसही तत्त्वे होतील. आणखी वाढविली तर आणखी वाढतील. वैज्ञानिक काय ९० / ९२ आहेत म्हणतात. म्हणजे बुद्धीचा विस्तार जास्ती झाल्यावर ती तत्त्वे अधिक

वाटतात. आम्हाला वाटते तेवढेच खरे आहे आणि बाकीचे खोटे आहे असे म्हणून चालत नाही. ज्ञानेश्वर महाराज सांगतात तेही बरोबर आहे, शंकराचार्य सांगतात तेही बरोबर आहे. कोणीही चुकलेले नाही. आम्ही चुकलो आहोत. आमची चूक सुधारून दोघांचा समन्वय कसा साधता येईल हे पहाणे आमचे कर्तव्य आहे.

भगवंतांनी अवतार धारण करून दुर्जनांचा संहार तर केलाच पण सज्जनांचे संरक्षणही केले. त्यांची बुद्धी यथार्थ मार्गाने नेऊन योग्य बनवायची, निःसंदेह बनवायची म्हणजे ते लोकांचा उद्धार करू शकतील हा, 'संरक्षण' शब्दाचा अर्थ आहे. भगवतीचे अवतारही त्यासाठीच झाले आहेत. दुर्गम दैत्याचा नाश केल्यामुळे तिला दुर्गादेवी असे नाव पडले.

● ●

## सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
## शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ।।

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

नित्यानित्य विवेक जोपर्यंत पूर्ण झालेला नाही, तोपर्यंत स्वर्गलोकात अधिक सुख आहे असे वाटते. जास्त सुख आपल्याला मिळावे ही इच्छा सर्वांनाच होते. पण तेही संपणारे आहे. ही कल्पना नाहीये. धर्माचरणाने, पुण्यकर्म केल्याने सुख मिळते. परंतु ते सुख अनित्य आहे. टिकाऊ नाही. ही कल्पना मनात येत नसेल असे नाही, पुण्यकर्म करणाऱ्यांच्या. यज्ञरूपी नौका ज्या आहेत त्या अगदी अदृढ आहेत. त्यांच्यात पाणी येते आणि त्या बुडून जातात. त्यामुळे त्या नावेत बसून जाणे बरे नाही म्हणतात. असे त्यांनी उपनिषदामध्ये सांगितले आहे. नाव चांगली पाहिजे, बळकट पाहिजे, पाण्याचा थेंबही आत येऊन उपयोग नाही. तशी नाव नाही. यज्ञयागादिक कर्मे ही वेदांनीच सांगितली आहेत. ही साधने अदृढ आहेत. टिकाऊ नाहीत. परंतु असे वाटते की, आपल्याला अधिक सुख मिळणार आहे. त्यामुळे काळ आम्ही विसरून जातो. कालाचे अखंड स्मरण राहिले पाहिजे. आपल्याला तर स्वतःच्या आयुर्मर्यादेचेही स्मरण नाहीये.

शास्त्रं करून ठेवलेली आहेत. ज्योतिषशास्त्र त्याकरता आहे.

कालज्ञानाकरता आहे. एकंदर आपले आयुष्य किती आहे आणि किती राहिले आहे हे या शास्त्राच्या सहाय्याने समजून येते. परंतु समजून त्याचा उपयोग काय आहे? मानवजन्माचा काल अत्यंत मर्यादित आहे. इंद्रादिक देवतांचा कालही मर्यादित आहे. सर्वात जास्ती आयुष्य ब्रह्मदेवांचे. ४००० युगे म्हणजे १ दिवस, ४००० युगे म्हणजे १ रात्र. अशी १०० वर्षे त्यांचे आयुष्य आहे. असे आयुष्य कोणालाच नाही. परंतु ब्रह्मदेवांचे एवढे आयुष्य असूनसुद्धा संपणारे आहे मग त्या तुलनेने आमचे आयुष्य किती अल्प आहे! आमचे सहा महिने म्हणजे देवांचा १ दिवस आणि सहा महिने म्हणजे देवांची एक रात्र. दक्षिणायन आणि उत्तरायण मिळून आमचे १ वर्ष म्हणजे देवांचा १ दिवस. सोय सगळी आहे. आमच्यापेक्षा अधिक आयुष्य आहे. सुखसोयीसुद्धा त्यांना पुष्कळ आहेत. या ठिकाणी जी काही अधि दैवी, आधिभौतिक, आध्यात्मिक दुःखं आहेत ती त्या ठिकाणी नाहीत असे म्हणता येईल. म्हणून तिथे सुख पूर्ण आहे, आमच्या दृष्टीने.

शास्त्रकार स्वर्गसुखाची व्याख्या करताना सांगतात ते केवळ सुख आहे, दुःख अजिबात नाही, तो काल असेपर्यंत. तिथे असेपर्यंत दुःखं येणार नाहीत. आणि ज्या सुखाची इच्छा होईल ते सुख लगेच प्राप्त होते. सुखाची सर्व साधने तिथे आहेत. कल्पवृक्ष आहे, कामधेनु आहे. तो लोकच असा काही विलक्षण आहे. तिथे इच्छा होता क्षणीच ती पूर्ण होतेय. अशी स्वर्गसुखाची कल्पना वेदांनीच दिलेली आहे. शास्त्रानेच दिलेली आहे.

पण त्याच्यापेक्षाही नित्यसुख म्हणून जे आहे ते वेगळे आहे. तीही आणखी कल्पना शास्त्रकार देतात. बरं, ह्यापैकी सुख प्राप्तीही आपल्या प्रयत्नांनी करायची आहे, यज्ञादिक साधने करायची, त्यांच्या योगाने पुण्य संपादन करायचे. या लोकातील कालमर्यादा संपल्यावर त्या स्वर्ग लोकात जाऊन राहायचं. ह्या सुखासाठी आपण प्रयत्न करू पण या सुखाच्या पलीकडे काही सुख आहे याची आम्हाला काही कल्पनाच नाहीये. ईश्वरस्वरूप झालेले ज्ञानी महात्मे हे सुख टिकणारे नाहीये असं सांगतात. ऐकेल का कोणी असं

सांगितलं तर! आपल्याला जी वासना आहे ती वासना जाणे कठीण आहे. त्याला आणखी सुखाची इच्छा असते.

फल पुण्याने मिळते. कर्माने, धर्माने, यज्ञाने मिळते असा सिद्धान्त वेदांतशास्त्राचा नाहीये. व्यास महर्षींनी तो सिद्धांत मान्य केला नाही. पुण्यकर्म करीत राहिले म्हणजे सुख मिळते. पण सुख देणारा दुसरा आहे. क्रिया सुख देऊ शकत नाही. सुख दुःखाला कारण कर्म आहे, क्रिया आहे, धर्म किंवा अधर्म हे सुख दुःखाला कारण आहे हा विचार पटल्यानंतर ईश्वरापर्यंत जीवात्मा जाऊ शकतो. अहंकार थोडासा सोडायची त्याची तयारी होते. नाही तर मी प्रयत्न करणार आहे. मला बुद्धी आहे, शारीरिक शक्ती आहे, आर्थिक शक्ती आहे, सत्ता आहे, कीर्ती आहे, अशी सर्व प्रकारची अनुकूलता असल्यामुळे माझ्या प्रयत्नांनी होणार नाही असे कसे? शक्य वाटत नाही आपल्याला. मी प्रयत्न करतो म्हणजे प्रयत्नांपेक्षा 'मी' मोठा आहे. माझे महत्त्व जास्त आहे. आपण केलेल्या प्रयत्नांपेक्षा आपण कर्तृत्त्व आपल्याकडे जे घेतो तो अहंकार अत्यंत मोठा असतो. परंतु धर्माचरण करण्याची प्रवृत्ती झाली असताना कर्मापासून सुखदुःख मिळतंय हा एक सिद्धांत बुद्धीला एकदा जर पटत असेल, तशी जर योग्यता बुद्धीची झालेली असेल तर ती सुद्धा एक प्रकारची शुद्धी आहे. पुण्यकर्म आपल्या हातून घडावी, मला त्याच्या योगाने सुख मिळेल. या लोकात मिळेल, परलोकात मिळेल. त्याकरता आणखी पुण्यकर्म करीत राहावे, असे वाटणे म्हणजेसुद्धा मनातले पुष्कळ दोष कमी झालेत असे समजायला हरकत नाही. परंतु त्या वासना या अधिकाधिक वाढत जाताहेत. जशी दुःखं या लोकामध्ये आहेत तशी त्या स्वर्गलोकामध्येही आहेत हा विचार मनामध्ये येत नाही. इथल्यापेक्षा अधिक काल टिकणारे सुख तिथे आहे. सुखाची सगळी साधनेही दिव्य आहेत.

पंचभूतांपासून सगळी सृष्टी झालेली आहे. पण पंचभूतांमध्येसुद्धा सात्त्विक, राजस, तामस असे भाग आहेत ना! भगवान गोपालकृष्णांनी विश्वकर्म्याला सांगून द्वारकानगरी विलक्षण अशा प्रकारची निर्माण केलेली

आहे. हा किती उत्तम भौतिकवाद आहे. त्या नगरीत किती प्रकारच्या सोयी होत्या! संरक्षणाच्या सोयी किती वेगळ्या होत्या. पहारेकरी ठेवलेले असतील. पण त्या द्वारकानगरीच्या सभोवती सुदर्शन चक्र सारखं फिरतंय. संरक्षणाची योजना करणे हे राजाचे कर्तव्य आहे. स्वर्गलोकातील सुख किंवा सुखाची साधने ही पांचभौतिक विभागातील उत्तम उत्तम अंशांपासून तयार झाली आहेत.

मृत्युलोकावर असणारी साधने ही पांचभौतिक आहेत. घरदार, खाणे-पिणे जे काही असेल ते पांचभौतिक आहे. तर ही सगळी समान आहेत. पण ते अधिक आहे आणि हे कमी आहे. कालाचा विचार नाही. जरी चित्त शुद्ध झालेलं आहे, पाप न घडता चांगली कर्मं घडावीत अशी इच्छा आहे. म्हणजे चांगले आहे की. मनाची शुद्धी झाल्याशिवाय पापकर्मं सुटतील कशी ? परंतु अद्यापि ती शुद्धी व्हायला पाहिजे. त्या वासनाजालामध्येच तो सापडला आहे. वेदाभ्यास केलेला आहे. अर्थज्ञान आहे. सांगवेदाचा अभ्यास झालेला आहे. वेदांचे ज्ञान उत्तम आहे. पण तिथेच गुंतून पडलेला आहे. यज्ञयागादिक कर्मं करायची आणि स्वर्गलोकाची प्राप्ती करून घ्यायची. कोणत्या तरी लोकामध्ये त्या त्या देवतेची उपासना करून जायचे. पण याच्याही पलीकडे मनाला समाधान होणार नाही त्या ठिकाणी. हेही शास्त्रकारच सांगताहेत. स्वर्गामध्ये पाहिजे ते सुख, हवे तेव्हा आणि पाहिजे तितके, दीर्घ काल मिळते पण तेही शेवटी क्षीण होणारे आहे. हेही शास्त्रच सांगतंय. संपणारे आहे, बाबा. बरं, संपेपर्यंत तरी सुख आहे की नाही? नाही. तेही नाही. या ठिकाणी सर्वही आयुष्य सुखामध्ये गेलेले आहे. असे कोणी सांगू शकेल? मला कधीही दुःख आलेले नाहीये, हे सांगणारा कोणी भेटतो का? प्रतिकूल काळही आहे, अनुकूल काळही आहे. सुख मिळेल त्यावेळेला सुखी आहे समजायचे, समाधान मानायचे. दुःखाची प्राप्ती झाली त्याच्यामध्ये विषाद मानायचा, उद्वेग मानायचा. हे चाललेले आहे. तशीच स्थिती त्या ठिकाणी आहे. एक तर स्वर्ग लोकामध्ये अधिक काळ टिकणारे सुख असल्यामुळे त्याची प्राप्ती होण्यासाठी आम्ही यज्ञ यागादिक कर्मं करतो. कर्माचे फळ ईश्वर देणारा आहे. ही बुद्धी

आहे. फलदाता परमात्मा आहे.

कर्माप्रमाणे सुख दुःखं प्राप्त होतात हे बुद्धीला पटणे म्हणजे बुद्धीची शुद्धी आहे. पूर्ण नाही शुद्धी अद्यापि. पुष्कळ वासना मनामध्ये आहेत. तर ती शुद्धी, धर्मापासून सुख आहे आणि अधर्मापासून दुःख आहे हे मनाला पटले, काही त्याप्रमाणे आचरण होणे सुरू झाले. अशा परिस्थितीमध्ये कर्माचेच फल मिळतंय आणि माझ्या प्रयत्नांनीच मिळतंय हा अहंकार सुटल्याने होते.

कर्म म्हणजे क्रिया. चांगले बोलणे. सत्य बोलणे. शरीराने कोणाला पीडा वगैरे न करणे. मनामध्येसुद्धा चांगले विचार येणे. या मनाच्या, शरीराच्या, इंद्रियांच्या क्रिया आहेत. क्रिया कसे फल देतील? क्रियेला काय समजलं? याला सुख द्यायचे आणि त्याला द्यायचे नाही? क्रियेला ज्ञान आहे का? म्हणून कर्मफलाचे विवरण करताना व्यास महर्षी थोडे पुढे गेलेत. धर्माधर्मापर्यंत मानवांची बुद्धी आली. मीमांसाकारांनी 'सर्व योगांमध्ये कर्मयोगच सांगितलेला आहे' असा सिद्धांत मांडला पण त्याच्याबद्दल ते उदासीन राहिले. कर्म प्रधान आहे. कर्माचरण शेवटपर्यंत केले पाहिजे. हे जेमिनी महर्षींनी सांगितले. इथपर्यंत लोकांची बुद्धी आली. पापकर्मापेक्षा चांगली कर्म करताहेत. चालू देत. पण व्यास महर्षी थोडे पुढे गेले. या सगळ्या योजना आहेत. सगळे जग निर्माण केल्यानंतर विश्वाचे संरक्षण करण्याची ईश्वराची योजना आहे. आमचे घर म्हटल्यानंतर त्याची कुठे पडझड झालीये, दुरुस्ती कुठे केली पाहिजे इकडे लक्ष जाईल. पण दोन दिवस राह्यला आलेल्या पाहुण्याचे तिकडे कशाला लक्ष जाईल? घर पडलेले असो अगर नसो मला काय त्याच्याशी करायचंय, मी दोन दिवस राहणार आणि जाणार.

तसं संपूर्ण विश्व निर्माण करणारा जो परमात्मा आहे त्याला संरक्षणाची व्यवस्था करावीच लागते. दक्षता आहे. दक्षता हा गुण आहे. तो उदासीन नाही. 'काय होईल ते होईल' असा तो विचार करीत नाही. 'काय होईल ते होईल किंवा प्रारब्ध असेल तसे होईल' हे जीवांनी म्हणायचंय, ज्यांची शक्ती बिलकुल नाहीये. आमच्या मनाला जे वाटेल ते आम्ही करू शकत नाही

ना! पण सर्वही शक्ती ज्याच्याजवळ आहे त्याने हे विश्व उत्पन्न केले आहे. यावरूनच त्याची शक्ती समजून येते. त्याच्या संरक्षणाची योजनाही त्याने केली पाहिजे.

ती संरक्षण योजना अशी आहे. जीवांच्या बुद्धीचे संरक्षण करणे. जीवात्मे जे कर्म बंधनात, कर्म पाशामध्ये सापडलेले आहेत, विसरून गेलेले आहेत, ईश्वराला. आणि आपल्या बुद्धीने म्हणा किंवा केव्हा होईल त्या कालाच्या साहाय्याने म्हणा इथपर्यंत आलेले आहेत. धर्माचे आचरण केले म्हणजे आपण सुखी होऊ असे त्यांना वाटायला लागले. परंतु नुसत्या धर्माने किंवा अधर्माने फल उत्पन्न होणार नाही. क्रिया जाणणारा कोणी नको का? "याने पुण्य केलेले आहे" हे समजणारा कोणी तरी असला पाहिजे. सर्वज्ञ आहे तो. ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी निर्माण होणे हे धर्माचरणाचे फल आहे. असे निश्चित मनाने सांगता येते.

धर्माधर्माकडे लक्ष न देता मनाला येईल त्याप्रमाणे वागणारा जो आहे त्याला ईश्वराचे अस्तित्व कधीही मान्य होणार नाही. 'मला जे पाहिजे ते माझे मी करून घेणार' असे तो म्हणतो. मग 'दुःखही माझे मीच घेणार हे आलेच' अर्थात. 'सुखी आणि दुःखी मी माझ्याच कर्तृत्वाने होणार' असेच त्याला समजून राहावे लागते.

धर्माचरण करणाऱ्याला मात्र त्या धर्माचरणाने म्हणा, पुण्याने म्हणा, सकाम कर्म जरी घडले असले तरी कर्ता, फलदाता ईश्वर आहे ही भावना आहे. दैत्यांनासुद्धा तशी भावना होती. सर्व सत्ता आपल्याला मिळावी, त्यासाठी आपण तपश्चर्या करावी पण त्या तपश्चर्येचे फल देणारा, सृष्टिकर्ता कोणी तरी आहे ही भावना त्यांच्या मनामध्ये आहे. कोणत्याही शक्तीबद्दल आदरभाव, आस्तिक्यभाव मनामध्ये न ठेवता कर्म करायचे म्हटले तर काय होणार? म्हणून ईश्वर हा फलदाता आहे हा सिद्धांत वेदव्यास मुनींनी मांडला आहे.

या सृष्टीमध्ये मार्गदर्शक म्हणून ईश्वराने वेदव्यासांची नेमणूक केलेली आहे. असे अनेक ऋषी आहेत. एकाच युगामध्ये नाहीयेत, किती तरी वेदव्यास

झालेत, होताहेत. सूर्यनारायण, चंद्र, वरुण, अष्ट दिग्पाल आहेत हे सगळेही नियुक्त आहेत. ईश्वराने सृष्टीमध्ये त्यांची नेमणूक केलेली आहे. सृष्टीचे संरक्षण करण्याची ही व्यवस्था आहे. यज्ञयाग करून आपल्यापर्यंत येऊन पोहोचतील जीवात्मे. येऊ देत. मृत्युलोकाच्या संगतीतून तरी सुटले की नाही ! आणि त्यांचे सामर्थ्य नाही. हेही तितकेच खरे आहे. इंद्रलोकात गेले, तिथे त्यांना ठेवून घेतले तरी त्यांची बुद्धी बदलणार नाही. यांच्या वासना मनातून काढून टाकणे, नित्यानित्य विवेक निर्माण करणे आणि त्यांना मोक्षापर्यंत पोहोचवणे ही शक्ती देवांची नाही.

मुचकुंद राजाचे उदाहरण दिलेले आहे. त्याने देवांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचे सेनापतित्व पत्करलेले आहे. पुष्कळ काळ टिकणारे सुख आहे स्वर्गलोकामध्ये पण दैत्यांचे त्या ठिकाणी आक्रमण ठरलेले आहे. ती भीती देवांनाही आहे. हा दुर्गम दैत्य आलेलाच आहे की. अमरावती त्याने ताब्यामध्ये घेतलेली आहे. देवांना सगळे सोडून देऊन जाणे भाग पडलेले आहे. ज्यांचा जीवभाव अद्यापि गेलेला नाही असे देव मृत्युलोकातून स्वर्गलोकात आलेल्या लोकांना मुक्त कसे करणार ? ते स्वतःच मुक्त नाहीयेत. सर्व देव मुचकुंद राजाला म्हणाले, आप्तेष्ट मंडळींचा त्याग करून आमच्यावर उपकार करण्यासाठी, आम्हाला मदत करण्यासाठी तू इथे राहिलास पण तुला आता परत पृथ्वीवर जायचे असेल तर जा. परंतु तू तो लोक सोडल्याला इतका काळ लोटला आहे की आता तुझी कुटुंबीय मंडळी तिथे कोणी राहिलेली नाहीत. तुझी काय इच्छा आहे ? मोक्ष आम्ही देऊ शकत नाही. एक समर्थ परमात्मा श्रीहरि आहे. गोपालकृष्ण. परमात्माच फक्त मुक्ती देऊ शकतो. म्हणजे मुक्तीची सगळी साधने दिल्याशिवाय मुक्ती कशी मिळेल ? योग्यताही आली पाहिजे.

मुचकुंद राजाने रात्रंदिवस जागून दैत्यांचा नाश केला आणि देवांचे संरक्षण केले. त्याला आता विश्रांती घ्यायची इच्छा झाली. म्हणून तो पृथ्वीवर आला आणि एका गुहेत जाऊन झोपला. कालयवनाचा नाश करण्याकरता भगवान त्याला घेऊन त्या गुहेत आले. देवांनी त्याला असा वर दिला होता की

त्याची झोप पूर्ण होण्यापूर्वी जर त्याची कोणी झोपमोड केली तर त्यावेळेला ज्यावर त्याची दृष्टी पडेल तो जळून भस्मसात होईल. गोपालकृष्णांनी कालयवनाला स्वतः मारले नाही. यादवांचे उपाध्याय गर्गाचार्य यांचा तो मुलगा. आपल्या हातून त्याचा नाश कसा करायचा म्हणून त्याला ते या गुहेत घेऊन आले. तो गोपालकृष्णांच्या मागे पळत आला. गुहेत गोपालकृष्ण कुठे लपले हे त्याला अंधारात समजले नाही आणि त्याची लाथ मुचकुंद राजाला लागली, राजाची झोप मोडली आणि आपले डोळे उघडल्यावर समोर तो यवन दिसला व त्या यवनाचा देवांनी राजाला दिलेल्या वराप्रमाणे नाश झाला.

तर हे देव त्या स्थानामध्ये (स्वर्गात) राहाणारेसुद्धा मुक्ती देऊ शकत नाहीत. जीवात्मे पुण्यकर्म करायला लागलेले आहेत म्हणजे बुद्धी शुद्ध झालेली आहे. पूर्ण अशुद्धी नाहीये. काही तरी पुण्य कर्म आपण करावे आणि याचे फल देणारा एक ईश्वर आहे एवढी तरी भावना त्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. म्हणजे बुद्धी चांगली आहे. पण त्यांच्या मनात अशी इच्छा आहे, की ईश्वराने आपल्याला स्वर्गसुख द्यावे.

ब्रह्मलोकामध्ये जाऊन राहावे अशी धर्मराजांनासुद्धा इच्छा निर्माण झाली. म्हणून त्यांनी राजसूय यज्ञ केला म्हणतात. श्रीकृष्णांना विनंती केली, मला ब्रह्मलोकाला जायचंय. त्यात काही विशेष आहे. ब्रह्मलोकात गेलेला जो जीवात्मा आहे त्याला पुनर्जन्म नाहीये. ब्रह्मदेवांचे सान्निध्य आहे. ब्रह्मदेव मुक्त होईपर्यंत तिथे राहायला मिळते आणि ब्रह्मदेवांचा काल संपल्यानंतर ते जेव्हा मुक्त होतात त्यावेळी ब्रह्मलोकात असणारे सर्वही जीव मुक्त होतात. त्यामुळे या बाकीच्या स्वर्गादिक सुखापेक्षा त्या ठिकाणचे हे काही विशेष आहे. ब्रह्मदेवांना आदि जीव म्हणतात ना! परमेश्वराने त्यांना संपूर्ण वेदज्ञान दिलेले आहे. ज्ञानसंपन्न अशा प्रकारचे ब्रह्मदेव जीव आहेत. पूर्ण ज्ञान आहे. ईश्वर स्वरूप जाणणारे आहेत. आणि कार्य शक्ती मोठी आहे – विश्वाची उत्पत्ती करणारी. सर्व सृष्टीतल्या प्रत्येक जीवाच्या कर्मांचे ज्ञान आहे – कोणी किती पाप केले, कोणी किती पुण्य केले – ही काही कागदोपत्री नोंद नाहीये. बुद्धीच

त्यांची तेवढी समर्थ आहे. सर्वग्राहक बुद्धी आहे. त्यामुळे पदज्ञान त्या बुद्धीमध्ये पूर्ण आहे. त्यामुळे कोणत्या जीवाला कोणत्या जन्मात घालायचं हे ज्ञान आहे. ज्याच्या त्याच्या कर्मांप्रमाणे त्या त्या योनीत त्याला जन्माला घालायचे. त्यात चूक नाही. जगाच्या संरक्षणाकरता ईश्वराने जे अधिकारी नेमलेले आहेत त्यांची ज्ञानशक्ती फार मोठी आहे. उगीच वशिल्याने कोणत्याही अयोग्य व्यक्तीची नेमणूक होत नाही.

शंभर अश्वमेध यज्ञ करणाराच इंद्र होणार. परंतु त्या पदावर गेल्यावरसुद्धा त्याचा जीवभाव जात नाही. त्याच्याही अंतःकरणात वासना आहेत. शत्रु-मित्रभाव आहे. म्हणजे स्वर्गात सुखाचा उपभोग मिळत असतानासुद्धा दुःख आहे. ते सुख संपणारे आहे. ही कल्पना आल्याबरोबर स्वर्गसुखाची इच्छा सोडणारे लोक आहेत. पूर्ण शुद्धी ज्यांच्या मनाची झालीये त्यांना जाणीव आहे की हे सुख टिकणारे नाही. ईश्वराजवळ सुखच मागायचे तर मग हे असे नश्वर सुख का मागायचे ? ह्या विचारामुळे ते स्वर्गाच्या वाटेला जातच नाहीत. इह लोकाप्रमाणेच स्वर्ग लोक आहे ही कल्पना ज्यांच्या मनात आलीये त्यांचीच बुद्धी पुढे गेली आहे. सर्वांचे संरक्षण करणारा, इंद्रादिक देवांची नियुक्ती करणारा जो परमात्मा आहे, त्याची जसजशी कृपा होत जाईल तसतशी या जीवांची बुद्धी आणखी पुढे पुढे जाते आहे.

यज्ञयागादिक पुण्य कर्मे करून स्वर्ग लोकाला जावे ही बुद्धी चांगली नाही का ? चांगली आहे, पण मागे आहे. पुढे गेलेली बुद्धी नाही. ती बुद्धी वेगळी आहे. इंद्राला एक वाडा बांधायचा होता. विश्वकर्म्याने तो बांधायला घेतला. इंद्र तिथे जाऊन त्याला बांधकाम कसे करायचे याच्या सूचना देऊ लागला. विश्वकर्म्याने केलेल्या बांधकामात चुका काढून इंद्र त्याला ते पाडून पुन्हा बांधायला लावी. असेच सारखे चालले. विश्वकर्मा कंटाळला बिचारा.

असाच इंद्र एकदा बांधकामातले दोष काढीत असताना अचानक लोमश ऋषी तिथे आले. शास्त्रकारांना आपल्या शरीरावर लोम म्हणजे केस

एरव्ही कोण कशाला हे पाहणार ? पण रोम / लोम रंध्रामध्ये पाप राहतंय ना ! लोमश ऋषींना तपश्चर्येच्या प्रभावाने त्यांच्या शरीरावर जेवढे केस आहेत तेवढे कल्प आयुष्य त्यांना मिळालेले आहे. ब्रह्मदेवांचा १ दिवस म्हणजे कल्प. किती आयुष्य असेल ! लोमशांच्या डोक्यावर एक ताडाचे पान होते. इंद्राने त्यांना नमस्कार करून म्हटले, "काय ऋषिमहाराज तुम्ही ताडपत्र कशाला डोक्यावर घेता ?" ऋषी म्हणाले, "ऊन पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून घेतो."

इंद्राला पश्चात्ताप झाला. केवढे यांचे आयुष्य ! माझ्यासारखे किती इंद्र होऊन जाणार यांच्या आयुष्यात आणि हे केवळ तात्पुरते संरक्षणापुरते ताडपत्र घेतात, वाडा राहायला बांधत नाहीत. बांधकाम चालू असताना दोष काढत नाहीत. केवळ माझ्या हाताखाली नोकर चाकर आहेत म्हणून मी त्यांना काहीही कामे सांगून त्रास देतो हे योग्य नाही. नको वाडाबिडा, काही नको.

हे जे मार्गदर्शन आहे हे असे काही समोर आले तर होणार ना ! तर अशा प्रकारची बुद्धी मिळावी असे वाटते का आम्हाला ? एकापेक्षा एक बुद्धि संपन्न महात्मे त्या त्या कालामध्ये जन्माला आलेले आहेत. त्यांनी उत्तम पुण्यकर्म केलेले आहे. असतील. पुण्यकर्म करून स्वर्गलोकामध्ये गेले असतील. पुन्हा खाली आले असतील. परंतु कोणातरी संत महात्म्याच्या भेटीने त्यांची बुद्धी सुधारली गेली आहे. त्यांनाही पश्चात्ताप होऊन वासनारहित कर्मं व्हावीत इकडे त्यांचे लक्ष गेले. मनानेच सगळं करायचंय. मनाची तपासणी मनानेच करायची आहे. दुसरा कोणी सांगणार नाही.

नाथ महाराज म्हणतात हीरा फोडायला गेले तर फुटत नाही. तो हिऱ्यानेच कापावा लागतो. त्याचप्रमाणे मनाची स्थिती कशी आहे याचा मनानेच विचार केला पाहिजे. यज्ञयागांपेक्षा चांगली कर्मं आपल्याला नाही का करता येणार ? किंवा हे यज्ञयाग करतानाच आपण चांगली बुद्धी ठेवली तर ! स्वर्गाला जाऊन पुन्हा परत यायचे, काय उपयोग आहे ? तिथेही हेवेदावे आहेत, निरनिराळी दुःखे आहेत. निवडणुका आहेत की नाहीत कोणाला ठाऊक ? कारण तिथे पुण्याने जावे लागते. त्यामुळे असे मनाचे परीक्षण करायला

लागल्यानंतर हळू हळू तो विचार करू लागतो की, यज्ञयाग करण्यापेक्षा मनातल्या वासना दूर व्हायला पाहिजेत. ऐहिक सुख जसे नश्वर आहे तसे आमुष्मिक सुखही नश्वर आहे. सुख जाणार आहे हा एकच दोष त्याच्या लक्षात आल्यावर त्याला असे वाटते, जाऊ दे हा प्रयत्नच नको. वैराग्य हे हळूहळू उत्पन्न व्हायला लागते. सुखच्या इच्छेने केलेल्या कर्माचे फल ईश्वराला सुखाच्या रूपाने द्यावे लागते. मनात ज्या तऱ्हेची वासना कोणतेही कर्म करताना असते, त्याप्रमाणे फल मिळते.

हजारो गायी आहेत त्या चरून परत आल्यावर त्यांची वासरे आपापल्या आईजवळच बरोबर जातात. ते दुसऱ्या गाईकडे जाणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक जीवात्म्याने केलेले कर्म त्याच्याकडेच परत जाणार. ही केवढी शक्ती आहे! त्यात चूक नाही. तर अशा रीतीने त्याच्या मनात हळूहळू प्रवृत्ती होऊ लागते, माझे मन चांगले बनले पाहिजे. कोणत्या वासना जास्ती आहेत. अशुभ वासना कमी कमी होत आल्या पण शुभ वासनाही जास्त वाढू देऊन उपयोगी नाही. स्वर्गलोकाला जाण्यासाठी, यज्ञयाग करणे, त्यासाठी ईश्वराची भक्ती करणे काय करायचंय? माझी कीर्ती वाढावी, धन मिळावे, सत्ता मिळावी, त्याच्याकरता देवाची भक्ती करायची का? ते सगळे मिळाल्यानंतर देवाचे स्मरण राहील का मला?

पांडव राजे झाल्यानंतर त्या कुंतीने मागितलेले आहे. देवा, आम्हाला धोक्यात टाकले तुम्ही! पांडव नेहमी वनवासात राहिले पाहिजे असं त्यांची आईच मागणे मागतेय. केवढी शुद्ध बुद्धी आहे! कारण आपल्या मनात अनेक प्रकारचे अहंकार उत्पन्न होतात, वाढतात.

गोपालकृष्णा, आपली कृपा कोणावर होते? ज्याच्याजवळ काहीही नाही, जो कबूल करतो माझ्याजवळ काहीही नाही. अर्थ नाही, काम नाही, धर्म नाही.

कुंतीला वाटले मुलांनी हे योग्य मागणे मागितले नाही. त्यांना राज्य मिळाले हे चांगले झाले नाही. ऐश्वर्य, सत्ता मिळाल्यावर मद वाढतो. आणि

मग गोपालकृष्णांचे नाव पांडवांच्या मुखातून येणार नाही. अरण्यात असताना तुमची जशी आठवण येत होती तशी आठवण राज्यावर बसल्यावर येणार नाही. आणि पूर्वीप्रमाणे तुमची आठवण झाल्यावर तुम्ही याल का लगेच? अरण्यातही गोपालकृष्ण येऊन भेटून जात होते. दुर्वास ऋषी पांडवांची परीक्षा पहायला आले असता गोपालकृष्णांनीच येऊन सुटका केली ना!

तर याप्रमाणे कुंतीची बुद्धी अशी आहे की, दुःखाची साधने आम्हाला मिळावीत. म्हणजे दुःख आम्हाला मिळेल. समर्थांनी मनोबोध केला आहे. मनानेच मनाला तपासून पहायचे. आपल्या दोषांचा अभ्यास करायचा. मनाला शिकवायचंय. आत्ता मनामध्ये कोणते दोष आहेत, उद्या अनुकूल परिस्थिती आल्यावर मनामध्ये कोणते दोष येण्याचा संभव आहे, हा सगळा अभ्यास केला पाहिजे. फलदाता परमेश्वर आहे. त्याच्याजवळ हे मागायचे म्हणजे मनाच्या शुद्धीमुळे त्याची भक्तीसुद्धा शुद्ध होऊन जाते. काही तरी मिळाले म्हणजे ईश्वराची - जगदंबेची कृपा आहे असे नाही. परंतु काही काही जीवांची बुद्धी पुढे न्यायची आहे. काळ कारण आहे सगळ्या सृष्टीला. तर त्या काळाने सुधारणाऱ्या बुद्धी अशा सुधारल्या पाहिजेत की ज्या बुद्धीचा सर्वांच्या समोर आदर्श राहील. केवढी कुंती बुद्धिमान आहे! पांडवांना हे सुचले नाही. कोणत्या ऋषींनाही हे सुचले नाही. पांडवांनी कायम वनवासातच राहिले पाहिजे असे त्यांची माता म्हणते आहे! मुलांबद्दल तिला काही प्रेम नाही?

क्रमाक्रमाने ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी निर्माण झाल्यावर हळूहळू हा विचार सुरू होतो. आपले मन किंवा आपली बुद्धी किती सदोष आहे हे समजायला लागते. आणि ते दोष कमी करण्याचा प्रयत्न सुरू होतो. पुण्यकर्मे करावीत, स्वर्गादि लोकांमध्ये जावे, सुख मिळवावे, ते संपल्यानंतर पुन्हा मृत्युलोकामध्ये यावे. मग पुन्हा यज्ञयागादिक कर्मे करावीत. पुन्हा स्वर्गलोकात जावे, म्हणजे पुन्हा जन्माला यावे, पुन्हा मरावे; हीच इच्छा केल्यासारखे झाले. जन्म - मृत्यूच्या फेऱ्यातून तो जीव जर सुटला तर किती सुख आहे! हळूहळू ईश्वराबद्दल भक्ती, आस्तिक्य बुद्धी निर्माण झाली की आपल्या कामाकरता

ईश्वराकडे जायचे नाहीये, असे वाटू लागते. ईश्वराच्या शक्तीने, कृपेने सर्वही मिळते. जीवभाव असेपर्यंत अहंकार कायम आहे. अहंकार जर आहे तर आम्ही केलेल्या कर्माचे फळ आम्ही भोगले पाहिजे असं का समजू नये? देवाला भार घालण्याचे काय कारण आहे? करायचे तुम्ही आणि देवाला सांगायचे यातून आमची सुटका करा! वकील लोक सुटका करत असतील. पण त्यांना फी किती द्यावी लागते? होईल. सुटका होईल. पण कायमची सुटका नाहीये. सगळी कर्मं सुटली नाहीत. तेवढ्यापुरता काही बंदोबस्त झाला म्हणा, अशी समजूत करून घ्यायची आपण. तर बुद्धिरूप जी जगदंबा आहे ती अशी वेगळी वेगळी बुद्धिरूप घेऊन येते. जास्तीत जास्त शुद्ध बुद्धी जीवात्म्याला मिळणे ही खरी ईश्वराची कृपा आहे. अशुद्धताही बुद्धीमध्ये राहिली, धर्माचरणही सुरू झाले, त्याचे फल म्हणून स्वर्गादिक लोकांचे सुखही मिळायला लागले परंतु दुःखं संपली नाहीत. सर्व दुःख कायमची नाहीशी होणे याला मोक्ष म्हणतात. कोणतेही दुःखं शिल्लक राहून उपयोग नाही. अशी अवस्था कोणाला नकोय? सगळी दुःखं कायमची सुटली पाहिजेत. दुःखाचा पुन्हा संबंध राहून उपयोग नाही. ही अवस्था काही प्राप्त होणार नाहीये. त्याकरता क्रमाक्रमाने तशी बुद्धी आपल्याला मिळाली पाहिजे. बुद्धीस्वरूप जगन्माता आहे, देवी आहे. तिची भक्ती करताना अशा प्रकारे करायची की मन शुद्ध होत जाईल. बुद्धी चांगली बनवायची आहे. जीवनातल्या इतर अनुकूल प्रतिकूल गोष्टींकडे लक्ष द्यायचे नाही. ती बुद्धी आता अंतर्मुख झालेली आहे. बाहेरचा विचार बुद्धीने, मनाने करायला सुरुवात केली तर तो संपत नाही ना! हे जास्ती आहे, ते मिळवावे, अमूक करावे. पण आता आपल्या मनामध्ये जे कोणते दोष जास्ती आहेत, ते कमी करायला पाहिजेत. ते कमी कमी होत चाललेले आहेत.

शास्त्रकारांनी वैराग्याचेसुद्धा प्रकार सांगितले आहेत. चार प्रकारचे वैराग्य आहे. हे नको, ते नको म्हणजे प्रयत्न सुरू झाला आता. ईश्वराची कृपा झाली. चांगल्या मार्गाने जायला लागला. पुन्हा यज्ञ करायचे, पुन्हा स्वर्गाला जायचे, ते पुण्य संपलं की पुन्हा यज्ञ करायचे पुन्हा इथे स्वर्गाला यायचे, हे

नाही आता. मानव जन्म मिळाल्यानंतर आता असे करण्याची बुद्धी सुरू झाली. हे नको आता, असे वाटायला लागले. प्राथमिक प्रयत्न भूमिका आहे. याला 'यतमान संज्ञा वैराग्य' म्हणतात त्याचा अभ्यास चालू असताना किती दोष कमी झालेले आहेत, अजून किती दोष उरलेले आहेत हाही विचार त्या मनाला करता येतो. मनामध्ये विलक्षण शक्ती आहे. अनेक जन्म ईश्वराला विसरून गेलेले मन ईश्वराचे स्मरण प्रयत्नाने, अभ्यासाने अखंड करू लागते. गुळाला चिकटलेला मुंगळा जसा तोडून काढला तरी निघत नाही तसं मनाचं होतं. म्हणून समर्थ सांगताहेत –

**'मना सज्जना भक्तिपंथेची जावे ।'**

हे मना, तू सज्जन आहेस, फार चांगला आहेस तू. तू भक्तिमार्ग पकड. ती मनामध्ये असणारी प्राणशक्ती फार विलक्षण आहे असे शास्त्रकार मानतात. ती शक्ती जसजशी अंतर्मुख होऊन विचार करू लागेल, तसतसा बुद्धीला आत्मविश्वास वाटेल.

त्या महाभारतामध्ये गोष्ट आहे ना! ते ऋषी दुपारी जेवण झाल्यावर वामकुक्षी करायला थोडे पडले. झोप लागली. सूर्यास्ताची वेळ आली. त्यांच्या बायकोला वाटले सूर्यास्ताच्या वेळेला यांची संध्या, अर्घ्य कधी चुकले नाहीत. तेव्हा त्यांच्या नियमात खंड पडू नये म्हणून तिने त्यांना उठवले.

तर ते ऋषी आपल्या बायकोला म्हणाले, "माझे अर्घ्य घेतल्याशिवाय सूर्यनारायण अस्ताला जाणे शक्य आहे का? माझ्या तपावर तुझा विश्वास नाही?" रागावले नाहीत. इतका आत्मविश्वास निर्माण झालाय, की माझ्या बुद्धीमध्ये कोणताही दोष शिल्लक राहिलेला नाही. ही पुढची भावना आहे. बुद्धीची तयारी झालेली आहे. एकेक दोष कमी कमी होत गेले. प्रयत्न करायचा. प्रयत्नांनी सगळे होते. प्रयत्नवादही शास्त्रकारांना मान्य आहे. पण तो प्रयत्न याच्याकरता केला पाहिजे. त्या प्रयत्नांचा उपयोग काय? नाही तर –

**'पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननी जठरे शयनम् ।'**

याशिवाय दुसरे काही मिळणार नाही. त्यामुळे हा प्रयत्न सुरू झाला आणि त्या बुद्धीची प्रगती होत चाललेली आहे. परिणामी आहे. पांचभौतिक बुद्धी आहे.

सात्त्विक बुद्धी आहे. पंचभूतांच्या सत्त्वांशापासून अंतःकरण तयार झालेले आहे. म्हणून त्याला समर्थ 'सज्जन' म्हणतात, 'तू सात्त्विक आहेस पण रजोगुण आणि तमोगुण येऊन मिसळले तुझ्यात. त्यामुळे बिघडलास तू. भक्ति मार्गाने जा.' असा उपदेश मुद्दाम करतात.

अशी जर बुद्धी क्रमाक्रमाने शुद्ध होत गेली तर कोणत्याही वासना मनामध्ये उत्पन्न न होता धर्माचरण चाललेले आहे. ही मोठी तयारी झाली आहे. आणि भगवत् प्रेम निर्माण झाले. मग त्या धर्माचरणाचे फल काय मिळणार आता? 'स्वर्गादिक सुख नको मला. जरूर नाही. हे तर केव्हाच ठरून गेलेले आहे.' मग यज्ञयागादिक कर्म कशाला करता? त्याकरता देवाने ही योजना केली. जास्तीत जास्त शुद्ध बुद्धी होऊन जाते. पांडवांपेक्षाही कुंतीची बुद्धी अत्यंत विवेकसंपन्न ठरलेली आहे. पांडवांचे संरक्षण करा, त्यांच्याकडे लक्ष द्या. नाही तर त्यांना पुन्हा वनवासात पाठवा. राज्य देऊ नका त्यांना. असे सांगणारी माता केवढी बुद्धिमान असली पाहिजे.

'ददामि बुद्धि योगंतं .......'

भगवंतांनी सांगितले आहे. जी कर्म शुद्ध होताहेत त्याचे फल दिले पाहिजे. कर्माचा फल देणारा मी आहे ना! सिद्धांत आहे. ज्यांच्या बुद्धीमध्ये कर्तृत्व बिलकुल नाहीये, ईश्वराची प्रेरणा आहे, फल काय द्यायचे तेही त्या शक्तीनेच द्यावे, फल मिळण्याच्या वेळेस बुद्धीमध्ये काही विकार निर्माण होणे अथवा न होणे याचाही विचार त्यानेच करायचा आहे. कर्तृत्व आपल्याकडे कोणतेही घ्यायचे नाही, हा अभ्यास झालेला आहे ईश्वराच्या कृपेने. माझ्या बुद्धीमध्ये काही दोष राहिलेले नाहीत याचा अहंकारही नाही आणि काही दोष राहिले आहेत याची खंतही नाही. तो आपला बुद्धी सुधारण्याचा प्रयत्न करतोय. त्यामुळे ईश्वराला हे सांगावे लागले की, त्याला मी तशी बुद्धी देतो –

**'येन मां उपयान्तिते।'**

'स्वर्गलोक नको की ब्रह्मलोक नको. मला कुठेच जायचे नाही. इंद्र जरी बोलवायला आला तरी नाही.

धर्मराज शेवटी एकटेच पुढे जाऊ लागले, त्यावेळी इंद्राने त्यांना

स्वर्गलोकात येण्यासाठी सारथी देऊन आपला रथ पाठवला. पण धर्मराजांबरोबर त्यांच्याजवळ बराच काळ राहिलेला एक कुत्रा होता. त्याला सोडून एकटंच स्वर्गलोकात जायची धर्मराजांची इच्छा नव्हती. आता कोणाच्याही गाडीत कुठेही कुत्रा बसलेला असतो. पण त्या कुत्र्याला घेऊन स्वर्गलोकात जायचे काय? गाडीत कुत्रा घेऊन बसण्याला प्रेम म्हणत नाही. ती काही समदृष्टी नाहीये. तो सारथी म्हणाला, 'हे कसे शक्य आहे? कुत्र्याला तुम्हाला कसे बरोबर घेता येईल?' धर्मराज म्हणाले, 'मग मला यायचे नाही. माझ्या मित्राला मी सोडू शकत नाही.'

धर्माबद्दलची जी कल्पना आहे ती केवढी उच्च आहे! हा मोठा धर्म आहे. जो सहाय्य करणारा आहे. त्याचा त्याग केव्हाही करायचा नाहीये.

'या कुत्र्याला नेत नसाल तर मला स्वर्ग नको' असे म्हणणारा कोण आहे सध्या?' त्या कुत्र्याच्या रूपाने स्वतः यमधर्मच होते. तर ही बुद्धी क्रमाक्रमाने जगदंबेच्या कृपेने प्राप्त होते आणि तशी बुद्धी प्राप्त झाल्यानंतर ती ईश्वरदत्त बुद्धी आहे. ईश्वराकडून ज्याला बुद्धी मिळाली आहे तो जीवात्मा ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचू शकतो. पूर्ण आनंद त्याला मिळू शकतो. नाही तर अपूर्ण आनंदातच याचे किती जन्म जातील याला काहीही सांगता येणार नाही.

गोकुळामध्ये राहणाऱ्या गोपी पहाटे उठून दही घुसळायचे काम करायच्या परंतु वाणीने मात्र गोपालकृष्णांची लीला वर्णन करीत. मन तिकडे आहे. शरीराने काम चाललेले आहे. शुकाचार्य महाराज वर्णन करताहेत. त्या गोपींनी गोपालकृष्णांची अनेक चरित्र स्वतः पाहिलेली आहेत. मुखाने त्यांचे सुंदर वर्णन करताहेत. ती चरित्रं गोपींनी प्रेमाने पाहिलेली आहेत. पाहून ऐकून प्रेम आणखी जास्ती दृढ होते, त्या ठिकाणी अशी शक्ती नाहीये. भगवत्‌भक्ती हा मोठा धर्म त्यांच्याकडून घडलेला आहे. त्यामुळे त्यांच्या मुखातून जे भगवंतांच्या नामाचे संकीर्तन, गुण संकीर्तन निघतंय त्याने सर्वही दिशांचे अमंगल दूर होतंय. संत महात्मे ज्या स्थानात आहेत ते स्थान पवित्र होऊन जातंय.

प्रल्हादजींनी नरसिंहांना विनवले, "माझ्या पिताजींनी आपला द्वेष केला पण आपण त्यांचा राग करू नका. त्यांचा उद्धार करा." नरहरि म्हणाले, "बाबा, तुझा एकटा पिताच उद्धरून गेला नाही, तर तुझ्या २१ पिढ्या उद्धरून उत्तम लोकाला गेल्या." हे पुण्य आहे. निर्वासन अंतःकरण आहे. देवाजवळ काहीही मागायचे नाहीये. भगवंताबद्दल प्रेम करायला मनाला शिकविले पाहिजे. मनाने ईश्वराशिवाय दुसरे काहीही मागायचे नाही. ती तशी बुद्धी भगवतीच्या कृपेने प्राप्त होते. हेच पुढे आणखी व्यास महर्षी सांगताहेत.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ॥**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

ज्ञान जास्ती असावे अशी इच्छा करणे हे काही वाईट नाही. परंतु ऋषींचे, विप्रांचे ज्ञान नाहीसे होऊन ते मला मिळावे ही इच्छा वाईट आहे. दुर्गम दैत्याची भावना अशी होती, की सत्ता सर्व आपल्या ताब्यात असावी. नियामक म्हणून जो ईश्वर आहे तो मीच असावा. आसुरी संपत्तीचे वर्णन भगवंतांनी केले आहे –

**ईश्वरोहम् भोगी सिद्धोऽहम् बलवान् सुखी ।**

ही इच्छा मनामध्ये असल्या कारणाने तपश्चर्या करून सुद्धा चित्ताची शुद्धी नाहीये. तपाने मनातल्या वासनांचा क्षय झाला पाहिजे. तपाने ब्रह्मज्ञान होते असे शास्त्रकार सांगतात.

ब्रह्मदेवांच्या वराने दुर्गम दैत्याने सर्व ज्ञान आमल्याकडे घेतले आणि ज्ञानशून्य जग झाल्यामुळे कर्मं बंद झाली. यथाविधी सर्व कर्मं व्हायला पाहिजे ना! विधीचे ज्ञान संपादन करून कर्म करायचे. त्या ज्ञानामध्ये न्यूनता असेल तर कर्मामध्येही न्यूनता येते. ती न्यूनता दूर होण्याकरता परमेश्वराची प्रार्थना कर्म समाप्त झाल्यावर करायची आहे. अहंकाराने माझ्या हातून काही झाले

असेल तर त्याच्यामध्ये न्यूनता निश्चित आली असणार! ती न्यूनता आपल्या स्मरणाने पूर्ण व्हावी. इतके सामर्थ्य परमेश्वराच्या स्मरणामध्ये आहे, नामस्मरणामध्ये आहे. कर्मस्मरणामध्ये आहे. ईश्वराने जसे वागून दाखवलंय, त्याने जशी कर्मं केली आहेत त्याप्रमाणे आपण वागवे. अर्जुनाला तेच सांगितले भगवंतांनी.

"मला काहीही मिळवायचे राहिलेले नाही. काय मिळवायचे आता? सर्व शक्ती जर माझ्याजवळ आहे तर आणखी काय मिळवायचे? परंतु मी कर्म करतोय की नाही, तसे तुला कर्म केले पाहिजे. लोकसंग्रहाकरता करायचे. आज तू मोठा योद्धा म्हणून जगामध्ये प्रसिद्ध झालेला आहेस. युद्ध करणारे क्षत्रिय वीर तुला आदर्श समजताहेत. तू जर युद्ध केले नाहीस तर लोक तुला म्हणणार, 'अर्जुनाने ऐन मोक्याच्या वेळी युद्ध सोडून दिले. आपणही तसेच करावे.' क्षात्र वृत्ती सगळी नाहीशी होईल तुझ्या या युद्ध न करण्याने" 'क्षतात त्रायते इति क्षत्रिय:' क्षत्रिय शद्बाचा अर्थ म्हणजे सर्व प्रजाजनांचे, दुःखी जनांचे, दुःखितांचे संकट दुःख दूर करणारा, संरक्षण करणारा. ही शक्ती जवळ आहे. बौद्धिक शक्ती आहे. धैर्यादिक गुण बुद्धीमध्ये आहेत. त्यामुळे पुढचे सगळे कार्य होते. युद्ध वगैरे करायला धैर्य पाहिजे ना!

भीष्माचार्यांचे धैर्य किती विलक्षण आहे! शरीराकडे लक्ष नाहीये. क्षत्रियाने आपल्या स्वतःच्या शरीराकडे लक्ष देऊन भागत नाही. देहात्माभिमान असणारा क्षत्रिय युद्ध करू शकणार नाही. तो भित्रा असून चालणार नाही. दुसऱ्याचे संकट, दुसऱ्याची दुर्बुद्धी पाहिल्याबरोबर ज्याला राग येतो, शासन केले पाहिजे असे ज्याला वाटते तो युद्ध करू शकतो. त्याशिवाय युद्धाला जाईल कशाकरता? युद्ध म्हणजे काही खेळ नाहीये. जयापजयाचा अगोदर काही निर्णय नाही, जीवन राहील किंवा नाही याचीही काही खात्री नाही अशा स्थितीमध्ये, 'देह म्हणजेच मी आहे,' असे जो समजतोय ती व्यक्ती किंवा समाज हा युद्ध करायला अयोग्य आहे.

वानरांनी युद्ध जिंकलेले आहे. राक्षस मोठे बलवान, समर्थ असे

प्रसिद्ध झाले होते पण त्यांचा तो देहात्माभिमान वाढलेला आहे. भोगबुद्धी निर्माण झाली आणि मनामध्ये भीती निर्माण झालेली आहे. मारुतिरायांनी त्या ठिकाणी जाऊन एवढे कार्य केले. राक्षसांच्याच नव्हे तर राक्षसराज रावणाच्या मनामध्येही भीती उत्पन्न करून मारुतिराया परत गेले आहेत. सीतेलाही आश्वासन दिलेले आहे. हे धैर्य देहाभिमान असणाऱ्याला कसे असणार ? म्हणून क्षत्रियांनी हा अभिमान सोडला पाहिजे. भीष्माचार्य म्हणजे उत्तम क्षत्रिय आहे. युद्धाच्या वेळेला त्यांचे शौर्य विलक्षण आहेच आहे. स्वतःचे संरक्षण करायचे. आणि शत्रूचा नाश करायचा. देहाभिमान सोडणे याचा अर्थ देहाची उपेक्षा नाहीये, देह पडला तरी चालेल असा नाहीये. सामर्थ्य आहे ते. ज्ञान आहे ना ! आपल्या स्वतःचेही संरक्षण करायचे आहे. आणि समोरच्या दुर्जनांना शासन करायचे आहे.

शूर्पणखा राक्षसीचे नाक कापल्यावर तिचे आप्तेष्ट आणि तीन सेनापती मिळून चौदा हजार राक्षस चाल करून आले. रामचंद्रांनी लक्ष्मणाला सांगितले, 'तू सीतेला घेऊन पर्वतावरील गुहेत जाऊन थांब. मी युद्ध करून येतो.' म्हणजे एकटा लक्ष्मणच बरोबर होता पण त्याचेही सहाय्य घेतले नाही. आपल्या शक्तीवर केवढा विलक्षण विश्वास आहे. म्हणून रामदूतही तसेच निघाले. एकट्याने लंकेत जाऊन सगळ्या राक्षसांच्या मनात भीती निर्माण केली. धर्मशील व्यक्ती एकटी असली तरी ती सामर्थ्यशाली असू शकते. हे दाखविले त्यांनी. आणि चौदा हजार राक्षसांचा नाश केलेला आहे. आता त्या राक्षसांना काय शस्त्रास्त्र विद्या येत नव्हती ? शत्रूचा नाश करण्याकरता त्यांच्याजवळही शस्त्रं होती, अस्त्रं होती. पण यांच्यावर जी शस्त्रास्त्रं यायची ती परत आपल्या स्थानात जाऊन पडायची योजना अगोदरच करायची आहे. आत्मरक्षण करायचंय. आणि मग सगळ्या शत्रूंचा नाश करायचा. त्याप्रमाणे सर्व शत्रूंचा नाश करून रामचंद्र त्या पर्वतावर आले. लक्ष्मण आणि सीतादेवींची भेट झाली.

लक्ष्मणाच्या मनामध्ये रामचंद्रांबद्दल अत्यंत विश्वास आहे. रामचंद्र

साक्षात् परमेश्वर आहे, समर्थ आहेत, पूर्ण शक्ती आहे अशी त्याची भावना आहे. पण सीतादेवीच्या मनामध्ये ही भावना कमी आहे, असे म्हणावे लागते. चौदा हजार राक्षसांना एकट्याने मारून रामचंद्र परत आले हे सीतेला काय समजले नाही? वनामध्ये आपण तिघेच राहतोय आणि चौदा हजार राक्षस राहताहेत पण मनामध्ये भीती नाहीये. आमच्या वाटेला जाऊन त्यांनी पहावे. मग काय झाली त्यांची अवस्था? एकही जिवंत राहिला नाही. हे रामांचे सामर्थ्य सीतेला माहीत नाही काय? हे माहीत असूनसुद्धा मायावी सुवर्णमृग तिथे आला आणि त्याला धरण्यासाठी रामचंद्र त्याच्यामागे गेले. त्याला बाण लागल्यावर त्याने रामचंद्रांच्या आवाजात 'सीते! लक्ष्मणा!!' अशा हाका मारल्या. रामचंद्र संकटात सापडलेत असे दाखवले.

सीता घाबरली. तीही क्षत्रियाची कन्या आणि सून होती. क्षत्रियाचीच पत्नी होती. मानव देह धारण केल्यानंतर कमी शक्ती, अधिक शक्ती वगैरे काय काय समज लोकांचे होत असतात. जेव्हा सीतेने सांगितले, "लक्ष्मणा, जा रामांच्या मदतीला," तेव्हा त्याने सांगितले, "हा रामांचा आवाज नाहीये. रामांवर संकट येणे शक्यच नाही." हा आस्तिक्य भाव आहे. ईश्वर आहे. पूर्ण समर्थ आहे. हे मनाला इतके पटले पाहिजे, की रामाप्रमाणे आवाज ऐकूनसुद्धा हा रामांचा आवाज नाही, कारण रामांवर संकट येणे शक्य नाही, हा विश्वास पाहिजे. आता सीतेची योग्यता अधिक आहे की लक्ष्मणाची? वास्तविक शिवधनुष्य मोडले त्यावेळी सीतेने रामांच्या सामर्थ्याचा अनुभव घेतलेला आहे. तीनशे माणसांनी गाड्यावर ठेवून ओढून आणलेले शिवधनुष्य एकट्या रामचंद्रांनी उचलून त्याला बाण लावण्यापूर्वीच मोडून गेलेले आहे.

लग्न करून अयोध्येला जायच्या वेळेला परशुरामांनी त्यांना गाठलेले आहे. ते रामचंद्रांना म्हणाले, "ते जुने धनुष्य मोडले म्हणजे पराक्रम झाला काय? हे माझे धनुष्य घे. त्याला बाण लावून दाखव." सगळे घाबरले. सर्व क्षत्रियांचा नाश करणारा हा परशुराम महापराक्रमी आहे. अतिरेकी बितीरेकी डोके वर काढणार नाहीत त्याच्यासमोर. सगळे गप्प आहेत.

रामचंद्रांनी त्यांचे धनुष्य घेऊन त्याला बाण लावला आणि सांगितले की, "एकदा मी धनुष्याला बाण लावला की तो परत भात्यात ठेवत नसतो. आता मी बाण लावलाय त्याला कुठे मारू ते सांगा. हा लावलेला बाण कुठे तरी सोडला पाहिजे. तो पुन्हा भात्यामध्ये जाणार नाही." राम एक बाणी, एक वचनी म्हणून प्रसिद्ध आहे. हे सांगताना सीतेने ऐकलंय, सगळ्यांनी ऐकलंय. एक बाण राम दोन वेळा जोडत नाही. एकदा जोडलेला बाण काम करून टाकतो. राम पाणिग्रहण एकदाच करतो. दुसरे पाणिग्रहण नाही. द्विभार्या प्रतिबंधककायदा करण्याची जरुरी नाहीये. मानसिक धैर्य पूर्ण आहे. ज्यांचा भक्त (हनुमान) जितेंद्रिय आहे, तर ते जितेंद्रिय आहेत हे काही वेगळे सांगायला नको. कोणीही मागायला आला तर दोन वेळेला याचकाला राम केव्हाही देत नाही. आत्ता एवढे घेऊन चला, पुढच्या महिन्यात पगाराला पुढचे देऊ. इथे काय पगार आहे का? एकच वेळा राम त्याला असे दान देतील की जन्मात पुन्हा त्याला कोणासमोर हात पसरण्याची पाळी येणार नाही. आणि शेवटी सांगताहेत, "राम दोन वेळेला बोलत नाही. कुठे सोडायचा हा बाण? तुमचे चालणे बंद करू? तुम्हाला पाऊल उचलता येणार नाही, इथेच थांबावे लागेल. का तुमचा स्वर्गाचा दरवाजा बंद करू? लवकर सांगा, हा बाण कशाकरता सोडायचा? जोडायला तुम्ही सांगितलात. तो तसा परत ठेवला जाणार नाही."

परशुरामजीसुद्धा ईश्वराचे अवतार आणि हेही अवतारच. दोन्ही अवतार असताना असे चरित्र करून दाखविले. काल आहे आणि त्या त्या कालाला तो तो अवतार आहे. 'त्रेतायाम् रघुनंदनः ।' हेही सीता देवीने पाहिलेले आहे. परशुरामासारखा अजिंक्य. एकही शत्रू समोर उभा राहू शकणार नाही. परशुराम नुसते आलेत समजल्यावर मोठे मोठे राजे स्त्रीवेष परिधान करून अंतःपुरात जाऊन लपून रहात. बाहेर दिसला तर तो जिवंत राहणार नाही. एका क्षत्रियाने आपल्या पित्याचा शिरच्छेद केला आहे. सगळेच क्षत्रिय दोषी आहेत ही राजनीती आहे. असे जे राजनीतिज्ञ आहेत ते राजनीतीप्रमाणे

वागल्यानंतर दहशत निर्माण होऊन सगळे गप्प बसतात. एकही क्षत्रिय डोके वर काढू शकला नाही. हेही सीतादेवीने पाहिलेले आहे. रामांची शक्ती किती विलक्षण आहे! मनामध्ये शक्ती आहे, शरीरामध्ये शक्ती आहे. शस्त्रास्त्रांमध्ये शक्ती आहे, वाणीमध्ये शक्ती आहे. ह्या सगळ्या आपल्या मानसिक शक्ती आहेत. हा बौद्धिक शक्तींचा विकास आपल्याला या मानव जन्मामध्येच साधता येतो. वाटेल तितका विकास होऊ शकतो.

वैदिक संस्कृतीमध्ये या मानसिक बौद्धिक शक्तींचा विकास साधण्याचे पुष्कळ उपाय सांगितले आहेत. तो विकास केवळ आपल्या वासना अधिकाधिक वाढवण्याकरता करायचा, का वासना शांत करण्याकरता करायचाय हे समजण्यासाठी ईश्वरकृपा पाहिजे.

म्हणून लक्ष्मण सीतादेवींना सांगताहेत, हा रामांचा आवाज नाहीये. राम संकटात कधीही सापडणे शक्य नाही. हा मायावी दैत्याचा आवाज आहे. केवढी भक्ती आहे! ज्येष्ठ भ्राता 'पितुःसम।' पण आज आम्ही जिथे पित्यालाच मानायला तयार नाही तर ज्येष्ठ भावाला काय मानणार! आमचा देहात्म अभिमान फार आड येतो आहे. सगळ्या धर्माच्या आड तो मुख्यत्वे करून येतो आहे. रामांची आज्ञा नसताना त्याला जावे लागले. नियती आता काय करेल ते करेल. लक्ष्मण म्हणाला, "माझ्या बोलण्याचे जाऊ दे पण रामावर अविश्वास? माझ्या सांगण्यावर विश्वास नसू दे पण रामांची शक्ती एवढी कमी झाली?"

म्हणजे सीतादेवींकडून रामांचा तर अपमान झालाच पण रामभक्त लक्ष्मणाचासुद्धा अपमान झाला. त्यांची शक्ती कमी झाली, असे समजणे, म्हणजे अपमान नाही का? राम संकटात सापडलेले आहेत असे मनात येणे, असे समजणे म्हणजेसुद्धा भक्तीमध्ये कमीपणा आहे. रामचंद्रांच्या शक्तीवर लक्ष्मणाचा केवढा विश्वास आहे! बाकी कुठेही विश्वास ठेवायची तयारी नाही. जगामध्ये कोणत्याही शक्तीवर विश्वास नाहीये, इतका विश्वास रामांच्या शक्तीवर आहे.

सीतादेवींना या अविश्वासाचे फळ भोगायला लागले. रावण त्यांना घेऊन गेलेला आहे. मग क्षमा मागितली. झाले पुढे सगळे. 'लक्ष्मणांचा अपमान माझ्यामुळे झाला म्हणून रावणाने मला आणून बंदिखान्यात ठेवले,' असे त्यांना नंतर दुःख झाले.

## 'विनाशाय च दुष्कृताम्'

हा शब्द वापरला आहे भगवंतांनी. आपल्या दुष्कृत्याने आपलाच नाश होतो असे नाही, तर सगळ्या जगाचा नाश होतो. ईश्वराच्या विश्व कार्यामध्ये विघ्न उत्पन्न करणारे आहेत म्हणजे सगळ्या जगाचेही आहेत. त्यांना दुसरी शिक्षा नाही.

ज्ञानेश्वर महाराज दयाळू आहेत. 'जे खळांची व्यंकटी सांडो।' असं ते म्हणतात. म्हणजे दुष्टांना त्यांचा दुष्टपणा सोडून जावो. कशाला नाश करायचा? प्रल्हादजीही म्हणाले – 'खळांचे मन प्रसन्न होवो' – भगवंतांनी तो शब्द वापरला आहे. ते ईश्वर आहेत. आणि ज्ञानेश्वर महाराज गुरु आहेत. गुरु दयाळू आहेत. ईश्वर दयाळू नाहीत असा याचा अर्थ नाही. पण दया कुठे करायची आणि कुठे नाही? हे समजले पाहिजे. सृष्टीचे जे नियम ठरलेले आहेत त्यांचा भंग करणाऱ्याला दया नाही. नाशच आहे. प्रत्येक अवतारामध्ये हे कर्तव्य भगवंतांनी दाखविलेले आहे. आणि हे क्षात्रकर्म आहे. हे कर्म केव्हा केले पाहिजे, असं म्हणतात. नाश शद्ब त्यांनी वापरला नाही. भगवान अर्जुनाला सांगताहेत –

धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते।

युद्ध करणे हा धर्म आहे क्षत्रियांचा. यावेळी हिंसा अहिंसेचा विचार करणारी तुझी बुद्धी चांगली नाही. तू आपल्या मार्गापासून, कर्तव्यकर्मापासून भ्रष्ट व्हायला लागला आहेस. 'तयारी' म्हणतोयस. कसली तयारी? तू स्वतः आणखी तुला दया आली म्हणून जाहीर करतोयस. तुझे शत्रू मानतील काय? अर्जुनाला दया आली म्हणून अर्जुन युद्ध सोडून निघून गेला असे तुझे शत्रू म्हणतील का? तुझे शत्रू असाच प्रचार करणार, की अर्जुनाला भीती वाटली म्हणून अर्जुन युद्ध सोडून गेला. आमच्याकडे जे मोठे मोठे वीर आहेत त्यांच्या भीतीने तो निघून गेला. म्हणजे स्वकर्तव्य भ्रष्ट तू झालास. त्यामुळे तुझ्याकडे

ज्ञानही पुरते नाही आणि अहंकार तुझा पुढे आलेला आहे. त्या अहंकारामुळे आपले कर्तव्य कर्म कशाकरता केले पाहिजे हे ज्ञानही तुझ्या बुद्धीतले गेले आहे. अविवेक निर्माण झालेला आहे. कर्मही गेले आणि शेवटी तुझे नावही राहणार नाही. नामशेष तू होशील. कीर्तीही राहणार नाही. हिंसात्मक कर्माचा क्षत्रियाने विचार करायचा नाहीये. तरच युद्धात त्याचा देह पडल्यावर त्याला उत्तम लोकाची प्राप्ती होते. योगाभ्यास करणारा, आत्मानात्मविवेक संपन्न अशा प्रकारचा संन्यासी महात्मा हा सूर्य मंडलद्वाराने पुढे जातो. पुन्हा येत नाही मृत्युलोकावर. आणि त्याच्याच बरोबरीचा (योग्यतेचा) रणांगणावरील योद्धा आहे. युद्ध करताना देह पडला तरी त्याला त्याची कल्पना येत नाही. तोही सूर्य मंडलातून पलीकडे जातो. आनुवंशिक हे सगळे धर्म आहेत. वर्णरचना वैदिक धर्मामध्ये याकरता केली आहे. ब्राह्मणांचे धर्म आनुवंशिक आहेत, क्षत्रियांचे आहेत, वैश्यांचे आहेत, शूद्रांचे आहेत. त्याला तसेच वाटणार. मी असे हे केले पाहिजे. आपले काय कर्तव्य आहे याचे ज्ञानही पूर्ण पाहिजे, श्रद्धा पाहिजे आणि त्याप्रमाणे आचरण पाहिजे. अशी स्थिती जोपर्यंत आहे तोपर्यंत सर्व व्यवस्थित चालणार. बुद्धीने काहीही विचार करायचा, सगळे खोटे आहे, कोणी तरी रचलेले आहे, कोणी तरी अमुक केलेले आहे, तमुक केलेले आहे. हेच आणखी विकल्प मनात यायला लागले. तर स्वतःचे कर्तव्य कोणते आहे, त्याचे किती महत्त्व आहे, त्याचे फळ किती आहे तेही जाणार आणि त्याच्या बुद्धीतील ज्ञानही जाणार.

युद्धाच्या दहाव्या दिवशी सबंध शरीरावर अर्जुनाचे बाण लागून भीष्माचार्य खाली पडले. बाणावरच निजलेले आहेत. दुर्योधनादिकांनी गाद्या वगैरे आणल्या म्हणे. ते म्हणाले, 'या शरशय्येवरच मी पडणार आहे.' केवढी तितीक्षा असेल! क्षत्रियाजवळ किती तितीक्षा असली पाहिजे! बाणवर्षात होतोय, जखमा होताहेत तरीसुद्धा उत्साहभंग नाही. भीतीचा लेशसुद्धा मनामध्ये नाही. प्राण जाईल याचीही कल्पना नाही. हे आनुवंशिक आहे. परंपरेने हे सगळे गुणधर्म येतात. हा विभाग त्याकरता केलेला आहे आणि त्या

दृष्टीने सर्वांचाही उत्कर्ष आहे.

ऋषी मंडळींनी बाजूलाच राहिले पाहिजे. युद्ध त्यांनी स्वतः करायचे नाही. युद्धकला शिकवायची. ज्ञान त्यांच्याजवळ आहे. त्यांच्याजवळील शस्त्र-अस्त्र-विद्या त्यांनी द्याव्यात. ज्ञानशक्ती सर्वांना देऊन आणखी सर्व समर्थ करावेत आणि त्यांच्याकडून सर्व कार्य करून घ्यावे.

क्षत्रियाने युद्ध केलेच पाहिजे. 'अहिंसा परमो धर्मः' हे क्षत्रियाने म्हणून उपयोग नाही. तो अहिंसेचा उपदेश झाल्यामुळे क्षत्रियांची बुद्धी तशीच बनत गेली आणि त्यांच्या आनुवंशिक गुणांचा विसर पडला. नियामक कोणीच राहिला नाही. परशुरामांना हातामध्ये त्याकरता शस्त्र घ्यावे लागले ना! क्षत्रिय वीर आपल्या शक्तीचा दुरुपयोग करायला लागले. ही काय बुद्धी वाढली म्हणायची?

तर भीष्माचार्यांनी त्यावेळी शरशय्येवर पडले असता धर्मराजाला सर्व उपदेश केला. धर्मराजासारख्या धर्मशील महात्म्याला त्यांनी सगळे ज्ञान दिले. आणि त्याची बुद्धी स्थिर केलेली आहे. अर्जुनाची बुद्धी भगवंतांनी स्थिर केली. त्याचे अज्ञान दूर केले, मोह दूर केला.

मी अमर व्हावे या हेतूने हे सगळे दैत्य तपश्चर्या करतात. ती तपश्चर्या आणि भीष्माचार्यांची तपश्चर्या यात केवढा फरक आहे? भीष्माचार्य शुद्ध आचरण करून, निर्वासन मनाने तपश्चर्या करतात. पित्याची सेवा करणे, पित्याची इच्छा पूर्ण करणे ही ईश्वराची आज्ञा आहे, ते माझे कर्तव्य आहे. त्याचे मला फल मिळाले पाहिजे ही त्यांच्या मनात वासनाच नाहीये. आधीपासूनच शुद्धबुद्धीने धर्माचरण चालले आहे. त्यांचे लग्न न झाल्याने त्यांनी अग्निहोत्र कुठले घ्यायचे किंवा यज्ञयाग कसे करायचे?

तपश्चर्या करायची, काही तरी मागणे मागायचे तर देहाभिमान कायम राहील असाच वर मागून घ्यायचा का? काय उपयोग आहे? तपश्चर्येचा काय उपयोग झाला? 'मी अमर व्हायचे,' याचा अर्थ देहालाच तो 'मी' समजतोय. तो देह कायम राहिला पाहिजे असे समजतोय. तो देह कायम कसा राहील?

तपश्चर्येचे फल म्हणून काही काळ राहील. इतरांपेक्षा अधिक काळ राहिला तरी शेवटी त्याचा विनाश आहे. आणि मग परमेश्वराला अवतार धारण करून अशा असुरी प्रवृत्तीच्या लोकांचा विनाश करावा लागतो. लोकांचा बुद्धिभेद किती होईल ना! दैत्यांना आदर्श मानणारे लोक काय निर्माण होणार नाहीत किंवा जगात नाहीत का ? अमुक दैत्याने उपासना केली, ब्रह्मदेवांकडून वर मिळवला, स्वर्गलोक जिंकून घेतला, असे वागायला हरकत नाही. देहाभिमानसुद्धा मोठा गुण आहे. देह कायम राहिला पाहिजे असेसुद्धा देवाजवळ मागून घ्यायला हरकत नाही, असे वाटणार नाही कोणाला ? म्हणजे सगळ्याच लोकांची ही बुद्धी कायम ठेवायची का ? 'मी अमर व्हावे,' असा वर मागणे म्हणजे, 'माझा देहतादात्म्यभाव कायम राहावा' असे वाटणे आहे. हा आहे विचार मनात ? अशा लोकांना समाजात प्रतिष्ठा मिळणे चांगले नाही. 'विनाशायच दुष्कृताम्' हे त्याकरता आहे. हे चांगले नाही. तपश्चर्या करून काही काल अधर्माने वागूनसुद्धा तुम्हाला पुष्कळ संपत्ती मिळेल, सत्ता मिळाली असे वाटेल. पण नाही.

ज्ञानापर्यंत पोहोचणे, ईश्वरापर्यंत येणे अशा असुरी प्रवृत्तीच्या लोकांना शक्यच नाहीये. सगळी तपश्चर्या मातीत गेली. अनेक जन्म चालत आलेले देहतादात्म्य अधिक बळकट झालेले आहे. काय उपयोग ?

म्हणून भगवतीने अवतार धारण केलेला आहे. ऋषी मंडळींचा पक्षपात असा नाहीये यात. ते देहापासून बाजूला होण्याचा प्रयत्न करताहेत. अनेक जन्मांचे जे दोष आहेत त्यामुळे देहतादात्म्य जास्ती जास्ती होतंय. वनामध्ये गेले म्हणजे देहापासून बाजूला होता येते असे नाही. घरामध्ये राहूनही प्रयत्न करणारे अशा प्रकारचे महात्मे आहेत. अहंता नाही, ममता नाही ज्यांना, अशा प्रकारचे संत महात्मे देहापासून बाजूला राहू शकतात. ही ईश्वराची त्यांच्यावर केवढी कृपा आहे! बुद्धिरूपाने ती जगदंबा अशा ज्ञानी महात्म्यांच्याजवळ राहिलेली आहे ना! अभिमान घालवण्यासाठी त्यांना वेगळी तपश्चर्या करावी लागत नाही. पूर्ण शक्तिसंपन्न अशा प्रकारची जगदंबा आहे,

असा पक्का विश्वास, पक्की श्रद्धा जर उत्पन्न झाली तर सगळे मिळालेच. रामांची शक्ती कमी आहे, असे वाटल्याबरोबर रावण सीतादेवींना घेऊन गेलेला आहे. बिभीषणाची बुद्धी चांगली आहे. रावणाचा भाऊ आहे. रावण, कुंभकर्ण देहात्मभावामध्येच गुंतून राहिले आहेत. तपश्चर्या करून त्यांनी तेच पुन्हा मागून घेतले. रावणाने राज्य, संपत्ती, सत्ता, राज्य मागून घेतले याचा अर्थ देहतादात्म्य पक्के करणे आहे.

पण बिभीषणाच्या मनात मात्र रामचंद्रांच्या शक्तीबद्दल पूर्ण विश्वास आहे. म्हणून त्याने रावणाला सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे. बिभीषणाचे रामचंद्रांनी संरक्षण करायचे ठरवले. तो शरण आलेला आहे. जरी शरण आला नसता तरी रावणाच्या नंतर राज्य त्यालाच मिळाले असते. त्याने युद्धामध्ये भाग घेतला नव्हता पण लंकेत राहाणे चांगले नाही असे त्याला वाटले. इंद्रजिताने बिभीषणाची निंदा केली. तो म्हणाला, "जेव्हा देवांना जिंकून आम्ही संपत्ती आणली त्यावेळी त्यातला भाग तू घेतलास ना? आणि आता रावणाला उपदेश करतोस? मग तेव्हा का भाग घेतलास? आता योग्य अयोग्यतेच्या गोष्टी रावणाजवळ करतोस, मग त्या वेळेला तुझी ही बुद्धी कुठे गेली होती? तेव्हा का म्हणाला नाहीस, तुला ते द्रव्य नको म्हणून?"

परंतु रामांचे चरित्र नंतर ऐकून बिभीषणाच्या मनात रामांच्याबद्दल श्रद्धा निर्माण झाली. आस्तिक्य बुद्धी निर्माण होणे, संसारातील वासना, आसक्ती कमी कमी होऊन ईश्वराकडे, धर्माचरणाकडे मन लागणे ही खरी भक्ती आहे. म्हणजे देहापासून मन बाजूला झाले आहे. त्याकरता ईश्वराबद्दल फार मोठी आस्तिक्यबुद्धी निर्माण झाली पाहिजे. सीतादेवींची आस्तिक्यबुद्धी कमी पडली. त्याचेही समर्थन केलेले आहे. शत्रूच्या मनामध्ये देखील विचार येणार नाही असे, आत्यंतिक प्रेम ज्या ठिकाणी आहे तिथे विचार येतात. हा एक त्यांनी मार्ग सांगितला आहे. रामांच्या शक्तीबद्दलचा विश्वास तिच्या मनातला का गेला? रामावर फार प्रेम आहे म्हणून गेला. हे कारण सांगतात.

मनामध्ये रामांबद्दल विश्वास नाही असे नाही. अत्यंत विश्वास आणि

प्रेम आहे. वनात जाण्याची आज्ञा झाली तेव्हा रामचंद्र तिला म्हणाले, "मी आणि लक्ष्मण आता वनात जाणार आहे. तुला हवे तर माहेरी जाऊन राहा किंवा इथे राहून सासू-सासऱ्यांची सेवा कर." ती म्हणाली, "मी माहेरीही जाणार नाही आणि इथेही राहणार नाही. तुमच्या बरोबर मी वनात येणार आहे." रामचंद्र म्हणाले, "तिथे वनात काय नोकर चाकर आहेत का? तुला राजैश्वर्यात राहायची सवय झालेली आहे. तिथे तुलाच सर्व कामे करावी लागतील, वेळ प्रसंगी संकटांना तोंड द्यावे लागेल." ती म्हणाली, "असू दे. संकटाचा प्रसंग आला तरी तुमच्या सान्निध्यामध्ये मला राहता येईल. तुमच्या संगतीचे फार महात्म्य आहे."

सीतादेवीच्या मनातील पतिप्रेम कमी झालेले नाही. हे खरं त्याचं उत्तर आहे. पण बाह्य दृष्टीने हे झाल्याबरोबर तिला शासन मिळालेले आहे. रामांच्याबद्दल अविश्वास! लक्ष्मणाबद्दल अविश्वास! पण तो अविश्वास का निर्माण झाला? आपल्या स्वतःच्या शरीरावर नसेल एवढं उत्कट प्रेम रामांवर आहे. तिला पश्चात्ताप झाला तो त्या प्रेमामुळे. 'कशाला आपण सांगितले त्या मृगाचे कातडे आणायला.' असं वाटलं.

'यथा देहे तथा देवे' ही भक्तीची व्याख्या आहे. देहावर जितके प्रेम आहे, देहतादात्म्य जेवढे दृढ आहे, ईश्वरशक्तीसुद्धा तशीच आहे. आपल्या देहाबद्दल जेवढे प्रेम वाटते, तेवढे प्रेम देवाबद्दल निर्माण झाले तर पूर्ण विश्वास झाला.

सीतादेवींच्या मनामध्ये अत्यंत प्रेम आहे रामांबद्दल. रामांच्या शक्तीबद्दल तिला खात्री आहे. परंतु आवाज त्यांच्यासारखा ऐकलेला आहे. दैत्यांनी आणखी तेच काम केले. प्रेमामुळे तो आवाज ऐकल्यावर, रामांच्यावर संकट आले अशी भावना झाली. त्यांनी सुरक्षित राहावे, त्यांच्यावर संकट येऊ नये असे निस्सीम प्रेमाने वाटल्यामुळे तिच्या मनामध्ये शंका आली. इथे संशय हा दोष ठरत नाहीये. असे त्याचे समाधान आहे.

परंतु बाह्यदृष्टीने लक्ष्मणाचा विश्वास मोठा आहे. राम कधीही

संकटात सापडणार नाही. ईश्वराची शक्ती कधीही कमी होणारी नाहीये. परिपूर्ण शक्ती आहे हा विश्वास ज्याच्या मनामध्ये आहे, तो निर्भय आहे. कोणीही मारू शकणार नाही देवाच्या भक्ताला.

ऋषी मंडळींच्या बुद्धीतील ज्ञान दैत्याने तपश्चर्या केली म्हणून गेले. मग दैत्यांपेक्षा ऋषींची तपश्चर्या कमी आहे असं म्हणायचं का? काल आहे. काल हा सुध्दा सृष्टीला एक कारण आहे. अधर्माची बुद्धी, काही कालामध्ये वाढत असते. धर्म बुद्धीही वाढत असते. काही काल धर्माला अनुकूल आहे. काही काल अधर्माला अनुकूल आहे. अधर्माचरणाचेही फल देणारा तो काल आहे. धर्माचरणाचेही फल देणारा तोच काल आहे. ऋषी मंडळींनी धर्माचरण केले ते फुकट गेले असा अर्थ नाहीये. ते धर्माचरण अत्यंत शुध्द धर्माचरण आहे. त्यांनी देहतादात्म्य सोडून धर्माचरण केले आहे. त्याशिवाय धर्माचरण होणार नाही. परलोक आहे, इहलोकाचा त्याग आपल्याला केव्हा तरी करायचाच आहे, मग ' देह म्हणजे मी नाही. हा देह इथेच राहाणार आहे. हा देह सोडून आणखी दुसरीकडे कुठे तरी जाणे मला अत्यंत आवश्यक आहे. मला गेलेच पाहिजे. जावे लागेल. तिथूनही आणखी पुढे प्रवास करावयाचा आहे.' हे जाणून तिथे मला सुख मिळावे यासाठी केलेला प्रयत्न दीर्घ दृष्टीचा नाही का ? शास्त्र हे दीर्घदृष्टी दाखवणारे आहे. तात्कालिक काही सुख मिळाले तर ते मिळवावे, वाढवावे, नीतिअनीतीचा काही विचार करण्याची जरूर नाही. हे विचार तात्कालिक सुखाकरता आहेत. दीर्घ दृष्टी नाहीये. पुढे आपले कसे होणार? शरीर हे साधन आहे. धन हे साधन आहे. हे विसरून जातो आपण. हे साध्य आहे अशीच आमची बुद्धी झालीये. धनच पुष्कळ पाहिजे. शरीरच कायम राहिले पाहिजे. शरीर, धन यांचा उपयोग आपल्याला पुढच्या सुखासाठी करून घ्यायचाय. हा विचारच नाही. म्हणून ऋषी मंडळी देहतादात्म्य सोडून धर्माचरण करतात. धर्माचरण करणाऱ्या मनुष्याची देहतादात्म्य बुद्धी आणि धर्मापासून बाजूला राहणाऱ्या नेहमी अधर्माचरण करणाऱ्याची बुद्धी, याचा विचार केला पाहिजे. देहतादात्म्य वाढवून अधर्माचरण करणारा मनुष्य भित्रा

असतो. आपल्या कर्तव्य कर्माची जाणीव असणारे क्षत्रिय, देहतादात्म्य कमी झाल्याने, युद्ध भूमीवर जाताहेत. देह पडला तरी हरकत नाही, ही निर्भयता त्यांच्याजवळ आहे.

भगवान् सांगताहेत – उद्धवजी, ब्राह्मणाचे धैर्य इतके मोठे पाहिजे की देवेंद्राचे पद मिळाले तरी ते क्षुद्र आहे, त्यात काही अर्थ नाहीये असे वाटले पाहिजे. केवळ देहतादात्म्य घेऊन काय मिळणार? सर्व संकटे , दुःख सोसण्याची तयारी पाहिजे. तरच धर्माचरण शुद्ध होईल. कोणाजवळही मागायचे नाही. ईश्वर देणारा समर्थ आहे. सर्वांना जन्माला त्याने घातलेले आहे. संरक्षणाची जबाबदारीही त्याची आहे. तो संरक्षण करू शकतो. प्रारब्धाने मिळेल असा अर्थ नाही. ईश्वराच्या कृपेने मिळेल. तो उपाशी ठेवणार नाही. हे धैर्य केवढे मोठे आहे ! हे धैर्य, देह तादात्म्यबुद्धी असणाऱ्याच्या मनात येईल कसे? आपले कसे होईल ? घरदार राहिले पाहिजे. नोकर चाकर पाहिजेत.अन्न, वस्त्र, दागदागिने यांचा संग्रह मारुतीच्या शेपटाप्रमाणे कितीही वाढला तरी संपतच नाही. पाहिजेच. शुद्ध बुद्धीने जर खरे धर्माचरण घडले तर या वासना कमी होतात. ही जगदंबेची कृपा त्या ऋषी मंडळींच्यावर आहे. त्यांनी केलेले धर्माचरण फुकट जाणार नाही.

त्याचप्रमाणे अनंत जीव जगामध्ये आहेत – चांगलेही आहेत – वाईटही आहेत. दैत्य आहेत ते आपल्या आपल्या बुद्धीप्रमाणे कार्य करणार. त्यांची बुद्धी देहतादात्म्य ठेवण्यापुरतीच आहे. आणि याच देहाला म्हणजे आपल्याला सगळी सुखं मिळाली पाहिजेत, असे त्यांना वाटते. सर्व कार्य कालरूपाने परमात्मा करतो. संकटे आली तरीसुद्धा जातात. अनुकूल परिस्थिती आली तरीसुद्धा जाणार. सुख आले तरी जाणार आहे. जाणे, टिकाऊ नसणे हे सुखाच्याही ठिकाणी आहे आणि दुःखाच्या ठिकाणीही आहे. 'सुख दुःखे समेकृत्वा' याचा अर्थ काय ? दुःखाच्या वेळेससुद्धा सुख मानायचे असा अर्थ याचा घ्यायचा का ? किंवा सुखाच्या वेळेस मी दुःखात आहे असे दाखवायचे काय ?

'सम' याचा अर्थ असा आहे की, सुख मिळालंय आज त्याच्यामध्ये आनंद मानून उपयोग नाही. जाणार आहे. टिकाऊ नाही. भगवान् सांगताहेत –

**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्ण – सुखदुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥**

अनित्य आहे. सुखही जाणारे आहे. मला सुख मिळाले. म्हणजे अहंकारादिक विकार वाढणार आणि ते वाढले म्हणजे रागद्वेष वाढतात. ते टिकविण्याकरता पुन्हा प्रयत्न करायचा. प्रयत्न करूनही सुख जाणारच. ज्याला उत्पत्ती आहे त्याचा नाश ठरलेला आहे.

तसेच दुःखही. दुःखाच्या वेळेला उद्वेग कशाला करायचा? तेही जाणारे आहे?

तेव्हा सुख हे जाणारे आहे याची जाणीव असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी इच्छा उत्पन्न होत नाही. तसेच दुःख आल्यावर सुद्धा हे टिकणार नाही, जाणार आहे या जाणिवेने त्यांच्या मनावर काहीही परिणाम होत नाही. मग काय करायचे? फक्त परमेश्वराचे स्मरण करायचे, चिंतन करायचे, मनाला ती सवय लावायची आहे. भगवत भक्ती, प्रेम अधिकाधिक वाढले पाहिजे. तेव्हा दुःख आले असता जर परमेश्वराचे स्मरण घडत असेल, तर ते दुःख राहिले तर काय हरकत आहे? दुःखात जर परमेश्वराचे प्रेम अधिक वाढत असेल, स्मरण अधिक घडत असेल तर दुःखही राहावे आणि वाढावी म्हणतात. जरी त्यांच्या दृष्टीने 'समे कृत्वा' सुखही जाणारे आहे आणि दुःखही जाणारे असले तरी! पण ईश्वरस्मरण अखंड राहिले पाहिजे. त्या स्मरणामुळे सद्‌गुणांची वृद्धी होते. ज्ञान आहे, वैराग्य आहे. चित्तशुद्ध होत जातंय ईश्वर स्मरणाने. हे अनंत गुण ज्या ईश्वर स्मरणाने प्राप्त होणारे आहेत, ते स्मरण आपल्याला अखंड राहावे याकरता त्यांचा प्रयत्न चाललाय. दुःख आले तरी दूर करण्याचा प्रयत्न नाही, सुख मिळाले तरीसुद्धा ते टिकविण्याचा प्रयत्न नाही. काही नाही. ईश्वरस्मरण अखंड राहावे याकरता प्रयत्न आहे. हा एक बुद्धीचा प्रकार आहे. अशी बुद्धी असणारी ऋषी मंडळी त्या वेळेला होती. त्यांचे कर्माचरण या बुद्धीने

चालले होते. काही मिळवण्याच्यासाठी नाही. देहबुद्धी कमी कमी करताहेत. धैर्यशील आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले धर्माचरण फुकट गेले नाही. पांडवांनी केलेले धर्माचरण फुकट गेले नाही. दुर्योधनाने राज्य कपटाने, अधर्माने मिळविले असे म्हणू आपण. म्हणजे अधर्माने राज्य मिळते अशी समजूत करून घ्यायला हरकत नाही. तशा बुद्धीचे जे लोक असतील त्यांनी ! पण ते टिकले का ? या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही. धर्माचे राज्य गेले तरी त्याला ते मिळाले. पण त्याला त्याची इच्छा नाहीये. नको. लढाई करू नका, असेच धर्मराज सांगत होते. राज्यासाठी लढाई नको, म्हणून मध्यस्थी करण्यासाठी त्यांनी श्रीकृष्णांना कौरवांकडे पाठविले. काय, आम्हाला एकेकाला एकेक गाव अशी चार - पाच गावे दिलीत तरी पुरे, असा निरोप पाठविला. अरण्यात नाही का राहिलो आम्ही बारा वर्षे ! आनंदात आमचे दिवस गेले. राज्य घेऊन काय करायचंय ? उलट जास्ती त्रास आहे. राजधर्माप्रमाणे ज्याला वागायचंय त्याला राज्य करणे म्हणजे फार मोठी जबाबदारी आहे. राजधर्माप्रमाणे माझे वागणे झाले पाहिजे. ते तसे होतेय की नाही या विचाराने तो घाबरून जातो.

देहाभिमान उपयोगी नाही. अहंकार उपयोगी नाही. स्त्री, पुत्र इत्यादिकांची ममता उपयोगी नाही. लोक काय म्हणतील इकडेही लक्ष देऊन उपयोगी नाही. रामांनी जानकीचा त्याग केला. हो, केला. "राजधर्माप्रमाणे मला वागायचंय. राजधर्म माझ्या दृष्टीपुढे मुख्य आहे." असे वागणारे जे आहेत त्यांना ईश्वराने शुद्ध बुद्धी दिली आहे. धर्माचरण करून देहापासून ते बाजूला झालेले आहेत. त्याशिवाय धर्माचरण क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक हा आणखी अधिकाधिक पक्का होऊन जातो. शरीरतादात्म्य होणार. आणि त्या धर्माचरणाने कमी कमी होत जाते. ब्रह्मज्ञान झाल्यानंतर देहतादात्म्य जाते म्हणतात.

आज देहात्मबुद्धी जितकी पक्की आहे तितके ब्रह्मज्ञान दृढ झाल्यावर देहतादात्म्य जाते असे शास्त्रकार सांगतात. देहतादात्म्य पुष्कळ कमी होते. प्रारब्धकर्म येत असेल मध्ये मध्ये. ब्रह्मज्ञानाशिवाय पूर्ण मनोनाश कसा होणार ? ज्यांच्याकडून शुद्ध बुद्धीने धर्माचरण घडले आहे त्याचे फल म्हणजे

ते जगदंबेची उपासना करू लागले आहेत. निराश झाले नाहीत. आणि तशी प्रार्थना केल्यामुळे जगदंबेने त्यांना दर्शन दिले. त्यांच्यावरचे संकट दूर केले. त्यांचे संरक्षण करण्याचे असल्यामुळे दुर्गम दैत्याचा नाश करायचे कार्य आता ती करणार आहे.

प्रथमतः या सर्व ऋषींच्याभोवती तिने संरक्षणासाठी चक्राची व्यवस्था केली. तर अशा रीतीने धर्माचरणाचे फल म्हणून त्या ऋषी मंडळींकडून जगदंबेची अखंड भक्ती चालू राहिली आहे. त्यामुळे भक्तांचे संरक्षण करण्याकरता जगदंबेचा अवतार झाला आहे. तिने ही संरक्षण व्यवस्था केल्याचे पाहिल्यावर तो दुर्गम दैत्य सैन्य घेऊन आला. वास्तविक याचा कार्यभाग आधीच साधलेला आहे. असुरी प्रकृतीच्या लोकांना नाश करण्यातच समाधान वाटते. आपले सर्व सैन्य घेऊन दुर्गम दैत्य देवीवर चालून आलेला आहे. व्यास महर्षि त्याचे वर्णन करताहेत.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ॥**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

वेदव्यास महर्षींनी अनेक प्रकारची पुराणे केली. शिवमहात्म्य सांगणारे शिवपुराण, विष्णूंचे महात्म्य सांगणारे विष्णुपुराण वगैरे. त्या देवतांनी कोणकोणते अवतार धारण केले आणि ते अवतार धारण करायला लावणारे भक्त या दोघांचीही चरित्रे सांगितली आहेत. सर्वांनी श्रवण करावे असे ईश्वराचे चरित्र आहेच आहे. त्यामुळे प्रेम निर्माण होते.

परंतु ईश्वरभक्तांचीही चरित्रे वेदव्यासांनी वर्णन केलेली आहेत. देवी भागवत त्यांनी स्वतःच जनमेजय राजाला सांगितले आहे. त्याच्यामध्ये देवीचे अवतार वर्णन केले आहेत. जगामध्ये अशी विविधता ईश्वराने सुद्धा धारण केलेली आहे. भक्तांच्या मनात प्रेम आहे पण प्रेमाचे प्रतीक मात्र प्रत्येक भक्ताचे वेगवेगळे आहे. भगवंतांची गोपींच्या बरोबर रासक्रीडा चालली असताना गोपींना थोडासा अहंकार झाला, की 'सर्वही जगामध्ये आम्ही श्रेष्ठ आहोत. भगवान गोपालकृष्ण आमच्या ताब्यात आहेत.' असा थोडासा अहंकार उत्पन्न झाल्यावर, शुकाचार्यांनी सांगितले, भगवान् एकदम गुप्त झाले.

तो अहंकार गेला पाहिजे. ईश्वराच्या सान्निध्यात जायचे म्हणजे

समीपता मुक्तीच आहे. सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्य असे मुक्तीचेही शास्त्रकारांनी भेद सांगितले आहेत. उपासना करणारे भक्त त्या उपास्य देवतेच्या लोकामध्ये जाऊन राहू शकतील. तिथेही रोज दर्शन घडायचे नाही. पण वास्तव्य त्या लोकामध्ये होते. उदा. वैकुंठ लोक, कैलास पर्वत. देवीलोकामध्ये मणिद्वीप पर्वतावर भुवनेश्वरीचे वास्तव्य आहे. पण त्या लोकामध्ये राहिले तरी पुष्कळ कल्याण आहे ना! मनाला समाधान आहे. केव्हा तरी दर्शनाला जाता येण्याचा संभव आहे.

पण त्याच्याहीपेक्षा समीपता ही एक महत्त्वाची मुक्ती आहे. देवाच्या समीप राहणे. ईश्वराच्या समीप राहायला मिळणे हे वास्तविक भाग्य आहे. उपनिषदामध्ये ईश्वर अत्यंत दूर आहे आणि अत्यंत समीप आहे असे वर्णन आले आहे. 'तद्दूरे तदन्तिके' दूरही आहे व जवळही आहे म्हणजे काय? परस्पर विरोध आहे की नाही! असे वाटते. पण ज्ञानेश्वर महाराज खुलासा करतात –

'जै जगा धाकुटे होईजे
तै जवळीक माझी!'

जवळही मी आहे पण कोणाला? जो जगाला नम्र झालेला आहे, निरहंकार वृत्ती ज्याची बनलेली आहे. प्रयत्न करावा लागत नाही. निरहंकार वृत्ती ज्यांची बनलेली आहे त्यांना ईश्वर जवळ आहे. ती समीपता मुक्ती मिळू शकते. जीवात्मा ईश्वराच्या जवळ राहू शकतो. पण या समीपतेमुळे त्या गोपींसारखा एखादे वेळेस अहंकार उत्पन्न होण्याचा संभव आहे.

जयविजयांच्या हातून संतांचा, भक्तांचा अपमान झाला. अमर्यादा त्यांनी केली त्यामुळे त्यांना पुन्हा मृत्युलोकात यावे लागले. समीपता आहे. सरूपताही आहे त्यांना. तसा गोपींना आणखी अभिमान उत्पन्न झाला. ईश्वराच्या भक्तीने अहंकार दूर होतो.

नामदेवांनी प्रार्थना मुद्दाम केली आणि त्यात हा दोष व्यक्त केला आहे.

**अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझीया विष्णुदासा भाविकासी।**

नामदेवांना विष्णुदासांच्याबद्दल इतकी आत्मीयता वाटते की त्यांचे अकल्याण होऊ नये. अहंकाराचा वाराही लागू नये. या अहंकारामुळे ईश्वर दूर जातो ना। ईश्वराच्या जवळ जाण्यासाठी त्यांना किती जन्म प्रयत्न करावा लागला असेल! पण विसरून गेला. दूर होणे याचा अर्थ ईश्वर लांब गेला असे नाही. गोपालकृष्ण गुप्त झाले फक्त. 'काय गोपी बोलताहेत? गोपींची मनःस्थिती कशी होती? त्यांना पश्चात्ताप झालेला आहे काय?' हे सगळं ते गुप्त राहून पहात होते. म्हणजे प्रपंचात जशी स्थिती होते तशीच जवळ जवळ स्थिती या गोपींची झाली. ईश्वर दूर गेलेला आहे. परंतु त्यांच्या अंतःकरणामध्ये जो काही प्रेमाचा उद्रेक आहे त्यामुळे त्यांना नंतर दुःख झाले, आणखी ते ज्ञान त्यांना उत्पन्न झाले. वियोगदुःख हे फार मोठे आहे. अत्यंत प्रेमी मनुष्याचा वियोग झाला असताना फार दुःख होते. परमात्म्याचा वियोग झाला आपल्याला, काय दुर्दैव आपलं? परंतु त्यांनी परमात्म्याची स्तुती करीत असताना, 'गोपालकृष्णा' म्हणून हाक मारली.

**न खलु गोपिकानन्दनो भवानखिल - देहिनामन्तरात्मदृक्।**
**विखनसार्थितो विश्वगुप्तये सख उदेयिवान् सात्वतां कुले ॥ ४.३१ ॥**

गोपालकृष्णांच्याबद्दल काय समजूत होती गोपींची. केवळ प्रेम आहे असे नव्हे तर त्याच्या पुढे ज्ञानही आहे. ईश्वरस्वरूप काय आहे? गोपालकृष्णांच्याबद्दल निष्ठा मोठी आहे. पण अहंकार आड आलेला आहे.

**ईश्वरः सर्व भूतांना हृद्देशेऽर्जुनतिष्ठति ।**

जो सिद्धांत भगवान् सांगताहेत तोच सिद्धांत गोपी सांगताहेत. सर्वही जीवांच्या हृदयामध्ये आपण आहात. आपण सर्वसाक्षी आहात. सर्व द्रष्टे आपण आहात. म्हणून सर्वज्ञ आहात.

ईश्वर सर्वज्ञ का मानायचा? त्याचे स्थान असे आहे. सर्वांच्या बुद्धीजवळ तो आहे. तो कसा राहतो, काय राहतो, शक्य आहे का अशक्य आहे; आमच्या आमच्या शक्तीप्रमाणे आम्ही वाटेल ते बोलावं, समजून घ्यावं, आणि दूरच रहावं. पण तो सर्वज्ञ आहे त्याला युक्तीची जरुरी नाही. ईश्वर

आहे आणि तो सर्वज्ञ आहे. सद्गुरु हे सर्वज्ञ आहेत ही जर भावना झाली तर त्या सद्गुरूंच्यापासूनच सर्व आणखी कल्याण होते आहे. ईश्वराकडून कल्याण होते आहे.

तर भगवंतांनी स्वतः जो सिद्धांत सांगितला तो या गोपींना माहिती आहे. कुठं शिकायला गेल्या होत्या ? अवतार झालेला आहे, हे या गोपींना कसं समजलं ? त्या अवताराच्या मूल स्वरूपापर्यंत त्यांचे अंतःकरण जाऊन पोहोचलेलं आहे. अखिल देहिनामन्तरात्मदृक्, ईश्वराचे अंतर्यामी म्हणून एक स्वरूप सांगितले आहे.

**पृथिव्यां तिष्ठन् यो यमयति महीं वेद न धरा ।**
**यमित्यादौ वेदो वदति जगतामीशममलम् ।**
**नियंतारं ध्येयं मुनिसुरनृणां मोक्षदमसौ ।**
**शरण्यौ लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षि विषयः ।।४।।**
**महेन्द्रादिर्देवो जयति दितिजान् यस्य बलतो ।**
**न कस्य स्वातंत्र्यं क्वचिदपि कृतौ यत्कृतिमृते ।**
**कवित्वादेर्गर्वं परिहरति योऽसौ विजयिनः ।**
**शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषयः ।।५।।**

आचार्य महाराजांनी केलेली ही स्तुती आहे. कृष्णाष्टक आहे. गोपालकृष्ण मला डोळ्यांनी दिसावे अशी इच्छा आहे. आणि स्तुती काय करताय ? 'अंतर्यामी' म्हणून स्तुती करताहेत. जो अंतर्यामी आहे तो डोळ्यांनी दिसेल कसा ? म्हणजे अंतर्यामीच गोपालकृष्ण आहेत.

गोपींचीही भावना तीच आहे. जो अंतर्यामी भगवान आहे तोच कृष्णावतार झालेला आहे. आणि या भाग्याला आम्ही वंचित झालो. ब्रह्मदेवांनी आपली प्रार्थना केली, जगाची व्यवस्था बिघडलेली आहे, पृथ्वीला भार झालेला आहे, पृथ्वी दुःखी आहे. संकट आल्यानंतर दुःख आपल्याला होते, पण संकट दूर करणारा कोणीतरी आहे ही भावना आपली होत नाही. पृथ्वीला अंतर्यामीचे ज्ञान नाहीये. प्रत्येकाच्या अंतर्यामी परमात्मा आहे. इतका जवळ आहे. पण तो अहंकार मध्ये असल्यामुळे आपले जे परमात्मरूप आहे त्याचे ज्ञान

आपल्याला होत नाही. मी करतो, बोलतो, खातो ह्याला जो आपण आत्मा समजतो तो शुद्ध अहम् नाहीये. अशुद्धालाच मी समजून आपण बसलोय. अहंकार तरी चांगला पाहिजे ना! देहापासून 'अहम् अहम्' असे आम्ही समजून घेतलेले आहे. एका ठिकाणीसुद्धा अहम् काही दृढ नाहीये. अशा अशुद्ध अहम् मध्ये सापडलेला जीवात्मा इतक्या जवळ असलेल्या परमात्म्याला कसा समजावून घेणार? समीप असूनही समजू शकत नाहीये. पण गोपींना ते समजलंय. त्या म्हणाल्या, 'अंतर्यामी असलेला परमात्मा आपण आहात.' अशीही प्रार्थना केली. पुष्कळ सिद्धांत मांडलेले आहेत. आणि कृष्णदर्शनासाठी त्या शोकाकुल झाल्या आहेत. कृष्णांनी आम्हाला दर्शन द्यावे. अंतर्यामी तुम्ही आहात. विश्व उत्पन्न करणारे, पालन करणारे आणि संहार करणारे तुम्ही आहात. हे सगळे स्वरूप गोपींना माहीत आहे. माहीत असून त्या कृष्णाचे दर्शन व्हावे अशी इच्छा करताहेत. कृष्णस्वरूप तुम्ही धारण केलंत. मग नेत्रांना आमच्या काही समाधान नको? नेत्रासमोर येणारे आपले रूप सोडून अंतर्यामीकडे जायचे आम्ही? डोळे बंद करायचे आम्ही? नेत्रांनी ते सुख भोगू द्या.

**सर्व सुखाचे आगरू।**
**बाप रखुमा देवीवरू॥**

रखुमादेवीवर जे साकार स्वरूप आहे तिथे सर्व सुख आहे.

सर्व शब्दाचा अर्थ सर्वही सुखे असाही करता येतो. किंवा सर्वच ब्रह्म. सर्वस्वरूप असलेले जे ब्रह्मरूप आहे, आत्मरूप आहे, ते सुख म्हणजे सुद्धा आत्मानंदाचे आगर आहे. ते आत्मस्वरूप जसे आनंदमय आहे तसाच तो बाप रखुमादेवी वरू आहे. निराळे नाहीये.

ईश्वराने जे निरनिराळे अवतार धारण केलेत त्या स्वरूपाच्या ठिकाणी निष्ठा जन्मजन्मांतरीची आहे. 'बहुत सुकृताची जोडी'.... म्हणजे एका जन्माचे नाहीये. अनेक जन्मांचे सुकृत आहे. त्यामुळे ती आवड आहे, ती वासना आहे – ते स्वरूप आपल्या डोळ्यांसमोर निरंतर असावे. आणि ती भावना दृढ होण्याकरता सर्व सुखं या ठिकाणी आहेत. ब्रह्मसुखही आहे किंवा सर्वही सुखे

आहेत. ह्याची पक्की खात्री आहे. दुसऱ्या सुखाकडे मन जाऊ शकणार नाही. म्हणून हे पाहिजे. सगळी सुख सोडून तुमच्या जवळ आलो आहे. आणि तुम्ही अदृष्य झालात ?

वेदान्त तत्त्वज्ञान हे खरे आहे, नाही असे नाही. परंतु त्या वेदान्त तत्त्वज्ञानाच्या भूमिकेपर्यंत जाणारे आचार्य महाराज हे सुद्धा –

**शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षि विषयः ।**

भगवान् श्रीकृष्ण हे माझ्या डोळ्यासमोर येऊ देत; मला दिसावेत ही इच्छा करताहेत. पण ऐक्य आहे. त्यांचे अंतर्यामी स्वरूप, त्यांचे शुद्ध ब्रह्म स्वरूप हे सगळं माहिती आहे, परंतु मला कृष्णांचे दर्शन पाहिजे. ही जी प्रेमभावना अंतःकरणामध्ये आहे ती कशाला घालवायची ?

ज्ञानी मनुष्याच्याजवळ आग्रह नाहीये. बुद्धीमध्ये जे जे संस्कार दृढ झालेले आहेत, पक्के झालेले आहेत त्या त्या संस्कारांप्रमाणे ती बुद्धी, ते मन, त्या त्या वेळेला, त्या त्या स्वरूपाकडे जाते. सगुणाकडे जाईल. निर्गुणाकडे जाऊ शकेल ते मन इतके समर्थ बनलेले आहे की मोकळेपणाने कोणत्याही स्वरूपाकडे जाऊ शकेल. अनेक जन्मांची पुण्याई आहे. कर्म झालेले आहे. भक्तीचा अभ्यास झालेला आहे. ज्ञान झालेले आहे, सगळे झालेले आहे. अंतरंग साधने, बहिरंग साधने, बाह्यपूजा, अंतःपूजा, हे जे उपासना मार्गामध्ये सांगितलेले आहे ते सगळे त्यांचे झाले आहे. त्यामुळे निर्गुणापर्यंत जाणारी बुद्धी सगुणापर्यंत आल्यानंतर त्यांना वाईट वाटत नाही.

आम्ही अज्ञानी जीव आहोत. काय हो, निर्गुण श्रेष्ठ, असे एकाने म्हणायचे. एकाने म्हणायचे सगुण श्रेष्ठ आहे. काय करायचंय निर्गुण घेऊन ? काही श्रेष्ठ पुरुष असतात. त्यांचे आचार अशा प्रकारे दृष्टीला पडतात. सगुण श्रेष्ठ आहे कारण आचार्यमहाराज कृष्णांचे दर्शन व्हावे म्हणून स्तोत्र करताहेत. हा पुरावा द्यायचा आम्ही. वादाशिवाय आमच्याजवळ काही नाही. सगुणामध्येही राहू शकत नाही आमचे मन. निर्गुणात तर नाहीच नाही. त्याला किती जन्म लागतील सांगता येत नाही. त्यात आनंद आहे ना ! निर्गुण कमी आणि सगुण

जास्ती महत्त्वाचे किंवा निर्गुण श्रेष्ठ आणि सगुण कनिष्ठ, कशाकरता? आनंदस्वरूप परमात्मा सगुण आहे. तोच आनंदस्वरूप आणि निर्गुण आहे. असेना कोणचेही रूप! आनंद जो आहे, तो आनंद सगळीकडे समान आहे. समान असताना श्रेष्ठ, कनिष्ठ भाव कशाकरता करायचा?

याप्रमाणे असे काही पहायचे, काहीतरी ऐकायचे, काहीतरी वाचायचे आणि संभ्रमात, शब्दच्छलात पडायचे. हेच चांगले बाकी नको.

पण ज्ञानी महात्म्यांची भूमिका वेगळी आहे. ते आग्रहाच्या पलीकडे गेले आहेत. बुद्धीला जे योग्य वाटेल ते घ्यायला हरकत नाही. 'जे जे भेटिजे भूत। ते ते मानिजे भगवंत।' हे सुद्धा घ्यायला हरकत नाही. सर्व भूते म्हणजे भगवत् स्वरूप आहेत!

'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हाही सिद्धान्त आहे. तिथेही मन स्थिर होते. 'जो लपोनी जगदाभासु.... प्रगटिला जगी.' जगन् मिथ्याही सांगितले आहे. आचार्य महाराजांचा सिद्धांत ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. आणि चिद्विलासही सांगताहेत– सर्वही भूते म्हणजे भगवान् आहेत. हा भक्तियोग आहे असे ते म्हणताहेत.

तर आग्रह ज्या बुद्धीमधे नाही, ते कसे सांगतात, कसे बोलतात, त्याप्रमाणे होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

तर गोपींनी प्रार्थना केली आहे. विष्णू स्वरूप धारण करून गोपालकृष्ण आले म्हणतात. गोपींनी सांगितले, 'हे रूप आम्हाला नको आहे.' आता विष्णू गोपालकृष्ण झालेले आहेत. ते काय गोपींना माहिती नाही का? आपला संसार सोडून कृष्णाच्या ठिकाणी त्या आसक्त झाल्या, कृष्णाच्या अंतर्यामीं शुद्ध स्वरूपापर्यंत त्यांनी आपली बुद्धी नेली, 'त्यांच्या मनात कामविकार आहेत' अशी भाषा काढणे शोभणारे नाहीये. 'विष्णू स्वरूप आम्हाला पहायचे नाही.' असे त्या म्हणाल्या. त्याचा तो अहंकार दूर झाला. अत्यंत शोक आणि पश्चात्ताप त्यांना झाला. केवढे भाग्य आमच्या हातात आले असताना गेले! आमचाच दोष आहे, हे पटले मनाला. तर परमेश्वर जवळ

आहे, लांब नाही, जो अंतर्यामी आहे, अंतरात्मरूप आहे तोच बाहेर आहे. परमेश्वराचे आवाहन करायचे आहे आणि विसर्जन करायचे आहे.

पूजेमध्ये १६ उपचार आहेत. आरंभाला आवाहन करावे लागते. आपला जीवभाव कमीकमी करीत पूजेमध्ये निमग्न झाले पाहिजे. आणि शेवटी 'कुलदेवस्वयमेवहि' इथपर्यंत अर्चनाची परिसीमा झाली पाहिजे. 'देवच मी आहे.' एका भक्ताने सांगितले, "काय या श्रीकृष्णांबद्दल बोलायचे. 'दासोहम् दासोहम्' म्हणत बसलो पण श्रीकृष्णांना चोरी करायची सवयच आहे म्हणे. गोपींची वस्त्रे त्याने नेली नव्हती का? त्यांच्या ध्यानामध्ये मी 'दासोहम् दासोहम्' म्हणत निमग्न असताना त्यांनी माझ्या 'दा'ची कधी चोरी केली कळलीच नाही आणि मी 'सोऽहम् सोऽहम्' असेच म्हणू लागलो."

तर त्या गोपींना श्रीकृष्णांचे खरे स्वरूप माहिती होते. त्यांचा अहंकार दुःखामुळे दूर झाला. म्हणून दुःखं यावीत अशी इच्छा करतात भक्त लोक. 'तुझा विसर न व्हावा.' एवढेच मागणे आहे. भगवंताचे अखंड स्मरण राहाण्याला अहंकार हा प्रतिबंध आहे. ते सुद्धा ईश्वराचे रूप आहे हं! परंतु समजून त्याचा स्वीकार करणे, अहंकारही करावा. पण अहंकार दोष असला तरी काही वेळेला त्याचा स्वीकार करावा लागतो. ईश्वरभक्ती ज्यांच्या अंतःकरणामधे मुरलेली आहे त्यांना हा अहंकार एखादे वेळेला बाहेर आल्यासारखा दिसतो. पण तो टिकत नाही. तो उपयोगी आहे.

सर्व कौरवांनी मिळून अभिमन्यूचा वध केला हे अर्जुनाला रात्री समजले. सर्वांनी मिळून त्या एकट्या मुलाला मारले आणि जयद्रथाने त्यात पुढाकार घेतला होता! 'उद्या सूर्यास्तापूर्वी मी जयद्रथाचा शिरच्छेद करीन. नाहीतर मी जगातून जाईन. मी तरी जाईन किंवा जयद्रथ तरी जाईल.' प्रतिज्ञा केली. पण त्याला मान्यता आहे. भक्ताचा अहंकार काही वेळ आलेला आहे. तो खरा नाही. तो गेलेलाच आहे. त्याला मध्ये मध्ये यावेसे वाटते. कारण कार्यही करायचंय ना! अहंकाराशिवाय कोणचेही कार्य होत नाही.

भगवत्‌भक्ती करायची झाली तरी अहंकार पाहिजे. 'कार्यं वा

साधयेत् देहं वा पातयेत्. ' एक वर्षाच्या आत मला दत्तात्रेयांचे दर्शन झाले नाही तर मी जिवंत राहाणार नाही; अशी निरंजन रघुनाथांनी प्रतिज्ञा केली होती. त्याप्रमाणे सर्व दत्तक्षेत्रे फिरत फिरत गिरनार पर्वतावर आले. वर्ष संपत आले होते. आजपर्यंत कोणच्याही स्थानात दर्शन झाले नाही. आता या गिरनार पर्वतावरील, श्रीदत्त पादुकांवर मस्तक फोडून घेऊन प्रतिज्ञा पूर्ण करायचे त्यांनी ठरवले. ' देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो । ' त्याप्रमाणे त्यांनी कपाळ फोडून घेतले आणि मग प्रत्यक्ष दत्तात्रेयांनी दर्शन देऊन त्यांना पुन्हा जिवंत केले. ही कथा प्रसिद्ध आहे.

आणि अर्जुनाला गाढ झोप लागली. 'तुम्हाला काय ठेवायचे असेल ते ठेवा. ठेवणारे तुम्ही आहात. अर्जुनाला ठेवायचे असले ठेवा. जयद्रथाला ठेवायचे असेल तर त्याला ठेवा.' सूड घेणारा अहंकार निराळा आहे. सात्त्विक अहंकार निराळा आहे. आपल्या पाठीमागे एक मोठी शक्ती आहे ही जाणीव आहे. त्यामुळे, "तुम्ही हातात एकही शस्त्र घेतले नाही तरी मला चालेल. तुम्ही नुसते माझ्याबरोबर राहा, जवळ राहा. अर्जुनाला माझा म्हणा." आणि दुर्योधन म्हणाला, "मला तुम्ही एकटे काय करायचे? त्यापेक्षा तुमचे सैन्य द्या." दुर्योधनाचा सैन्याच्या बळावर विश्वास आहे. एक व्यक्तीसुद्धा सर्वरूप असू शकते हा सिद्धान्त ऐकणारही नाही आणि ऐकला तरी मनामध्ये राहणारही नाही. एकच सर्वरूप आहे. हा सिद्धान्त अर्जुनाला पटलेला आहे. त्यामुळे त्याला झोप लागली. पण गोपाळकृष्णांना कुठे झोप आहे? उद्या सूर्यास्ताच्या आत त्या जगद्रथाचा वध करायचा म्हणजे काही सोपी गोष्ट नाही. कौरवांचीही तयारी जास्ती असणार ना! सहा कोस लांब त्यांचे सैन्य पसरले होते. बारा मैल. आणि त्याच्या मागे दुर्योधनाने जयद्रथाला ठेवले होते.

चक्रव्यूहाची रचना द्रोणाचार्यांनी केली आहे. चक्रव्यूहाचा भेद करून आत जायचंय. मध्ये मध्ये किती तरी मोठे मोठे वीर आहेत. त्या सगळ्या वीरांना तोंड देऊन बारा मैल आत असलेल्या जयद्रथापर्यंत सूर्यास्तापूर्वी जाऊन पोहोचायचे आहे. ही काही सामान्य स्थिती नाहीये. मोठे मोठे अतिरथी,

महारथी शस्त्र घेऊन तयार आहेत. तेही तपस्वी आहेत. त्यांनीही अस्त्रविद्येचा उत्तम अभ्यास केला आहे. श्रीकृष्णांना झोप नाहीये. दारूक सारथ्याला त्यांनी निरोप पाठविला, उद्या सकाळी माझा रथ लवकर तयार ठेव. मलासुद्धा उद्या कदाचित हातात शस्त्र घेण्याचा प्रसंग येण्याचा संभव आहे. अर्जुन सांगून गेला, म्हणाले, मला ठेवा नाही तर त्याला ठेवा. तुम्हीच उपदेश केलेला आहे.

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहान्तर प्राप्तिधीरस्तत्र न मुह्यति ॥ २-४३ ॥**

त्याचा मोह भगवंतांनी दूर केलेला आहे. निर्मोह अंतःकरण करून त्याला युद्धाला उभे केले आहे. त्याच्या अनुषंगाने हा अहंकार किंवा सूड नाहीये. राग आहे. अर्जुन रागावलेला आहे पण त्याचा राग किंवा अहंकार आणि आमचा राग किंवा अहंकार यात अंतर आहे. अशा प्रसंगी आपल्याला झोप लागली असती का? उद्या इतक्या लोकांबरोबर युद्ध करून जयद्रथाला मारायचंय. नाही तर आपण तरी जायचंय.

हा आपला आभासात्मक अहंकार आहे. भगवत् भक्ती ज्याच्या अंतःकरणामध्ये दृढ आहे असा तो अर्जुन आहे. 'अर्जुना तू परिससी । परिसूनिया अनुष्ठिसी ।' हे सांगताहेत भगवान्. तू नुसता गीता ऐकणारा नाहीस, तू त्याप्रमाणे वागणारा आहेस म्हणून मी तुला सांगतो. वागणाऱ्याकडे लक्ष दिले पाहिजे. अर्जुनालाही भगवंतांच्या कृपेने स्वप्नदृष्टांत झाला. भगवान शंकरांनी त्याच्या स्वप्नात येऊन विचारले, "काय अर्जुना! तुला पाशुपतास्त्र दिले आहे त्याचे विधान वगैरे सर्व लक्षात आहे ना? या सगळ्या अस्त्रांचा उद्या उपयोग करावा लागेल. त्याशिवाय रस्ता मोकळा कसा होणार?" 'मी, मी' म्हणवणारे मोठे मोठे वीर आहेत त्यांना बाजूला करून पुढे जायचंय. शंकरांनी अर्जुनाला पुन्हा सगळे पाशुपतास्त्र कसे वापरायचे ते समजावून सांगितले.

सात्त्विक कार्यसुद्धा अशा प्रकारे अहंकारच करतोय. मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार असे विभाग आहेत अंतःकरणाचे. त्यांपैकी अहंकार हा मोठा आहे. त्या अहंकारापासूनच पंचमहाभूते निर्माण झाली आहेत. म्हणून

अहंकाराने सगळे कार्य चाललेले आहे. तेव्हा अंतरात्मरूप जो आहे तो आत राहूनसुद्धा बुद्धीला, मनाला, अंतःकरणाला प्रेरणा करतो आहे. त्याच्या प्रेरणेने सात्त्विक, राजस आणि तामस कार्य होते. अंतर्यामी, अंतरात्मा जो आहे त्याचे मुख्य कर्तृत्व आहे.

जगदंबेचे स्वरूपही शास्त्रकारांनी असेच सांगितले आहे. जीवरूपही घेणारी जगदंबाच आहे. ईश्वररूपही तीच आहे. चैतन्यरूप असलेली जगदंबा नियम्यरूपही झाली आणि नियामकरूपही झाली.

**या देवि सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता ।**

माता हा एक अर्थ प्रसिद्ध आहे. पण प्रमाता असाही अर्थ घेतात. सर्व जीवरूप झालेली आहे. जीवरूप परमात्मा आहे. जीव ही भगवंताची विभूती आहे. म्हणून, 'जे जे भेटिजे भूत । ते ते मानिजे भगवंत ।' प्रत्येक जीवावर प्रेम करायचे. मीच आत्मरूपाने, जीवरूपाने आलेलो आहे. अर्थात जीवावर प्रेम करणे म्हणजे भगवंतावर प्रेम करणे आहे. जीवरूप झालेल्या भगवंतावर प्रेम करण्यासारखे आहे. जीवभाव बाजूला करून साक्षात् भगवानच आहेत या भावनेनेही प्रेम करता येते.

मूर्ती दगडाची असली किंवा धातूची असली तरी तिच्या पूजेमध्येसुद्धा संवित उपासना, अध्यास उपासना असे भेद सांगितले आहेत. मूर्ती म्हणजेच परमात्मा आहे, अशी पूजा करता येते. सगळंच विश्व जर परमेश्वर आहे, मग मूर्ती परमेश्वर नाही का?

मूर्तीलाच परमात्मा मानून परमेश्वर माझ्यासमोर आहे या भावनेने पूजा चालली आहे. ही मूर्ती नसून परमेश्वरच मूर्तिरूप आहे. त्याची पूजा चालली आहे. ती पूजा जपून केली पाहिजे. त्यावेळी रागावून उपयोग नाही. जोराने बोलून उपयोग नाही. अत्यंत अंतःकरणपूर्वक पूजा व्हायला पाहिजे. मूर्ती म्हणजेच परमेश्वर आहे. तर त्याचे फल मिळते.

नामदेव सांगतात, "पांडुरंगाची ही मूर्ति नाहीये. ही कोणी घडवलेली नाही, बसवलेली नाही. साक्षात् पांडुरंग आहे." हा एक उपासनेचा, पूजेचा प्रकार आहे.

दुसरा पूजेचा प्रकार म्हणजे प्रतीक पूजा. मूर्ती नसून साक्षात् वैकुंठपती या ठिकाणी आहेत, साक्षात् जगन्माताच माझ्याकडून पूजा घेते आहे. तिचे स्वरूप लक्षात घेऊन साक्षात् जगदंबेची पूजा. मनातली मूर्ती बाजूला गेली. साक्षात् जगदंबा आहे ही अध्यास उपासना किंवा प्रतीक उपासना सुरू झाली.

तेव्हा संपूर्ण जीव हे परमेश्वराचे स्वरूप आहे. त्याची जीवरूपाने भक्ती करायची हा एक प्रकार आहे किंवा जीवरूप ज्याने घेतले आहे त्याचे स्वरूप आठवायचे आणि जीवरूप विसरून जायचे. अशी मनाची तयारी झाल्याशिवाय म्हणजे अहंकार आपल्या संबंधाचा गेल्याशिवाय जीव विसरून जाणे आणि साक्षात् भगवान असे समजणे किंवा जीवालाच भगवान समजणे हेही दोन्हीही प्रकारे पूजा होणार नाही. जे जे भेटिजे.... हा चिद्विलास दोन्ही प्रकारे होणार नाही. खऱ्या भक्ताचा तो सर्व अहंकार गेलेला असतो. आणि त्याच्या मनात जे भगवंतांबद्दल प्रेम निर्माण झाले आहे, ते संस्कार इतके दृढ झालेले आहेत की रजोगुण, तमोगुण वगैरे बाकीचे दोष राहतीलच कसे? हे दोष जर चित्तामध्ये असतील तर अहंकार वाढणार. धर्माचरण करताना सत्त्व शुद्धी आहे. पण फलाभिलाषा किंवा कर्तृत्व अभिमान असेपर्यंत ते सत्त्व अद्यापि शुद्ध झालेले नाहीये. रजोगुण, तमोगुणांचे त्यावर आक्रमण आहे. ते दूर झाले पाहिजे.

'जगदंबा आपले संरक्षण करणारी आहे,' हे धर्माचरणामुळे झालेले संस्कार ऋषी मंडळींच्या मनातून तो दुर्गम दैत्य दूर करू शकला नाही. ज्ञानावर त्याने आवरण आणले. देवांना निर्वासित केले त्याने. पण त्यामुळे त्याचा अहंकार किती वाढलेला आहे! ईश्वराने निर्माण केलेल्या जगाला जर अशा अहंकाराचा उपद्रव व्हायला लागला तर तो काढून टाकला पाहिजे. तो काढून टाकायची शक्ती त्याच्याजवळच आहे. चांगल्या फळाफुलांच्या बागेत मध्येच जर वाटेल तसे गवत वाढले तर माळी ते गवत काढून टाकतो. तिथे दुसरा विचार नाही. आपण लावलेली बाग सर्वांना समाधानकारक व्हायला पाहिजे. मध्ये असा कोणचाही प्रतिबंध राहून उपयोगी नाही. ही शक्ती माळ्याजवळच आहे, हे

ज्ञान त्यालाच आहे. बागेत काय ठेवायचे आणि काय काढायचे हे त्यालाच माहिती आहे. सृष्टीमध्येही तसेच करावे लागते.

सर्व विप्रांचा आणि इतरांचा नाश करण्यासाठी सैन्य घेऊन तो दुर्गम दैत्य आलेला आहे. पुष्कळ सैन्य आहे. अनुयायी कोणत्याही पक्षाला मिळू शकतात. अनुयायी मिळाले म्हणजे पक्ष चांगला ही बुद्धी बरी नाहीये. आपल्या बुद्धीचे निरीक्षण करून महात्म्यांनी जे सिद्धांत मांडलेले आहेत, स्मृतिकारांनी सांगितले आहे की विचार करायला चार लोकांची परिषद चालते, दहा लोकांची चालते. अथवा भगवत् भक्त अध्यात्मज्ञानी महात्मा एकटा असला तरी तो परिषद आहे. एक अध्यात्मज्ञानी व्यक्ती राष्ट्र आहे, तोच विश्व आहे. त्याचा संकल्प, त्याची वाणी कार्य करू शकते. बालपणीच सर्वज्ञता.... हे स्वतःचं चरित्रच ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. पण ते ज्ञानी महात्म्यांचे, संत महात्म्यांचे वर्णन करण्याच्या रूपाने लिहिताहेत. तर सर्व ऋषी मंडळींच्या मनात असलेले भगवतीबद्दलचे प्रेम दूर झाले नाही. तो दैत्य ते दूर करू शकला नाही. तपश्चर्या केली असेल. तपश्चर्येने त्यांचे स्थान घेतले, त्यांच्या ज्ञानाला प्रतिबंध केला पण ते ज्ञान या दैत्याला मिळाले नाही. याला जर ते खरे ज्ञान मिळाले असते तर अशी विपरीत बुद्धी झाली नसती. हे जर खरे ज्ञान झाले असते तर त्याला या सृष्टिकर्त्या ईश्वराला, जगदंबेला जाणावे अशी बुद्धी झाली नसती का ? अस्तेय नाही स्तेय आहे. चोरी करून आणलेले धन आणि स्वतः परिश्रम करून मिळविलेले धन, यांपैकी समाधान कोणामुळे आहे ? दोन्ही धनच आहेत. जर धनामुळे समाधान असेल तर धन दोन्हीही आहेत. पण ज्याने चोरी करून आणलंय त्याला झोप नाहीये. संसार देवाचा आहे, ही भावना होणे हे अहंकार कमी झाल्याचे चिन्ह आहे. तुकाराम महाराज याला भक्ती म्हणतात.

**हे - ची थोर भक्ती आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।**

संसार टाका असा नाही. माया कमी करा, आसक्ती कमी करा. म्हणजे अहंकार कमी करा. म्हणजे ममता कमी झाली. संकल्प - विकल्पाने मनाचे जे काम वाढते आहे ते कमी झाले पाहिजे.

दुसरे म्हणजे मनाची अवस्था जाऊन निश्चयात्मक बुद्धीची अवस्था मिळाली पाहिजे. अहंकार अवस्था कमी झाली पाहिजे. म्हणजे राजस, तामस मिश्र अहंकार कमी झाला पाहिजे. ईश्वराची भक्ती सोडायची नाही. वयाच्या पाचव्या वर्षी प्रल्हादजींच्या मनात डोक्यावर टांगती तलवार असताना भगवत् भक्तीचा निश्चय पक्का झाला आहे. सबंध जगाचा स्वामी असलेला बापच मारण्याचा प्रयत्न करतो आहे. असेल! जगाचा स्वामी एकच आहे. दुसरा कोणीही जगाचा स्वामी असू शकत नाही. त्यामुळे मनामध्ये निर्भयता आहे. त्यामुळे त्या सत्त्वाची शुद्धी इतकी झालेली आहे की त्या गुरुजींनी विचारले, "अरे, तू भजन कशाला करतोस? बापाच्या विरुद्ध कशाला जातोस?" प्रल्हादजी म्हणाले, "गुरुमहाराज, मी भजन करीतच नाही. माझ्या बुद्धीला प्रेरणा करणारा तो अंतर्यामी परमात्मा आहे. बुद्धीला पहाणारा, द्रष्टा, प्रेरणा करणारा परमात्मा आहे. त्याच्या इच्छेने माझे मन तिकडे जातंय मी काय करू?" केवढी तयारी आहे! केवढे मन ताब्यात आहे! प्राण जाण्याची वेळ आली आहे पण मन तिकडे जात नाहीये. देहात्मबुद्धी संपलेली आहे. शुद्ध बुद्धी अंतःकरणात उत्पन्न झाल्यावर देहात्मबुद्धी जाऊ शकते याचे हे उदाहरण आहे. पाच वर्षांच्या मुलाला मृत्यूचीही भीती नाहीये. त्याच्या शरीरावर शस्त्र प्रहार होताहेत पण त्याला काही लागतच नाहीये. त्यामुळेही अभिमान नाही. संरक्षण करणारा परमेश्वर आहे याचा प्रत्यक्ष अनुभव घेतो आहे प्रल्हाद. राजाच्या आज्ञेप्रमाणे सर्व बाजूंनी दैत्य त्याच्या शरीरावर प्रहार करताहेत पण त्याला काहीही शारीरिक इजा होत नाहीये. हा अनुभव आलेला आहे. ईश्वर संरक्षण करणारा आहे ही नुसती आस्तिक्य बुद्धी नाहीये. पण अनुभव आलेला असतानासुद्धा अहंकार बिलकुल नाहीये. त्या चक्रपाणीच्या इच्छेने सर्व चाललेले आहे ही त्याची भावना आहे. माझे संरक्षण करणेही त्याचेच कार्य आहे, माझा काही संबंध नाही. हा अहंकार इतका बाजूला झालेला आहे, इतका शुद्ध झालेला आहे की त्या शुद्धीमुळे सर्व कार्य चाललेले आहे.

ज्ञानेश्वर महाराजांना गुरु समजून चांगदेव वाघावर बसून येताहेत.

थंडीच्या दिवसात निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर वगैरे भावंडे उन्हात त्या भिंतीवर बसली आहेत. निवृत्तिनाथ म्हणाले, "अरे, योगिराज आलेत, त्यांना सामोरे जायला पाहिजे." ज्ञानेश्वर महाराज म्हणाले, "जाऊ या." आणि ती भिंत चालायला लागली. ते पाहिल्यावर चांगदेवांचा अहंकार गेला. अहंकार वाईट आहे, तो चांगला नाही, तो गेला पाहिजे. त्याशिवाय भक्ती नाही, हे व्याख्यान देण्याचे काम नाही. आपोआपच गेला. दगडाच्या भिंतीत ज्यांच्या संकल्पाने क्रिया उत्पन्न होऊ शकते म्हणजे ईश्वरात आणि यांच्यात काय अंतर राहिले? आणि हा चेतन वाघ आहे त्यावर नियंत्रण ठेवणे काय कठीण आहे, असा विचार मनात येऊन चांगदेवांचा अहंकार गेला. अहंकार धारण करण्याची योग्यता कोणाच्यात आहे? ज्ञानेश्वर महाराजांनी अहंकार धरला पाहिजे, त्याचे जर प्रतिपादन करायचे झाले तर. अचेतन भिंतीलासुद्धा ज्यांच्या शक्तीमुळे क्रिया उत्पन्न झाली, त्या स्वतःच्या शक्तीबद्दल अभिमान तर नाहीच नाही. उलट स्वतःची शक्ती ते विसरून गेले आहेत.

'या, या, योगिराज, आलात बरे झाले.' आपण भिंत चालवली याची थोडीदेखील त्यांनी चांगदेवांना जाणीव करून दिली नाही. वर्तमानपत्रात देणार नाही, तोंडाने कोणाला सांगणार नाही. विसरून गेले. संत महात्मे आपले चरित्र सांगत नाहीत, लिहीत नाहीत. काय करायचंय जाहीर करून? त्यांनी जे लिहून ठेवलंय ते आपण किती पाळतो, किती आचरण करतो? आचरण करायचंय.

तर सगळी ऋषी मंडळी जगदंबेची प्रार्थना करताहेत संरक्षणासाठी. काही काळाने तरी त्या दैत्यात सुधारणा होईल या आशेने आम्ही राहिलो आत्तापर्यंत. पण आता विनाश व्हायची वेळ आली आहे. आपल्या कृपेने पूर्वीप्रमाणे आम्हाला स्थिती मिळाली असती पण आम्हीच आता जिवंत राहणार नाही.

प्रथम जगदंबेने त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था केली. ज्या बाजूला देव आणि ऋषी मंडळी होती त्या बाजूला जगदंबेचे तेजचक्र सारखे फिरू लागले. ते तेज सहन न होऊन ते दैत्य त्या बाजूला जाऊच शकले नाहीत. मग देवीने

सर्वही दैत्यांच्या बरोबर युद्ध करायचे ठरवले. युद्ध करायचे कशाला ठरविले? का? त्या देवीच्या संकल्पामध्ये शक्ती नाही का? ईश्वराच्या संकल्पामध्ये शक्ती आहे ना!

रामाने अवतार धारण कशाला केला? रावणाला मारायला? रावणाला मारणे किती क्षुल्लक काम आहे. कशाला अवतार झाला? त्याचे कारण सांगताहेत भगवान मारुतिरायांना – मनुष्यरूप धारण करून केवढे कार्य केले रामचंद्रांनी! त्या कार्याचे नुसते चिंतन जरी केले तरी मनातला सगळा अहंकार जातो. कशाचा अहंकार बाळगायचा आपण? केवढे आम्ही खाली आहोत! जमीन अस्मानाचा फरक आहे. कवी वर्णन करतात – सुर भारतीचे हे वैभव आहे. ऐकताना सुद्धा किती आनंद होतो! किती विपुल शब्दसंपत्ति आहे! नामाचे सगळे धातू या स्तुतीत वापरले आहेत. धातूंची नामे बनविता येतात, नामांचे धातू बनविता येतात. संस्कृत भाषेचे हे वैभव दिसून येते.

भगवान् रामचंद्रांचे सामर्थ्य कवी सांगतो आहे – रामचंद्र आणि सीतादेवी एकदा बोलत बसले असता एक कावळा त्या ठिकाणी आला आणि सीतादेवींना त्रास देऊ लागला. जवळच एक गवताची काडी पडली होती ती उचलून घेऊन मंत्राने तिच्यावर अभिमंत्रण करून कावळ्याकडे फेकली. त्या कावळ्याला त्या काडीची भीती इतकी वाटली की संरक्षणासाठी सगळ्या विश्वात फिरून आला, पण त्याला कोणीही अभय देऊ शकला नाही. एका तृणावर अस्त्रप्रयोग केला. त्या तृणाने कावळ्याला जर्जर केले. शेवटी तो शरण आला. त्याचा एक डोळा काढून घेतला. तेव्हापासून कावळ्याला एकच डोळा आहे.

शंकरांचे धनुष्य तृणाप्रमाणे झालेले आहे रामचंद्रांच्या करस्पर्शाने. धातूचा प्रयोग केलेला आहे, संस्कृत भाषेमध्ये पण धातू म्हणजे नामाचा धातू आहे.

विश्वामित्र ऋषि राम-लक्ष्मणांना मुद्दाम बरोबर घेऊन निघाले. गौतम ऋषींचा आश्रम ओसाड पडलेला आहे. एक शिळा पडलेली आहे.

विश्वामित्र म्हणाले, "रामा, या शिळेला पाय लाव. रामचंद्रांना या सांगण्याचा काही अर्थ समजेना. त्यांना वाटले, पाय कशाला लावायचा. पण त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्याला स्पर्श करताच गौतम ऋषींची पत्नी अहिल्या त्या शिळेतून प्रगट झाली.

भरताला पादुका दिल्या. "मी राज्य करणार नाही. राज्य करीन पण तुमचे राज्य म्हणून करीन" असे भरताने सांगितले. केवढा त्याग आहे! रामांनासुद्धा भरताच्या त्यागाचे वर्णन करावे लागले. ते म्हणाले, "भरता, माझ्यापेक्षा तुझा त्याग मोठा आहे. मला राज्य अद्यापि मिळायचे होते. राज्याभिषेक व्हायचे ठरले होते पण तो झाला नाही, काही नाही. त्याच्यापूर्वीच मला वनात जावे लागले. तुझ्या आईने तुझ्याकरता वर मागून राज्य मिळवून दिले." ईश्वराने जरी मोहामध्ये टाकण्याचा प्रयत्न केला तरी भरताला मोह नाहीये. तो म्हणाला, "आईची आज्ञा पाळली पाहिजे अशी तुमची आज्ञा आहे ना! त्या आईला मी 'आई' म्हणायला तयार नाही. तुम्हाला वनामध्ये पाठवणारी माझी आई राहणार नाही." पण रामचंद्र म्हणाले, "भरता, असे बोलता येत नाही. मी जर सगळया वडील मंडळींचे ऐकतो तर तुला ऐकायला काय झाले?" भरताने सांगितले, "काय आज्ञा आहे ? " "राज्य भरताने करावे" "करतो. पण तुमच्या पादुका द्या."

त्याने सिंहासनावरती पादुका स्थापन केल्या. राज्य करणे, हीसुद्धा उपासना आहे. सर्व संसार करणे हीसुद्धा ईश्वराची भक्ती आहे. "संकल्पावी माया संसाराची" एवढे मात्र साध्य झाले पाहिजे. त्या पादुकाच राजारूप झालेल्या आहेत.

अयोध्येपासून शेकडो योजने दूर, मध्ये पसरलेला समुद्र पार करून रावणापर्यंत पोहोचायची शक्ती दुसऱ्या कोणाची आहे? तो महासागर सामान्य एका नाल्यासारखा, ओढ्यासारखा भासला. सबंध वानर सैन्य तिथे जाऊन पोहोचलेसुद्धा. मग डोळे उघडले त्या रावणाचे आणि त्याच्या मंत्रिमंडळाचे. ते एकमेकांवर दोषारोप करू लागले. सेतू बांधून वानर इथे यायला लागले आणि

तुम्हाला समजले नाही? तुमचे हेरखाते काय करत होते? रावणाने मंत्र्यांना दोष द्यायचा, मंत्र्यांनी इतरांना दोष द्यायचा. ते तर रावणालाही दोष देऊन म्हणू लागले, "तू आणलंसच का सीतेला? तू आणले नसतेस तर कशाला आले असते वानर सैन्य? दोघांचाही नाश जवळ आलेला आहे."

रानावनात राहून कंदमुळे खाणारे कपि, वानर पण योद्धे झालेले आहेत. रावणाच्या मोठमोठ्या सेनापतींचा त्या वानरांनी नाश केला. कुंभकर्ण माझा भाऊ आहे, तो रामलक्ष्मणांना मारल्याशिवाय राहणार नाही या अहंकारात रावण गेला. इंद्राला जिंकणारा इंद्रजितही गेला. सगळे अहंकार दूर करून शेवटी रावणाचे अहंकाराचे जे कार्य चाललंय ते बंद पडले.

मर्त्यांनी शिक्षण घेण्यासारखे रामराज्य आहे. अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे हे शिक्षण देण्यासाठी रामचंद्रांनी मर्त्य म्हणजे मानवी अवतार धारण केला. श्रेष्ठ नेता कसा असावा हे सर्वांना दाखवण्यासाठी वाल्मीकी मुनींनी रामायणाची रचना केली. रामांच्यासारखा नेता पाहिजे. रावणाकडे मोठे सैन्य आहे, शूर योद्धे आहेत, त्याची संरक्षण व्यवस्था अभेद्य आहे वगैरे गोष्टींनी घाबरून जाऊन उपयोग नाही. घाबरण्याचे कारण नाही.

**'अहंकाराचा वारा न लागो राजसा।'**

या भूमिकेपर्यंत जे जाऊन पोहोचलेले आहेत. त्यांची शक्ती फार मोठी आहे. त्या शक्तीची तुलना करून उपयोग नाही. निर्भयपणे अन्यायाचा प्रतिकार झाला पाहिजे हे मर्त्यांना शिक्षण देण्याकरता रामावतार झाला. रावणाचा नाश करणे काय अशक्य आहे? हे मर्त्यशिक्षण आहे.

म्हणून देवी स्वतः युद्धामध्ये उतरलेली आहे. दुर्गम दैत्याचा नाश करायचाय. लोक म्हणणार, तपश्चर्या केली होती त्याने. मग त्याला कसे मारले? पण तपश्चर्या करून काय केले? त्याचा उपयोग काही नाही. सगळ्या जगाचा विध्वंस करायला प्रवृत्त झालेल्या दैत्याला जिवंत ठेवून काय करायचे? अहंकारामुळे अशी जी कार्ये होताहेत त्या अहंकाराचा छेद करण्याकरता अवतार होताहेत.

पुढे त्यांचे युद्ध झाले आहे. त्या देवीच्या शरीरापासून अनेक शक्ती निर्माण झाल्या आहेत. आणि त्या दुर्गम दैत्याचा नाश करून विप्रांना त्यांचे ज्ञान परत मिळवून दिले आणि पुन्हा त्यांची भक्ती, उपासना सुरू झाली. सर्वजण सुखी झाले. त्याचे वर्णन वेदव्यास मुनी पुढे करणार आहेत.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

कालमर्यादा सर्वांना आहे. कालमर्यादा संपविणे हाही एक उद्देश आहे. कालरूप ज्याने धारण केले तोच जीवाला त्या कालमर्यादेतून मोकळे करणार. किती वेळा जन्माला यावे लागले, किती मृत्यू झाले, किती सुख-दुःखे भोगावी लागली याची सामान्य जीवांना कल्पनाही करता येणार नाही. अनंत आहे. नामरूपात्मक सगुण विश्व जे आहे, ते मनातून मिथ्या म्हणून काढून टाकायचे म्हणजे मनाची केवढी तयारी पाहिजे. म्हणजे कालमर्यादा, देशमर्यादा सगळी गेली. त्यासाठी मनाची फार मोठी योग्यता असली पाहिजे. मन अत्यंत शुद्ध झाले पाहिजे. मन अत्यंत स्थिर झाले पाहिजे. केवळ एक परब्रह्म तत्त्व आहे, सच्चिदानंदघन परमात्मा आणि चैतन्यरूपी जगदंबा एकच आहे. दुसरे काही नाही हे मनात पक्के ठसले पाहिजे.

हे नुसते तोंडाने म्हणणे निराळे. आपण वाचन करतो, ऐकतो, बोलतो. पण कालाची मर्यादा घेऊनच आम्ही जन्माला आलो आहोत आणि ती घेऊनच आमचे किती जन्म जाणार आहेत कोणास ठाऊक ! त्या मर्यादेच्या काही आपण पलीकडे जाऊ शकत नाही. आचार्य महाराजांनी काही साधनांचा

अभ्यास करायला सांगितला आहे आरंभापासून.

**वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयतां।**
**तेनेशस्य विधीयतामपचितिः काम्ये मतिस्त्यज्यताम् ॥१॥**

आचार्य महाराज म्हणतात, सगळे ज्ञान समजावून घ्या. वेद म्हणजे परमेश्वराचे रूप आहे. शब्द ब्रह्म त्याला म्हणतात. ब्रह्म म्हणजे विचार! केवढे सर्व ज्ञान आहे! शब्दात्मक आहे म्हणून सर्वज्ञ त्याला म्हणतात.सर्वज्ञासारखा वेद आहे. सर्व ज्ञानवान् म्हणजे चेतन पाहिजे कोणी तरी. हा शब्दात्मक असल्यामुळे चेतन नाही पण ज्ञान सर्व त्यात आहे. वेद अनंत आहेत. सर्वही ऋषी मंडळींचे वेदाभ्यास करणे हेच तप चालू आहे. त्यावेळची आयुर्मर्यादाही जास्तीत जास्त आहे.

प्राणवायूवर (श्वासोच्छवासावरच) आयुष्याची कल्पना झाली आहे. शंभर वर्षे आयुष्य सर्व साधारणपणे मानवाचे समजले गेले आहे. शंभर वर्षांत किती श्वासोच्छवास होतात याचे गणित किती मोठे होईल. एकवीस हजार सहाशे श्वासोच्छवास आपले रोज चालू असतात. आमचा श्वास कधीही बंद होत नाही. प्राणवायूची क्रिया अखंड चालू आहे. इतके श्वास म्हणजे एक दिवस, अशी वर्ष गणनेची कल्पना आहे.

प्राणायामादिकांचा अभ्यास करणारे महर्षी आहेत. संध्येमध्येही प्राणायाम सांगितला आहे. संध्या करायलाच वेळ नाही तर प्राणायाम करायला वेळ कुठला होणार आम्हाला! प्राणवायूचा निग्रह साध्य झाला तर सर्व इंद्रिये आणि मनसुद्धा निग्रहीत होते. असे प्राणशक्तीचे योगशास्त्रकार महात्म्य सांगतात. पण त्या प्राणशक्तीला ताब्यामध्ये घेणे फार कठीण आहे. प्राणाचा निग्रह करायचा म्हणजे सगळ्या इंद्रियांचा निग्रह करायचा आणि मनालाही स्वस्थ बसवायचे आहे. मनाला निश्चल, स्थिर करायचे आहे.

मन कधीही स्थिर नाही आणि प्राणवायूही कधी स्थिर नाही अशी स्थिती आहे. त्या दोघांच्यापैकी कोणालाही एकाला स्थिर करता आल्यानंतर ते दोघेही स्थिर होतात. जोपर्यंत श्वासोच्छवासाच्या रूपाने प्राणवायूची

हालचाल चालू आहे तोपर्यंत मनाची अस्थिरता कायम आहे. प्राण स्थिर झाला म्हणजे मनही स्थिर होते. अथवा विचार, विवेक, वैराग्यादि साधनांनी मन जर स्थिर झाले, ज्ञान समजावून सांगणारे महात्मे जर भेटले, तर मनात उत्पन्न होणारे विकार, संशय वगैरे सर्व त्यांच्या मार्गदर्शनाने नष्ट होते. हे खोटे आहे असे वाटते, पटत नाही आपल्याला, याचा काय उपयोग आहे असेही वाटते. धर्माचा काही उपयोग नाही म्हणून एक बुद्धिवाद निघाला आहे. 'पूर्वी असेल धर्माचा उपयोग, पण आता धर्म कालबाह्य झालेला आहे,' असे ते म्हणतात. काय कालबाह्य झाले? जे पूर्वी चालू होते तेच रोज चालू आहे. धर्मच तेवढा कालबाह्य ठरवायचा. आपल्या ज्या अगदी सामान्य भोजनादि क्रिया चालू आहेत, त्याच्यात काय कमी आहे? रोज भोजन करायचे, रोज झोप घ्यायची, रोज बोलायचे, चालायचे वगैरे सगळे रोजचे चालू नाही का? वाणीने किंवा इंद्रियाने अखंड चालू राहणारी कार्ये काय बंद आहेत का? नाही. ती चालूच आहेत. वेगळी काय आहेत पूर्वीपेक्षा? धर्मालाच तेवढे आम्ही आमच्या बुद्धीने कालबाह्य ठरवतो.

कोणत्याही विषयाचे, पदार्थाचे ज्ञान आम्हाला ज्ञानेंद्रियांनी होते. डोळ्यांनी आपण भगवंतांची स्थाने पाहतो. कानांनी भगवंतांच्या लीला ऐकू शकतो. नेत्राने त्या त्या स्थानांचे ज्ञान होते यामुळे काही तरी संस्कार होतो की नाही? परिणाम होतो की नाही? आणि त्या परमेश्वराचे चरित्र, लीला ऐकण्याचे साधन आम्हाला मिळालेले आहे - श्रोत्रेंद्रिय ज्याला म्हणतात. त्याने ते ज्ञान होते. शब्द समजतो आणि शब्दांच्या द्वाराने अर्थ समजतो. इथे दोन प्रमाणं आहेत. एक प्रत्यक्ष प्रमाण आहे, शब्द ऐकण्याकरता कर्णेंद्रिय पाहिजे. ऐकायला यायला पाहिजे कानाने. आणि त्या शब्दाचा अर्थ मनाला समजला पाहिजे. ती पुढची पायरी आहे. म्हणजे शब्द हा कानाच्या योगाने ऐकायचा आणि त्या शब्दाच्या योगाने अर्थाचे ज्ञान होते. कानाने फक्त शब्द समजतो. ईश्वराच्या सृष्टीमध्ये काय विलक्षण चमत्कार आहेत सगळे! श्रवणेंद्रियाने ऐकायचे म्हणजे फक्त शब्द ऐकायचा नाही तर त्या शब्दाच्या द्वाराने अर्थ

समजावून घ्यायचा. श्रवण हे ज्ञानाचे पहिले साधन सांगितले आहे ना! आणि नंतर मनाचा उपयोग आहे. मन हे इंद्रिय नंतर कार्य करणार.

इथे शब्दाने जो अर्थ समजावून सांगितला पण मन हे इंद्रिय, कबूल नाहीये, पसंत नाहीये. एक शक्ती सगळे कार्य करणारी आहे. भगवान अर्जुनाला सांगताहेत - "मी महाकाल आहे. सर्व लोकांचा संहार मला या ठिकाणी करायचा आहे. माझा तसा संकल्प झालेला आहे." हे ते स्वतःच सांगतात. "तेव्हा तू युद्ध कर आणि सोडून गेलास तरी हे लोक कोणीही जिवंत राहणार नाहीत. 'मी युद्धातून बाजूला झालो म्हणजे त्यांचा नाश होणार नाही' असे वाटणे म्हणजे अहंकार आहे. ही तुझी दया नाहीये. मनाने तू विचार करतो आहेस, पण मी तुझ्यासमोर प्रत्यक्ष उभा राहून शब्दांनी तुला सांगतो आहे. माझे मूळ स्वरूप दाखवून शब्दांनी तुला सगळी ओळख करून दिली आहे. तरी सुद्धा 'माझ्या मनाला हे पटत नाही' असे तू म्हणत असलास तर जा निघून. इथे राहू नकोस. या लोकांना तू वाचविणारा नाहीयेस, किंवा मारणारा तू नाहीयेस." हे त्याला पटवून दिले. ऐकायला येतंय अर्जुनाला. कान आहेत. शब्द ऐकायला येताहेत.

भगवान बोलताहेत हे ऐकायला येतंय. कान आहेत. शब्द ऐकायला आलेले आहेत आाणि त्याचा अर्थ त्या शब्दातूनच निघतो. "सर्व लोकांचा क्षय करणारा मी काल आहे. मी आज सर्वांचा नाश करणार आहे कालरूपाने." हे स्वतः भगवान सांगताहेत हे काय अर्जुनाला समजत नाही?

कान या माध्यमातून शब्द ऐकायला आले आणि शब्दांच्या माध्यमातून "मी कालरूपाने सर्वांचा संहार करणार आहे." हे शब्दार्थ ज्ञान त्याला झालेले आहे. भीष्म, द्रोण कोणीही राहणार नाही, समजलेले आहे अर्जुनाला. परंतु मनाने जर अशा प्रकारची तक्रार केली, "असे कसे शक्य आहे? एवढे अतिरथी, मोठमोठे वीर सगळे जाणार म्हणता तुम्ही युद्धामध्ये? आणि मी युद्ध सोडून गेल्यानंतर जाणार?" हा अर्जुनाचा अहंकार आहे ना! मीच मोठा आहे. मी युद्धातून बाजूला झालो तर हे जिवंत राहतील. अहिंसा परमो धर्मः। सगळं

चांगलं होईल. हे सर्व अर्जुन आपल्या मनानेच ठरवतोय. धर्माधर्माचा विचार करणारी एक मोठी शक्ती अर्जुन आपल्यासमोर डोळ्याने पाहतो आहे. त्या विश्वरूपी परमात्म्याचे सामर्थ्य तो प्रत्यक्ष पहातो आहे. हजारो नेत्र आहेत, हजारो मुखं आहेत. जिकडे पहावे तिकडे ते विश्वरूप आहे. पण तो आपल्याला बाजूलाच ठेवतो आहे. विश्वरूप परमात्म्याच्या विश्वरूपात माझा अंतर्भाव असल्यामुळे मीही त्याच्याच रूपात अंतर्भूत आहे. मला मिळालेला देह, इंद्रिये वगैरे सर्व त्या विश्वरूपातच अंतर्भूत आहे. हा विचार मनामध्ये येत नाही ना! बाजूला राहून सर्व पहातो आहे. याचा अर्थ तो अहंकार याला त्या परमेश्वराच्या रूपापर्यंत जाऊ देत नाहीये.

विश्वातल्या सर्वही वस्तूंचे ज्ञान करून देणारे शब्दप्रमाण आहे. डोळ्यापेक्षा सुद्धा त्याचे जास्त महत्त्व आहे. डोळ्यांसमोर असलेला पदार्थ फक्त पहाता येईल किंवा कानाजवळ झालेला शब्द कानाने ऐकू येईल. या इंद्रियांचे सामर्थ्य मर्यादित आहे. पण इंद्रियांवर जीवाचा विश्वास आहे. मनाने कुठे विश्वास ठेवायचा आणि कुठे ठेवायचा नाही हा विचार काही मनात येत नाही. आमचा एकच विश्वास. डोळ्यांनी दिसते ते खरे. बरे हरकत नाही.

परंतु धर्माधर्मादिक पदार्थ डोळ्यांना दिसत नाहीत. डोळ्याने दिसणारे जे पदार्थ आहेत, त्याच्यासंबंधी मनाने विचार करायला लागल्यानंतर डोळ्याने समोर जे दिसते आहे त्याला अनुसरून मन विचार करू शकते. तो सुद्धा विचार पूर्ण होणारा नाही. परंतु धर्माधर्मादिक जे पदार्थ आहेत ते अतींद्रिय आहेत. त्याच्यावर विचार करणे योग्य नाही. अर्थशास्त्र निराळे काढले गेले, धर्मशास्त्र निराळे काढले गेले. अर्थशास्त्र श्रेष्ठ मानणारे जे मन आहे त्या मनाला धर्मशास्त्र पटत नाहीये.

शब्दप्रमाण मोठे आहे आणि कालात्मा श्रीहरी शब्दाने सांगतो आहे की, 'हे सगळे मरणार आहेत. ते अधार्मिक आहेत. धर्मानुकुल नसलेला जिवंत राहणार नाही. हा माझा संकल्पच झालेला आहे.' म्हणजे अधर्माने यांचा नाश होणार. आणि तो करणारा हा कालात्मा आहे. स्वतःच सांगताहेत. हे मान्य

करायला पाहिजे मनाने. पण पटत नाही. समोर सगळे प्रमाण असून पटत नाही, म्हणायचे. श्रद्धा ज्याला म्हणतात - 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्!' प्रमाण असून काय करायचे ?

ईश्वरस्वरूप झालेले संत महात्मे दयाळू आहेत. त्यांचा शब्द आहे – सगळ्यांचे कल्याण व्हावे. पण ती जाणीव नाही. त्या शब्दांचा आमच्या मनावर परिणाम होतच नाहीये. म्हणजे ही साधनसामग्री समोर आहे. चक्षुप्रमाण आहे, कर्णेंद्रिय प्रमाण आहे. शब्द ऐकायला आलेला आहे पण शब्दाचा अर्थ मनामध्ये जात नाहीये. का नाही ? ज्ञान जर मनाने झालेले आहे मग ते खरे नाही असे का वाटावे ? हे सर्व ज्ञान खोटे आहे असे सांगणाऱ्याजवळ तरी तसे सिद्ध करणारे काही प्रमाण आहे का ? युक्तिवाद आहे का ?

म्हणून श्रद्धा हे एक साधन, साधन चतुष्ट्यांमध्ये घातलेले आहे. इंद्रियांचा निग्रह झालेला आहे, वासना कमी झालेल्या आहेत, सहनशीलता पुष्कळ आहे. आध्यात्मिक दुःख सहन करायची शक्तीही अभ्यासाने वाढली आहे. आणि श्रद्धा नसेल तर ? सगळी साधने एकत्र पाहिजेत ना ! त्या श्रद्धेचे, विश्वासाचे स्वरूप काय आहे हे समजून घेणेच मोठे कठीण काम आहे.

'धर्मशील महात्मे जे आहेत त्यांचं मला संरक्षण करायचंय आणि अधार्मिक प्रवृत्तीच्या लोकांचा नाश करायचाय,' हे भगवान् युद्धभूमीवर उभे राहून सांगताहेत. युद्धामध्ये ज्यांनी ज्यांनी भाग घेतलाय ते सगळे जाणार आहेत. एकमेकांच्याकडून एकमेकांचा नाश होईल. हे कालाचे काम चालूच आहे. उत्पन्न करणे आणखी विनाश करणे. धर्माधर्मादिक निमित्त पुढे करून धर्माचे रक्षण आणि अधर्माचा नाश चाललेला आहे. पुन्हा 'कालात्मा' श्रीहरी बाजूला आहे. ईश्वर हा बाजूला आहे. पक्षपाती नाहीये. तर मनाचा जो धर्म आहे तो कमी पडला. श्रद्धा कमी पडली. ज्ञानाच्या साधनांबद्दल – शब्दप्रमाण व प्रत्यक्ष प्रमाण - अविश्वास दाखविण्याचे कारण नाहीये. समोर डोळ्यांनी दिसतो आहे ईश्वररूपी परमात्मा. तो बोललेला ऐकायला येतंय. कान आहेत. डोळे आहेत. मन आहे. पण मनामध्ये एक बाजू कमी आहे. विश्वास म्हणून

जो बसायला पाहिजे तो बसत नाहीये. तो कोठून आणायचा! प्रयत्नांनी ते शक्य आहे का? प्रयत्नांनी श्रद्धा, विश्वास निर्माण करणे शक्य आहे का?

श्रद्धेबद्दलचे एक उदाहरण श्रीगुरुचरित्रामध्ये आलेले आहे. श्रद्धा कशी असली पाहिजे? मनाने आपला विचार बाजूला ठेवला पाहिजे. कानाने कोणाचा शब्द आपण ऐकतो आहोत. त्या शब्दामध्ये केवढी शक्ती आहे! हे त्या शब्दप्रमाणाकडे लक्ष देऊन डोळ्याने दिसणारे सुद्धा खरे मानायचे नाही. इतकी मनाची तयारी पाहिजे. त्याला अंधश्रद्धा म्हणतील लोक. म्हणू देत. पण शब्दप्रमाणाचा विचार चालू आहे. तो शब्द आम्हाला खरा वाटत नाहीये.

गाणगापूरमध्ये भगवान नरसिंह सरस्वती महाराज नरसोबावाडीहून राहाण्याकरता गेले आहेत. त्या आधी बारा वर्षे नरसोबावाडीत राहिले. पूर्वी तिथे अरण्य होते. कृष्णेच्या किनाऱ्यावर अष्टतीर्थे आहेत. एकांतवासात राहिले आहेत. आणि तिथून गाणगापूरला गेलेले आहेत. महाराज गाणगापूरला जाऊन संगमावर राहिले. संन्यासाश्रमात सर्व संगपरित्याग सांगितला आहे. जास्त काळ एका ठिकाणी राहायचे नाही. भिक्षा मागायला सांगितली आहे. शब्दप्रमाण मानणारी मंडळी आहेत. संन्यासाश्रम शब्दप्रमाणावर चालू आहे. धर्माधर्माचा विचार चालू असताना तर्क मुख्य नाहीये. परमेश्वराचे शब्दप्रमाण जे वेद, ते मुख्य आहेत. त्यांनी सांगितलेली धर्माज्ञा आहे. ज्ञानेश्वर महाराज सांगतात, 'शास्त्राने सांगितले राज्य सोडा, मग सोडले पाहिजे.' विष द्यायला सांगितले तरी घेतले पाहिजे.

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज नियमितपणे नरसोबावाडीला जाऊन रहात होते. कोल्हापूरचे प्रोफेसर एकदा महाराजांचा वाडीत मुक्काम असताना तिथे काही प्रसंगाने आले होते आणि भाषणाला उभे राहिले. महाराजांनी त्यांना सुरुवातीलाच बजावले, शंकराचार्यांच्या विरुद्ध तुम्ही तुमच्या भाषणात एक शब्दसुद्धा उच्चारायचा नाही. जर उच्चारलात तर मी इथून तत्क्षणी निघून जाईन, पण तेवढी वेळच आली नाही. त्या प्रोफेसरांनी महाराजांना नम्र अभिवादन करून सांगितले, 'महाराज, मी आचार्यांच्या ग्रंथांचा अभ्यास केला

आहे, तेव्हा त्यांच्याविरुध्द मी काहीही बोलणार नाही.' वेळ प्रसंगी ताकीद करून श्रध्दा निर्माण करावी लागते आणि ते सामर्थ्य अशा महात्म्यांच्या शब्दामध्येच आहे. आमच्याकडे हे सामर्थ्य नाही. आम्ही प्रचारासाठी जाऊन प्रचाराचा उपयोग होतो की नाही पाहू शकतो. नाही होत.

दत्तप्रभू संगमावरून रोज भिक्षा मागण्यासाठी गावात येत असत. त्या ठिकाणी एक ब्राह्मणाचे घर होते. त्याने गावात कोरान्न भिक्षा मागून आणावी; त्या भिक्षेत मिळालेल्या धान्याचा त्याच्या पत्नीने स्वयंपाक करावा. त्याने नैवेद्य, वैश्वदेव करून गावात कोणी अतिथी आलाय का पहावे. आला असल्यास त्याला आदराने घरी जेवायला बोलवावे. शांतपणाने सगळे काम चालायचे. ८ची लोकल गाडी पकडायचीये, ९वाजता ऑफिसात पोहोचायचेय, हे सगळे कसे जमणार ?

त्याचे हे धर्माचरण शब्दप्रमाण चाललंय. सर्व जीवांचे जन्ममृत्यू कालरूपी परमात्म्याच्या ताब्यामध्ये आहेत. त्या शब्दप्रमाणावर विश्वास ठेवून श्रध्दापूर्वक आचरण करणारे, ती श्रध्दा कायम टिकवणारे महात्मे पूर्वी होऊन गेले आणि आजही जन्म घेत आहेत. अजूनही आहेंत. त्या ब्राह्मणाच्या घरी एक वांझ म्हैस होती. तिला वासरू नसल्याने ती दूध देत नसे. त्यामुळे भार वाहण्यासाठी तिचा उपयोग करीत. गावातले लोकसुध्दा या ब्राह्मणाला मोबदला देऊन माती वगैरे वाहून नेण्यासाठी नेत असत. हा काही तो व्यवसाय म्हणून करीत नव्हता पण घरात म्हैस आहे ती कुठे सोडून द्यायची नाही, म्हणून हा उपयोग करीत होता.

भिक्षा मागून अन्न आणावे असा एक पक्ष आहे. अयाचित वृत्ती हाही एक पक्ष आहे. या अयाचित पक्षाप्रमाणे कोणाजवळही याचना करायची नाही. पण त्याला मनाचे फार धैर्य पाहिजे ना! देहात्मवाद ज्याचा बाजूला झालेला आहे तोच अयाचित वृत्तीने राहू शकेल. नाही तर याचना ठरलेली आहे. मोठे मोठे याचना करताहेत.आज सगळीकडे तेच पहायला मिळतंय. पैसा मिळणाराही याचना करतोय. आणि न मिळणाऱ्याचा तर प्रश्नच नाही. त्याने याचना केली

तर हरकत नाही. खायला अन्नच नसेल म्हणून मागितले तर तो दोष होणार नाही. पण याचना नाहीये! याच्या पाठीमागे श्रध्दा मोठी आहे. ज्याच्या मनामध्ये जगदंबेबद्दल, ईश्वराबद्दल पूर्ण श्रध्दा आहे तो मनुष्य याचना करू शकत नाही. तरीही वेदांनी सांगितलेले आहे, शब्दप्रमाण आहे. घरात नैवेद्य, वैश्वदेव करण्यासाठी, अतिथीला देण्यासाठी याचना करण्यास हरकत नाही. नैवेद्य, वैश्वदेव, अतिथी वगैरे सर्व देऊन जे अन्न उरेल ते ग्रहण करावे असे सांगितले आहे. त्या पवित्र अन्नाचे संस्कार मनावर होऊन मनातले दोष हळूहळू दूर होताहेत. कोणत्याही आजच्या विद्यापीठातून श्रद्धादिक गुण दिले जाणार नाहीत. विद्यापीठातून व्याख्याने दिली जातील पण श्रध्दा गुण जो मनामध्ये उत्पन्न करायचाय ती शक्ती तिथे नाहीये. कोणाच्याही शब्दामध्ये नाही. म्हणून कोणचा शब्द प्रमाण आहे आणि कोणचा अप्रमाण आहे हाही विचार करायचाय. कोणी सांगितलेले खरे मानून तेवढी श्रध्दा आमची उत्पन्न होती. आमच्या मनामध्ये ज्याच्याबद्दल अविश्वास असेल त्याला अनुकुल सांगणारा भेटला की आम्ही म्हणणार, "तुमचे म्हणणे बरोबर आहे. तुमचा युक्तिवाद बरोबर आहे. मला पटतो." पण ज्ञानेश्वरांसारखे मोठे मोठे ज्ञानी संत महात्मे आम्हाला जे सांगताहेत त्यांचा शब्द मात्र आम्हाला पटत नाही.

तर एके दिवशी महाराज त्या ब्राह्मणाच्या घरी भिक्षेला आले. त्यावेळी तो ब्राह्मण गावात कुठे भिक्षा मागायला गेला होता. त्याच्या पत्नीने महाराजांचे आदरातिथ्य केले. पत्नीला सहधर्मचारिणी म्हटले आहे. विवाहसंस्कार त्यासाठी आहे. धर्म, अर्थ आणि काम या तिघांची समध्दी, अनुकूलता पत्नीच्या योगाने होणार आहे. दोघांनी मिळून धर्माचरण करावे, अशी शास्त्राची आज्ञा आहे. शब्दप्रमाणापासून आपण किती बाजूला झालेलो आहोत. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये संघर्ष आहे. हित कोणते आणि अहित कोणते हे सांगणारे शास्त्र आहे. करवून घेत नाहीत. समजून देतात. पाटी लावलेली आहे. " हा रस्ता अमूक गावाला जातो" त्याअर्थी हा रस्ता अमूक गावाला जातो. प्रवासी मनुष्याने ती पाटी वाचून शंका घेतली, की ही पाटी खरी कशावरून असेल ?

म्हणतील, जा दुसऱ्या गावाला ! ती पाटी काही सांगत नाही माझ्यावर विश्वास ठेव म्हणून. ती असेही म्हणत नाही, की माझ्यावर विश्वास ठेवला नाहीस तर तुला पाहिजे असलेला गाव जन्मात भेटणार नाही. तो मनुष्य म्हणाला की पाटीने सांगितलेल्या दिशेने जाणार नाही, जाऊ नकोस. हिताहित सांगणे एवढेच काम आहे शब्दप्रमाणाचे. त्याप्रमाणे करणे हे आपल्या मनाचे काम आहे.

धान्यभिक्षा काय मागायची, किती मागायची हेही शास्त्राने सांगितले आहे ना ! नाही तर आपली पोती भरून ठेवलेली आहेत ! जास्ती संग्रह करायचा नाही हा कायदा पूर्वी करावा लागत नव्हता. हे आमचे शब्दप्रमाण आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात – वेदांनी, शास्त्राने विष जरी घ्यायला सांगितले तरी ते बरोबर आहे, घ्यायला पाहिजे. राज्य टाकायला सांगितले तरी टाकले पाहिजे. इतकी शब्दप्रमाण म्हणजे लष्करी आज्ञा आहे.

तर त्या गृहिणीने महाराजांना बसायला पाट दिला. म्हणाली, "माझे यजमान भिक्षा घेऊन आत्ता येतीलच. ते आले की मी स्वयंपाक करते." महाराज तिला म्हणाले, "बाई, तुमचे यजमान कधी येणार, तुम्ही स्वयंपाक कधी करणार ? तेवढा वेळ आम्ही थांबू शकणार नाही. तुमच्या दारात म्हैस बांधलेली दिसतेय. तिचे आम्हाला थोडेसे दूध जरी दिलेत तरी आमची भिक्षा झाली." 'विधीवशात् प्राप्तेन संतुष्यताम् !' अशी आचार्य महाराजांनी, संत महात्म्यांनी काय बहुमोल साधने सांगून ठेवली आहेत की ज्यांचा अभ्यास केला असता कितीही दोषांनी मन भरलेले असले तरी सुधारलेच पाहिजे. ही साधने म्हणजे प्रयोग आहे. धर्माचरण हे प्रयोग आहे. प्रयोग करून पाहिला पाहिजे. अगोदरच त्यात काही अर्थ नाही, अमूक नाही असे म्हणून उपयोग नाही.

"संन्याशाला काय अन्नच पाहिजे असे नाही. दूध दिले तरी चालेल." ती बाई म्हणाली, "महाराज, ती म्हैस तर दूध देणारी नाहीये. आज किती तरी वर्षे आमच्या घरामध्ये आहे. वासरूही नाही. दूध नाही. भार वाहण्यासाठी लोक नेतात. आम्हाला काही पैसे मिळतात. आमचा उदरनिर्वाह होतो." महाराजांना त्यावेळी काय वाटले कोणाला ठाऊक. पूर्ण शक्ती ज्या ठिकाणी

आहे त्या ठिकाणी संदेह कधीही असू शकत नाही. जे आपण बोलतोय तेच खरे आहे. आपल्या शब्दावर विश्वास आहे. हा अहंकार नसून आत्मविश्वास आहे. हा अहंकार होऊ शकत नाही. आपण जे बोललेलो आहोत, आपण जे विचार मांडलेले आहेत, आपण जे करतो आहोत ते बरोबर आहे. माझी चूक होणे शक्य नाही, ह्याला आत्मविश्वास म्हणतात. हा पूर्ण विश्वास कायावाचामनाने घडणाऱ्या आपल्या प्रत्येक कर्मावर असणे हे फक्त पूर्ण शक्तिसंपन्न मानवालाच शक्य आहे. इतरांना नाहीये. अपूर्ण शक्ती असणारा प्रत्येक ठिकाणी संशय घेत बसणार. हे होईल की नाही, हे कसे शक्य आहे?

महाराजांनी विचारले, "तुम्हाला तुमच्या म्हशीचे दूध आम्हाला द्यायचे नाही का?"

उत्तरेच्या गर्भात असणाऱ्या अभिमन्यूच्या मुलावर अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्राचा प्रयोग केलेला आहे. ब्रह्मास्त्र म्हणजे केवढे भयंकर असते. समोरचा शत्रू राहाणेच शक्य नाही आणि हा तर लहान बालक आहे. परंतु गोपालकृष्णांनी सांगितले, "जा. तुझ्या मुलाचे संरक्षण मी करणार आहे. काही घाबरण्याचे काम नाही." अर्जुनाला सांगताहेत, "तूं निघून जा. हे कौरव कोणीही जिवंत राहाणार नाहीत. या सर्वांचा नाश करायचा माझा संकल्प झाला आहे." इथे उत्तरेला सांगताहेत, "तुझ्या मुलाचे संरक्षण मी करणार आहे. जा. शांतपणाने जा. काही घाबरू नकोस." हा विश्वास आहे. त्यांचा तो शब्दही तशाच प्रकारचा शक्तिसंपन्न शब्द आहे.

या ठिकाणी ही स्त्री सांगते आहे, महाराज, दूध जर या म्हशीने दिले तर चांगलेच आहे पण ही म्हैस दूध देणारी नाही.' महाराज म्हणाले, 'तुम्हाला दूध द्यायचे नसेल तर राहू दे. आम्ही जातो. दूध काढून आणता का तुम्ही? द्या लवकर आम्हाला तापवून.' ही शक्ती त्या शब्दामध्ये कशी आली? संताच्या, महात्म्यांच्या वाणीतून निघालेल्या शब्दाच्या मागून अर्थ येतो म्हणतात. त्यांना आपले बोलणे खरे करण्याकरता वकील द्यावे लागत नाहीत. आता या ठिकाणी मनाचे काम आलेले आहे. शब्दामध्ये काही शक्ती आहे त्याचा उपयोग पुढे झाला

आहे.

महाराज सांगताहेत, म्हशीचे दूध काढून आणायला. पण प्रत्यक्ष परिस्थिती विरुद्ध आहे ना! आज किती दिवस म्हैस घरामध्ये आहे? एक दिवस एक थेंबभरही दूध या म्हशीने दिलेले नाही, हे आपण डोळ्यांनी पाहतो आहोत. बर बहुमतही आहे. एक मतानी निर्णय नाही. गावातल्या सर्व मंडळींना विचारले तरी ते सांगतील की, या म्हशीने दूध कधीच दिलेले नाही. म्हणजे बहुमतही आहे. तर हे सगळे शब्दांनी सांगणे आहे. डोळ्यांनी पाहूनही सांगतील की म्हैस दूध देणारी नाही.

पण इथे शब्दप्रमाण सामान्य नाहीये. पूर्ण स्थितीमध्ये असलेला साक्षात् परमात्मा संन्यासी वेषामध्ये आलेला आहे. तो म्हणतोय, दूध लवकर काढून द्या. प्रत्यक्षाच्या विरुद्ध शब्द आलेला आहे.

सद्गुरु महाराज अलर्काला विचारताहेत, "तू संसारी नाहीस. तुला दुःख झाले? कोणाला दुःख आहे?" हे शब्द श्रीदत्तात्रेयांच्या मुखातून निघाल्याबरोबर अलर्काचे अंतःकरण एकदम अंतर्मुख झालेले आहे. 'माझे राज्य गेले, मी दुःखी आहे,' म्हणून तो शरण आलेला आहे. 'कोण दुःखी आहे? तू म्हणजे कोण आहेस?' एवढे विचारले. बाकी काही नाही. या शब्दांच्या उच्चाराबरोबर त्याचे मन अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोशातून एकदम त्या आनंदापर्यंत जाऊन पोहोचले. 'अहम्' कोण हे लगेच समजले आहे. आणि 'अहम्' आनंदरूप आहे. निर्विकार मी आहे, द्वंद्वातीत मी आहे. मला कसले सुख दुःख? कशाला मी आलो महाराजांच्याकडे, उगीच काही तरी प्रार्थना करायला? मला दुःख असेल तर दूर करायचे ना! ही ज्या शब्दामध्ये शक्ती आहे ती समजून घेण्याची योग्यता, पात्रताही मनामध्ये असली पाहिजे. त्याशिवाय उपयोग नाही. "एक तरी ओवी अनुभवावी" नामदेव सांगताहेत. संत महात्म्यांचे अंतःकरण केवढे मोठे आणि निर्वासन आहे! वाणीचे तप आहे. सत्यवादाचे तप किती तरी केले असल्याचे ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. वाणीने असत्याचा कधीच उच्चार केला नाहीये.

अशा वाणीमध्ये अशी शक्ती येते की जे बोलले ते खरेच होणार! म्हणून या स्त्रीच्या अंतःकरणामध्येसुद्धा बदल झालेला आहे. आपल्या घरातल्या म्हशीला वासरू नाही. तिने एक दिवससुद्धा दूध दिले नाही. असे असताना तिचे दूध कसे काढायचे? सर्व संशय दूर करणे हे त्या शब्दाचे सामर्थ्य आहे. ईश्वराचा शब्द आहे. प्रत्यक्ष डोळ्यांनी खोटे दिसतंय. डोळ्यांनीच पाहिलेले खोटे आहे. शब्दांनी महाराज जे सांगताहेत तेच खरे आहे. आपणच इतके दिवस समजून घेतले नाही. आपल्याला कोणी समजावून सांगितले नाही. म्हैस दूध देणारी आहे. हे शब्दाचे महात्म्य आहे. मनाला का पटत नाही? कारण मनामध्ये संदेह निर्माण होतो. डोळ्यांनी पाहून, महात्म्यांचा शब्द ऐकूनसुद्धा त्या शब्दाचा अर्थ आमच्या मनामध्ये राहात नाहीये.

त्या स्त्रीचे पूर्व सुकृत किती असले पाहिजे की, प्रत्यक्षप्रमाण विरुद्ध असताना त्या स्त्रीचा त्या महाराजांच्या शब्दावर विश्वास बसला. हा निर्णय त्या स्त्रीने घेतलेला आहे.

परिषदा पुष्कळ होतात, पुष्कळ चर्चासत्रं होतात, पण असा संदेह दूर करणारा निर्णय त्या चर्चासत्रातून कधीही घेतला जात नाही.

इथे तर प्रत्यक्ष प्रमाण असे आहे की, महात्म्यांच्या शब्दावर विश्वास बसू नये. वासरू नाही तेव्हा दूध कसे काढायचे? हा देखील विचार तिच्या मनामध्ये आला नाही. ती भांडे घेऊन दूध काढायला गेली आहे. म्हशीने दूध दिलेले आहे. ते आणून तिने महाराजांना दिले. मनातले सगळे प्रतिबंध दूर करून इतकी श्रद्धा उत्पन्न करण्याचे सामर्थ्य महाराजांच्या शब्दात आहे. अशा मनाला कर्तृत्व अभिमान शिल्लक राहील काय? महाराजांना, 'मी दूध दिले' असे ती बाई बोलेल काय? अनुभव आलेला आहे. योग्यता नसतानासुद्धा योग्यता देऊन विश्वरूप दाखविल्यावर अर्जुन म्हणेल का, "या सर्वांना मी मारणार आहे!"

त्या स्त्रीची कायमची संदेहनिवृत्ती झाली की नाही असे आमच्या मनात येईल. कशी का असे ना! पण कार्य झालेले आहे. महाराजांच्या आज्ञेचे

पालन केल्यामुळे आजपर्यंत ज्या म्हशीने दूध दिले नाही तिने दूध द्यायला सुरुवात केली आहे. दूध घेऊन महाराज निघून गेलेले आहेत. त्यांच्या मनामध्ये या घटनेचा कोणताच विचार नाही. प्रचार करायचा नाही. आपल्या पूर्ण शक्तीवर ज्या महात्म्यांचा विश्वास आहे, त्यांना प्रचार करायची काय जरुरी आहे? ज्यांचे भाग्य असेल, पूर्व सुकृत असेल त्यांची संदेह निवृत्ती होऊन त्या मनावर आपोआप परिणाम होतो. हेही त्या शब्दांचेच सामर्थ्य आहे.

सबंध गावामध्ये या घटनेला प्रसिद्धी मिळाली. कालपर्यंत दूध न देणारी म्हैस आज कशी दूध द्यायला लागली? महात्म्यांचा शब्द खरा आहे, असे तेवढ्यापुरते तरी लोकांना वाटायला लागले. या बाईची श्रद्धा निमित्त झाली. दूध काढायलाच गेली नसती तर काय झाले असते! 'रोज मी तिला बघते आहे, तिने कधीही दूध दिलेले नाही. तुम्ही काय सांगता?' असे जर ती म्हणाली असती तर महाराज म्हणाले असते, 'जाऊ दे' आणि निघून गेले असते. पण कालरूपी परमात्मा कुठे कुठे अनुकूल आहे. धर्माचरण ज्यांचे झाले आहे त्यांना तो धर्म असा उपयोगी पडतो आहे. महात्मा कोणी तरी आलेला आहे आणि त्याचा शब्द खरा मानला पाहिजे, ही भावना त्या धर्माचरणानेच उत्पन्न होऊ शकते. हे अशाच बुद्धीला वाटेल, की ज्याचे धर्माचरण पुष्कळ काळ झालेले असेल. तो धर्म सहाय्यक आहे.

तर गाणगापुरामध्ये महाराज गेल्यानंतर पहिल्या प्रथम घडलेली ही घटना आहे. ही बुद्धी तयार करण्याची शक्ती महात्म्यांची आहे.

परमात्म्याला तू शरण जा, बाबा. अहंकार सोडून दे. त्याचा प्रसाद झाला म्हणजे शांती मिळते. तुझ्या मनांतले सगळे विचार दूर होऊन मन अगदी शांत होईल, स्थिर होईल, निश्चल होईल. जे स्थिर करणे मोठ्या मोठ्या योगाभ्यास करणाऱ्यांनाही असाध्य वाटते. त्यासाठी फक्त ईश्वराचा प्रसाद पाहिजे. म्हणून या सगळ्या ऋषी मंडळींच्या संरक्षणाची योजना भगवतीने केली आहे. आपले सुदर्शन चक्र त्यांच्या रक्षणासाठी ठेवले.

देहात्मवाद हा सगळ्यात मोठा आहे. चार्वाक म्हणजे लोकायतवाद

म्हणतात. लोकायत म्हणजे 'लोके आयतम्.' लोकांमध्ये फार पसरलेले आहे. याचे कारण तात्कालिक आणखी पटणारे आहे. 'देह मी नाही' असे कधीच कोणाला वाटत नाही. देह म्हणजेच आपण आहोत, देहाचे संरक्षण करावे, वगैरे चार्वाकांचे सगळे युक्तिवाद आहेत. ऋण काढून चांगले चुंगले खावे, प्यावे, देह चांगला वाढवावा. ऋण फिटले नाही तरी हरकत नाही. फेडू नये. असाच उपदेश आहे त्यांचा. नीतिअनीती, धर्मअधर्माचा काही उपयोग नाही. आपल्या सन्निध एक ईश्वरी शक्ती आहे, असे मानले तर देहात्मवाद कमी होऊन जातो. देह म्हणजे मी आहे. अशी आसक्ती निर्माण झाल्यावर त्याच्या संरक्षणाची काळजी आली. इथे काहीच नाही. भक्तिमार्ग हा काळजीतून मोकळे करणारा आहे. ईश्वराचे आस्तिक्य मानले म्हणजे सगळे पराधीन होतील, आपला प्रयत्न कोणी करणार नाहीत वगैरे वगैरे बुद्धीवाद आपण ऐकतो. छापले जाते, ऐकले जाते. तेवढयापुरतेच ते. त्याचा प्रचार काही होत नाही कुठेही. देवाच्या दर्शनाला जाणारे जातातच. व्याख्यान देणारे असे बुद्धीवादी लोक माउलीची पालखी लकडी पुलावर आल्यावर ती पहायला येतात. इकडे तिकडे पहात असतील. व्याख्यानात आपण काय बोललो आणि इथे कसे येतो. पण त्यांना वाटते. सातशे वर्षे त्या महात्म्याचे महत्त्व अखंड चालू आहे. कोणीही प्रचारक नाहीये. प्रचारक लागत नाही. सिद्ध महात्म्यांना प्रचाराची जरूरही नाहीये. ईश्वराच्या आज्ञेने ते कार्य चाललेले आहे. ईश्वराचे कार्य आहे. त्याची आज्ञा आहे. निरअहंकार वृत्ती आहे. विद्यार्थीही पुष्कळ येतात ती पालखी बघायला. बालबुद्धि आहे. श्रद्धा आहे. त्या श्रद्धेची जोपासना झाली पाहिजे, तर ते कार्य पुढे दिसून येईल.

तर अशा रीतीने शब्दप्रमाण हे आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये मुख्य आहे. सर्व संतांना ते मान्य आहे. सर्व आचार्यांना ते मान्य आहे. सर्व ऋषी मंडळींना ते मान्य आहे त्यामुळे ते शब्दांचे, वेदांचे ज्ञान आपल्याला असावे असे त्यांना वाटते. हे त्यांचे अखंड तप चालू आहे आणि त्याप्रमाणे आचरणही चालू आहे. पटत नाही वगैरे काहीही विकल्प मनात नाहीत. बरोबर सगळे चाललेले

आहे. पिता जसा वागतो तसाच मुलगा वागतो. घरामध्ये तसेच वळण लागते, संस्कार होतात. आम्हाला काही (पाश्चिमात्य) लोक मागासलेले म्हणतात. जे ऐकले त्याप्रमाणे वागण्याची प्रवृत्ती हा मागासलेपणा आहे? का पुढारलेपणा आहे? ती पुढे गेलेली बुद्धी आहे. श्रेष्ठ पुरुषाचा शब्द ऐकला पाहिजे आपण. आपण त्यांच्याइतका विचार करू शकत नाही. हे विचारांनी ऐकणे निराळे परंतु ऐकणे आपले कर्तव्य आहे, सांगणारा महात्मा आपला हितकर्ता आहे, ही भावना मनामध्ये असल्या कारणाने नियामक जरी असले तरी त्यांच्यामध्ये कधीही संघर्ष नव्हता.

शब्दप्रमाण आज संपलेले आहे. कोणाचेही शब्दप्रमाण मानावयाची प्रवृत्ती झालेली आहे आज. ती सुद्धा टिकणारी नाही. मोठ्या मोठ्या नेत्यांचे ऐकून त्यांचे अनुयायी व्हायचे आणि काही दिवसांनी त्यांचे म्हणणे आम्हाला पटत नाही सांगून दुसऱ्या पक्षात जायचे. कोणाचे शब्दप्रमाण मान्य आहे? अशी बुद्धी चांगली काय? आणि याला पुढारलेली बुद्धी म्हणायचे? कोणीही सांगणारा श्रेष्ठ पुरुष आहे आणि त्याचा शब्द मान्य करायचा? पटत नाही वगैरे म्हणायचे नाही. आज्ञापालन करणे हा केवढा मोठा गुण आहे! शब्द नकोच आम्हाला. तुम्ही कोण सांगणार? असे जर समाजातील प्रत्येक व्यक्तीने म्हणायला सुरुवात केली तर राजशासन नियंत्रण करू शकेल का? आपल्या संस्कृतीमध्ये प्राचीन कालापासून शब्दप्रमाण मानून आज्ञापालन चालत आलेले आहे. प्राणाचा निरोध करून आयुष्य वाढवून तप करणारे मोठमोठे महात्मे आपल्या देशात होऊन गेले. देहात्मवादाचा ते असा उपयोग करीत होते. म्हणून देहात्मवादी जीवांच्या भक्तांच्या करता भगवती जगदंबा अवतार घेऊन आली. त्यांना सुद्धा आमच्याबद्दल दया उत्पन्न होण्याचे कारण हे आहे. आमचे अज्ञान आहे. न मानण्याचा स्वभाव आहे. ज्यांना निर्माण केले त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी पत्करलेली आहे आणि तेही जीव गुणी आहेत. ती गुणग्राहकता पूर्ण आहे. वात्सल्य आहे. काही जीवांकडे धर्मशील बुद्धी आहे. धर्माकरता देहत्याग जरी करायचा प्रसंग आला तरी करू शकतात. असा पुण्यवान एखादा

जीव, एखादी व्यक्ती जरी असली तरी तिच्याकरता अवतार होतात. प्रल्हाद एकटाच होता. प्रल्हादाच्या बाजूला कोणता समुदाय होता ? हिरण्यकश्यपूच्या बाजूला तर सगळे लोक होते. दैत्य तर होतेच पण देवसुद्धा त्याच्या बाजूने होते कारण त्याच्या विरुद्ध कोणीच बोलू शकत नव्हता ना. प्रल्हाद एकटा आहे परंतु त्याची श्रद्धा, त्याची भावना फार मोठी आहे. विशाल मन आहे. हिरण्यकश्यपूने विचारले, "तुझा ईश्वर सर्व ठिकाणी आहे, मग या खांबात का दिसत नाही ?" प्रल्हाद म्हणाला, "मला दिसतोय. खांबात नाही असे कसे म्हणणार ?"ज्याला अनंत म्हटलेले आहे असा परमात्मा सर्व ठिकाणी आहे. ज्याला अंत म्हणजे मर्यादा नाही. अमूक कालामध्ये आहे, अमूक देशामध्ये आहे हे जीवाबद्दल बोलावे लागते. सर्व कालामध्ये, सर्व देशांमध्ये जीवात्याचे महत्त्व राहू शकत नाही. जीव अहंकारग्रस्त आहे आणि अहंकार ज्यांचा नाहीसा झालेला आहे, असे ईश्वररूप झालेले महात्मे अनंत, सर्वत्र आहेत. खांबात तुम्हाला दिसत नाही. मला दिसतोय.

**कोरडीये खांबी ठेवता भावो।**
**तेथेची प्रगटला देवाधिदेवो ।।**

परमार्थामध्ये सद्भावनेला फार महत्त्व आहे. नाथमहाराजांनी परमार्थाचे मोठे साधन सांगितले की, 'ईश्वर सर्व ठिकाणी आहे, तो मला पाहील' ही बुद्धी पाहिजे. मला शिक्षा करील. जर खरी ईश्वर भावना असेल तर पाप दूर होईल. प्रचारी भावना उपयोगी नाही. कायदे कितीही केले तरी पाप कमी होणार नाही.

शब्दप्रमाण फार मोठे आहे आणि त्याला जपणारे ऋषी आहेत. त्या ऋषींना वाटतंय वेदज्ञान आपल्याजवळ राहिले पाहिजे. वेदज्ञानाबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारे आहेत. पवित्रपणे त्यांचे चिंतन करणे, श्रवण करणे, अखंड त्यांच्यामध्ये निमग्न होणे, तो विद्यानंद घेणारे लोक आहेत. त्या विद्यानंदामध्ये मन, बुद्धी गुंतून गेले असता तहान, भुकेचा विसर पडतो. ईश्वरभावना अंतःकरणामध्ये उत्पन्न झाल्यानंतर शरीराची काळजी रहात नाही. क्षुधा - तृषेसारखे शरीराचे धर्म विसरून जाताहेत. तुकाराम महाराजांची 'जय

जय रामकृष्णहरि,' म्हणायला एकदा भंडारा डोंगरावर सुरुवात झाली की संपले सगळे! देहसुद्धा नाहीसा होतो आहे. हे भगवत् प्रेमाचे महत्त्व आहे. ते महत्त्व सांगणारे महात्मे भारतवर्षामध्ये आपल्याला अजूनही भेटतील. त्यांचे ग्रंथ आहेत. ग्रंथरूपाने ते आजही आहेत. त्यांच्या शद्बांवर श्रद्धेने आमच्या मनामध्ये विश्वास मात्र निर्माण झाला पाहिजे. ईश्वराने कृपा केली पाहिजे म्हणजे त्यांच्या शद्बाच्या सामर्थ्याने आमच्या बुद्धीतील सारे दोष दूर होतील.

**'किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनी तिन्ही लोकी ।**
**भजिजो आदि पुरुषी, अखंडित ।।'**

ते भजन करा म्हणून कळकळीने सांगताहेत.

याच्यानंतर त्या दुर्गम दैत्याचा नाश केला. त्या शताक्षी देवीच्या शरीरातून अनेक शक्ती निर्माण झाल्या. एक देवी आहे, आपण केव्हाच तिचा नाश करू असे तो समजत होता; पण नाही. तिच्यापासून अनेक शक्ती निर्माण झाल्या आणि त्यांनी दुर्गम दैत्य व त्याच्या सैन्याचा नाश केला. पुन्हा सबंध वेदज्ञान स्थिर झालेले आहे. ऋषी मंडळींच्या मनाचे समाधान झाले हे चरित्र झाले.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

व्यास महर्षी जनमेजयाला सांगतात, त्या दुर्गम दैत्याला विरोध करणारा आत्तापर्यंत निर्माण झाला नव्हता. तपश्चर्याही त्याने पुष्कळ केली. ब्रह्मदेवांनी वर प्रदान केला आणि त्याच्या इच्छेप्रमाणे सर्वही ऋषींचे वेदज्ञान त्याच्याजवळ आले. म्हणजे ऋषींचे ज्ञान लुप्त झाले. त्यांच्या बुद्धीवर काही परिणाम झाला आणि त्यांचे ज्ञान नाहीसे झाले असे म्हणायला हरकत नाही. कर्म नाही, ज्ञान नाही. त्यामुळे सर्वही ऋषीमंडळी चिंताक्रांत झाली होती. त्या असुराचे काम झालेले आहे. दुसऱ्याचे दुःख पाहून समाधान मानणे याचेच नांव 'असुर' आहे. आपल्यापुरते सुख असावे, आपल्याला बरे म्हणणारी, आपल्याला अनुकूल असणारी मंडळी सुखी व्हावीत. एवढीच इच्छा आहे. 'हे विश्वची माझे घर' ही वृत्ती कोणीकडे आणि आपल्या स्वतःपुरतेच सुख मिळावे अशी असुरी वृत्ती कोणीकडे ?

दैवी संपत्ती आणि असुरी संपत्ती यांचा भेद भगवंतांनी मुद्दाम दाखवलेला आहे. दैवी संपत्ती पाहून ती मिळवण्याची इच्छा असुरांना होत नाही. ती दैवी संपत्तीच नष्ट व्हावी अशा प्रकारची भावना आहे मनामध्ये. पण सर्व

दैवी संपत्ती देणारी ईश्वरशक्ती आहे. संरक्षण करणारीही तीच आहे ना! दैवी संपत्तीच आपल्याला मिळावी म्हणून प्रयत्न करणारे जे जीवात्मे आहेत त्यांनी सर्व भार त्या ईश्वरशक्तीवर टाकलेला आहे आणि त्यांना तशी तळमळही आहे. 'सर्वेपि सुखिनः संतु' ही भावना मनामध्ये निरंतर रहावी अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या एकट्यालाच सुख मिळावे अशी भावना नाहीये.

काही कालपर्यंत या असुरांची इच्छा पूर्ण झाली. परंतु त्याने केलेली तपश्चर्या ही सकाम आहे. मनामध्ये अत्यंत दुर्विचार, अशुभ वासना बाळगून त्याने तपश्चर्या केलेली आहे. त्याने त्याचे जे फळ मिळविले त्याचा नाश ठरलेला आहे. नित्य सुख किंवा समाधान अशा अशुभ वासनेने मिळत नाही. दुःखाची निवृत्तीही अशाने होत नाही. जरी आपण सुखी झालो असे वाटले तरी ते जाण्याची पाळी आलेली आहे.

देवीचे संरक्षण सर्व लोकांना मिळाले. ऋषी मंडळी, ब्राह्मण मंडळी आणि देव यांचे संरक्षण कोणीही करू शकणार नाही अशी जी त्या असुराची कल्पना होती ती दूर झाली आणि देवी युद्धाकरता आली. तिकडे ते देवीचे सुदर्शन चक्र सर्वांना सुरक्षित ठेवते आहे. असुरांचीच अशी अशुभ इच्छा असते असे नाही तर देवांचीही असते. वासनारूपाने, संस्काररूपाने जर देवांच्या मनात विकार असतील तर त्यांचीही इच्छा त्या असुरांसारखीच आहे.

इंद्राची परीक्षा पाहाण्याकरता भगवान् गोपालकृष्णांनी उपदेश केला तो शास्त्राप्रमाणेच आहे. पण तो नास्तिकवाद आहे असे आपल्याला वाटेल. ते गोपाल इंद्राची पूजा करीत होते. इंद्र म्हणजे काही सर्वेंद्रिय नाही. 'ईश्वर नाही' असे त्यांनी सांगितले नाही. पण सामान्य उपदेश करताना म्हणाले, 'कशाला करता इंद्राची पूजा? ज्या इंद्राला तुम्ही ईश्वररूप समजता तो ईश्वर कधी तरी तुम्ही पाहिला आहे का? आणि तुम्ही पूजा केली, यज्ञ केला म्हणजे ईश्वर फल देणार. ज्याने पूजा केली नाही, यज्ञ केला नाही, त्याला काही ईश्वर फल देत नाही, इंद्र फल देत नाही.' म्हणजे कर्म हे मुख्य आहे हा सिद्धांत त्यांनी मांडला. शास्त्रीय सिद्धांत भिन्न भिन्न आहेत. त्यांच्या भूमिकाही मोठ्या आहेत.

वेदशास्त्र, शब्दब्रह्म ज्याला म्हणतात ते ईश्वराचे स्वरूप आहे. त्या शास्त्राने जी कर्मे सांगितली आहेत, त्या कर्माकडे लक्ष द्यायला पाहिजे. हा एक मोठा सिद्धांत आहे. ईश्वर वगैरे जगात कोणीही सर्वज्ञ असू शकत नाही, असं म्हणणारे मीमांसक आस्तिकच आहेत. वेद मानणारे आहेत, मीमांसक. पण त्यांनी शब्दप्रमाण, शब्दब्रह्म हे स्वरूप मानले आहे. परब्रह्म बाजूला ठेवलेले आहे. तेव्हा त्या शब्दप्रमाणाने, वेदांनी सांगितलेले जे कर्तव्यकर्म आहे ते प्रत्येक जीवाने करायचे. फल देणारा ईश्वर आहे, असे जरी मानले तरी कर्म केल्यावाचून तो फल देत नाहीये. म्हणजे कर्म हेच मुख्य ठरते, म्हणाले.

नंदादिक गोपालांना हा उपदेश करताहेत भगवान. आमचे कर्म म्हणजे गायींचे संरक्षण करणे. जे कोणी ज्ञानी महर्षी असतील त्यांची पूजा करणे. त्यांचा सत्कार करणे, हे आपले कर्म. आणि हा गोवर्धन पर्वत आहे. याचीच पूजा करा, गायींची पूजा करा. वैदिक संस्कृतीमध्ये पशूंचीसुद्धा देवरूपाने पूजा करतात. दत्तात्रेयांच्याजवळ कुत्री आहेत. त्याही देवता आहेत. ज्या संस्कृतीमध्ये पशूंच्या ठिकाणी देवत्व बुद्धी ठेवली जाते त्या संस्कृतीमध्ये मानवांच्याबद्दल अनादर आहे, विषमता आहे, हा दोष आहे असे कसे समजता येईल ?

इथे देवाचे स्वरूप समजण्यामध्ये थोडा घोटाळा झाला आहे. इंद्र त्रैलोक्याचा राजा आहे. त्याची पूजा आपण केली पाहिजे म्हणून सगळे गोपाल यज्ञ करीत होते. गोपालकृष्ण म्हणाले, "इंद्राचा काही संबंध नाही. आपण आपले कर्म करायचे. ईश्वर भावना धारण करून ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करणे ही मोठी भूमिका आहे." त्या भूमिकेपर्यंत ज्याची बुद्धी पोहोचू शकत नाही, त्याला कर्मामध्ये थांबवलेले आहे. आणि त्याचे प्रमाण म्हणजे शब्दप्रमाण. तोच ईश्वर आहे. शब्द हीच देवता आहे.

जेमिनी महर्षी मीमांसाशास्त्राचे सूत्रकार आहेत. ते काही सामान्य नाहीयेत. कर्मापर्यंत जीवांची बुद्धी आणून सोडली. कर्तव्य कर्म करा. आणि 'गोवर्धन पर्वत हा ईश्वर नाही का ?' म्हणाले. "प्रत्यक्ष दिसतोय तुम्हाला.

त्याचा उपयोग होतोय. तुमच्या गायींना वाटेल तितके गवत मिळते आहे, गुहा आहेत राहायला. मोठे मोठे वृक्ष आहेत. आपले पालन पोषण करणारा हा पर्वत आहे. हाच ईश्वर समजायला काय हरकत आहे ? '' हा एक विचार त्यांनी मांडलेला आहे. इंद्र पर्जन्य देत नाही असेही सांगताहेत.

सांख्यशास्त्रकारांनी त्रिगुणात्मक विश्व मानले ईश्वराला. पण उदासीन असणारे असे दोन प्रमुख शास्त्रकार आहेत. सहा दर्शनांपैकी सांख्यशास्त्रकार आणि मीमांसाशास्त्रकार. कर्माबद्दल, कर्म सांगणाऱ्या वेदांबद्दल आदरबुद्धी निर्माण झाली पाहिजे हा त्यांचा उद्देश आहे. सांख्यशास्त्राप्रमाणेसुद्धा आत्मानात्म विचार करायचाय. परमात्मा कशाला पाहिजे, म्हणतात. अगोदर आत्मस्वरूप तरी समजू दे की. आधी जीवात्म्याला स्वतःचे स्वरूप समजू दे. मग परमात्म्याचे पहाता येईल. नाहीतर बुद्धीत गोंधळ होऊन जाईल. परमात्म्याचे स्वरूप पुढे पहाता येईल. वेदांतशास्त्र त्याकरता आहेच.

सत्त्व, रज व तम अशी त्रिगुणात्मक प्रकृती आहे. क्रिया रजोगुणाचे स्वरूप आहे. शरीराच्या आत, बाहेर, सर्व ठिकाणी आपल्याला जी क्रिया दिसते ती रजोगुणाचा परिणाम आहे. रजोगुणाचे कार्य आहे. मेघ आकाशात येतात, इकडे तिकडे जातात, त्यांच्यापासून पाऊस पडतो हे रजोगुणाचे कार्य आहे. रजोगुण म्हणजे रज नावाचा एक मोठा पदार्थ आहे. सृष्टीच्या मूळ कारणामध्ये तो आहे. सर्वत्र आहे. सत्त्व, रज आणि तम हे तीन पदार्थ कुठे नाहीत असे नाही. तीनही पदार्थ जीवांच्या शरीरामध्ये आहेत,इंद्रियांमध्ये आहेत, सर्वत्र आहेत. त्रिगुणापासूनच सर्व विश्व उत्पन्न झाले आहे. क्रियाशक्ती म्हणजे रजोगुणाचे स्वरूप आहे. त्यामुळे पाऊस पडतो. गोपालकृष्ण म्हणाले, "मेघ इंद्राच्या आज्ञेने येतात आणि पाऊस पाडतात हे तुम्हाला कोणी सांगितले ? '' युक्तिवाद आहे हा. इथे सर्व विश्व परमेश्वरस्वरूप वगैरे हा विचार नाहीये. तो करायचा नाही इतक्यात. अगोदर इतके तरी समजू दे. ते सगळे भौतिक आहे. त्रिगुणात्मक सगळे आहे. ते दिसते तसे आहे. खरे आहे. खरेही समजा. आणखी आत्मस्वरूपाचा विचार करा. देवता वगैरे समजून तुम्ही त्याच्या

पाठीमागे लागून कर्म सोडायला लागलात तर कसे व्हायचे ? 'यथा सांग ते कर्म काही घडेना।' हे जे समर्थ सांगताहेत ते या सिद्धांताप्रमाणेच सांगताहेत.

ईश्वराची पूजा तुम्ही करता ती यथासांग होते का ? कोणचे कर्म यथासांग होते ? ईश्वर दयाळू आहे. आमच्या शक्तीप्रमाणे केलेली पूजा त्याला मान्य होते. ईश्वर मानायचा असेल तर त्याच्या भीतीने त्याप्रमाणे त्याची आज्ञा पालन केली पाहिजे. इतकी तयारी आहे का मनाची ? त्यापेक्षा जीवात्म्याचेच स्वरूप समजून घ्या, असे सांख्य म्हणतात. निरीश्वर सांख्य त्यांना म्हणतात. ते आस्तिक आहेत पण त्यांनी भूमिका अशी घेतली आहे.

श्रीकृष्णांची वाणी आहे. सर्व गोपालांना ते पटलेले आहे. श्रीकृष्णांना इंद्राला राग येतो की नाही पहायचंय. देवेंद्र आहे. त्रैलोक्याचा राजा आहे. श्रीकृष्णांना माहीत आहे, कारण त्याची नियुक्ती श्रीकृष्णांकडूनच झाली आहे. तोही मोठा शंभर यज्ञ करून आलेला आहे. कर्म मानणारा आहे तो. या सर्व गोपालांचे पालन करणे, हे त्याचे कर्तव्य आहे. क्षमा करणे हेही कर्म आहे. चूक झाली की लगेच हे बरोबर नाही म्हणून शिक्षा करणे, शक्ती असली म्हणजे दंड करणे हेही बरोबर नाहीः बुद्धीचा निग्रह पाहिजे, नियंत्रण पाहिजे. त्या देवेंद्राची मनःस्थिती कशी आहे हे पहाण्याकरता गोपालकृष्णांनी गोकुळामधल्या सर्वांची बुद्धि फिरवली.

श्रीकृष्णांनी त्यांच्या बुद्धीचे परिवर्तन केले. शास्त्रामध्ये, धर्मामध्ये परिवर्तन केले नाही. गोवर्धन पर्वत, गायी, ऋषी मंडळी यांची पूजाही शास्त्राने सांगितलेली आहे. श्रीकृष्णांनी 'इंद्राच्या यज्ञात बदल करा,' असे काही सांगितले नाही. 'सध्या हा यज्ञ राहू देऊ. ज्या सगळ्या गायींचे तुम्ही पालन करता, दूध-दह्याकरता उपयोग करता हाच परमेश्वर आहे. त्यांच्याबद्दल ईश्वर भावना ठेवा.' एवढेच सांगितले. परिवर्तन, बदल नाही.

सगळीच सृष्टी भगवंताची आहे. नेमलेल्या अधिकाऱ्याची – देवेंद्राची परीक्षा पहायची आहे. परीक्षा घेण्याचे सामर्थ्य पूर्ण आहे. इंद्राला राग आला तर काय होईल ते पहाता येईल. इंद्र रागावून काय करणार आहे ते पाहू पुढे.

अनुभवाला येणारा आणि उपयोगी पडणारा तो ईश्वर आहे. प्रत्येक वर्षी तुम्ही इंद्राचा यज्ञ करता, कधी तरी इंद्र तुम्हाला येऊन भेटलाय काय? तुम्ही चांगले करता वगैरे म्हणून तुम्हाला प्रोत्साहन दिलंय का? मग इंद्राला का मानायचे?

हे सर्व एकंदर आटोपल्यानंतर इंद्राला राग आलेला आहे. त्याला वाटले, कोण हा एक गवळ्याचा मुलगा कृष्ण आणि त्याने उपदेश करून माझी पूजा बंद केली? वास्तविक गवळ्यांच्या मनातील इंद्राबद्दलचा आदरभाव गेला असे नाही. पण हे जे त्यांच्यासमोर ईश्वराचे स्वरूप आहे, त्याची पूजा केली तर इंद्राला राग येण्याचे कारण काय आहे? गायींची पूजा इंद्राला मान्य नाही का? ऋषींची पूजा इंद्राला मान्य नाही का? गोवर्धन पर्वतही साक्षात् ईश्वराचे स्वरूप आहे. हे इंद्राला मान्य नाही? मग राग येण्याचे कारण काय?

'माझी पूजा बंद केली,' हा अहंकार आड आलेला आहे. इंद्र देवेंद्र जरी असला तरी सर्व विश्वामध्ये चालू असलेले त्याचे कार्य अहंकाराचे आहे. आणि त्याच्याशी जीवात्मा अगदी संबद्ध झालेला आहे. 'मीच सगळे करतो,' असे तो समजतोय. तो अहंकार सगळं करतोय. परमेश्वराने त्याला प्रेरणा करून सगळ्या जगाचे कार्य चालवलेले आहे. अंतःकरणाशी, बुद्धीशी ज्याचा संबंध आहे ते प्रत्येक अहंकाराला कसे कसे खेळवायचे, सृष्टीचे कार्य चालवायचे हे फक्त पहाताहेत.

देवेंद्राच्या मनात क्रोध उत्पन्न झाला आणि सर्व गोकुळाचा त्याने नाश करायचे ठरवले. त्यात गायी, बायका, पुरुष सगळे आले. पुरुषांनी चूक केली असेल, बायकांचा त्यात काय अपराध? आपल्या शक्तीचा प्रयोग पुरुषांवर करायचा होता. बायका किंवा गायी वगैरेंना कशाकरता त्रास द्यायचा? यांच्या बुद्धीत काही इंद्राबद्दल अनादर नाहीये. पण 'दुसऱ्याची पूजा केली आणि माझी पूजा केली नाही' ही विचारसरणी अहंकाराची आहे. त्या अहंकारामुळे इंद्राने सर्व गोकुळाचा नाश करायचे ठरवले. आणि पाऊस पाडायला सुरुवात केली.

प्रलयकालचे जे मेघ आहेत त्यांना प्रेरणा केली. सारखा पाऊस पडायला लागला. कुठेही कोणाला बाहेर जाता येणार नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आणि पाऊस थांबण्याचे लक्षण दिसेना. त्यामुळे ते सगळे गोपाल वगैरे घाबरले. श्रीकृष्णांना त्यांनी येऊन सांगितले की, "इंद्र रागावलेला दिसतोय. तुम्ही उगीच आम्हाला त्या गायींची, गोवर्धन पर्वताची पूजा करायला सांगितलीत. आम्ही ती नंतर केली असती की. इंद्राचा यज्ञ करून मग आम्ही या सगळ्यांची पूजा केली असती. निष्कारण इंद्राला तुम्ही राग आणला आणि त्याचे फळ मात्र आम्हाला भोगायला लागते आहे."

हे सगळे बरोबर आहे, पण आता इंद्राला समज द्यायची आहे. इंद्राचा अहंकार मोठा आहे. असा अहंकार की त्यावेळी बुद्धीमध्ये जो संकल्प होईल त्याचे फल तत्काल दृष्टीला पडणारे आहे. प्रतिबंध कोणीही करू शकणार नाही. देवही जिथे प्रतिबंध करणार नाहीत तिथे बाकीचे काय करणार? देवेंद्राला कोण सांगणार? म्हणून अशी परिस्थिती निर्माण झाली.

इंद्र समजतोय, कृष्ण एक गवळ्याचा मुलगा आहे. त्याचे त्या गवळ्यांनी ऐकून माझा अपमान केला. त्या वेळेला कृष्णांचे ते सामर्थ्य प्रगट झाले. कृष्णांनी आपल्या हाताने गोवर्धन पर्वत उचलून धरला आणि गोपालांना त्याच्याखाली जाण्यास सांगितले. तिथे काही पाऊस लागत नव्हता. सगळी व्यवस्था झाली. पाऊस सारखा पडतोय. बाजूने पाणी आले तर? नाही. ते शेष महाराज होते की तिथे. त्यांनी बाजूने वेढा देऊन बाजूने पाणी आत शिरू न देण्याची व्यवस्था केली. ईश्वराच्या शक्तीचा विकास किती आहे हे इंद्रही समजू शकत नाहीये. पण या गोपालांचे जे शुद्ध भावनेने झालेले कर्माचरण आहे त्याचे फल त्यांना मिळते आहे.

इंद्राचा बुद्धिपुरःसर अपमान श्रीकृष्णांनी केलेला नाही, हे त्याला समजायला पाहिजे. ही पूजा करून नंतर इंद्राची पूजा केली असती. एखादे वेळी राहिली असती. त्यांच्या मनात आदर नाही का! पण वहिवाट! वहिवाटीमुळे हा अहंकार आहे. वहिवाटीप्रमाणे आम्ही मालक आहोत.

आमच्या इच्छेप्रमाणे व्हायला पाहिजे. इंद्राने सात दिवसपर्यंत सतत पाऊस पाडला. त्याच्या इच्छेला प्रतिबंध निर्माण झाला. सात दिवसात गोकुळाच्या केसालाही धक्का लागलेला नाही. सगळी मंडळी, गायी वगैरे आरामात आहेत. त्यामुळे तो अहंकार कमी झाला आहे. आणखी पाऊस थांबला. सूर्य उदयाला आलेला आहे. गोपालकृष्णांनी सर्वांना बाहेर यायला सांगितले.

इंद्राला पश्चात्ताप झाला. 'श्रीकृष्ण हे मानव आहेत, गवळी आहेत,' हे देवेंद्राने म्हणावे? देवांची ज्ञानशक्ती इतकी कमी आहे? त्यांना समजत नाही? सगळे देव भगवंताची प्रार्थना करण्याकरता गेले. ते म्हणाले, 'मी अवतार घेऊन येणार आहे. तुम्हीही या. हे ब्रह्मदेवांनी सर्वांना सांगितले हे इंद्र विसरून गेला ? हे विस्मरण होतंय. ईश्वरशक्तीचे ज्ञान असायला पाहिजे.' देवांना जन्मतःच वेदज्ञान असते असे सांगतात. पण ते वेदांचे ज्ञान असून उपयोग काय? देहात्मबुद्धी कायम आहे. त्यामुळे पूर्णता नाही. अहंकाराच्या जो जीवात्मा आधीन झाला आहे तो अपूर्ण आहे. याचे कारण म्हणजे तो अहंकाराच्या नियंत्रणाखाली आहे. त्याप्रमाणे सगळे घडते आहे.

देवेंद्राच्या मनातील क्रोधवासनेने सर्व गोकुळाचा नाश करायचे कार्य अत्यंत निंद्य आहे.

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।**
**वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे ।**

ही केवढी भूमिका आहे! कोणाचाही द्वेष करायचा नाही ही देवाची पूजा आहे. प्रत्यक्ष पूजा घडली नाही तरी हरकत नाही. म्हणजे ती मुद्दाम करायची नाही असे नाही. तीही करायची. बाह्यपूजाही आहे आणि अंतःपूजाही आहे. द्वेषरहित अंतःकरण असणे, शुद्ध सात्त्विक मन बनणे ही पूजा आहे देवाची. बाह्यपूजाही करायची.

इंद्राची पूजा करू नये असे श्रीकृष्णांना सांगायचे नाही. पण एकदा ती परीक्षा पाहिलेली आहे. देवेंद्र शरण आलेला आहे. गोलोकातून कामधेनू आली. तीही शरण आलेली आहे.

त्या कामधेनूने सांगितले, "भगवंता, आपण आम्हाला वाचिवले. सगळ्या गायींचा या इंद्राला नाश करायचा होता. देवयोनी म्हणजे भोगयोनी आहे. इंद्राला गोहत्येचे पाप लागायचे नाही. पण आमच्या सगळ्यांचा नाश झाला असता ना! आमचे संरक्षण करणारे आपण आहात. आपणच आमचे इंद्र आहात." त्यावेळी भगवंतांना गोविंद हे नाव पडले. गायींचा इंद्र तो गोविंद.

इंद्राच्या समक्षच त्या कामधेनूने सांगितले, "ह्या इंद्राला आम्ही मानणार नाही. आपणच आमचे इंद्र आहात." भगवान् अवतार घेऊन आले असतानाही संघर्ष घडताहेत. ते संघर्ष कसे दूर करायचे हे कौशल्य आहे. समन्वय करण्याची ज्याची बुद्धी आहे तोच खरा नेता होऊ शकतो. कोणाला कमी म्हणायचे, कोणाला जास्ती म्हणायचे यात संघर्ष कमी झाल्यासारखा वाटला तरी कमी होत नाही.

इंद्राने, कामधेनूने श्रीकृष्णांची पूजा केली. इंद्राने भगवंतांची क्षमा मागितली आहे. "हाच अधिकार तुमचा आहे का? त्रैलोक्याचे अधिपती आणि असेच वागता तुम्ही?" श्रीकृष्णांनी विचारले. हेराकडून ही बातमी आणायची नाहीये. हेर सगळेच खरे कसे सांगतील? आणि हेराकडून बातमी घेणारा जो आहे तो ज्ञानी नाहीच आहे. ज्या ठिकाणी पूर्ण ज्ञान आहे तिथे हेर हवेतच कशाला? इंद्राच्या वासना कमी झाल्या पाहिजेत. देवेंद्र पदावर आज आहे उद्या नाहीये. पण याची त्याला जाणीव नाहीये. सुखामध्ये तो फार आसक्त झाला आहे. त्याचा अहंकार वाढलेला आहे हे माहिती असून त्याची परीक्षा केलेली आहे. इंद्र हा त्रैलोक्याचा राजा झाला तरी संरक्षण करणारी शक्ती वेगळी आहे, त्याला समजावून सांगायचे आहे. नियुक्त केलेले अधिकारी जरी असे उद्दामपणाने वागू लागले तरी रक्षक शक्ती वेगळी आहे, हे दाखविणारा नेता असू शकतो.

इंद्राची कानउघाडणी करताना, श्रीकृष्णांनी सांगितले, "सर्वांशी दयेने वागत जा. तुम्ही कायमचे नाही आहात." कायम नोकरी, असे म्हणतो आपण. अगदी कायम झालो आम्ही नोकरीत. कायम म्हणजे? ठरलेले आहे.

५८ किंवा ५५. कायम याचा अर्थ तेवढाच आहे. म्हणजे जीवन असेपर्यंत असाही अर्थ नाही. जीवन असेपर्यंत नोकरी होणेही शक्य नाही. म्हणून त्यांनी तो कायदा केला असेल. तर ' इंद्र, इंद्र' जरी म्हटले तरी कायमचा नाहीये. याची तुम्हाला आठवण आहे की नाही ? गरीब बिचारे हे गोपाल, यांचा अपराध काय झाला ? आणि इतके रागावून सर्वनाश करायला प्रवृत्त झालात तुम्ही. त्याची बदली केली नाही, त्याला काढून टाकले नाही, निलंबित केले नाही. काही करायला नको. बुद्धीचे परिवर्तन केलेले आहे. बुद्धीचे परिवर्तन एखादा श्रेष्ठ नेताच करू शकतो. पश्चात्ताप झाला म्हणजे परिवर्तन झाले. तर इंद्रादिक देवांच्या मनामध्येसुद्धा अशा प्रकारच्या अशुभ वासना असू शकतात. जीवभाव त्यांनाही आहे. ते काही ईश्वर नाहीत. ईश्वराचे रूप आहे. विश्वरूपी परमात्माच इंद्र झालेला आहे. पण त्याला ते समजत नाही. 'इंद्ररूप झालेला मी ईश्वररूप आहे,' ही भावना नाही. त्यामुळे अशा प्रकारचे प्रमाद घडत आहेत. अहंकाराधीन झालेल्या जीवात्म्याकडून अशा तऱ्हेचे प्रमाद घडतात.

देवांच्यापेक्षाही अशुभ वासना असणारे दैत्यही आणखी प्रभावी बनत आहेत. आणि त्या देवांना त्रस्त व्हावे लागते. अखंड कर्मानुष्ठान घडावे आणि वेदज्ञान होण्याकरता ऋषी मंडळी बुद्धीचा उपयोग करीत आहेत. हीच त्यांची तपश्चर्या आहे. त्याकरता दुसऱ्या कशाचीही इच्छा नाही, याचना नाही म्हणून तर वेद टिकले. अल्प प्रमाणात का होईना यामुळे टिकले. वेदाध्ययन करणारी मोठी मोठी मंडळी आजपर्यंत होऊन गेली आहेत. सबंध वेदवाङ्मय कंठस्थ करणारी बुद्धी, देणगी घेऊन हे कार्य करू शकते का ? अनुदानाने हे शक्य आहे का ? ही परंपरा टिकण्यासाठी अनुदान दिले पाहिजे, अमूक केले पाहिजे वगैरे आता शासनाला वाटतंय असे म्हणतात. तेही किती दिवस वाटणार आहे कोणाला ठाऊक ! इतके आपण अनुदान दिले पुरे झाले, असेही वाटण्याचा संभव आहे. अनुदानाने विद्येची परंपरा राहू शकत नाही. 'पवित्र वेदज्ञान आमचे आहे' ही भावना पाहिजे. ते साक्षात् परब्रह्मरूप आहे, ही श्रद्धा मनामध्ये असल्यामुळे त्याच्याबद्दल अत्यंत आदरभाव आहे.

बुद्धीमध्ये असलेले दोष दूर करतात. मेधा निर्माण करायची. ऐकलेले बुद्धीमध्ये स्थिर झाले पाहिजे. मेधा म्हणजे 'धारणावति मेधा.' विसर पडतो. किती अभ्यास करायचा. जन्मभर अभ्यास केला तरी बुद्धीमध्ये काहीच राहाणार नाही. स्मरण राहिले पाहिजे अखंड. अशी बुद्धी बनवायची आहे. ती बुद्धी बनवण्यासाठी लागणारे संस्कार करायची योजना वेदांनीच सांगितली आहे. आणि मुख्य म्हणजे आपल्या मनामध्ये अत्यंत शुभवासना असल्या पाहिजेत. संपूर्ण वेदांचे अध्ययन करून त्याप्रमाणे आचरण करणाऱ्यांची इच्छा पूर्ण होणार नाही का? ते उपाशी राहातील काय? मंत्रामध्ये असणाऱ्या विलक्षण शक्तींचा आज आम्हाला अनुभव नाही. तो अनुभव घेण्यासाठी सर्वप्रथम शरीर शुद्ध पाहिजे. शरीर शुद्ध राहण्याकरता अन्न शुद्ध पाहिजे. अन्नाने मन बनते. पवित्र आहार घेतल्याने मनातले किल्मिष जातात. भगवान मुद्दाम सांगतात

यज्ञशिष्टाशिनःसन्तो मुच्यंते सर्व किल्मिषैः।

यज्ञातून शिष्ट जो आहार असेल तो घ्यावा. म्हणजे सर्व किल्मिष म्हणजे दोष जातात ना! मन शुद्ध होते. आहार शुद्ध असला म्हणजे अंतःकरण शुद्ध होते आणि मग ते शुद्ध अंतःकरण वेदज्ञान मिळवून त्याप्रमाणे आचरण करण्याकडे लक्ष देते.

बाकीच्यांकडे लक्ष नाही. जसं असेल तसं होईल. त्यात काय मोठेसे. मनाप्रमाणे, बुद्धीप्रमाणे आपण कितीही वागलो तरी कमीच पडतंय ना! मग ते ज्ञानार्थी म्हणतात, जे आम्हाला मिळवायचे त्याकडे आमचे मन प्रवृत्त झाले पाहिजे. बाकीचे कमी आहे. कमी आहे काही म्हणून उपयोग नाही. हा निग्रह आहे त्यांचा. मनात अशा वेदमंत्राबद्दल अत्यंत आदरभाव ठेवून निग्रह केला तर त्याचे फळ मिळते.

सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांच्या चरित्रात अशी गोष्ट वाचली असेल पुष्कळांनी. त्यांचे नुकतेच उपनयन झाले होते. वेदाध्ययन इतक्या लहान वयातच चालू झाले होते. पण त्या वयातही वेदमंत्रांची शक्ती

त्यांनी मिळवली होती. वेदाध्ययन तर पूर्णही झाले नव्हते. गणपतीचे उत्सव असायचे. कोकणामध्ये लांब लांब लोक राहायचे. रात्री गणपतीच्या आरतीला, मंत्रपुष्पांजलीला जाऊन मंडळी आपल्या घरी परत जात. अशीच काही मित्र मंडळी घेऊन महाराज निघालेले आहेत. अचानक एक मोठा नाग वाटेत आला. महाराजांनी हातात माती घेऊन मंत्र म्हणून त्या नागाच्या सभोवती टाकली. तो नाग तिथेच थांबला. लोकांना काय दिसले ? बाकीचे सहाध्यायी अध्ययन करीत होते. महाराजही अध्ययन करीत होते. कोणच्या मंत्रात काय शक्ती आहे आणि दुसऱ्या मंत्राच्या सहाय्याने ती शक्ती कशी वाढवता येते हे मंत्रशास्त्रामध्ये पुष्कळ सांगितले आहे. जो मंत्र महात्म्यांच्याकडून मिळालेला असेल त्याची शक्ती अधिक उद्दीपित करण्याकरता बीजमंत्र आहेत. मंत्राचे दहा संस्कार सांगितले आहेत.

म्हणजे मंत्राची मूळची शक्ती असतानासुद्धा ती उद्दीपित व्हावी, अधिक व्हावी, प्रगट व्हावी, प्रसूत व्हावी याच्याकरता हे उपाय आहेत. ते शब्दशास्त्र फार मोठे आहे. मोठे प्रमाण आहे. सृष्टीचा सगळा विकास कसा व्हावा हे मांडून दाखवणारे शास्त्र आहे.

तर तो नाग त्या मंत्रशक्तीच्या प्रभावाने तिथेच राहिला आणि ही मंडळी पुढे निघून गेली. जिथे गणपतीच्या आरतीला जायचे होते तिथे जाऊन परत येताना ह्या नागाबद्दल ते विसरून गेले.

मंत्रशक्तीचा उपसंहार करणारीही शक्ती आहे. अस्त्रविद्या म्हणजे मंत्रशास्त्रच आहे. अब्जावधी डॉलर खर्च करून अणुबॉंब निर्माण करायचा आणि मग शस्त्रकपात करायची हे चाललंय सध्या. दारिद्र्य सगळ्या जगात येणार आहे. हे कोट्यावधी रुपये वाचले तर जगात कोणीच दरिद्री राहणार नाही. पण तितकी भीती आहे. आपणच श्रेष्ठ झाले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी अहंकार आहे. व्यक्ती असो, राष्ट्र असो, समाज असो.

महाराज घरी परत आले आणि दुसरे दिवशी एकदम त्या नागाची आठवण आली. 'अरेरे ! आपण त्या नागाला तसेच ठेवले.' लगेच तिथे गेले

आणि बघतात, तो नाग त्याच ठिकाणी होता. ती माती घेऊन जे महाराजांनी अभिमंत्रण केले होते त्याच्या बाहेर तो नाग येऊ शकत नव्हता. पुन्हा त्या मंत्राचा उपसंहार केला.

आग्नेयास्त्र सोडल्यावर चारही बाजूंनी अग्नी प्रकट होतो पण तो शांत करण्याचेही सामर्थ्य पाहिजे आणि समोरच्या शत्रूच्या शक्तीनुसार कोणते अस्त्र सोडायचे हे ठरवले पाहिजे. समोरचा जर दुर्बल असेल तर भयंकर अस्त्र सोडायचे नाही असा मनाचा निग्रहही पाहिजे. अशा निग्रही, संयमी माणसालाच अस्त्रविद्या मिळायची. सर्वांनाच पूर्वी अस्त्रविद्या शिकविली जात नसे. ब्रह्मास्त्रज्ञान अश्वत्थाम्यालासुद्धा पूर्ण मिळाले नाही, द्रोणाचार्यांचा मुलगा असून! कर्णाबद्दल पक्षपात केला, अर्जुनाबद्दल जास्ती प्रेम दाखविले, पण अश्वत्थाम्याबद्दल पक्षपात केला असे द्रोणाचार्यांबद्दल म्हणायचे का? काय आक्षेप आमच्या बुद्धीतून निघतात! कर्ण श्रेष्ठ म्हणा की तुम्ही. कोण नाही म्हणतंय. पण नुसते त्यावर लेखनातून, भाषणातून नुसताच, 'तो श्रेष्ठ आहे' म्हणण्याचा उपयोग काय? तुम्ही काय शिकलात त्याच्यापासून? तुम्ही त्याचा काही आदर्श घ्या! केवढा दाता होता तो! त्याची दातृत्व बुद्धी, त्याग बुद्धी एवढी होती की, समोर मागायला आलेल्याला त्याने 'नाही' कधीच म्हटले नाही. सूर्यनारायणाने त्याला अगोदर सांगितले होते, "इंद्र दुसरे रूप घेऊन येऊन तुझी कवच कुंडले मागणार आहे." कर्ण म्हणाला, "माझ्याकडे जर कोणी ती मागितली तर मी नाही म्हणणार नाही." आणि खरोखरच त्याने ती काढून दिली. त्यामुळे त्याचे सामर्थ्य थोडे कमी झाले. यात द्रोणाचार्यांचा काय संबंध?

इंद्राला असे वाटले की, कवच कुंडले अर्जुनाला मिळावीत म्हणून त्याने कर्णाजवळ याचना केली. कर्णानेही ती देऊन टाकली. अर्जुनाबरोबर युद्ध करताना, "अर्जुन तरी राहील किंवा मी तरी राहीन" अशा पणाने वागणाऱ्या कर्णाने त्यागबुद्धीने ती कवच कुंडले त्यावेळी देऊन टाकली. हे जे काही गुण आहेत हे गुण घेतले पाहिजेत. लोकांच्या बुद्धीमध्ये कर्ण चांगला होता आणि

द्रोणाचार्य वाईट होते हे विषांकुर पेरून उपयोग काय? ते वाचून कर्णाप्रमाणे वागायला कोणी तयार आहे का? इतकी प्रतिकूल परिस्थिती असतानाही शेवटपर्यंत त्याने आपली महत्त्वाकांक्षा, आपला निश्चय सोडला नाही. कृष्णांनासुद्धा त्याने सांगितले, "मी पांडवांच्या बाजूला येणार नाही. दुर्योधन माझा मित्र आहे. त्या मित्राचा द्रोह मी करणार नाही. मी कृतघ्न होणार नाही." हे कोणी शिकले का कर्णापासून?

तर त्या मंत्राचे जे सामर्थ्य आहे ते कमी केले, काढून घेतले. एकदम जागा मोकळी झाली, तो नाग निघून गेला. म्हणजे आठ-दहा वर्षांच्या वयात हे वेदाध्ययन चालू असतानासुद्धा असे सामर्थ्य आहे त्या वेदमंत्रांमध्ये. दाखवून देणारा तसा पाहिजे. आणि ते समजून घेणारी बुद्धी अत्यंत शुद्ध पाहिजे. निष्ठा पाहिजे. सगळ्यामध्ये निष्ठेला महत्त्व आहे.

**श्रद्धावान् लभते ज्ञानम् तत्परः संयतेन्द्रियः ।। ४.३९ ।।**

अंतरंग साधनांपैकी श्रद्धा जसे साधन आहे तसे तत्पर म्हणजे तन्निष्ठ पाहिजे. ती निष्ठा तत्पर निर्माण करणारी आहे, ती तिथून दुसरीकडे जाणार नाही.

त्याप्रमाणे ही सगळी ऋषी मंडळी वेदनिष्ठ आहेत. त्या दुर्गमासुराने पुष्कळ युद्ध केले. देवीच्या शरीरातून कितीतरी विविध सशस्त्र शक्ती निर्माण झाल्या आहेत. आणि त्या शक्तींनी दुर्गमासुराचे सर्व सैन्य मारून टाकलेले आहे. किती तरी अक्षौहिणी सैन्य घेऊन आला होता तो. सर्व सैन्य नष्ट झाल्यावर दुर्गमासुराचे आणि देवीचे पुष्कळ काळ युद्ध झालेले आहे. आठ दहा दिवसात सर्व सैन्याचा नाश झाला.

दुर्गमासुराने काही होम हवन केले. रावण आणि इंद्रजिताने सुद्धा मंत्रशक्ती मिळविण्यासाठी होम हवन केले म्हणतात. बिभीषणाने रामचंद्रांना सांगितले, "इंद्रजिताचा यज्ञ जर पार पडला तर त्याला तुम्ही मारू शकणार नाही. अगोदरच तो यज्ञ बंद करा." कोणाचा यज्ञ बंद करायचा आणि

कोणाच्या यज्ञाला सहाय्य करायचे हेही समजले पाहिजे. हा धर्म आहे. इंद्रजितासारखा दैत्यकुमार अथर्ववेदाचे साहाय्य घेऊन रामचंद्र आणि वानर सेनेचा नाश करायचा या वासनेने यज्ञ करतो आहे. तो यज्ञ बंद केला पाहिजे. तो काही अधर्म होणार नाही. रामही काही बोलले नाहीत. इंद्रजिताचा यज्ञ जर पूर्ण झाला तर तो अदृष्य होऊ शकतो आणि अदृष्य होऊन बाणवर्षाव केला म्हणजे किती लोक मरून जातील! प्रतिकार कोणाचा करायचा? वानरांनाही समजणार नाही आणि मानवरूप धारण करणारे रामचंद्र आपल्या शक्तीला प्रगट करणार नाहीत. तेव्हा इंद्रजिताची अदृर्ष्य होण्याची शक्ती नष्ट करण्याकरता तो यज्ञ बंद पाडला.

बुद्धावतार धारण करून सर्व दैत्यांचा बुद्धिभेद केला. उपनिषदांमध्ये सांगितलेले निरनिराळे सिद्धांत त्यांना पटवून दिले. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' याच्या सारखा वेदांताचा सिद्धांत ऐकला, योग्यता नसताना, म्हणजे सगळा गोंधळ होऊन जातो. सर्वच मिथ्या आहे. सर्वच मिथ्या होत नाही. आपल्या शत्रूचे आपण किती नुकसान करू शकतो, अजून किती करता येईल असा सारखा विचार चालतो. आणि पुन्हा 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' म्हणायचे. देहात्मभाव कायम राहिलेला आहे. मिथ्या काय ठरते? म्हणून वेदांत सिद्धांत ऐकण्याची योग्यता प्राप्त झाल्याशिवाय ऐकू नये. त्याच्या विरुद्ध बुद्धीवर परिणाम होतो. म्हणून सर्वांना मोह उत्पन्न करण्याकरता भगवंतांनी बौद्धावतार धारण केला.

यज्ञयागापासून बाजूला करण्याकरता, युक्तिवादाने त्यांची बुद्धी फिरवली. केवळ युक्तिवादाच्या आहारी जाणारी बुद्धी पुढे जावू शकत नाही. श्रद्धेचा संबंधच त्या ठिकाणी नाही. युक्तिवादाचीच सवय झालेली आहे.

वाचस्पति मिश्र म्हणतात, तर्काशिवाय काही नाही. युक्तिवाद पाहिजे. डोळ्यासमोर हत्ती आहे. पण आम्ही म्हणतो नाहीये. तर्काने सिद्ध झाले पाहिजे. अरे डोळ्याने दिसतेय की! तर अनुमान प्रमाण किंवा तर्कप्रमाणाने आम्हाला त्याचे ज्ञान झाले, मग आमच्या मनाचे समाधान होते. असेही प्रयत्न

करणारे आहेत. बुद्ध तर्करसिक होते आणि त्यांनी दैत्यांचा बुद्धिभेद केलेला आहे. हे उपकार केलेले आहेत.

वैदिक परंपरेत वेदप्रमाणाबद्दल आदर आहे. त्यात सांगितलेल्या कर्म किंवा प्रमेयांबद्दल पूर्ण आदर आहे. कोणाच्याही बद्दल अनादर नाहीये. ही परंपराच चालत आलेली आहे.ती परंपरा सुरक्षित ठेवण्याकरता दैत्यांची बुद्धी त्यापासून बाजूला केली. ती बुद्धी जर या ठिकाणी आली तर सगळाच गोंधळ होणार. एक तर हे तरी श्रेष्ठ होतील. श्रेष्ठ याचा अर्थ ते आपली बाह्य उन्नती करून घेतील. आणि बाह्य उन्नती झाली तरी शेवटी देहात्मवाद! अहंकार नियंत्रित नसल्यामुळे यांच्या हातून जगाचा नाश होण्याचा संभव आहे. विश्वाचे संरक्षण करण्यासाठी म्हणून सर्वही दैत्यांच्या बुद्धीमध्ये मोह मुद्दाम निर्माण केला आहे.

या दुर्गमासुरानेही त्या मंत्राप्रमाणे होमहवन केलेले आहे. आणि रथात बसून युद्ध करण्याकरता तो बाहेर पडला. सर्व शक्तींना त्याने जिंकले. हा एक मोठा चमत्कार आहे. देवीच्या संकल्पाने निर्माण झालेल्या किती तरी शक्ती होत्या. त्यांच्याबरोबर युद्ध करून या दुर्गमासुराने त्यांचा नाश केलेला आहे. आणि मग महादेवी शताक्षी युद्धाला आलेली आहे. तिने आपल्या चार बाणांनी प्रथम दुर्गमासुराचे चार घोडे मारले. एका बाणाने त्याचा सारथी मारला. दोन बाणांनी त्याचे दोन हात तोडलेले आहेत. त्याच प्रमाणे एका बाणाने त्याच्या रथावरचा ध्वज तोडला. डोळे फोडून त्याच्या हृदयावर पाच बाण मारले. गतप्राण झाला तो. त्याने देवीशी युद्ध करताना - सन्मार्गाला विरोध करताना त्याची बुद्धी ईश्वरनिष्ठ झाली. देवीचा नाश म्हणजे या विप्रांचा नाश आपण सहज करू शकू. देवीचे संरक्षण विप्रांना मिळालेले आहे ना! देवीचा पराजय कसा करायचा, नाश कसा करायचा हा त्याला अखंड ध्यास लागल्यामुळे त्याचा देह पडल्यानंतर एक तेज बाहेर पडले आणि देवीच्या शरीरात गेले. शेवटी अंतकाली जी बुद्धी होईल त्याप्रमाणे गती प्राप्त होते हा मोठा शास्त्रसिद्धांत आहे. मृत्यू समीप आला असता आपल्या पापकर्माबद्दल पश्चात्ताप झाला आणि

ईश्वराचे स्मरण झाले तर ईश्वराची कृपा होते. प्रेमाने स्मरण होते किंवा द्वेषाने केले तरीही स्मरणच होते. ईश्वरस्वरूपापर्यंत मन जाऊन पोहोचते ना! शिशुपालाचा उद्धार झाल्याचे हेच कारण नारद महर्षी सांगतात. ते म्हणतात, ज्याचे मन कोणत्याही कारणाने का होईना, ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचलेले आहे त्याचा निश्चित उद्धार होतो. माध्यम कोणचेही असेल, द्वेष असेल, प्रेम असेल, भीती असेल. गोपींचा काम म्हणालात तरी हरकत नाही. गोपालकृष्ण सुंदर आहेत. अंतःकरण तिथे तल्लीन झालेले आहे. या निष्ठेचे फल म्हणजे देहात्मविस्मृती. अंतःकरण निष्ठ आहे. अगदी तत्पर झालेले आहे. त्याचं फल म्हणजे जीवभाव विसरून जाणे. स्वतःचे घरदार विसरून जाणे. आत्मविस्मृती व्हायला पाहिजे. सगळेच विसरून गेलेला आहे. सगळ्यांच्या आठवणीमध्ये आहे, लक्षामध्ये आहे, त्या सगळ्यांशी इतके तादात्म्य झालेले आहे की त्यामुळे ईश्वराचे स्मरण होऊ शकत नाहीये. आमचे मन ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचू शकत नाही. पण जर एखाद्याचे मन कोणत्याही माध्यमाद्वारा ईश्वरापर्यंत पोहोचले तर ते शास्त्राविरुद्ध होत नाही. काममाध्यमातून गोपींचे मन गोपालकृष्णांच्या ठिकाणी स्थिर झालेले आहे की अनेक जन्मांचा देहभाव त्या गोपी विसरून गेल्या. या कामाला दोष म्हणायचे की गुण?

अनेक जन्म एकच देहभाव आमचा स्थिर आहे - हा देह म्हणजे मी आहे, घरदार माझे आहे, त्याचप्रमाणे मन, इंद्रिये सगळी माझी आहेत. ही अहंता आणि ममतासुद्धा विसरून गेलेल्या गोपी. त्यांचे माध्यम काम असले म्हणून बिघडले कुठे? जाऊन पोहोचलंय त्यांचं मन त्या ईश्वरापर्यंत. त्या मुक्त झालेल्या आहेत. देहभाव वगैरे सगळे विसरून जाणे म्हणजे मुक्त होणे अनंत जन्मांच्या वासना निघून जाऊन त्यांच्या मनामध्ये गोपालकृष्णांच्या शिवाय काहीही नाही. ही केवढी त्यांची योग्यता आहे! कबीरजींना लोक म्हणत, कबीरजी, आपण एवढे मोठे रामभक्त आहात. पण कबीरजी म्हणायचे -

**कबीर, कबीर क्या कहे**
**जाओ जमुना के तीर ।**
**एक एक गोपी के प्रेम में**

बह गये कोटी कबीर ॥

ही खरी निरहंकारी भक्ती आहे. माझ्या पाठीमागे लागू नका बाबांनो ! गोपींचे प्रेम किती आहे ते पहा. त्यांच्या फलावरून परीक्षा करा. सर्व विसरून गेल्या त्या गोपी. शास्त्र विसरल्या आहेत. लोकापवाद विसरलेल्या आहेत. व्यवहार विसरून गेलेल्या आहेत. लोक काय म्हणतील, याचा विचार नाहीये. सर्व संत महात्म्यांना गोपीभाव धारण करून देवाची भक्ती करावी असे वाटतेय.

नाथांच्या किती तरी गवळणी आहेत. ज्ञानेश्वर महाराजांच्या गवळणी आहेत. खरी निष्ठा आपण गोपीभावात गेल्याशिवाय येणार नाहीये असे त्यांना वाटते. आपल्या अंतःकरणात जरी भक्ती, प्रेम असले तरी त्या गोपीभावात गेले तर अधिक त्यांना उजाळा मिळेल. म्हणून भगवंताच्या गवळणी ऐकल्यावर तत्काल मनाचे समाधान होते.

तर त्या दुर्गमासुराच्या शरीरातून जे तेज बाहेर पडले ते लिंगशरीरच असले पाहिजे. ईश्वर स्वरूपामध्ये ते विलीन होणे म्हणजे संपले. जीवभाव संपून गेला.

महालक्ष्मीची पूजा करताना महिषासुराची पूजा याकरता करतात. त्या जगदंबेशी तू आणखी तन्मय होऊन गेलेला आहेस. महिषासुर हा देवीस्वरूपामध्ये विलीन झालेला आहे. आता तो देवी झालेला आहे. त्याची पूजा केल्याशिवाय महालक्ष्मीची पूजा सांग होत नाही. कोणत्याही माध्यमातून त्या ईश्वर स्वरूपात मिसळले, एकरूप झाले तरी पुन्हा जीवभाव प्राप्त होणार नाही. अशा प्रकारचा एक विचार आहे.

उद्या नवमी आणि दशमी एका दिवशी आलेली आहे. उद्या अंतःपूजा म्हणजे काय, बहिःपूजा म्हणजे काय, महात्म्यांची अंतःपूजा कशी चालू असते हे सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या अभंगावरून, काव्यावरून त्याचा विचार करायचा आहे.

● ●

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते**

**श्री गणेशाय नमः ।**
**श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।**

दुर्गमासुराचा नाश केला म्हणून 'दुर्गादेवी' हे नाव प्राप्त झाले. अनेक नेत्र धारण करून आल्यामुळे 'शताक्षी'म्हणजे अनेकाक्षी हे नाव पडले. 'शाकंभरी' असेही नाव तिला आहे. क्षुधातृषार्त झालेल्या मानवांना धान्य दिलेले आहे, म्हणून शाकंभरी, शताक्षी, दुर्गादेवी अशा नावांनी देवी प्रसिद्ध झालेली आहे. सर्व देवांना, ऋषी मंडळींना आनंद झालेला आहे. देव मंडळी जगदंबेचे महत्त्व काय आहे हे जाणणारी होती. हे त्यांच्या स्तुतीवरून दिसून येते.

हा जो जगरूपी भ्रम निर्माण झालेला आहे तो आभास आहे. याला कारण म्हणजे आपणच आहात. चैतन्य, अधिष्ठानरूपाने कारण आहात आणि त्या चैतन्याच्या ठिकाणी भ्रम झालेला आहे. हे झाले मूळ स्वरूप. त्याशिवाय शाकंभरी वगैरे नावाने ओळखला जाणारा अवतार धारण करून दुर्गमासुराचा नाश केला. हे कार्य ज्या रूपाने केले त्या रूपाची स्तुती आहे. निर्गुण आणि सगुण एक आहे असे देव मानतात.

देवमंडळींमध्ये सर्वच जण काही सुखासक्त झालेली असतात असे

नाही. काही विवेकसंपन्नही असतात. मानवांमध्येही 'मनुष्याणाम् सहस्त्रेषु' का होईना पण असतो एखादा. वेदाध्यायी ऋषी मंडळी अखंड तत्त्वविचार करीत असतात. त्यामुळे हे जग हे भ्रामक कसे आहे आणि मूळ सत्याचे अधिष्ठान काय आहे हे त्यांना वेदप्रमाणावरून माहीत आहे. आणि त्याप्रमाणे त्यांचे चिंतनही अखंड चालू आहे. समाधी अवस्थेपर्यंत त्यांची भूमिका गेलेली आहे. ध्येय वस्तूचे ध्यान करता करता समाधी अवस्थेपर्यंत जाता येते. ईश्वरकृपासंपन्न, सद्गुरुकृपासंपन्न अभ्यास करणारे महात्मे या अवस्थेपर्यंत जाऊ शकतात.

मनाला चिंतनाला एक विषय द्यायचा आहे. जगत्‌रूपी विवर्ताचा विषय चिंतनाला कायमचा आहे. अनेक जन्म तो विषय मनात आहे. त्या विषयाला बाजूला करून चैतन्यरूपिणी जगदंबेचे अधिष्ठानरूप आहे त्याचे चिंतन करायचे आहे. पंचकोशांचे उत्तम ज्ञान झाले असले पाहिजे. व्यवहारामध्ये पंचकोश आहेत. त्याशिवाय व्यवहार कसा होणार? अन्नमय हा पहिला कोश आहे. पण ते कोश आहेत. चैतन्यरूपिणी जगन्माता त्या कोशांमध्ये झाकली गेलेली आहे.

बाहेर अन्नमय कोश आहे आत चैतन्य आहे. त्याच्याही पलीकडे प्राणमय कोश आहे. क्षुधा, तृषा हे विकार हे या प्राणमय कोशामुळे निर्माण होतात.

परिक्षित राजा मोठा भगवत् भक्त आणि विरक्त. पण तोही या क्षुधातृषांमध्ये सापडला. अरण्यातून येताना तहान लागली होती त्याला. म्हणून ऋषींचा आश्रम दिसल्यावर आत गेला. ऋषी समाधी लावून बसलेले आहेत. त्यांचे अंतःकरण स्थिर झालेले आहे. आणि त्या अंतःकरणात अधिष्ठानरूपी चैतन्य आहे त्याचे चिंतन चाललेले आहे. आणि त्यांचे मन अत्यंत स्थिर झालेले आहे. ही ब्रह्मज्ञानाची भूमिका आहे. 'अहम्' सगळा निघून गेला, सगळे कोश बाजूला झाले आहेत. आणि त्या सगळ्या कोशांना आधार, अधिष्ठान म्हणून जे चैतन्यरूप आहे त्या चैतन्यापर्यंत अंतःकरण गेले आणि तिथेच थांबलेले

आहे. अभ्यासाला चार प्रतिबंध आहेत.

ध्यानाचा अभ्यास सुरू केला आहे म्हणजे मन हे त्या परतत्त्वापर्यंत न्यायचे आहे. अंतःपूजाही चालू आहे. चिंतन चाललंय. चिंतन म्हणजेच पूजा. बाह्य पूजाही आहे.

पंचकोश हाच आत्मा म्हणून मानलेला आहे ना. आरंभाला तिथूनच पुढे जायचे आहे. अन्नमय कोशाच्या ठिकाणी मन स्थिर झाले पाहिजे. प्राणमय कोशाच्या ठिकाणी स्थिर झाले पाहिजे. त्याच्याही पुढं जायचंय.

परिक्षितासारखा सार्वभौम राजा तहानेने व्याकुळ होऊन पाणी, पाणी करतो आहे. सैन्य वगैरे कुठे पाठीमागे राहिले असेल. ऋषी महाराज समाधीमध्ये निमग्न आहेत. त्यांना बाहेरचे भान नाहीये. 'पंचकोशांतलस्थिते' असे देव सांगताहेत जगदंबेला, त्या जगदंबेच्या चैतन्यरूपापर्यंत त्यांचे मन जाऊन स्थिर झाले आहे. त्याच्या पुढे आता कुठे जायचे नाही. स्थिरतेचा परमावधी याला म्हणतात. अंतःकरण अत्यंत स्थिर होणं म्हणजे चैतन्यनिष्ठ होणं. ती अवस्था त्यांना अनेक जन्मांच्या सुकृताने, अभ्यासाने प्राप्त झालेली. लय नाही, विक्षेप नाही, कषाय नाही, रसस्वाद नाही. आरंभाला अधून मधून अनुभव येतात. पण त्या अनुभवांचेच चिंतन करण्यामध्ये मन निमग्न होते. असा दृष्टांत झाला, असे दिसले मला, असा आदेश ऐकायला आला याचेच चिंतन होते. म्हणजे मन हे तिथेच राहू शकते. 'रसास्वाद' हा मोठा दोष मानला आहे शास्त्रकारांनी. तिथून मन पुढे नेऊन ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर केले म्हणजे अभ्यास संपलेला आहे.

तर या भूमिकेवर ते ऋषी आहेत. राजे लोकही मोठे अधिकारी होते. आणि त्यांच्या राज्यामध्ये अशा प्रकारचे ब्रह्मनिष्ठ महात्मेही होते. त्यांचे तप चाललेले आहे. तप म्हणजे चिंतन करणे अंतःपूजा करणे.

त्यामुळे त्या ऋषींना आपल्या आश्रमामध्ये सार्वभौम राजा आलाय की, आणखी कोणी आलाय याचे भान नाहीये. सर्व इंद्रिये विलीन झालेली आहेत त्याची. सुषुप्तिमध्येही इंद्रियांचा लय होतो. अंतःकरण अद्यापि आहे.

नाही, काही नाही.

राजाला उत्तर तर मिळाले नाही. तहान तर अतिशय लागलेली आहे. राजा रागावला. ऋषींच्या आश्रमात पाणी मिळू नये अशा प्रकारची अव्यवस्था काय कामाची? कोणीच अतिथीचा परामर्श घेत नाही.

त्रिगुणात्मक स्वरूपापर्यंत ज्यांचे अंतःकरण जाऊन स्थिर झालेले आहे. त्यांना विधीनिषेधाचा संबंधच नाहीये. अहंकार गेलेला आहे ना! मी अमुक जातीचा आहे, अमुक वर्णाचा आहे, अमुक आश्रमाचा आहे असा अहंकारयुक्त देहाभिमान असतो आणि असे देहतादात्म्य जोपर्यंत असते तोपर्यंत विधीनिषेध हे जरूर असता विधींचेही पालन केले पाहिजे. विधींपेक्षांही निषेधांचे पालन केले पाहिजे. पण इथे काहीच संबंध नाही. ज्या अधिष्ठानावर सर्वही विश्व निर्माण झालेले आहे मग ते धर्मात्मक का असेना त्या विश्वामध्ये हे सर्वही आणखी नियम आहेत. त्या विश्वामध्ये कार्य करणारे, स्वतःचे स्वरूप त्या धर्मामुळे का असेना अमूक प्रकारचे आहे असे समजून घेणारे जे आहेत त्यांना हे सगळे नियम आहेत. मी कोण आहे, ही भावना संपून गेलेली आहे. 'अहम्'चा विलय होऊन गेलेला आहे. सोहम् सुद्धा नाही. 'अहम्' गेला. फक्त चैतन्य तेवढे राहिलेले आहे. 'आत्मसंस्तभनं कृत्वा न किंचित् अपिचिंतयेत्' ही भूमिका प्राप्त झाली. राजाच्या दृष्टीने हे निंद्य ठरलेले आहे आणि ऋषींची परीक्षा पहाण्यासाठी त्याने एक मेलेला साप ऋषींच्या गळ्यात अडकवला आणि तो निघून गेला. पुढे त्यांच्या मुलाने राजाला शाप दिला.

परंतु हा परिक्षित राजा प्राणमय कोशापर्यंतच येऊन थांबलेला आहे. "मी मोठा राजा असताना मला पाणी सुद्धा दिले नाही हा माझा अपमान आहे." आणि या विचाराचे पर्यवसान ऋषींचा अपमान करण्यामध्ये झाले. निंद्य कर्म घडलेले आहे. विधिनिषेधाचा अधिकारी असताना त्यांचे पालन शांत मनाने कोणत्याही परिस्थितीत करायला पाहिजे. ते केले नाही तर त्याचे शासन

होऊन जाते. सार्वभौम राजा असला तरीसुद्धा समाधि भूमिकेपर्यंत तो अद्यापि गेलेला नाहीये ना! तसा विचारही नाहीये. अहंकार! तादात्म्यबुद्धी! स्वतःला सार्वभौम राजा म्हणून समजतो आहे.

क्षुधा-तृषादि विकारांची जाणीव आहे. प्राणमय कोशातच तो अभिमानी जीव राहिला आहे. वास्तविक राजा मोठा भगवत् भक्त होता. त्याच्या हातून ऋषींचा अपमान होणे अशक्य होते. पण ते होऊन गेले. पुढच्या सगळ्या घटना व्हायच्या होत्या.

शुकाचार्य महाराज त्याला उपदेश करण्याकरता आपण होऊन आले. हा त्याचा अधिकार आहे. शुकाचार्यांनी जेव्हा भगवंताचे चरित्र सांगायला सुरुवात केली, तेव्हा तो एका आसनावर बसलेला आहे. सांगणारे शुकाचार्य महाराजही द्वंद्वातीत आहेत. त्यांच्या कृपेने म्हणा किंवा संगतीच्या प्रभावाने म्हणा हाही द्वंद्वातीत झालेला आहे. शरीराची काही कल्पना नाही. तहान भूक गेली. पंचकोशांच्या पलीकडे जाऊन त्याने भागवत ऐकले आहे. तो स्वतःच सांगतोय, "मला तहान भूक लागत नाहीये. मला काही व्यथा नाही, क्लेश नाहीत. आपल्या मुखातून भगवत कथारूपी अमृत मला मिळतंय." भगवत् कथेमध्ये काय सामर्थ्य आहे हे जाणण्याची त्याच्यात योग्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शुकाचार्य महाराज भागवत सांगत असताना त्याचे लक्ष सगळ्या कोशांच्या पलीकडे गेलेले आहे. त्याला नंतर ज्ञान झाले, म्हणतात. संपूर्ण भागवत ऐकल्यानंतर शुकाचार्यांनी त्याला उपदेश केलेला आहे.

"तू काही राजा नाहीस. तुला शाप मिळालेला नाही. तुला जन्म नाही, मृत्यू नाही." हे सगळं आपल्या अधिकार वाणीने समजावून सांगितले. आणि नंतर राजा त्या भगवत्स्वरूपाच्या चिंतनामध्ये निमग्न झालेला आहे. "तक्षकाने तुला दंश केला तरी तुझे शरीर जळून जाईल. तुला काही होणार नाही. तुला तक्षकाची भीती नाहीये. तू निर्भय आहेस." हे त्याला शुकाचार्यांनी सांगितले. राजाला त्याचे ज्ञान झाले आणि तो समाधि अवस्थेमध्ये असताना तक्षकाने त्याला दंश केला आणि त्याचे शरीर दग्ध होऊन गेलेले आहे. राजा

मुक्त झालेला आहे.

तर हे चिंतन अखंड घडले पाहिजे म्हणून सांगतात. मोठे मोठे ऋषी या चिंतनापर्यंत गेलेले आहेत. सगळी तयारी पूर्वीपासून करून ठेवलेली आहे. अंतःकरण स्थिर करणे. अंतःकरण स्थिर करण्याकरता इंद्रियांचा निग्रह करणे हे पहिले कार्य आहे.

वेदान्त शास्त्रामध्ये शमदमादि साधने सांगितली आहेत. बाह्य इंद्रियांच्या निग्रहाला ' दम ' म्हणतात. आणि मनाचा निग्रह इतका झालेला आहे की, मनातल्या सगळ्या वासना नाहीशा झालेल्या आहेत. त्याशिवाय मनाला स्थिरता येत नाही. चांचल्य हा मनाचा स्वभाव आहे असे वाटते पण तो स्वभाव जिंकायचा आहे.

भगवान् सांगताहेत उद्धवजींना, " प्रत्येकाचेच स्वभाववैशिष्ट्य आहे. पण तो जिंकायचा आहे. विषयाकडे जाणे हा इंद्रियांचा स्वभाव आहे. उपनिषदामध्ये तर सांगितलंय की, ब्रह्मदेवांनी बाहेरच जाणारी इंद्रिये निर्माण केली. केवढी हानी झाली आमची! आत राहायचं सोडून मनही त्या इंद्रियांबरोबर वाटेल तिकडे जातंय. काय ? बाहेर आहे काय ? अंतर्निष्ठा उत्पन्न झाली पाहिजे. तरच तो जीवात्मा आत्मस्वरूपापर्यंत जाऊ शकतो. साक्षात्कार संपन्न होतो. वासना मनातल्या नष्ट करून श्रवण करतात. श्रवण भूमिका हे अंतरंग साधनांपैकी पहिले साधन आहे.

श्रवण मुख्य मानतात. मनन, निदिध्यासन ही त्याला सहकारी कारणं आहेत. श्रवण झाले पाहिजे, मनन झाले पाहिजे. निदिध्यासन झाले पाहिजे. पुढे सगळे काम मनाचे आहे. बाहेरचे सगळे मन आत आले पाहिजे ना! ते कोणत्याही बाह्य विषयांकडे जाऊन उपयोग नाही. त्याचा स्वभाव इतका बदलून गेला पाहिजे, की ते बाहेरचे आत कधी आले,-अंतर्निष्ठ कधी झाले हे कळतच नाही.

बरीच वर्षे झाली. नरसोबावाडीला मौनीस्वामी नावाचे एक मोठे जीवनमुक्त महात्मे होऊन गेले. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज

पूर्वाश्रमात वाडीला यायचे त्यावेळी मौनीस्वामी तिथे होते असे सांगतात. बालवृत्ती आहे. लहान मुलांबरोबर बोलायचे, खेळायचे. गावातल्या लोकांना सांगायचे, " आज दूध घेऊन या. " दूध तापवायचे. देवाकडे आलेल्या सर्व मुलांना बोलवायचे आणि त्यांना दूध पिऊन जायला सांगायचे. ही स्थिती आहे. बालकांच्या बरोबर वागताना आनंदयुक्त अंतःकरण आहे, बालवृत्ती आहे. मुलांनी विचारावे, " स्वामी महाराज तुम्ही शाळेमध्ये गेला होता काय ? तुम्हाला एक, दोन, तीन, चार म्हणता येतं का ? म्हणा बघू." आता ही मुलांची वृत्ती आहे. स्वामीमहाराज मोठे आहेत ही कल्पना नाही. मुलांच्या मनात अनादर नाहीये. प्रेम आहे. स्वामी महाराजांनी म्हणायला सुरुवात करावी एक, दोन, तीन आणि वाणीच बंद व्हावी. अंतःकरण हे पुन्हा अंतर्निष्ठ होऊन गेलेले आहे. स्वस्थ, शांत बसायचे. काय स्वामी, मुलांबरोबर खेळतात वगैरे म्हणतील लोक. पण यांचे अंतःकरण केव्हाही त्या परतत्त्वाशी स्पर्श करू शकते. परतत्त्व स्पर्श मोठे साधन आहे.

अशी साधने आरंभापासून करता करता ज्यांचे मन हे परतत्त्वापर्यंत येऊन पोहोचलेले आहे, त्याचेच ते अंतःकरणात चिंतन करतात. वाणीने त्यांच्या तेच कार्य चाललेले आहे. पंचकोश सोडून ब्रह्मतत्त्वाचे जे अधिष्ठान असलेल्या चैतन्यरूपी भगवतीपर्यंत जाऊन पोहोचतात. तिथेच थांबायचे. अध्यारोप, अपवाद हे सगळे चाललेले आहे.

सगळे विश्व कसे निर्माण झाले ? प्रत्येकाच्या कारणापर्यंत मन जाऊन पोहोचले पाहिजे. कारण विचार मनाने झाल्यावर कार्य बाजूला होते आहे. भागवतामध्ये नारदांनी यालाच 'भावाद्वैत' असे सांगितले आहे.एक पदार्थ आहे, त्याचा शोध करायचा म्हटल्यानंतर पंचभूतांपर्यंत आले, पुन्हा पाठीमागे जायचे. त्याला कारण हा अहंकार आहे. महत् तत्त्व आहे. त्रिगुणात्मक प्रकृती आहे. माया शक्ती आणि तिचे एक अधिष्ठान असे एक आत्मतत्त्व आहे. म्हणजे हे सगळे गेले. कारणाच्या ठिकाणी मनाची स्थिरता जितकी जितकी अधिकाधिक होईल तितका अपवाद होऊन जातो आणि

अपवाद हीच अंतःपूजा आहे.

सद्गुरु वासुदेवानंद महाराजांची एक आरती आहे. महात्म्यांची आरती असो किंवा साधे बोलणे असो त्यांच्या शब्दामध्ये फार मोठा अर्थ भरलेला असतो. भगवान् दत्तात्रेयांची आरती प्रसिद्ध आहे.

**आरती ओवाळू अनसुया तनया दत्तात्रेया।**

महाराज दत्तात्रेयांची आरती करताहेत. ही अंतःपूजा चालू आहे हं! बाहेरही पूजा वगैरे करीत असतील. मंडळी सांगतात, ते नरसोबाच्या वाडीला आले म्हणजे संगमावर स्नान करायचे, पादुकांवर पाणी घालायचे, दंड वंदन करायचे. म्हणजे हे बाह्य आचरणही चालू होते. परंतु स्थिर बसल्यावर आत्माकार वृत्ती झालेली आहे. भगवान् दत्तात्रेय अनसूया तनय आहेत, ही मनाची विचारसरणी आहे. आणि तिथून सुरुवात झाली. आरतीचे निरांजन कोणते? आरती याचा अर्थ आरतीचे साधन.

सात्त्विक हृदय हे आरतीचे निरांजन. चिंतन चाललेले आहे मनाचे. युक्तायुक्त विचार करून विवेक, वैराग्य, शम, दम, श्रद्धा, तितिक्षा, संन्यास. सर्व व्यवहारापासून मन बाजूला झालेले आहे. उपरती. ही सगळी साधनं आहेत. त्या मनाला आरतीचे निरांजन हे सात्त्विक हृदय आहे. त्याचेही चिंतन आहे ना! पूजेमध्ये कोणची कोणची साधनं लागतात ती सगळी या अंतःपूजेमध्ये मांडलेली आहेत. अंतःकरण सात्त्विक झाले पाहिजे. सात्त्विक अंतःकरण किंवा हृदय म्हणजे प्रसन्नता. चित्तप्रसाद जो आहे, तो मोठा प्रसाद आहे. मोठी मोठी दुःखं आली तरीसुद्धा मन प्रसन्न आहे म्हणजे दुःखाचा आघात मनावर होतच नाही ना!

त्याचप्रमाणे सुखंही पुष्कळ आली तरीसुद्धा मनावर कोणता परिणाम नाही. ही जी स्थिती आहे तिला समप्राप्ती म्हणतात. ब्रह्मप्राप्ती झाल्यावर ही स्थिती येते. पण ज्यांच्या मनावर सुखाचाही परिणाम नाही, दुःखाचाही परिणाम नाही, त्यांचे अंतःकरण प्रसन्न आहे. कोणतेही विकार मनामध्ये नाहीत. हे सात्त्विक हृदय आहे म्हणून चिंतन चाललेले आहे. बाहेरचे निरांजन, बाहेरच्या

वाती, बाहेरचे तूप, बाहेर दिवा लागला की नाही हे सगळे आपण बाह्योपचार पहातो. इथे अंतःकरणातच सर्व आहे. याच्यामध्ये वाती कोणत्या?

**सात्विक हृदय हे आरती ।**
**निजकर्माच्या वाती ।**

अंतःपूजेत किती अनुकूलता आहे. आपल्या हातून घडलेली कर्मं आहेत. ती या निरांजनामध्ये घालून जाळून टाकायची आहेत. बाहेरच्या आरतीने ती जळून जातील असे नाही. जातील. बाह्यपूजेतील आरतीने ती जळून जातील. बाह्यपूजेमध्येही पुण्य आहे. पण त्याच्याहीपेक्षा अधिक पुण्य अंतःपूजेमध्ये आहे.

सगळी कर्मं त्या सात्त्विक हृदयरूपी निरांजनामध्येच आहेत सूक्ष्म रूपाने. धर्मअधर्म जे घडले आहेत ते फल देण्यासाठी सूक्ष्म वासनारूपाने त्या मनामध्येच (म्हणजे निरांजनामध्येच) आहेत. जास्त दुःख देणारी कर्मं आधी जाळून टाकायची वगैरे काही करायला नको. ज्या स्थानात आरती करायची आहे तिथेच सगळी कर्मं आहेत. ती सगळीही कर्मं या वाती आहेत, म्हणतात महाराज. तूप त्याच्यामध्ये पाहिजे की नको!

**विवेक स्नेहाने त्या निगुती ।**
**भिजवूनी ज्ञानज्योती ।**
**पाजळूनी पेटविल्या ।**
**ओवाळाव्या श्रीगुरुदत्तात्रेया ।।**

विवेक स्नेह आहे. अगोदर सात्त्विक हृदय बनवलेले आहे. देवाच्या आरतीकरता निरांजनच नाही दुसरे की ज्या निरांजनात सर्व संस्कार वातीरूपाने जळून जाणार आहेत. असे निरांजन म्हणजे सात्त्विक अंतःकरण आहे. आणि त्याच्यामध्ये विवेक, स्नेह आहे. विवेक स्नेहामध्ये त्या निजकर्मरूपी वाती भिजवल्या आहेत. चांगलीही कर्मं असतील आणि वाईटही कर्मं असतील. जी जी कर्मं घडली असतील ती सगळी सूक्ष्मरूपाने, वासनारूपाने, संस्काररूपाने मनामध्ये आहेत. अनंत जन्मांच्या कर्मांचे संस्कार मनामध्ये आहेत. आणि त्या संस्काररूपाने ती कर्मं त्या ठिकाणी आहेत. त्याच्यामध्ये विवेकरूपी तूप घातले

आहे, आणि -

**भिजवूनी ज्ञानज्योती। पाजळूनी पेटविल्या ।**

ज्ञानरूपी ज्योती आहेत. हे सगळे मनातच आहे. स्वप्नात मनच सगळे बनते म्हणून सांगतात. विषय तोच आहे. इंद्रियही त्या स्वप्नाच्या वेळेस मन बनलेले आहे.

अगोदर आपल्या मनाने सर्व चिंतन केलेले आहे. मन सात्त्विक झालेले आहे, हे मान्य केलेले आहे. त्याशिवाय ही आरती किंवा पूजा होणार नाही. सात्त्विक हृदय झाल्याशिवाय ही आरती होणार नाही. त्यात सगळी निजकर्मं आहेत वातीरूपाने. विवेक स्नेह आहे. आत्मानात्म विवेक आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहे. ते मन विवेकाने परिपूर्ण भरले आहे. मनच आता सगळं रूप होणार आहे ना!

वाती म्हणून जी काही कर्मं केली ते मनच आहे. संस्काररूपाने सगळी कर्मं त्या मनामध्ये आहेत. आरतीचे साधन, निरांजनही तेच आहे. विवेक स्नेहरूपी तूप जे घातलंय तेही ते मनच बनलेले आहे. आणि अशा त्या विवेकज्ञानरूपाने त्या सगळ्या वाती भिजवून टाकलेल्या आहेत. आणि त्यांना आता प्रज्वलित करायचे आहे. ज्ञानज्योती ज्या आहेत त्याही मनच आहेत.

अनेक जन्म तपश्चर्या करून अंतःकरणाला विषयापासून, संसारापासून बाजूला करण्याचा प्रयत्न करणारे, त्याकरता ईश्वराची अखंड भक्ती करणारे महात्मे, त्यांना शेवटी ईश्वरकृपेने ज्ञानज्योती (ज्ञान) प्राप्त होतात. अशुद्ध 'अहम्' नाहीसा झालेला आहे. आणि शुद्ध 'अहम्' प्रगट झालेला आहे. साक्षीरूप आहे. त्याचे वर्णन करताहेत महाराज पुढे.

'तर मीच आणखी चैतन्यरूप आहे, ब्रह्मरूप आहे' हे ज्ञान झाले आणि त्या ज्ञानज्योतीला ह्या वाती लावलेल्या आहेत. सद्‌गुरुनाथ दत्तात्रेयांना ओवाळायचे आहे. ह्या सगळ्या सामुग्रीमुळे ती आरती पवित्र झालेली आहे. आणि आरतीला सुरुवात झाली. मनानेच ही सगळी साधनरूपे धारण केली आहेत.

**सर्वांतरिचें जें निजगूज । साक्षीभूतचि तेज ।**

उपास्य कोण आहे ? कोणाची आरती करायची ? हेच सांगायला पाहिजे ना ! तिथे मनाने सुरुवात केली. यांच्यामध्ये किती काल जाईल, सांगता येत नाही. देहादिकांचे विकारांशी तादात्म्य जोपर्यंत झालेले आहे तोपर्यंत कालाची जाणीव आहे. इथे काही विकार नाहीत. पंचकोशांच्या पलीकडे जाऊन पोहोचलेले महात्मे हा अंतर्याग करताहेत. अंतःपूजा हा अंतर्याग आहे. जरी या आरतीत दत्तात्रेयांचे नाव घेतलेले आहे तरी -

**सर्वांतरिचें जें निजगूज । साक्षीभूतचि तेज ।**
**संसारवृक्षाचें आदिबीज । तो हा सद्‌गुरुराज ।**
**विरजब्रह्म जया म्हणति जया । श्रीगुरुदत्तात्रेया ॥**

परमात्मा सर्वांतर्यामी आहे. नित्य आहे. त्याला साक्षीभूत म्हटलेले आहे. आणि त्याच्याही पुढे जाऊन शुद्धापर्यंत जाऊन पोहोचले आहेत. चैतन्यरूपी आत्मतत्त्व म्हणजेच 'भगवती' आहे. तिलाच 'पंचकोशास्थिता' म्हणतात देव. ते संसारवृक्षाचे आदिबीज आहे. संसार म्हणजे अनंत ब्रह्मांड आहे. या संसाराची कल्पना कोणाला करता येणार नाही. वेदव्यासांसारख्या ज्ञानी भगवत् भक्ताने या सबंध ब्रह्माण्डाचे वर्णन प्रत्यक्ष पाहून केले आहे.

चतुर्दश भुवनांचे एक ब्रह्माण्ड असते. अशी किती तरी ब्रह्माण्डे आहेत. काही कल्पनासुद्धा येणार नाही, एवढा विशाल वृक्ष आहे. भगवान् सांगतात, हा केव्हा सुरू झाला, केव्हा संपणार काही सांगता येणार नाही. 'ऊर्ध्वमूलमधःशाखः' याचा अर्थ वर मूळ आणि खाली फांद्या असा नाही. "ऊर्ध्वम् उत्कृष्टम् मूलम्" असा अर्थ आचार्य महाराजांनी केला आहे. फार श्रेष्ठ मूळ आहे. अशी अनेक ब्रह्माण्डे निर्माण होताहेत, जाताहेत. कार्य चाललेले आहे. काहीही त्याच्यामध्ये फरक नाही.

कूटस्थ आहे. निर्विकार आहे. तर सर्वांच्या अंतर्यामी जे आहे, साक्षीभूत ते सर्व संसारवृक्षाला आदि कारण आहे.

**तो हा सद्‌गुरुराज । विरजब्रह्म जया म्हणती तया ।**

सद्गुरु मूर्तीही तीच आहे. ज्या ब्रह्म तत्त्वापर्यंत जायचंय आणि मूळचे स्वरूप प्राप्त करून घ्यायचंय तोच सद्गुरु आहे. त्यांनी जर कृपा केली तरच जीवात्मा त्या आत्मतत्त्वापर्यंत जाऊन पोहोचू शकतो, नाही तर नाही. म्हणून आणखी ईश्वर आणि गुरु एक आहेत. हीसुद्धा मनाची भावना आहे. सद्गुरुरूपाने मनाने चिंतन केले आहे आणि त्याचे शुद्ध स्वरूप म्हणजे 'विरजब्रह्म' आहे. कोणत्याही प्रकारचा ज्याच्यामध्ये संभव नाही. रजोगुणाचा मुद्दाम उल्लेख केला आहे. उत्पत्ती हे रजोगुणाचे कार्य आहे. सर्व संसार म्हणजे रजोगुण आहे. पण तोच याच्यामध्ये नाहीये. संसार उत्पन्न झाला. संसाराचे बीज याला म्हणायचे. अशा भावनेने ही आरती करायची.

**आरति उजळीता ह्या चित्ता । मध्ये तिळभर ध्वांता ।**
**वावहि नच मिळता हृष्यता । आली निमेष न जाता ।**
**सोहं प्रकाश हा हो सखया । श्रीगुरुदत्तात्रेया ।**

ही आरती जर चांगली झाली तर आरंभापासूनच कर्मं जळायला लागली आहेत. वेदब्रह्मापर्यंत मन गेलेले आहे. त्याचा साक्षात्कार झाला. मग कर्मांचा संपूर्ण नाश होतो. अशा स्थितीमध्ये ईश्वर हा सद्गुरु आहे, ज्ञान देणारा आहे, विद्यादाता तो आहे, ती भगवतीच विद्यादात्री आहे. ह्या भावनेने निर्गुणाच्या ठिकाणी मन न्यायचंय, उजळायचंय परंतु सगुणरूपाने, गुरुरूपाने, संसारवृक्षाच्या आदिबीजरूपाने त्याचे ज्ञान घ्यायचे आणि या ज्ञानाग्निमध्ये सगळीही कर्मं जळायला लागलेली आहेत.

**प्रकाश आरतीचा थोर । सबाह्य अभ्यंतर ।**
**मी - तू पण हाचि अंधकार । जाळुनि झळके फार ।**
**वेगळा वासुदेव तेथुनियां । नोहे दत्तात्रेया ।**
**आरती ओवाळू ।।**

ह्या आरतीमध्ये सगळी कर्मं पेटताहेत सारखी. ज्ञानाग्नीमध्ये ती कर्मं प्रदीप्त झाली आहेत. वेदब्रह्मापर्यंत अंतःकरण गेलेले आहे. 'सोहं' हा प्रकाश झालेला आहे. या प्रकाशामध्ये सर्वही एकंदर अज्ञान नाहीसे झाले आहे.

अहंकार (मी - तू पण) जो आहे तोच अंधकार आहे. बाहेरही तोच

कार्य करतोय. आतही तोच कार्य करतोय. अंतर्याग आपल्या हातून व्हावा असे वाटले, तरी तो अहंकाररूपी अंधकार अंतर्याग होऊ देत नाही. कोणती आरती करायची, त्याला तूप कोणते घालायचे, कोणत्या अग्नीवर प्रदीप्त करायचे हे काही कळू देत नाही. अंधकाररूपी अहंकार भरलेला आहे. तो अंधार आरतीच्या प्रकाशाने समूळ नाहीसा झाला आहे. मी - तूपण निघून गेले आहे.

**तुका म्हणे जेथे। नाही मी - तूंपण।**

पूजा कोणाची करायची ? मी एक लहान आहे आणि मोठा कोणीतरी आहे त्याची स्तुति करायची. पण लहान-मोठेपणा संपलाच की आता. अहंकारात्मक अंधार, मी - तूपण निघून गेलेला आहे आणि ही स्तुति करणारा वासुदेवसुद्धा राहिला नाही. त्या अंतर्यागाचे इतके महत्त्व आहे की, तो यागकर्ताच नाहीसा होऊन जातो. हेच चिंतन अखंड करणारे महात्मे आहेत.

उपास करणे, देहाला कष्ट वगैरे देणे हाही 'तप' शब्दाचा अर्थ आहे. पण हे पुढचे तप आहे. आरती कोणती व्हावी, त्या निमित्ताने चिंतन कोणते व्हावे हे सांगताहेत महाराज. यात सर्वही कर्मांचा विलय होतो आहे. अनेक जन्मांचा अंधार साधनांना झाकून टाकतो आहे. साधन होऊ शकत नाहीये. आज जे मन हे साधन करू शकते तिथपर्यंत मनाला यायाला किती काल गेला असेल ? किती जन्म गेले असतील ? अंधार पसरलेला आहे. त्या अंधारामध्ये ही सगळी साधनं आच्छादित झाली आहेत. झाकली गेलेली आहेत. साधनाही होऊ शकत नाही. हा साधनाभ्यास होण्याकरता सद्गुरु रूपाने ईश्वराचे अखंड चिंतन होणे आवश्यक आहे. सद्गुरूंच्या देहरूपानेसुद्धा ईश्वराचे अखंड चिंतन घडले पाहिजे. या दोन्हींचाही उल्लेख या आरतीत केला आहे. वासुदेव जरी आता शिल्लक राहिला नसला तरी सद्गुरुरूप ईश्वराचे चिंतन त्याने सोडलेले नाही. ईश्वरच सद्गुरुरूप आहे.

म्हणून सगळे देव जगदंबेची या रूपाने प्रार्थना करताहेत. 'पंचकोशास्थिता' म्हणतात तिला. हा अंतर्याग साधलेला आहे त्यांना सात्त्विक हृदय आहे. यज्ञयागादिक पुण्यकर्मं करून स्वर्गलोकात गेले आहे. सगळ्यांचीच

कर्मं सवासन झाली आहेत असं नाही. निर्वासन अंतःकरणाने त्यांची कर्मं झालेली असतील. त्यामुळेही स्वर्गलोक मिळाला असेल आणि त्या स्वर्गलोकात जाऊनसुद्धा त्यांचा हा अंतर्याग चालू असेल. जगदंबेचे स्वरूप त्यांना मनामध्ये आणता येणे हाच अंतर्याग आहे ना! बाहेर शताक्षी, शाकंभरी रूप दिसतंय परंतु देव म्हणताहेत.

पंचकोशान्तरस्थिता।

ते बाह्यरूप पाहूनही हे चिंतन चालू आहे. सर्व दृष्य नाहीसं झालं आहे. ते दृष्य नाहीसं होणं हा आणखी अपवाद आहे. मनाचा हा एक अभ्यास आहे. अभ्यास करता करता या चिंतनाने कर्मांचाही लय झालेला आहे. तो अंधकारही नाहीसा झालेला आहे. मी अमूक आहे, मी तमूक आहे असा अध्यास, देहात्मभाव कोणताही उरलेला नाही. अशा स्थितीमध्ये ऐक्य शेवटी होऊन गेले. ऐक्य याचा अर्थ जीवभाव संपला. जीव आणि ब्रह्म एक होणे म्हणजे काय? दोन म्हणायचे आणि एक कसे होतील? कर्मं संपली की जीवभाव संपला. जन्ममृत्यू संपले. त्यामुळे त्या महात्म्याच्या अंतःकरणात किती शांती, किती समाधान असेल! अशा महात्म्यांची त्यांच्याबद्दल आदरभाव असणाऱ्या पुण्यशील लोकांना जर संगती घडेल तर त्यांना मार्गदर्शन सहज होऊन जातंय. ज्ञानी महात्म्यांची संगती सहसा मिळत नाहीये. आधिकारी महात्मेच अशा ज्ञानी महात्म्यांची संगती मिळवून घेऊ शकतात. हा अंधार पसरलेला आहे. हा महात्मा आहे. हा काहीही करू शकेल. आम्हाला संसारातून आत्ता मोकळा करू शकेल, आमच्या मनात हे येतच नाही, असे आम्हाला वाटतच नाही. तर त्या दृष्टीने परिक्षित राजा सात दिवसांनी आपल्याला मृत्यू येणार हे समजल्यावर परमेश्वराला शरण गेला. ईश्वरच गुरु स्वरूपाने त्याच्याजवळ येऊन पोहोचला. ही त्याची किती जन्मांची पुण्याई असेल! ऋषींचा अनादर त्याच्याकडून घडलेला असेल. पण तो अंधारामध्ये असताना घडलेला आहे. त्या अवस्थेत काही कळत नाही ना! सगळेच आच्छादित झाले आहे. विवेकभ्रष्ट स्थिती होती त्याची. तो अंधार दूर करणारी गुरुशक्ती प्राप्त झाली. परमात्म्याची सर्व लीला त्याला

सद्‌गुरूंनी समजावून सांगितली. त्याच्या मनातला सगळा अंधकार दूर केला. अविद्या संपलेली आहे. अविद्या गेल्यामुळे जीवदशाही संपलेली आहे. मी ब्रह्मरूप झालो नाही. 'मी' गेला. ब्रह्म एकच आहे. ब्रह्मरूप व्हायचे नाहीये. आहेच.

तर अशा दृष्टीने ईश्वरकृपासंपन्न महात्मे निरंतर ईश्वरचिंतनात निमग्न असतात. अनेक जन्मांच्या अभ्यासाने ते चिंतन करण्याची योग्यता त्यांनी मिळवलेली आहे. भगवान् सांगतात, हा अंतर्याग करायची अवस्था अनेक जन्मांच्या अभ्यासाने, ईश्वर, सद्‌गुरु कृपेने प्राप्त होते आणि त्या आनंदात ते निमग्न असतात.

अशा रीतीने जगदंबेची कृपा सर्व देवांवर झालेली आहे. देवांना तिचे खरे स्वरूप कळलेले आहे. बाह्यरूपाने जगदंबा आली, त्या दुर्गमासुराचा नाश केला, आमची स्थाने आम्हाला दिली हे तर आहेच. पण हेच चिंतन किती करायचे? खरं जे स्वरूप आहे त्या स्वरूपाचे चिंतन आपल्याला घडलं पाहिजे. त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात स्तुती करताना हीसुद्धा स्थिती निर्माण झाली. 'सर्वही कोशांच्या अधिष्ठानरूप आधारभूत, असं आपलं रूप आहे, ते रूप आमच्या अंतःकरणामध्ये निरंतर राहावं,' ही प्रार्थना सर्वही देवांनी केलेली आहे, ऋषी मंडळींनी केलेली आहे आणि जगन्मातेची त्यांच्यावरही कृपा झाली.

देवी भागवतही मोठे आहे. जगदंबेने कोणती रूपे का धारण केली, कोणाचा नाश कसा केला वगैरे सर्व लिहून ठेवले आहे. ऋषींचे गेलेले वेदज्ञान पुन्हा त्यांना परत मिळाले आहे.

आचार्य महाराजांनी "साधना पंचकामध्ये" शेवटी सिद्धावस्थेचे वर्णन केले आहे. एकान्तामध्ये बसल्यानंतर हे चिंतन मनाने सारखे होतंय. किती जन्मांचे सुकृत त्यांचे असेल! सगुणाचेही चिंतन चाललेले आहे. त्यालाही प्रतिबंध नाही. मनातल्या सर्वही वासनांचा क्षय झालेला आहे. अमूक एकच पाहिजे असं नाहीये. भारतवर्षामध्ये व्यास महर्षींच्या रूपाने अवतार धारण करून ही सगळी ईश्वराची चरित्रे आपल्यासमोर ठेवलेली आहेत. हे त्यांचे केवढे

आपल्यावर उपकार आहेत!

आज आता ही सेवा समाप्त झाली आहे. जीवभाव असेपर्यंत सेवा झाली पाहिजे. नवविधा भक्ती आहे. त्याबद्दल मनामध्ये सतत उत्साह पाहिजे. श्रवण घडले पाहिजे, स्मरण अखंड झाले पाहिजे. सेवन झाले पाहिजे. अर्चन झाले पाहिजे. वंदन झाले पाहिजे. दास्य आहे. सख्य आहे, आत्मनिवेदन आहे. किती भक्तीचे प्रकार आहेत! मनातल्या वासना, कुसंस्कार दूर करण्याकरता हे सर्व आहे. साधनांची विविधता ही त्याकरता आहे. बाह्य याग घडला तरी हरकत नाही. त्यामुळे अंतर्याग करायची योग्यता प्राप्त होईल. तीच कृपा जगन्मातेची आम्हा जीवांवर असावी आणि त्या जगन्मातेच्या कृपेने कोणत्या तरी जन्मात असा अंतर्याग आम्हाला करता यावा. बाह्य यागात राहण्यात कृतार्थता नाहीये. तर, बाह्ययागही सोडायचा नाही, अंतर्यागही झाला पाहिजे. अशी मनाची स्थिरता, योग्यता आम्हाला प्राप्त व्हावी एवढीच जगदंबेच्या चरणी प्रार्थना.

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते**

